म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ११९२

# ह्या देशाचें प्रेम



REFBK-0010236

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: निबंध
क्रमांक ........ नों: दि: ........

# ह्या देशाचें प्रेम

१०२३५

संपादन :

जेम्स. एच. रॉबिन्सन

●

अनुवाद :

माधव मनोहर

REFBK-0010236

किंमत २ रुपये

कैलास प्रकाशन : १७.

*

प्रथमावृत्ति
जानेवारी १९५९

Copyright, The Christian Education Press, 1956

*

संपादन :
जेम्स. एच. रॉबिन्सन

*

अनुवाद :
माधव मनोहर

*

वेष्टन :
गोपालकृष्ण भोवे

*

मुद्रक :
व्यं. रा. शिंगरे,
सर्वोदय मुद्रणालय,
४५० बुधवार, पुणें २.

*

प्रकाशक :
नारायण पुराणिक,
कैलास प्रकाशन,
१२, त्रिभुवन रोड,
मुंबई ४.

कैलास प्रकाशन

अनुक्रम २५६४८ वि: १
क्रमांक ११९२ नों. दि. २४-११-५८

# लेखकांसंबंधीं :

**जेम्स एच्. रॉबिन्सन,** प्रस्तुत ग्रंथाचा संपादक व प्रस्तुत ग्रंथांतील अनेक प्रकरणांचा लेखक. ‘ चर्च ऑफ दि मास्टर’चा पॅस्टर व तत्संबद्ध ‘ मॉर्निंग-साइड कम्युनिटी सेंटर, न्यूयार्क’चा डायरेक्टर. ‘ टुमारो इज टुडे ’ नामक ग्रंथाचा व ‘ रोड विथाउट टर्निंग ’ नामक आत्मचरित्राचा लेखक.

**रॉबर्ट एल्. कार्टर,** ‘ न्यूयॉर्क बार’चा सदस्य. ‘ नॅशनल अॅसोसिएशन फॉर दि अॅडव्हान्समेंट ऑफ दि कलर्ड पीपल ’ नामक संस्थेचा अॅसिस्टंट स्पेशल कौन्सल.

**रॉबर्ट एम्. साइप्स,** ‘ फॅमिली वुईक मॅगेझिन ’ चा भूतपूर्व उपसंपादक, जाहिरात–मसुद्यांचा लेखक, व्यावसायिक नट, नभोवाणीलेखक व नाटयनिर्माता.

**जे. ऑस्कर ली,** ‘ इंटररेशिअल न्यूज सर्व्हिस ’ चा संपादक. ‘ नॅशनल कौन्सिल ऑफ दि चर्चेस ऑफ ख्राइस्ट इन दि यू. एस्. ए. ’ च्या ‘ डिपार्ट-मेंट ऑफ रेशिअल अँड कल्चरल रिलेशन्स ’ चा एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर.

**ह्यू एम्. स्माइथ,** ब्रुक्लिन कॉलेजमधील ‘ डिपार्टमेंट ऑफ सोशिऑलजी अँड अँथ्रॉपॉलजी ’ फॅकल्टीचा सदस्य. नीग्रो, आफ्रिकन व जपानी प्रश्ना-संबंधींच्या अनेकविध लेखांचा कर्ता.

**माबेल एम्. स्माइथ,** न्यूयॉर्क शहरांतील न्यू लिंकन स्कूलमध्यें अध्यापिका. ‘ नॅशनल अॅसोसिएशन फॉर दि अॅडव्हान्समेंट ऑफ कलर्ड पीपल ’ या संस्थेच्या निर्बंधसमीक्षकांनीं शालेय पक्षपाताच्या फिर्यादींसंबंधांत जें संशोधन प्रामुख्यानें उपयोजिलें, त्या संशोधनाची संपादिका.

**ज्यूलियस ए. टॉमस,** ‘ नॅशनल अर्बन लीग ’ च्या ‘ डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रिअल रिलेशन्स ’चा डायरेक्टर. १९५२ पासून राष्ट्राध्यक्षांच्या ‘ कमिटी ऑन गव्हर्मेंट कॉंट्रॅक्ट कंप्लायन्स ’ चा सल्लागार.

**विल्यम आर. हजिन्स,** ‘ कार्व्हर फेडरल सेव्हिंग्ज अँड लोन अॅसोसिएशन ऑफ न्यूयॉर्क सिटी ’ चा प्रेसिडेंट. ‘ अपटाउन चेंबर ऑफ कॉमर्स, न्यूयॉर्क रिअल एस्टेट बोर्ड, हार्लेम मॉर्टगेज अँड इंप्रुव्हमेंट कौन्सिल, हार्लेम रिअल एस्टेट बोर्ड ’ व ‘ क्वीन्स कौंटी स्टेट कमिशन अगेन्स्ट डिस्क्रिमिनेशन’ या संस्थांचा सदस्य.

---

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रस्तावना ... ... ... | १ |
| शैक्षणिक क्षेत्रांतील नवीं क्षितिजें ... ... ... | ११ |
| नागरिक हक्कांचा विस्तार ... ... ... | २८ |
| उदरनिर्वाहासाठीं नवी संधि ... ... ... | ४७ |
| औद्योगिक व स्वत्वसंबद्ध प्रगति ... ... ... | ६३ |
| धर्मानें आश्वासिलेला भ्रातृभाव ... ... ... | ७३ |
| अमेरिकन संस्कृतीस नीग्रोचा हातभार ... ... | ८७ |
| क्रीडाक्षेत्रांतील मानकरी विजेते ... ... ... | १०५ |
| राष्ट्र-संरक्षणसंबंधांतील समानता ... ... ... | ११३ |
| उपसंहार ... ... ... | १३१ |

**जेम्स एच. रॉबिन्सन**

# प्रस्तावना

वंशभेदाच्या प्रश्नानें अमेरिकन लोकांच्या सदसद्विवेक बुद्धीस जशी टोंचणी लावली आहे, तशी संयुक्त राज्यांतील अन्य कोणत्याही प्रश्नानें आजवर लावलेली नाहीं. आणि या राष्ट्राविषयीं ज्यांच्या अंतः-करणांत स्नेहभाव आहे अशा लक्षावधि परदेशस्थ लोकांना हा एकच एक प्रश्न सर्वांत अधिक बेचैन करून सोडतो, यांत शंका नाहीं. स्वतंत्र राज्य-पद्धतीच्या लोकशाही तत्त्वज्ञानावर ज्यांना आघात करावयाचा आहे, ते या एकाच प्रश्नाचा बुद्धिपूर्वक वारंवार निर्देश करतात; आणि या प्रश्नास विकृत रूप देऊन त्याचें प्रदर्शन जगभर मांडतात. अमेरिकन समाजांतील नीग्रो माणसाचें स्थान हें नेहमींच कम्युनिस्टांच्या प्रभावी प्रचाराचें लक्ष्य झालेलें आहे. आज जगांत सर्वत्र अमेरिकेविषयीं सद्भावना आहे. तिचा उच्छेद करण्यासाठीं नीग्रो-प्रश्नाचें धारदार शस्त्र सतत वापरण्यांत येतें. विशेषेंकरून मध्यपूर्व आणि अतिपूर्व भागांतील वंशजागृत लोकांच्या मनावर प्रचाराच्या शस्त्राघाताचा मनस्वी परिणाम होणें स्वाभाविक आहे; पण वस्तुस्थिति अशी आहे, कीं वंशभेद आणि पक्षपात समूळ उखडून टाकण्या-साठीं या देशांतील विचारी माणसें जसे यत्न करीत आहेत, तसे अमेरिकन जीवनांतील दुसऱ्या एका क्षेत्रांत दिसून येत नाहींत.

वांशिक पक्षपात हा आंतरराष्ट्रीय विचक्षणेचा विषय आहे. आणि त्याचे परिणाम दूरगामी घडणार, हें उघड आहे. वांशिक पक्षपात मूलतःच सदोष आहे. अमेरिकेंतील नीग्रो–प्रश्न सर्वाधिक महत्त्वाचा कां ठरतो, तें समजून

घ्यावयास हवें. वांशिक पक्षपात अमेरिकेच्या राजकीय ध्येयवादाशीं आणि धार्मिक नीतीशीं सर्वथा विसंगत आहे. माणसाच्या मूलभूत हक्कासाठीं आणि प्रतिष्ठेसाठीं अमेरिका जगभर सर्वत्र जे यत्न करीत आहे, त्यांची कुचेष्टा करण्याची संधि खुद्द अमेरिकेंतील वांशिक पक्षपातामुळें विरोधकांस उपलब्ध होते. इलिनॉइस राज्याचा भूतपूर्व गव्हर्नर आणि १९५२ च्या निवडणुकींत अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठीं उभा राहिलेला डेमोक्रॅटिक प्रतिनिधि ॲडलाय स्टीव्हन्सन आणि विद्यमान उपाध्यक्ष रिचर्ड निकसन हे दोघे विख्यात अमेरिकन नेते अतिपूर्व देशांचा दौरा करून नुकतेच परत आले. त्यावेळीं उभयतांनीं याच एका विषयासंबंधीं आवेशानें आपले विचार प्रगट केले. अमेरिकन नीग्रो अमेरिकन समाजाशीं पूर्णपणें एकरूप करण्यांत लोकशाहीच्या सामर्थ्याचें खरें प्रात्यक्षिक आहे आणि तें जगास सिद्ध करून दाखविण्याची जबाबदारी अमेरिकन जनतेची आहे, असें त्यांचें प्रतिपादन होतें.

गेल्या अर्धशतकांत वांशिक संबंधांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं अनेकविध परिणामकारक यत्न करण्यांत आले. पण गेल्या पंधरा वर्षांत प्रस्तुत प्रश्नाच्या संबंधांत सर्व देशभर विलक्षण जागृति झालेली दिसते. आणि या काळांत हे संबंध सुधारण्यासाठीं सुबुद्ध जनतेनें मनस्वी उद्योग केलेला आहे, असें इतिहास सांगतो. वीस वर्षांपूर्वीं जी प्रगति कल्पनेंतसुद्धां असंभव वाटली असती, ती दुसऱ्या महायुद्धानंतर झपाट्यानें साधलेली आहे. आशावादी ध्येयनिष्ठांच्या स्वप्नांतसुद्धां अशी विलक्षण प्रगति आकारलेली दिसली नसती. अमेरिकन जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत आणि विभागांत प्रत्यहीं अशी आश्चर्यकारक प्रगति होत आहे कीं मानवसंबंधांतील सर्वाधिक महत्त्वाची सर्वोत्तम अशी ही साधना होय, असा निर्देश आजचे लोक उद्यां करतील. यापुढील पंधरा वर्षांत वांशिक प्रश्न सोडविण्याचे हे यत्न याच वेगानें अबाधित चालू राहिले, तर प्रस्तुत प्रश्नाची सोडवणूक फार दूर नाहीं, असें विचारी लोकांस वाटतें. वांशिक संबंध सुधारण्याचा हा प्रश्न अत्यंत बिकट आणि विलक्षण तापदायक आहे, यांत शंका नाहीं. आणि हा प्रश्न जर अमेरिका सोडवूं शकली, तर तें यश जगाच्या इतिहासांत अतुलनीय म्हणून उल्लेखिलें जाईल.

या अभूतपूर्व प्रगतीचा अमेरिकेनें अभिमान बाळगावा अशी आज स्थिति आहे. पण एवढ्यानें सारें कांहीं झालें असें होत नाहीं. जें कांहीं साधलें, त्यापेक्षां कितीतरी अजून साधावयाचें आहे. वंशभेदाच्या कल्पनेंतून निर्माण होणाऱ्या कित्येक घटना अशा आहेत कीं, ज्यांची विचारवंतास शरम वाटावी. अमेरिकेसारख्या प्रगत देशांत अजून कांहीं कर्मठ असे आहेत कीं, ज्यांना माणुसकीचे मूलभूत हक्कच मंजूर नाहींत. अमेरिकेचे सुसंस्कृत राष्ट्राध्यक्ष, राज्यपाल, नगराध्यक्ष आणि मानवाच्या मूलभूत हक्कांचें जतन करूं पाहाणाऱ्या संस्था, धर्मसंघ आणि कामगार सभा यांचे सुधारणावादी यत्न निष्फल ठरावेत, यासाठीं हे कर्मठ सदा सिद्ध आहेत. लोकांस हव्या असलेल्या सुधारणेच्या गाड्यास हे कर्मठ खीळ घालीत आहेत. संकल्पित सुधारणा आकारास येऊं नयेत, यासाठीं अशा कर्मठांचे उद्योग नित्य चालू आहेत. देशांत असे कर्मठ अजून कित्येक आहेत—आणि त्यांच्यापैकीं कांहीं उच्चपदस्थ आहेत—कीं जे वांशिक शत्रुत्वाचें रक्षण करूं पाहात आहेत. वंशावंशांत युद्ध चेतवावें, अशी त्यांची मनीषा आहे. मानवाचे मूलभूत हक्क आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार या अशा लोकांस साफ नामंजूर आहेत.

प्रस्तुत ग्रंथांतील प्रकरणें ज्या विख्यात लेखकांनीं लिहिलीं आहेत, त्यांना हें सर्व कबूल आहे. अमेरिकन जीवनांतील नीग्रोचें स्थान आज पूर्वीचें राहिलेलें नाहीं, तें बदलत आहे, झपाट्यानें बदलत आहे, वांशिक संबंधांत पुष्कळ सुधारणा होत आहेत; हें सर्व खरें. पण या सुधारणेचा वेग असावा तसा नाहीं, हें पण तितकेंच खरें. प्रस्तुत ग्रंथाच्या संपादकास ज्यांनीं लेखन-साहाय्य दिलें आहे, त्यांना हें पक्केपणीं कळून चुकलें आहे कीं, वंशभेद समूळ उखडण्याच्या यत्नांत जरा सुद्धां कसूर होतां कामा नये. अमेरिकनांचे विचार आणि आचार यांत अजून महदंतर आहे. वस्तुतः आचार–विचार एकरूप असावयास हवेत. पण निकटचा भूतकाळ धैर्य देण्यास समर्थ आहे; आणि भविष्यकाळ आशादायक आहे. हें सर्व खरें, पण जोंपर्यंत अमेरिकेंतील कोणा एका व्यक्तीस मानवाचे सर्व मूलभूत हक्क व अधिकार सहज प्राप्त होत नाहींत, तोंपर्यंत कोणाहि प्रागतिक अमेरिकन माणसास स्वस्थता लाभणें शक्य नाहीं.

निर्दोष लोकशाही या देशांत अजूनपर्यंत प्रस्थापित झालेली नाहीं. पण योग्य दिशेनें आणि वेगानें अमेरिकेंतील सुधारणेचा प्रवास अखंड चालूच राहील. सुधारणावादी व्यक्तींनीं आणि संस्थांनीं स्वतःच्या जबाबदारीवर विसंबून न्यायालयांत मोठमोठे विजय मिळविले आहेत. देशासाठीं कायदे करण्याचें काम ज्यांच्या हातीं आहे, त्यांनीं प्रस्तुत संबंधांत इष्ट ते कायदे करावेत, यासाठीं जागरुक सुधारकांचे यत्न अखंड चालू आहेत. नगरांतील, राज्यांतील आणि राष्ट्रांतील अधिकारी वर्गांनीं वांशिक संबंध सुधारण्यासाठीं कायद्यानें दिलेले अधिकार शक्य तेथें कार्यवाहींत आणावेत, यासाठीं अर्ज-विनंत्या करण्यांत येत आहेत. समानतेच्या तत्त्वावर अधिष्ठित असलेली न्याय्य समाजरचना अस्तित्वांत यावी, यासाठीं सुधारणावादी अविरत यत्न व श्रम करीत आहेत. देशांतील कित्येक विभागांत एतदर्थ जे झटत आहेत, त्यांच्यांत नीग्रोंपेक्षां गोऱ्यांची संख्या अधिक आहे. पण अमेरिकन नीग्रो मध्यंतरीं स्वस्थ बसलेला नाहीं. शिक्षणानें तो सुधारत आहे. त्याचें उत्पन्न वाढत आहे. राजकीय दृष्टीनें तो जागृत होत आहे. आणि वांशिक संबंध-सुधारण्यासाठीं तो स्वतः शक्य ते सर्व यत्न सर्व शक्ति एकवटून करीत आहे स्वातंत्र्याचें संरक्षण करावयाचें असेल, तर देशांत न्यायाचें राज्य प्रथम प्रस्थापित व्हावयास हवें, या एकाच उद्देशानें तो झटत आहे. आत्मविकास साधण्याचा त्याचा यत्न अखंड चालूच आहे.

गेल्या दोन दशकांतील वांशिक सुधारणेचा हा अहवाल मनास धीर देणारा आहे. कारण त्याचा एकूण निष्कर्ष असा आहे कीं अमेरिकेचें स्वप्न साकार होऊं शकेल. त्यासाठीं अवश्य तो पुरावा येथें सादर करण्यांत आला आहे. इतिहासाची ही साक्ष अभ्यसनीय आहे. हा अहवाल समग्र अभ्यासिला, म्हणजे भविष्यकाळाचें सोनेरी स्वप्न आकारण्यास आवश्यक ती लोकशाहीवरील श्रद्धा दृढमूल होईल. आणि ध्येयसिद्धीसाठीं अधिक निकराचे यत्न करण्यास उमेद येईल. प्रस्तुत ग्रंथांत जी कथा निवेदिली आहे, ती संपूर्ण आहे, असें नाहीं. वांशिक संबंध सुधारण्याचे यत्न अमेरिकेंत सर्वत्र कसून होत आहेत. पण त्या सर्व यत्नांचा इतिहास संपूर्ण निवेदन करणें, हा प्रस्तुत ग्रंथाचा उद्देश नव्हे. अलीकडच्या

काळांत सर्वांस समान संधि आणि सर्वांस मुक्तजीवन जगण्याचें स्वातंत्र्य उपलब्ध करून द्यावें, एतदर्थ देशभर सर्वत्र जे यत्न करण्यांत आले, त्यांतील सर्वाधिक महत्त्वाच्या क्षेत्रांतील घटनांचा इतिहास येथें ग्रथित केलेला आढळेल. अमेरिकेंतील सार्वजनिक जीवनांत वंशभेदामुळें जो अन्याय मातला आहे, त्याचा परिचय येथें अभिप्रेत नाहीं. नीग्रोच्या छळाची कहाणी सर्वश्रुत आहे. अमेरिकेंत ज्याप्रमाणें सर्वांस ती विदित आहे, त्याचप्रमाणें या देशाबाहेर सर्वत्र तिचा परिचय व प्रचार झालेला आहे. कारण नीग्रोची बातमी ही जगाच्या कानाकोपऱ्यांत सर्वत्र उत्सुकतेनें वाचली जाणारी बातमी आहे. दुसरें असें कीं लोकशाही जीवनाचे जे शत्रु आहेत, ते अमेरिकें-तील वांशिक पक्षपाताचीं भेसूर चित्रें भडक रंगांत जगभर सर्वत्र तत्परतेनें दाखवीत आहेत. पण खुद्द अमेरिकेंत मात्र वांशिक पक्षपाताचें समर्थन करणाऱ्या कर्मठांचा वर्ग सावकाश पण निश्चयानें घटत आहे.

जगांतील पूर्वग्रहाचा आणि पक्षपाताचा जो इतिहास आहे, तोच अमेरिकेंतील पूर्वग्रहाचा आणि पक्षपाताचा इतिहास आहे. या पूर्वग्रहाचीं व पक्षपाताचीं पाळेंमुळें पूर्वेतिहासांत खोलवर रुजलेलीं आहेत. शिवाय त्या मुळांची गुंतागुंत अनेकविध आहे. गोरे आणि काळे यांची संस्कृति भिन्न आहे. त्यांत पुन्हा धार्मिक व राजकीय संबंध गुंतलेले आहेत. आर्थिक शोषण आहे. माणसाच्या वर्तनांतील दुर्बलता या सर्व संबंधांत प्रत्ययास येते. कांहीं बाबतींत जे एकमेकांपासून भिन्न आहेत, त्यांतील कांहीं जमावांचे परस्परांशीं असमर्थनीय असे बेबनाव आहेत. जमावांत, वंशांत, धर्मांत जे भयंकर संघर्ष निर्माण होतात, त्यांत भावनेचा अंश नेहमींच प्रबळ असतो. अशा स्थितींत सारासार विवेक भ्रष्ट वा नष्ट होतो. आणि स्वतःचे स्वार्थमूलक हेतु साधण्यासाठीं मानवी दुःखाचा जे व्यापार करतात, अशा भावजीवी वक्त्यांच्या मुखीं या संघर्षाचे स्फुल्लिंग सहजच चेततात आणि उफाळून पेट घेतात. अशा गंभीर प्रश्नांची योग्य आणि यशस्वी सोडवणूक भयावह प्रक्षोभक भाषणांनीं होण्याचा सुतराम् संभव नाहीं. वांशिक प्रश्नांची समाधानकारक उकल करावयाची असेल, तर त्यासाठीं सर्वांस समान असा एकच एक नैतिक व नागरिक कायदा अस्तित्वांत आणावयास हवा. लोक-

शाही ध्येयांशीं विसंगत असें वर्तन जेथें होईल, तेथें त्याचा कडाडून निषेध करावयास हवा. सुयोग्य शिक्षणसंस्कारांनीं लोकांच्या मनांत इष्ट तो बदल घडवून आणावयास हवा; ख्रिश्चन धर्मतत्त्वें आणि लोकशाही मूल्यें सर्व लोकांनीं आचरणांत आणावयास हवींत. या संबंधांत सुसंस्कृत नागरिक आणि सरकारी अधिकारी यांनीं नेतृत्व करावयास हवें. अमेरिकेंतील वांशिक संबंध सुधारण्यासाठीं पूर्वींपासून हेच मार्ग प्रभावी ठरलेले आहेत.

गुलामांचा व्यापार सुरू झाला आणि नीग्रोंची आयात अमेरिकेंत व्हावयास लागली, तेव्हांपासून टॉमस जेफर्सन आणि हॅरिएट बीचर स्टोसारख्या विख्यात स्त्री–पुरुषांनीं ग़ुलामगिरीविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. गुलामगिरीचा नायनाट करण्यासाठीं त्यांनीं लेख लिहिले, भाषणें केलीं आणि अमेरिकेचे नागरिक या नात्यानें नीग्रो लोकांस सर्व अधिकार प्राप्त व्हावेत, एतदर्थ श्रमांची पराकाष्ठा केली. ज्यांचीं नांवें इतिहासास माहीत नाहींत, अशा उत्तर व दक्षिण अमेरिकेंतील सज्जनांनीं गुलामांचा व्यापार बंद पाडण्यासाठीं आणि गुलामगिरीचा बींमोड करण्यासाठीं निकराचे लढे उभारले. त्यांच्याच यत्नामुळें १७८७ मध्यें वीस वर्षांनंतर गुलामांचा व्यापार बंद करण्यासंबंधीं एका कायद्याची रूपरेषा आंखण्यांत आली. त्यांचा प्रचार निष्फळ ठरला नाहीं. १८०८ मध्यें गुलामांचा व्यापार कायद्यानें रद्द करण्यांत आला. तदनंतर बारा वर्षांनीं गुलामांची आयात करणारा गुन्हेगार फांशीच्या शिक्षेस पात्र ठरावा असा कायदा करण्यांत आला.

परिणामीं देशभर सर्वत्र जागृति झाली आणि गुलामगिरीविरुद्ध चळवळ करणाऱ्या २००० संस्था देशभर संघटित झाल्या. लॉइड गॅरिसन्, फ्रेडरिक डग्लस, जॉन ब्राऊन, हॅरिएट टबमन, सोजर्नर ट्रुथ आणि आणखी किती तरी विख्यात समाजसुधारक, धर्मोपदेशक, कायदेकर्ते या सर्वांनीं मिळून गुलामगिरीच्या प्रथेविरुद्ध लोकमत संघटित केलें. या सर्व यत्नांची परिणति १८६० च्या सिव्हिल वॉरमध्यें झाली. खरें म्हणजे हें युद्ध ज्या अनेक कारणांसाठीं लढलें गेलें, त्यांतील एक कारण गुलामांच्या मुक्ततेचें होतें. पण लोकांच्या लेखीं मात्र हेंच एक कारण सर्वप्रथम व सर्वप्रमुख होतें. १८६२ मध्यें हें युद्ध संपुष्टांत आलें. तदनंतरच्या पस्तीस वर्षांत मुक्त गुलामांच्या

पुनर्वस्तीसाठीं दारुण संग्राम चालू होता. या काळांत अनेक ध्येयनिष्ठ गोऱ्या स्त्रीपुरुषांनीं तन–मन–धन वाहून नीग्रोंस सर्वतोपरीचें साहाय्य उपलब्ध करून दिलें. गुलामगिरींतून नव्यानें मुक्त झालेल्या स्वतंत्र नीग्रोंस शिक्षण देण्यासाठीं त्यांनीं शाळा काढल्या. आणि सार्वजनिक जीवनांत त्यांना प्रतिष्ठेचें स्थान प्राप्त व्हावें, यासाठीं उदंड यत्न केले. त्यांच्यापैकीं कित्येकांस बहिष्कृत जीवन कंठावें लागलें. कित्येक तत्कालीन जीवनांतून कायमचे उठले; आणि कित्येकांनीं नीग्रोला नागरिकांचे हक्क न्यायपूर्वक मिळावेत, एतदर्थ स्वतःच्या जीविताचें बलिदान केलें.

रबी स्टीफेन एस्. वॉइज, ओस्वाल्ड गॅरिसन, विलार्ड जेम्स, वेल्डन जॉन्सन, रोजर बाल्डविन, रेव्ह. जॉन हेन्स होम्स, ज्यूलियस रोजेनवाल्ड, विल्यम लॉइड गॅरिसन, किंकल जोन्स, हॉलिंग्जवर्थ वुड्स इत्यादि विख्यात अमेरिकन नेत्यांच्या मदतीस हजारों सज्जन अमेरिकन धांवून आले. या सर्वांनीं मिळून नीग्रोंस मानवांचे मूलभूत हक्क प्राप्त व्हावेत, यासाठीं प्रचंड लढे उभारले. या यत्नांतून चालू शतकाच्या प्रारंभीं स्थापन झालेली 'नॅशनल ॲसोसिएशन फॉर दि ॲडव्हन्समेंट ऑफ कलर्ड पीपल्' आणि 'नॅशनल नीग्रो अर्बन लीग' सारख्या देशव्यापी संस्था प्रवर्तित झाल्या. नीग्रोच्या स्वातंत्र्याची सनद जाहीर झाल्यावर अमेरिकन बंधुतेचें स्वप्न साकार व्हावें आणि स्वतंत्र लोकशाहींतील सर्व नागरिकांस उपलब्ध होणारी संधि त्याला विनासायास प्राप्त व्हावी, त्याचे हक्क व अधिकार त्याला जन्मतःच मिळावेत, यासाठीं देशांत शेकडों स्थानिक व राष्ट्रीय संस्था सर्वत्र स्थापन करण्यांत आल्या व त्यांच्या कार्यांत हजारों गोऱ्या अमेरिकनांनीं आपल्या सर्व शक्ति वेंचल्या. आतां तर स्थिति अशी आहे, कीं उत्तरोत्तर या कार्यांत गढलेल्या उदारमतवादी सज्जनांची संख्या प्रतिदिन वाढत आहे. आणि त्यांच्या संदेशाचा प्रचार देशाच्या प्रत्येक क्षेत्रांत हिरीरीनें होत आहे. राष्ट्राध्यक्षांपासून तों सामान्य नागरिकापर्यंत, मोठमोठे उद्योगपति आणि त्यांचे मुकादम, कामगार–नेते व त्यांचे श्रमजीवी अनुयायी, पंडित प्राध्यापक आणि जिज्ञासू विद्यार्थी, सार्वजनिक जीवनांत अग्रेसर असणारी प्रसिद्ध समाज-सेविका आणि घरांघरांतून राबणारी गृहिणी, हे सर्व स्त्रीपुरुष आणखी

हजारोंच्या संख्येनें या कार्यांत सहभागी होत आहेत. आतां तर लोकजागृति करणाऱ्या ध्येयनिष्ठ नेत्यांचीसुद्धां जरुरी राहिलेली नाहीं कारण लोकांनींच या कामांत पुढारपण पत्करलें आहे.

नीग्रो प्रश्नाच्या संदर्भात आज जी प्रगति घडून येत आहे आणि उद्यां काळचा–गोऱ्यांतील पक्षपात नाहींसा करण्याच्या कामीं जे यत्न कारणीं लागणार आहेत, त्यांचें सर्व श्रेय वीरवृत्तीच्या या त्यागी समाजसेवकांस द्यावयास हवें. सनातनी कर्मठांच्या दुराग्रही विरोधास न जुमानतां खऱ्या-खुऱ्या लोकशाहीची प्रतिष्ठापना या देशांत करण्यासाठीं जे बद्धपरिकर झाले आहेत आणि सेवाभावी वृत्तीनें अविरत परिश्रम करीत आहेत, त्यांच्याच उज्ज्वल ध्येयनिष्ठेचें हें श्रेय आहे. लोकशाही समाजरचनेचा पाया या ध्येय-निष्ठांनींच घातला. आतां त्या मजबूत पायावर न्यायाचें व समानतेचें भव्य मंदिर आकारत आहे. ज्या देशव्यापी संस्थांच्या विद्यमानें या हजारों स्त्री-पुरुषांनीं शहाणपणानें आपले यत्न संघटित केले, त्या संस्थांस कित्येक सरकारी अधिकाऱ्यांचा रोष सहन करावा लागला आहे. त्यांच्या टीकेस व विरोधास न जुमानतां हें मानवतेचें काम अखंड चालू आहे.

आजवर जें कांहीं साधलें, तें सर्व लोकशाही मार्गानें व घटनेच्या चौकटींत काम करूनच साधलें आहे. लोकांच्या मनोवृत्तींत जो इष्ट बदल घडून आलेला दिसत आहे, तो शांततेच्या हृदयपरिवर्तनानें व न्यायालयांतील न्यायदानानें आजवर घडून आला आहे. अमेरिकन लोकशाहीच्या परंपरा-प्राप्त घटनेस अनुसरून हें सर्व घडून आलें आहे. जें कांहीं साध्य झालें, तें पुढील साध्यास साहाय्यभूत ठरतें; पूर्ण विकासाच्या वाटा शोधून मोकळ्या करतें. पक्षपाताच्या बुरख्याखालीं जो सैतान दडला आहे, त्याला हतप्रभ व नष्ट करण्यासाठीं हे सर्व यत्न संघटित झाले आहेत. अधिक जोमदारपणानें होत आहेत. आणि त्यामुळें वांशिक प्रश्नाची सोडवणूक वाटत होती, तेवढी बिकट वा असाध्य नाहीं, हें सर्वांस निश्चयानें कळून चुकलें आहे. प्रगतीचे विरोधक निष्प्रभ होत आहेत. आणि जें घडून यावयास हवें, असें सर्व सज्जनांस वाटतें, तें घडून येईल, अशी उमेद मानवतावादी मनांत बाळगून आहेत.

वस्तुस्थिति अशी आहे कीं जगांत सर्वत्र सामाजिक क्रांतीचे वारे वाहत आहेत. क्रांतीचा संचार जगभर सर्वत्र आहे. मानवांमानवांतील संबंध सुधारण्याची साद ही क्रांति लोकांस देत आहे. आफ्रिकेंतील व आशिया खंडांतील सुप्त जनतेस या क्रांतीची चाहूल लागली आहे. तेथील जनता आज जागृत होत आहे. आपणसुद्धां देवाचींच अपत्यें आहोंत आणि माणुसकीची संपूर्ण प्रतिष्ठा आपणांस प्राप्त व्हावी, यासाठीं तेथील जनतेची धडपड अखंड चालू आहे. स्वयंशिक्षणाचें वरदान तेथील लोक मागत आहेत. आत्मसन्मानाच्या अभिमानानें प्रेरित झालेले हे लोक सर्वत्र स्वराज्याची मागणी मुक्तकंठांनीं करीत आहेत. स्वतःच्या विकासाच्या वाटा मोकळ्या व्हाव्यात, यासाठीं ते विकसित राष्ट्रांतील लोकांचें साहाय्य हक्कानें मागत आहेत. सर्वतोपरींच्या जुलुमापासून त्यांना मुक्तता हवी आहे. अज्ञान, भूक आणि आजारपण यांजपासून त्यांना मुक्तता हवी आहे. उर्वरित जगाशीं सहकार करण्याची भाषा ते बोलत आहेत. आणि हा सहकार प्राप्त झाल्याशिवाय ते स्वस्थ बसणार नाहींत. काळोखांत लुप्त झालेलीं हीं राष्ट्रें गेलीं कित्येक शतकें क्रांतीची वाटचाल करीत आहेत. दुसऱ्या महायुद्धामुळें या वाटचालीस वेग प्राप्त झाला आहे. साम्यवादाच्या शक्ति त्या अर्धजागृत लोकांत प्रक्षोभ माजवीत आहेत. पण तेथें जी क्रांति घडून येत आहे, तिचीं पावलें साम्यवादाच्या रोखानें पडत नाहींत. तेथील लोकांचीं ध्येयें आणि स्वप्नें लोकशाहीचीं आहेत. लोकशाहीस अनुकूल असें त्या देशांतील वातावरण आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञानांतील जें जें म्हणून श्रेयस्कर आहे, तें तें सर्व तेथील लोकांस स्फूर्तिप्रद व मार्गदर्शक झालेलें आहे. पाश्चात्यांची सामाजिक साधना ही त्यांच्या यत्नाची प्रेरणा आहे. मानवाचें स्वातंत्र्य हें त्यांचें ध्येय आहे. इच्छेची सामुदायिक शरणागति ते पत्करणार नाहींत. त्यांना स्वातंत्र्य हवें आहे. कसली म्हणून गुलामगिरी नको आहे.

जगभर सर्वत्र जी सामाजिक क्रांति आकारास येत आहे, तिचाच एक अविभाज्य घटक अमेरिकेच्या भूमीवर घट्ट पाय रोवून निश्चल उभा आहे. अमेरिकेंत आज जें घडत आहे, तें जगाच्या प्रागतिक वाटचालीशीं सर्वस्वीं सुसंगत आहे. अमेरिकन लोकांच्या गेल्या दोन पिढ्यांनीं क्रांतीची ही मंद

पण निश्चयी वाटचाल पाहिलेली आहे. या देशांत आणि जगांत सर्वत्र ही क्रांति आकारत आहे. क्रांतीची वाटचाल कोणीही रोखूं शकत नाहीं; रोखणार नाहीं. सुदैवानें लोकशाहीचा वारसा जगांतील जनतेस सर्वत्र प्राप्त झाला आहे. सर्व माणसांचे हक्क व अधिकार समान आहेत, ही या क्रांतीची घोषणा आहे. आणि लोकशाहीच्या वातावरणांत रक्तशून्य क्रांति शांततेनें घडून येते, हें जगांतील सर्व लोकांस मनोमन पटलें आहे– अर्थात लोकशाहीवर ज्यांची दृढ श्रद्धा आहे, अशा लोकांस.. अशा लोकांचा हृदयपरिवर्तनावर विश्वास आहे. लोकशाहीच्या चौकटींत शांततेच्या न्याय्य मार्गानें इष्ट ते बदल समाजाच्या अंतरंगांत घडवून आणतां येतात, ही इतिहासाची साक्ष त्यांना मंजूर आहे. ही धारणा व श्रद्धा त्यांच्या मनांत नसती, तर ' नॅशनल अर्बन लीग, अँटि–डिफेमेशन लीग, सदर्न कॉन्फरस ऑफ ह्यूमन वेल्फेअर ' आणि 'नॅशनल ॲसोसिएशन फॉर दि ॲडव्हान्समेंट ऑफ कलर्ड पीपल ' अशा संस्था अस्तित्वांतच आल्या नसत्या, भरभराटल्या नसत्या; त्यांचें कार्य अशा रीतीनें सफल झालेलें दिसलें नसतें. अखेरीस या अशा संस्थांनींच नीग्रोच्या उन्नतीस सर्वाधिक हातभार लावला आहे. नीग्रोची स्थिति आज पूर्वीपेक्षां सुधारलेली दिसत असेल, तर त्या सुधारणेचें सर्वाधिक श्रेय या अशा संस्थांचें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २५९४८ वि: ...
क्रमांक ११८२ नों: दि: १४-११-...
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
१०२३६
क्र. क्र.

जेम्स एच. रॉबिन्सन
माबेल एम्. स्माइथ

# शैक्षणिक क्षेत्रांतील नवीं क्षितिजें

अमेरिकन नीग्रोस आज शिक्षणाची संधि आणि सोय देशभर सर्वत्र उपलब्ध आहे. तो मनांत आणील, तर अमर्याद शिक्षण कोठेंहि घेऊं शकतो. शिक्षणाच्या क्षेत्रांत वांशिक संबंध जसे सुधारलेले दिसून येतात, तसे अन्य कोणत्या एका क्षेत्रांत दिसून येत नाहींत. शिक्षणक्षेत्रांत त्याच्या विकासास संपूर्ण वाव आहे. तेथें अमेरिकन समाजाशीं तो एकरूप होऊं शकतो. आज नीग्रो किती प्रगत झाला आहे, याचें गमक म्हणजे त्याचें शिक्षण होय. शिक्षणाच्या साधनानें पुढील प्रगतीच्या वाटा आपोआप मोकळ्या होतात. शिक्षणामुळें कामधंद्यांतील अधिक चांगल्या जागांसाठीं तो स्वतःच उपयुक्त ठरूं शकतो. तेणेंकरून त्याचें जीवन अधिक सुखकर, सुरक्षित आणि यशस्वी होतें. शिक्षण नसेल, तर दारिद्र्यांत जन्म काढावा लागतो. आणि अज्ञान, आजारपण, गुन्हेगारी व निराशा हेंच अशिक्षिताचें भागधेय होतें. उलटपक्षीं शिक्षणामुळें केवळ माणसाचा आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक दर्जा वाढतो, असें नाहीं; तर एकूण समाजास त्याची शक्ति अधिक उपकारक ठरते. स्वतःच्या हक्काविषयीं तो अधिक जागरुक व दक्ष असतो. पक्षपाताचे दोष तो धैर्यानें दाखवूं शकतो. नागरिक या नात्यानें त्याची प्रतिष्ठा अधिक वाढते. आणि लोकशाही समाजांत जे मूलभूत हक्क त्याला जन्मःतच प्राप्त झालेले असतात, त्यांचें संरक्षण करण्यास तो अधिक समर्थ होतो. लोकशाही समाजाचीं ध्येयें व त्याचे कायदे यांचें त्याला ज्ञान असतें, आणि त्याच्या

बळावर तो त्या ध्येयांची व कायद्यांची कदर राखूं शकतो. याहून अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वतःच्या कर्तृत्वाच्या बळावर वंशावंशांतील भेद कमी करण्यास तो साहाय्य करूं शकतो, आणि गोऱ्या लोकांशीं स्नेहाचे संबंध निर्माण करूं शकतो. ज्यांचें शिक्षण एकसारखें झालेलें आहे, आणि पुढील शिक्षणासाठीं ज्यांना समान संधि उपलब्ध आहे, अशीं भिन्न वंशांतील माणसें जेव्हां एकत्र येतात, तेव्हां उभयतांस स्वाभिमानाची जोपासना करावी लागते, हें तो जाणून असतो.

गेल्या अर्ध शतकांत संयुक्त राज्यांतील अमेरिकन नीग्रोनें शिक्षणाच्या क्षेत्रांत आश्चर्यकारक प्रगति केली आहे. गेल्या वीस वर्षांत त्याच्या शिक्षणाची गति अप्रतिहत वाढलेली दिसून येते. विशेषतः गेल्या दहा वर्षांत नीग्रोच्या शिक्षणाचा वेग विलक्षण वाढला आहे. गेल्या शतकाच्या अखेरीस शंभरांतील ५६ नीग्रो निरक्षर होते, तर १९५० सालीं हें निरक्षरांचें प्रमाण शेंकडा दहापर्यंत खालीं आलें आहे. गोऱ्या लोकांतसुद्धां शंभरांतील दोन माणसें निरक्षर असलेलीं आढळून येतात. निरक्षरतेचें हें प्रमाणसुद्धां शिक्षणाची संधि ज्या प्रमाणांत अधिक उपलब्ध होईल, त्या मानानें कमी झालेलें दिसेल हें उघड आहे.

गेल्या शतकाच्या अखेरीस शंभरांतील ६२ नीग्रो मुलें प्राथमिक शाळेंत दाखल झाल्याचा दाखला मिळतो. याच्या उलट १९५० सालीं शंभरांतील ९९ नीग्रो मुलें प्राथमिक शाळेंत दाखल झाल्याचा दाखला आहे. प्रस्तुत संदर्भांत खालील आंकडेवारी बोधप्रद ठरावी. १९२० सालीं जेवढीं नीग्रो मुलें देशांतील सर्व माध्यमिक शाळांतून दाखल वा उत्तीर्ण झालेलीं आढळतात, त्यापेक्षां किती तरी अधिक नीग्रो विद्यार्थी १९५० सालीं कॉलेजांत दाखल वा ग्रॅज्युएट झाल्याचा दाखला मिळतो. चालू शतकाच्या आरंभापासून आजवरचा महाविद्यालयीन इतिहास पाहिला, तर असें दिसून येतें कीं जेवढे गोरे विद्यार्थी कॉलेजांत दाखल झाले त्यापेक्षां सहापटींनीं अधिक नीग्रो विद्यार्थी कॉलेजांत दाखल झालेले आहेत.

१९२० सालापर्यंत नीग्रो विद्यार्थ्यांसाठीं ज्या शाळा चालविल्या जात असत, त्यांजपैकीं संख्याधिक शाळांतील सोयी व शिक्षणसाधनें समाधान-

कारक नसत. अशा चार शाळांतील एका शाळेची स्थिति बहुतकरून फार वाईट असे. या शाळेची इमारत जुनीपुराणी, पडझड झालेली असे. दुर्दैवानें अशा पुष्कळ शाळा अजून विद्यमान आहेत, नाहीं असें नाहीं. पण दक्षिण राज्यांतून नीग्रो शाळांसाठीं नव्या इमारती बांधण्याचें काम प्रचंड प्रमाणावर आज सर्वत्र चालू आहे. या दिशेनें अजून पुष्कळ यत्न व्हावयास हवेत, ही गोष्ट खरी. पण नीग्रो मुलांच्या शाळांसाठीं सर्व सुखसोयींनीं युक्त अशा नव्या इमारती बांधण्याचा वेग प्रत्यहीं वाढत आहे. त्याच वेळीं नीग्रो आणि गोऱ्या शिक्षकांच्या वेतनश्रेणींत पूर्वीं जी विलक्षण तफावत होती, ती नाहींशी करून काळ्यागोऱ्या शिक्षकांचें वेतनमान एकसारखें करण्यासाठीं आज सर्व झटून यत्न होत आहेत. दक्षिण राज्यांत काळ्यागोऱ्यांच्या शिक्षणासाठीं जो पैसा खर्चीं पडत असे, त्यांतसुद्धां पूर्वीं भयावह असा पक्षपात केला जात असे. पण उत्तरोत्तर या पक्षपाताचें मान कमी कमी होत आहे. १९४९ सालीं ओक्लाहोमा राज्यानें गोऱ्या मुलांच्या शिक्षणासाठीं जी रक्कम खर्चीं घातली, त्यापेक्षां अधिक मोठी रक्कम नीग्रो शिक्षणापायीं खर्चीं घातली. दुर्दैवानें जॉर्जिया, मिसिसिपि, दक्षिण कॅरोलिना आणि अलाबामा राज्यांनीं समान शिक्षणास उग्र विरोध आजवर दर्शविला आहे. पण काळाचीं पावलें ओळखून त्यांना सुद्धां आपल्या धोरणात इष्ट तो बदल घडवून आणावाच लागेल, याविषयीं जरासुद्धां शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

जीन्स निधि, फेल्प्सस्टोक्स निधि, जनरल एज्युकेशन बोर्ड आणि रोझेनवाल्ड निधि यांचें फार मोठें साहाय्य उपयुक्त कामगिरीस व प्रगतीस झालें आहे. त्याशिवाय आणखी कित्येक संस्था आणि असंख्य व्यक्ति या सर्वांच्या संयुक्त सहकार्यानेंच नीग्रो-शिक्षणाचा प्रश्न धसास लागूं शकला.

आजवर स्थिति अशी होती, कीं दक्षिण राज्यांतील महाविद्यालयांत आणि विद्यापीठांत नीग्रोला प्रवेश नव्हता. फक्त नीग्रोंसाठीं ज्या शिक्षण-संस्था वेगळ्या चालविण्यांत येत असत, तेथेंच नीग्रो विद्यार्थ्यांस प्रवेश मिळे. या परिस्थितींत आतां पुष्कळच आशादायक बदल झालेला दिसतो. आज वस्तुस्थिति अशी आहे, कीं ज्या शिक्षण संस्थांत पूर्वीं नीग्रोस

मज्जाव होता, त्याच शिक्षण संस्थांतून जवळपास अडीच ते तीन हजार नीग्रो विद्यार्थी आज शिक्षण घेत आहेत. प्रतिवर्षी ही संख्या वाढतच आहे. राज्य–पुरस्कृत अशा वीस आणि दाननिधीच्या साहाय्यानें चालविण्यांत येणाऱ्या सत्तावीस शिक्षण संस्थांतून आज नीग्रो विद्यार्थ्यांस प्रवेश मिळाला आहे. व्हर्जिनिया राज्यांतील विल्यम अँड मेरी कॉलेजमध्यें तूर्त एक दोनच नीग्रो विद्यार्थी असले, तरी केंटकी मधील लुईव्हिल विद्यापीठांत आज २७५ नीग्रो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कर्मठ विद्यापीठांचीं द्वारें सुद्धां आज नीग्रो विद्यार्थ्यांस खुलीं झालेलीं दिसतात. इष्ट दिशेनें हा जो बदल घडवून आणण्यांत आला, तो शांततेच्या, न्याय्य अशा यत्नांमुळेंच शक्य झाला. एकदां का वंशभेदाची भिंत कोसळली कीं मग अशा शिक्षण संस्थांतील नीग्रो विद्यार्थी शैक्षणिक जीवनक्रमांत विनासायास समरस होऊन सहभागी होतात, असा आजवरचा अनुभव आहे. संमिश्र सहशिक्षणामुळें नव्या तेढी निर्माण होतील किंवा कायमचेंच अशांत वातावरण तेथें राहील, अशी भीति कांहीं गोटांतून व्यक्त करण्यांत येत असे. ती पण अनुभवानें अनाठायीं व निराधार ठरली आहे. ‘न्यूयॉर्क टाइम्स’चा वार्ताहर बेंजामिन फाइन यानें अशा संमिश्र विद्यापीठांतील प्रमुखांच्या व प्राध्यापकांच्या मुलाखती घेतल्या तेव्हां त्याला असें आढळून आलें कीं ज्या विद्यापीठांत नीग्रो विद्यार्थ्यांस मुक्तद्वार आहे, तेथें वंशभेदांतून निर्माण होणारे त्रासदायक प्रश्न बहुतकरून मिटलेले आहेत, आणि महाविद्यालयीन वातावरणाशीं नीग्रो विद्यार्थी कांहीं एक कटकटीशिवाय प्रायः एकरूप झाले आहेत. जेथें वंशभेदाची तेढ अत्यंत उग्र आणि प्रखर आहे, अशा दक्षिण राज्यांत प्रगतीस अनुकूल असें वातावरण निर्माण झालेलें दिसतें. अर्थातच उत्तर व पूर्वपश्चिम राज्यांतील राज्य–पुरस्कृत आणि निधि–संचालित शिक्षणसंस्थांतून व विद्यापीठांतून नीग्रो विद्यार्थ्यांची संख्या यापेक्षां पुष्कळच अधिक आहे. मध्यपश्चिमेंतील राज्य–पुरस्कृत विद्यापीठांतून प्रत्येकीं ५०० हून अधिक नीग्रो विद्यार्थी आज शिक्षण घेत आहेत. आणि यापूर्वी ज्या महाविद्यालयांचीं द्वारें नीग्रो विद्यार्थ्यांस सदांचीं बंद होतीं, अशा ३०० हून अधिक शिक्षणसंस्था आज नीग्रो विद्यार्थ्यांस शिक्षणासाठीं आमंत्रण देत आहेत, अशी स्थिति आहे.

विद्यापीठांच्या अधिकारांतील शिक्षण संस्थांत घडून आलेली ही प्रगति आश्चर्यकारक म्हणून उल्लेखनीय आहे. फार मोठ्या प्रमाणावर हे बदल घडून येत होते, त्याच वेळीं डोळ्यांत सहसा भरणार नाहींत, असे कांहीं सूक्ष्म बदल या विद्यापीठांच्या परिसरांत घडून येत होते. उदाहरणार्थ, १९२० सालापूर्वी गोऱ्यांच्या कॉलेजांत नीग्रो प्राध्यापक उभे राहून शिकवूं शकतील हें चित्र केवळ कल्पनेंतसुद्धां अशक्य वाटलें असतें; पण आजच्या वस्तुस्थितींत तें साक्षात् आकारलेलें दिसतें. दक्षिण राज्यांतील कडव्या विद्यापीठांत सुद्धां आज नीग्रो प्राध्यापक कोठें कोठें गोऱ्या विद्यार्थ्यांस पढवीत आहेत, असें दृश्य दिसतें. निदानपक्षीं १०६ 'गौर' महाविद्यालयांतून आज काळे प्राध्यापक शिकवीत आहेत. अर्थातच पूर्वी जेव्हां नीग्रो प्राध्यापक नियुक्त केले जात, तेव्हां वंशसंबद्ध नीग्रो इतिहास व असल्या कांहीं खास विषयांसाठींच त्यांची नेमणूक केली जात असे. तर आज अशी स्थिति आहे, कीं नीग्रो प्राध्यापक कोणताहि ज्ञानविषय शिकवूं शकतो. फेलोजपासून प्रोफेसर्स-पर्यंतच्या अध्यापन क्षेत्रांतील सर्व जागीं आज नीग्रोंची नेमणूक केली जाते. कित्येक महाविद्यालयांचे ग्रंथपाल नीग्रो आहेत. आणि कारकुनी पेशाचे काळे तर शिक्षण क्षेत्रांत सर्वत्र आहेत. जेथें म्हणून महाविद्यालयांत नीग्रो प्राध्यापक शिकवीत आहेत, तेथें त्यांच्या गोऱ्या सहकाऱ्यांनीं त्यांचें स्वागत केलें आहे. त्यांना मिळणारी वागणूक पक्षपाताची नाहीं. कांहीं नीग्रो प्राध्यापकांनीं विद्यादानाच्या आणि पांडित्याच्या क्षेत्रांत चांगला लौकिक मिळविला आहे, असें दिसतें.

उत्तर आणि पश्चिम राज्यांतील कित्येक ठिकाणीं शिक्षणखात्यांत वंशभेद मानला जात नाहीं; अर्थात्च तेथें पक्षपाताचा प्रश्नच उद्भवत नाहीं. बरें, हें सर्व सक्तीनें घडलें आहे, असें म्हणावें, तर तसें दिसत नाहीं. अशा ठिकाणीं वंशभेदाच्या भिंती लोकांनीं आपखुषीनें पाडून टाकल्या आहेत. किती तरी ठिकाणीं स्थानिक स्वराज्यसंस्थांनीं आणि राज्यसरकारनें सर्वत्र शिक्षण-समित्यांवर नीग्रो शिक्षणतज्ज्ञांची नियुक्ति वा निवडणूक केली आहे. आणि त्यांच्या हातीं केवळ नीग्रो विद्यार्थ्यांचेंच नव्हे, तर सर्व विद्यार्थ्यांचें शैक्षणिक भवितव्य सोपविलेलें आहे. १९५३ सालीं अटलांटा शहरांत

एक चमत्कार घडला. अटलांटा विद्यापीठाचा नीग्रो प्रेसिडेंट डॉ. रुफस क्लेमंट याची नेमणूक तेथील शिक्षणसमितीवर सर्व नागरिकांनीं मिळून केली. त्याला विरोध करणारा जो गोरा उमेदवार होता, तो अनेक वर्षें त्याच समितीवर पूर्वीपासून काम करीत होता. आणि असें असून सुद्धां या गोऱ्यास डावलून तेथील लोकांनी एका नीग्रो शिक्षणतज्ज्ञास पसंत केलें.

वांशिक प्रश्नाबाबत मध्यवर्ती सरकारचें धोरण उत्तरोत्तर वाढत्या उदारपणाचें द्योतक आहे. १९५० सालीं राष्ट्राध्यक्ष ट्रुमननीं या धोरणाचा धैर्यानें निर्वाळा दिला. सरकारच्या ताब्यांतील जमिनींवर जेथें म्हणून शिक्षणसंस्था होत्या, तेथील ज्या संस्थांचें धोरण वांशिक पक्षपाताचें होतें, त्यांना अनुदान देऊं पाहणाऱ्या प्रस्तावास मंजुरी देण्याचें त्यानीं साफ नाकारलें. ट्रूमनचा राजकीय पक्ष जेथें सर्वाधिक प्रबळ होता तेथें वांशिक पक्षपात रूढ आणि लोकप्रिय होता. तेथील मतदारांचा पाठिंबा गमावण्याचा धोका पत्करून सुद्धां त्यानीं हें साहस बुद्धिपुरःसर केलें. एवढेंच करून तें थांबले नाहींत. १९५१ सालीं सरकारच्या ताब्यांतील जमिनीवर बांधण्यांत आलेलीं सर्व शाळा–कॉलेजें त्यानीं सर्व विद्यार्थ्यांस मुक्तद्वार खुलीं केलीं. यांजपैकीं कित्येक शाळा लष्करी शिक्षणाच्या होत्या. राष्ट्राध्यक्ष आयसेन-हॉवर ट्रुमनचेंच धोरण पुढें चालवीत आहेत. वांशिक पक्षपातास त्यांचा सक्त विरोध आहे, हें सर्वश्रुत आहे.

उपर्युक्त सर्व इतिहासाचा अर्थ आणि निर्वाळा असा आहे, कीं अमेरिकन नीग्रो बहुसंख्येनें सुशिक्षित झाले, तर त्यामुळें अवघ्या देशाचा फायदाच होणार आहे. सुशिक्षित नीग्रो लेखक, इंजिनिअर, डॉक्टर, वकील, यंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ होऊं शकले, तर त्यांच्या बळावर अवघें राष्ट्र अधिक विकसित होणार आहे. नीग्रो सुशिक्षित झाले, तर ते नीग्रो जनतेच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक उत्कर्षास हातभार लावतील, हें उघड आहे. अमेरिकन जीवनाच्या अनेकविध क्षेत्रांत नवें नीग्रो नेतृत्व सर्वत्र दृष्टीस पडत आहे. नीग्रो नेते आज अल्पसंख्य असले, तरी त्यांची संख्या उद्यां वाढल्याशिवाय राहणार नाहीं.

आतां प्रश्न असा येतो, कीं अखिल राष्ट्रास उपकारक अशी ही स्थिति निर्माण कशी झाली ? आणि तिच्या निर्मितीस जबाबदार कोण आहे ? या प्रश्नाचें उत्तर या देशांतील लोकशाही समाजरचनेंत सांपडेल. ज्या स्त्री-पुरुषांची लोकशाहीच्या तत्त्वज्ञानावर श्रद्धा आहे, असे जबाबदार, विचारी, धैर्यशील लोक वांशिक पक्षपाताचा प्रश्न शहाणपणानें, सावकाश सोडवतील, यांत शंका नाहीं. रस्ता लांब होता. आणि वाटचाल सावकाश होती, वाट-सरू एकमताचे नव्हते, म्हणून प्रगतीस वेळ लागला. जी प्रगति झाली तिच्या यशाचे वाटकरी अनेक आहेत. प्रस्तुत संबंधांत दोन संस्थांचा निर्देश उद्‌बोधक ठरेल.

१९४६ सालीं जुलै महिन्यांत अनक अमेरिकन नागरिकांच्या विनंतीस मान देऊन राष्ट्राध्यक्ष ट्रुमननें ' कमिशन ऑन हायर एज्युकेशन ' नामक समिति नेमिली. ' अमेरिकन कौन्सिल ऑन एज्युकेशन'चा प्रेसिडेंट चार्ल्स, एफ्. झूक हा या समितीचा अध्यक्ष होता. १९४८ सालीं मार्च महिन्यांत नामांकित शिक्षणतज्ज्ञांच्या या समितीनें आपला अहवाल राष्ट्राध्यक्षांस सादर केला. या प्रचंड अहवालाचे सहा ग्रंथ आहेत, त्यांचा एकूण निष्कर्ष येणेंप्रमाणें:– ज्या कोणास शिक्षण घ्यावयाचें असेल, त्याला आपल्या कुवती-प्रमाणें उच्चतम शिक्षणाची समान संधि उपलब्ध करून देण्यांत यावी. मग शिक्षण घेऊं पाहणारी व्यक्ति स्त्री असो वा पुरुष असो. त्या व्यक्तीचें उत्पन्न, तिचा वंश वा वर्ण, तिचे पूर्वज वा तिच्या कुटुंबाचें जन्मस्थान वा तिचा धर्म लक्षांत न घेतां प्रत्येक अमेरिकन नागरिकास उच्चतम शिक्षणाची समान संधि व हमी मिळावी. अमेरिकन लोकशाहीचें हें एक प्रमुख उद्दिष्ट असावें—युद्धोत्तर काळांत सरकारी धोरण उत्तरोत्तर कसें उदार व प्रगत होत आहे, त्याची ग्वाही हा अहवाल निश्चयानें देईल. ' नॅशनल असोसि-एशन फॉर दि अॅडव्हान्समेंट ऑफ कलर्ड पीपल ' या संस्थेनें शैक्षणिक पातळी उंच करण्यासाठीं जे अखंड यत्न चालविले आहेत, ते केवळ अतुल-नीय होत. या संस्थेच्या संघटनेंत काळे–गोरे सारखेच सहभागी आहेत. तिच्या उत्कर्षासाठीं खांद्यास खांदा भिडवून ते एकत्र काम करीत आहेत. शिक्षण क्षेत्रांतील पक्षपाताच्या प्रवृत्तीचा समूळ उच्छेद करण्यासाठीं त्यांनीं

शहाणपणाचे पण निकराचे संघर्ष उभे केले आहेत. आणि लोकशाहीच्या चौकटींत राहून सुद्धां शांततेच्या मार्गानें उद्दिष्टप्राप्तीसाठीं कसें, किती व काय साधतां येतें, त्याचें प्रात्यक्षिक जगास दाखवून दिलें. या देशांत लोकशाही कणखर आहे, म्हणूनच मूलभूत माणुसकीच्या हक्कांसाठीं द्यावयाचे लढे येथें अत्युच्च, सार्वभौम न्यायालयापर्यंत नेऊन पोहोंचवितां येतात आणि सरकारच्या सर्वश्रेष्ठ अधिकाऱ्यांकडून अन्यायाची दाद लावून घेणें शक्य होतें. लोकशाहीचें तत्त्वज्ञान ज्या देशांत प्रभावी व कार्यकारी आहे, तेथेंच अंतिम न्यायाची अपेक्षा करतां येते.

उपर्युक्त संस्थेनें शैक्षणिक प्रश्न हातीं घेतले, ते केवळ अन्याय निवारण्याच्या न्यायबुद्धीनें. दक्षिण राज्यांत जेथें म्हणून सर्व लोकांकडून वसूल केलेल्या कराच्या उत्पन्नांतून शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्यांत आल्या, तेथें वांशिक पक्षपातास थारा नसावा आणि नीग्रो शिक्षकास गोऱ्यास मिळतो, तोच पगार मिळावा, एतदर्थ या संस्थेनें प्रथम लढा उभारला. जेथें उघड अन्याय झालेला दिसला, अशीं अनेक प्रकरणें एकामागून एक या संस्थेनें न्यायालयांत रुजू केलीं. त्यासाठीं कार्यकर्त्यांस असह्य खस्ता काढाव्या लागल्या आणि अपरिमित यत्न करावे लागले. शैक्षणिक पक्षपाताचे हे लढे लढवीत असतांना पदोपदीं त्यांना घटनेंत समाविष्ट केलेल्या अमेरिकन नागरिकांच्या मूलभूत हक्काची कांस धरावी लागली. प्रस्तुत संबंधांत पूर्वी न्यायालयांनीं जे निवाडे वेळोवेळीं दिले होते, त्यांची साक्ष या लढ्यांत कामीं आली. या संस्थेनें एकामागून एक अनेक प्रकरणांची दाद न्यायालयांत जाऊन मागितली आणि प्रत्येक प्रकरणीं न्यायानें त्यांचा पाठपुरावा केला. प्रस्तुत संबंधांत अमेरिकेंतील सुप्रीम कोर्टानें जे निवाडे दिले, त्यामुळें नवा इतिहास घडला. यांतील चार खटले विलक्षण गाजले. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार दक्षिण राज्यांना विद्यापीठांत नीग्रो अर्जदारास प्रवेश देणें भाग पडलें. त्याचप्रमाणें कोणा एका नागरिकानें मागणी करतांक्षणीं त्याला सर्वोच्च शिक्षणाची समान संधि प्रत्येक राज्यानें उपलब्ध करून देण्यास भाग पडलें. अशा रीतीनें राज्यांतील महाविद्यालयांचीं व विद्यापीठांचीं द्वारें नीग्रोंसाठीं खुलीं झालीं. १९४० सालीं व्हर्जिनिया राज्यांतील नॉर्फोक-

मधील एका केसचा निर्णय सर्किट कोर्ट ऑफ अपील्सनें दिला. तदनुसार शिक्षकांच्या वेतनमानांतील पक्षपात दूर झाला. राष्ट्राच्या घटनेप्रमाणें काळ्या-गोऱ्यास एकच वेतनमान उपलब्ध झालें व शिक्षकांच्या वेतनांतील वांशिक पक्षपात कायमचा नाहींसा झाला. कारण परिणामीं अनेक नीग्रो शिक्षकांनीं गोऱ्या शिक्षकांचा पगार आपणांस मिळावा, म्हणून कोर्टांत दाद मागितली. आणि शेंकडों फिर्यादींतून नीग्रो शिक्षकांचे मूलभूत हक्क व अधिकार प्रस्थापित झाले.

आणखी एक इतिहासाची साक्ष प्रस्तुत संदर्भांत उपकारक ठरेल. याच सुमारास दक्षिण राज्यांतील कित्येक गोऱ्या सुसंस्कृतांनीं, राज्यपालांनीं आणि त्यांच्या शैक्षणिक सल्लागारांनीं नीग्रो लोकांस उच्चतम शिक्षणाची संधि निकडीनें उपलब्ध करून देण्यांत यावी, म्हणून एकमुखानें मागणी केली. पण दक्षिणेंत राज्य सरकारांनीं या मागणीस तीव्र विरोध केला. त्यांनीं हरतऱ्हांचे कायदेशीर मुद्दे उपस्थित केले. आणि या मागणीबाबतचा अंतिम निर्णय लांबणीवर पडावा यासाठीं शक्य तेवढे सर्व यत्न केले. उदाहरणार्थ, राज्याबाहेर नीग्रोंच्या महाविद्यालयीन शिक्षणाची सोय करण्याची व्यवस्था करण्यांत येईल, म्हणून सांगून पाहिलें; पण शेवटीं सुधारणेच्या अनिवार प्रवाहास प्रतिरोध करण्याचा यत्न त्यांना सोडून द्यावा लागला. १९४९ सालीं शिक्षकसंघाच्या वार्षिक सभेसाठीं नीग्रो शिक्षकास प्रथम आमंत्रण देण्यांत आलें. वस्तुस्थिति अशी होती कीं दक्षिण राज्यांत सर्वत्र शिक्षणाची अनास्थाच होती. तेथें सुधारणेस अवश्य ती गति तावत्काळपर्यंत प्राप्त झालेली नव्हती. काळे–गोरे दोघांचेंहि शिक्षण तेथें अद्यापपावेतों दुर्लक्षित होतें. पण असें असलें, तरीसुद्धां दक्षिणेंतील दुराग्रही कट्टर राज्यांनीं पक्षपाताचा स्वीकार तत्त्व म्हणून केला होता. आणि त्याबाबत कांहीं तडजोड करण्याची वृत्ति मुळांतच तेथें नव्हती.

पण काळाचा आणि सुधारणेचा ओघ, किती झालें तरी, कोण किती काळपर्यंत थांबवूं शकणार ? सावकाश पण निश्चयानें तेथें सुद्धां वांशिक संबंधांत इष्ट ती सुधारणा करण्याचे यत्न करणारे सतत कार्य करीतच होते. आणि अंतीं आपला पराभव केवळ अटळ आहे, हें तेथील हट्टी राज्यकर्त्यांस

सुद्धां कळून चुकलें होतें. दक्षिण राज्यांतील एका सुप्रसिद्ध विद्यापीठाच्या प्रमुखानें एक वेळ प्रस्तुत ग्रंथाच्या संपादकास सांगितलें होतें:–' नॅशनल असोसिएशननें दोन नीग्रो विद्यार्थ्यांस आमच्या येथें प्रवेश मिळावा, म्हणून आमच्यावर कोर्टांत फिर्याद गुदरली आहे. आम्हांला माहीत आहे कीं ही केस आम्ही हरणार आहोंत. आम्ही अधिक शहाणे असतों, तर या नीग्रो विद्यार्थ्यांस प्रवेश दिला असता. विनाकारण कोर्टास द्यावा लागणारा खर्च व त्रास आम्ही वेळींच वांचविला असता. खरें म्हणजे न्याय प्रतिपक्षाच्या बाजूचा आहे, हें तर उघड दिसतें आहे. ' वांशिक पक्षपात आणि बहिष्कार यांजविरुद्ध कृष्णवर्णीयांच्या उन्नतीस वाहिलेल्या या संस्थेनें आपला लढा न्याय मिळेपर्यंत आवेशानें अविच्छिन्न चालू ठेवला. शहरांत, राज्यांत आणि राष्ट्रांत जेथें म्हणून संधि उपलब्ध होईल, तेथें या संस्थेनें अविलंब पुढाकार घेऊन वंश वा वर्णविषयक प्रत्येक अन्यायाची दाद लावून घेण्याचा निर्धारानें यत्न केला. आणि या टोकापासून त्या टोकापर्यंत वर्णद्वेषाच्या आघाडीवरील आपल्या मोहिमेनें सर्व राष्ट्र हादरून सोडलें. १९५१ सालीं या संबंधांतील आजतागायत सर्वाधिक महत्त्वाचा लढा या संस्थेनें हातीं घेतला आणि तो म्हणजे प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील वांशिक पक्षपात नष्ट करण्याच्या संबंधांतील होय.

गेल्या कित्येक वर्षांत कोणत्याहि एका प्रश्नानें लोकांचें लक्ष असें वेधून घेतलें नव्हतें. आणि आजवर न्यायालयांत गुदरलेल्या कोणत्याहि फिर्यादीचा निकाल लोकांनीं एवढ्या उत्सुकतेनें अपेक्षिला नव्हता. पांच शाळांतील पक्षपाताच्या संबंधांत ॲसोसिएशननें फिर्यादी गुदरल्या होत्या. कोर्टाच्या निर्णयास अजूनपर्यंत अवधि होता. अशा वेळीं जॉर्जिया राज्याच्या गव्हर्नरनें विद्यालयांत वांशिक संकर झाल्यास आपण लष्कर बोलावून घेऊं, अशी तंबी दिली. आणि दक्षिण कॅरोलिना राज्याच्या गव्हर्नरनें कोर्टाचा निर्णय पक्षपातास प्रतिकूल लागल्यास राज्यांतील सर्व सार्वजनिक शाळा बंद करण्याचा आपण हुकूम देऊं, म्हणून जाहीर घोषणा केली. कित्येकांनीं अत्याचाराच्या आणि रक्तपाताच्या धमक्या दिल्या. अशा परिस्थितींत ' रॅले न्यूज अँड ऑब्झर्व्हर'चा संपादक जोनाथन डॅनिएल्स यानें न्यूयॉर्कमधील

' नॅशनल अर्बन लीग'च्या सभेंत सांगितलें कीं या प्रश्नावर अत्याचार वा रक्तपात होईल, यावर आपला विश्वास नाहीं. दक्षिण कॅरोलिना शाळा बंद पाडणार नाहीं. आणि जॉर्जिया लष्कराचा उपयोग करणार नाहीं, असें त्यानें ठांसून सांगितलें. ' अटलांटा कॉन्स्टिटयूशन ' नामक वजनदार पत्राच्या संपादकानें १९५३ सालच्या डिसेंबर महिन्यांत एका संपादकीय लेखांत स्वच्छ लिहिलें:—

' आजच्या जगांत पक्षपाताच्या धोरणास कायदा कधींच पाठिंबा देणार नाहीं. या राष्ट्रांतून वांशिक पक्षपात कायमचा नाहींसा होणार आहे, हें स्वच्छ दिसत असतांनासुद्धां जो कोणी पक्षपाताच्या बाजूनें लोकांत प्रचार करील, तो लोककल्याणास विरोध करीत आहे असें खुशाल समजावें.' शाळांतील वांशिक पक्षपातासंबंधीं अजून सुप्रीम कोर्टाचा निर्णय जाहीर व्हावयास अवधि होता. आणि अशा वेळीं कट्टर म्हणून नांवाजलेल्या दक्षिण राज्यांतील हे दोन सुप्रसिद्ध संपादक आधींच आपला निर्णय बोलून चुकले होते.

१७ मे १९५४ रोजीं सोमवारीं सुप्रीम कोर्टानें दोन ऐतिहासिक निर्णय जाहीर केले. प्रस्तुत निर्णयासंबंधीं न्यायधीशांचें एकमत होतें. दोन्ही निर्णय स्पष्ट आणि भविष्यकाळावर चिर परिणाम घडविणारे होते. सार्वजनिक शाळांतील वांशिक पक्षपात राष्ट्राच्या घटनेनुसार अन्याय्य आहे, किंबहुना कोणत्याहि सार्वजनिक शिक्षणसंस्थेंतील पक्षपात दंडनीय ठरेल; असा निर्वाळा स्पष्ट शब्दांत प्रारंभींच दिल्यानंतर कोर्टानें निःसंदिग्ध शब्दांत ऐतिहासिक घोषणा केली, कीं यापुढें सतरा दक्षिण राज्यांतील आणि कोलंबिया परगण्यांतील सार्वजनिक शाळांतून काळ्यागोऱ्यांचा पक्षपात करणें अन्याय्य आहे. आजवर उपर्युक्त दक्षिण राज्यांतून असा पक्षपात कायदेशीर मानला जात असे. आजवर जें वर्तन कायदेशीर मानलें जात होतें, तेंच वर्तन सुप्रीम कोर्टानें बेकायदा ठरविलें. चार पश्चिम राज्यें, कायद्यानें नव्हे, तर आपखुषीनें विद्यालयास पक्षपाताचें धोरण अमलांत आणण्यास परवानगी देत असत. हें वर्तनसुद्धां यापुढें बेकायदा ठरविण्यांत आलें. एवढें करूनच कोर्ट थांबलें नाहीं. उभयवंशांस एकाच तऱ्हेच्या समान शिक्षणाची संधि उपलब्ध व्हावी,

याचा अर्थ वंशविशिष्ट वेगळ्या विद्यालयांतून समान शिक्षण दिलें गेलें म्हणजे झालें, असा करण्यांत येत असे. याबाबत सुप्रीम कोर्टानें खणखणीत शब्दांत स्वच्छ निर्णय दिला. शिक्षणाबाबत बाह्यतः केवळ समान संधीचा उद्घोष करून वंशसापेक्ष विभक्त पण समान शिक्षण देणाऱ्या संस्था यापुढें बेकायदा ठरविण्यांत आल्या. समान शिक्षण द्यावयाचें तें सुद्धां उभयवंशांस एकाच विद्यालयांत एकत्र देण्यांत यावें, अन्यथा अल्पसंख्य विद्यार्थ्यांस समान शिक्षणाची संधि कधीं उपलब्ध होणारच नाहीं, म्हणून वंशनिरपेक्ष समान शिक्षण एकत्र घेण्याचा हक्क सर्वांस सारखाच आहे, असा निर्णय सुप्रीम कोर्टानें ठणकावून दिला. १८९६ सालीं क्ले प्लेसी वि. फर्ग्युसन नामक एका गाजलेल्या केसमध्यें त्या काळांतील सुप्रीम कोर्टानें असा निर्णय दिला होता कीं समान शिक्षणाची संधि म्हणजे एकत्र शिक्षणाची संधि, असें नव्हे. शिक्षणाची संधि समान असावी, मग ती वंशसापेक्ष विभक्त विद्यालयांतून उपलब्ध करून देण्यांत आली, तर त्यामुळें राष्ट्राच्या घटनेंतील मूलभूत हक्कविषयक कलमांस बाध येत नाहीं, असें त्या काळच्या कोर्टाचें प्रतिपादन होतें, तें प्रस्तुत निःसंदिग्ध निर्णयानें बाद ठरविलें.

सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाची प्रतीक्षा सर्व राष्ट्र मोठ्या उत्सुकतेनें करीत होतें. कारण यावेळीं न्यायाधीश मंडळाचे दोघे सदस्य दक्षिण राज्यांतील होते. सर्व न्यायाधीशांनीं एकमतानें दिलेल्या त्या निर्णयाचें स्वागत राष्ट्रांतील जनतेनें मोठ्या उत्साहानें केलें. दक्षिण राज्यांतील सुप्रसिद्ध पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ आणि सरकारी वा सार्वजनिक अधिकारी वर्ग या सर्वांनीं सुप्रीम कोर्टाचा प्रस्तुत निर्णय स्वीकारण्याची व त्यास पाठिंबा देण्याची तत्परतेनें तयारी दाखविली. उदाहरणार्थ :—

युनिव्हर्सिटी ऑफ पेन्सिलव्हॅनिया लॉ स्कूलचा डीन जेफर्सन एफ्. फोरहॅम:—‘ जोंपर्यंत पक्षपात आहे, तोंपर्यंत खरीखुरी समानता प्रस्थापित झाली, असें होणार नाहीं...दक्षिण राज्यें याबाबत सौजन्यपूर्वक तडजोडीची प्रवृत्ति दाखवितील आणि विरोधी प्रतिक्रियेचें निदर्शन उग्र रूप धारण करणार नाहीं. ’

नॉर्थ कॅरोलिना विद्यापीठांतील समाजशास्त्राचा प्राध्यापक हॉवर्ड डब्ल्यू. ओगॅमः—' सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची प्रतिक्रिया दक्षिण राज्यें स्वतःस व सर्व देशास आश्चर्यकारक वाटेल, अशा शांत वृत्तीनें व्यक्त करतील. निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठीं आम्हांला थोडासा वेळ लागेल, ही गोष्ट खरी. पण माझी अशी समजूत आहे, कीं दक्षिण राज्यें या निर्णयाची तामिली योग्यप्रकारें करतील.'

व्हर्जिनिया राज्यांतील वूड्रो विल्सन स्कूल ऑफ फॉरेन अफेअर्सचा डायरेक्टर जॉन गेंजः—' सुप्रीम कोर्टाचा हा निर्णय लक्षावधि गोऱ्या अमेरिकनांच्या मनांतील अपराधवृत्तीचा निरास करील आणि समानतेच्या नांवाखालीं विषम वर्तन करीत असल्याबद्दल आमच्यापैकीं कित्येकांच्या मनांत जी दंभाची जाणीव होती, ती पण आतां सावकाश नाहींशी होईल.'

मेरिलँडचा गव्हर्नर थिओडोर आर्. मॅक्केल्डिनः—' कायदा प्रमाण मानणारें राज्य म्हणून मेरिलँडची जी ख्याति आहे, तिचा आम्हांला अभिमान आहे. या राज्यांतील नागरिक आणि सार्वजनिक अधिकारी सुप्रीम कोर्टानें मूलभूत कायद्याचा जो अर्थ लावला आहे तो प्रमाण मानून तदनुसार न्याय्य वर्तन करतील अशी माझी खात्री आहे.'

केंटकीचा गव्हर्नर लॉरेन्स वेदर्लीः—' भविष्यकाळांत दूरगामी परिणाम घडवून आणणारा असा हा एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय आहे. आणि या राज्यांतील सर्व सरकारी अधिकारी या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठीं आवश्यक तें सर्व करतील.'

वेस्ट व्हर्जिनिया राज्याचा गव्हर्नर विल्यम सी. मॉर्लंडः—' या राज्यांतील लोक हा निर्णय प्रमाण मानतील, आणि तदनुसार न्याय्य तें वर्तन उत्तम प्रकारें करतील. दंडाचा किंवा न्यायालयीन संघर्षाचा वापर प्रस्तुत संबंधांत करावा लागणार नाहीं, अशी माझी समजूत आहे. जें जें म्हणून न्याय्य व योग्य असेल, तें तें सर्व आम्ही करूं.'

आर्कन्सासच्या शिक्षणखात्याचा कमिशनर आर्च फोर्डः—' दक्षिण राज्यांतील वांशिक संघर्ष येथें सर्वांत कमी आहे. आणि वांशिक संबंध तसे

खेळीमेळीचे आहेत. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळें उत्पन्न झालेली नवीन परिस्थिति आर्कन्सास राज्य योग्य प्रकारें निभावून नेईल, असा मला विश्वास वाटतो.'

सुप्रीम कोर्टाच्या या नव्या निर्णयामुळें अनेक ठिकाणीं गुंतागुंतीचे प्रश्न नव्यानेंच निर्माण झाले आहेत, हें उघड आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेंतील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास ज्यांचा सक्त विरोध होता असे दक्षिण राज्यांतील कांहीं थोडे राजकारणी पुरुष या निर्णयाविरुद्ध आव्हानाची भाषा बोलत आहेत. आणि लोकांच्या मनांत प्रक्षोभ चेतविण्याचा उद्योग करीत आहेत. पण असें असलें तरी सुद्धां दक्षिण राज्यांतील जबाबदार समंजस नेते हा निर्णय म्हणजे अमेरिकेच्या सदसद्विवेक बुद्धीचा कौल आहे, असें मानून या निर्णयाच्या अंमलबजावणीस उद्युक्त झाले आहेत. मानवाच्या मूलभूत हक्कांच्या पायावर समाजरचना अधिष्ठित आहे, असा अमेरिकन जनतेचा विश्वास आहे.

अमेरिकन विद्यार्थ्यांनीं प्रस्तुत संदर्भांत मौल्यवान असें कार्य केलें आहे. शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रांतील पक्षपात नष्ट व्हावा व कोणत्याहि विद्यार्थ्यास समान व एकत्र शिक्षणाची संधि उपलब्ध व्हावी, हें तत्त्व त्यांना मनापासून पटलेलें दिसतें. या विद्यार्थ्यांनीं प्रक्षोभकारक चळवळी उभारल्या नाहींत, वा उग्र निदर्शनाची कांस धरली नाहीं. पण तरी सुद्धां त्यांनीं केलेलें कार्य परिणामकारक आहे. दक्षिण राज्यांतील कॉलेजांतून काळ्यागोऱ्या विद्यार्थ्यांस एकत्र शिक्षणाची संधि उपलब्ध होण्यापूर्वींच काळ्यागोऱ्या विद्यार्थ्यांच्या छोटया छोटया संघटनांनीं एकत्र येऊन एका मोठ्या सभेंत वंशनिरपेक्ष एकत्र शिक्षणाची मागणी केली होती. उत्तरेंतील गोरे विद्यार्थी नीग्रो विद्यार्थ्यांस सामावून घेण्यास उत्सुक आहेत. आणि वंशभेदाच्या अदृश्य भिंती पाडून टाकण्यासाठीं ते सतत यत्न करीत असतात. ज्या शिक्षण संस्थांत अद्यापपर्यंत नीग्रो विद्यार्थ्यास प्रवेश नव्हता किंवा नाममात्र प्रवेश असून सुद्धां नीग्रो विद्यार्थी जेथें पाऊल टाकण्यास धजावत नसत, अशा शिक्षण संस्थांत नीग्रो विद्यार्थ्यांनीं नांवें नोंदवावींत, यासाठीं गोरे विद्यार्थी मनापासून नित्य यत्न करीत असत. दक्षिण राज्यांत सुद्धां असे कांहीं गोरे

विद्यार्थी होतेच,--ते सदाच अल्पसंख्य आणि म्हणून असमर्थ असत,—कीं ज्यांना नीग्रो विद्यार्थ्यांनीं आपल्या शिक्षण संस्थांतून शिक्षण घ्यावें, असें वाटे व आपलें हें मत ते उघड बोलून दाखवीत.

नीग्रो लोकांच्या नागरिक हक्कांस आणि न्याय्य मागण्यांस पाठिंबा देणाऱ्या विद्यार्थ्यांचें नेतृत्व उणें पडलें, असें मानण्याचें तर मुळींच कारण नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे, कीं न्याय, मानवता आणि सुजनता ज्या ज्या म्हणून ध्येयांशीं संबद्ध आहेत, त्या त्या ध्येयांस अमेरिकेंतील कॉलेज–विद्यार्थ्यांनीं शक्य तितकी अधिकांत अधिक आर्थिक मदत वेळेनुसार केलेली आहे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रांतील नि:पक्षपाती धोरणास बांधलेली व वाहिलेली अशी जी एक ' नॅशनल स्कॉलरशिप सर्व्हिस अँड फंड फॉर नीग्रो स्टुडंट्स ' नामक अग्रेसर विद्यार्थी–संस्था आहे, तिची स्थापना दोन गोऱ्या विद्यार्थ्यांनींच केलेली होती. आवश्यक त्या शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या नीग्रो विद्यार्थ्यांस कॉलेजमध्यें प्रवेश मिळवून देण्यासाठीं सर्वतोपरीचें साहाय्य द्यावें, त्यांची इच्छा असेल, त्या कॉलेजांत प्रवेश आणि शक्य तर शिष्यवृत्ति सुद्धां त्यांना उपलब्ध करून द्यावी; या हेतूनें स्थापन झालेल्या व तदनुसार कार्य करणाऱ्या या संस्थेच्या सल्लागार मंडळाचे जे सभासद आहेत, त्यांत एकूण १६५ महाविद्यालयांचे व विद्यापीठांचे प्रमुख आहेत. १९४८ सालापासून या संस्थेनें २००० हून अधिक नीग्रो विद्यार्थ्यांस त्यांना हव्या असलेल्या कॉलेजांत प्रवेश व शिष्यवृत्त्या मिळवून देण्यास साहाय्य केलें आहे. आणि अलीकडे तर देशभर पसरलेल्या ११८ नीग्रो कॉलेजांत व विद्यापीठांत शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या गोऱ्या विद्यार्थ्यांसाठीं या संस्थेनें खास शिष्यवृत्त्या उपलब्ध करून दिल्या आहेत.

आजवर हजारों गोऱ्या विद्यार्थ्यांच्या, प्राध्यापकांच्या व दात्यांच्या साहाय्यानें कार्यान्वित झालेली ही संस्था विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तींत इष्ट ते बदल घडवून आणण्यांत पुढाकार घेऊन यशस्वी झालेली आहे. या संस्थेनें शिक्षणाच्या क्षेत्रांत नवयुग निर्माण केलें आहे असें म्हटलें, तर अतिशयोक्ति होणार नाहीं. आम्हर्स्ट कॉलेजचा प्रेसिडेंट डॉ० चार्ल्स कोल प्रस्तुत संस्थेच्या कार्यासंबंधीं म्हणतो : ' आज अशी वेळ येऊन ठेपली आहे, कीं शालान्त

परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कोणत्याहि नीग्रो विद्यार्थ्यास त्याची इच्छा असेल त्या राज्यांतील कोणत्याहि कॉलेजमध्यें प्रवेश मिळूं शकतो. आणि त्याच्या जोडीला त्याला पुष्कळ मोठ्या रकमेची शिष्यवृत्ति मिळूं शकते. आज स्थिति अशी आहे, कीं नीग्रो विद्यार्थी मिळविण्यासाठीं महाविद्यालयांतून स्पर्धा चालू असलेली दिसते.'

हें तर सर्व खरेंच. आणि पालटलेल्या परिस्थितीचें हें चित्र मोठें आशादायक आहे, यांत शंकाच नाहीं. पण असें असलें तरी सुद्धां आजवर जें साधलें आहे, त्यापेक्षां किती तरी अधिक अजून साधावयाचें आहे. किती तरी उणीवा अजून दूर करावयाच्या आहेत. उदाहरणार्थ, दक्षिण राज्यांत अजून नीग्रो विद्यार्थ्यांच्या प्राथमिक शाळेंतील अभ्यासक्रम व त्यासाठीं दिलेला अवधि गोऱ्या विद्यार्थ्यांसाठीं चालविण्यांत येणाऱ्या तत्सम शाळांच्या मानानें कमी आहेत. आणि नीग्रो मुलामुलींच्या शिक्षणापायीं दरडोई जी रक्कम खर्च होते, ती पण अजूनपर्यंत गोऱ्यांच्या तुलनेनें कमीच आहे. अलीकडे नीग्रो लोक शिक्षणांत अधिक रस घेऊं लागले आहेत; हें तर खरेंच. पण तरी सुद्धां शिक्षणाच्या एकूण सर्व क्षेत्रांत आणि विशेषत: उच्च शिक्षणाच्या संबंधांत नीग्रो विद्यार्थ्यांची संख्या गोऱ्यांच्या मानानें अजून पुष्कळच कमी आहे. अलाबामा, मिसिसिपि, दक्षिण कॅरोलिना आणि जॉर्जिया या दक्षिणेकडील चार राज्यांनीं अजूनपर्यंत सुप्रीम कोर्टाच्या निर्णयास मान्यता दिलेली नाहीं. आणि सार्वजनिक कराच्या उत्पन्नांतून चालविलेल्या गोऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण संस्थांत अजूनसुद्धां नीग्रो विद्यार्थ्यास प्रवेश दिला जात नाहीं. पण आतां सुप्रीम कोर्टाच्या निर्णयास प्रमाण मानावें किंवा नाहीं, हा प्रश्न निश्चितपनें संपुष्टांत आला आहे. सर्व शिक्षण संस्था सर्वांस मुक्तद्वार खुल्या असाव्यात हें तत्त्व आतां सर्वमान्य झालें आहे. हें केव्हां व कसें करतां येईल, सुप्रीम कोर्टाचा निर्णय कार्यवाहींत केव्हां व कसा आणतां येईल, हाच तूर्त वादप्रश्न आहे. पण यापुढें सर्व विद्यार्थ्यांस सर्व शिक्षणसंस्थांचीं द्वारें खुलीं होतील, ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

गेल्या वीस वर्षांत शिक्षण क्षेत्रांत आश्चर्यकारक बदल घडून आले आहेत आणि यानंतरच्या कांहीं वर्षांत प्रगतीचा वेग आणखी वाढेल यांत शंकाच

नाहीं. नजीकच्या भविष्यकाळांत अशी एक वेळ येईल कीं जेव्हां तथाकथित नीग्रो कॉलेज ही संस्था नामशेष होऊन जाईल, किंवा तिचें रूपांतर काळ्या गोऱ्यांच्या संमिश्र शिक्षण संस्थेंत होईल. गेल्या कांहीं वर्षांत शिक्षणक्षेत्रांत जें कांहीं घडून आलें, त्याचीं स्वप्नें फार थोडया अमेरिकन पूर्वजांनीं पाहिलीं असतील. आतां मात्र कांहीं थोडे लोक असे आहेत कीं ज्यांना प्रगतीचा चालू वेगसुद्धां मंद वाटतो. एक गोष्ट खरी, जो कांहीं विकास घडून येत आहे, तो सर्वस्वी इष्ट असाच आहे. जी वाटचाल चालू आहे, ती योग्य दिशेनेंच चालू आहे. या प्रगतीचें श्रेय अमेरिकेंतील लोकशाही समाज रचनेसच प्रामुख्यानें द्यावें लागेल. जेथें म्हणून लोकशाही कार्यकर आहे, तेथें न्याय, सभ्यता व समता प्रस्थापित होण्यासाठीं आवश्यक तें वातावरण आपोआप निर्माण होईल. समाजांतील विकासाच्या शक्ति लोकशाहींतच परिणामकारक ठरतात

---

रॉबर्ट एल्. कार्टर

# नागरिक हक्कांचा विस्तार

लोकशाहीसाठीं व स्वातंत्र्यासाठीं जगभर चाललेल्या लढ्याचें जागतिक नेतृत्व आज अमेरिका करीत आहे. आणि त्या ध्येयाशीं विसंगत असें वर्तन तीच अमेरिका खुद्द आपल्या घरांत करीत आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांत लोकशाहीची व स्वातंत्र्याची घोषणा करणारी अमेरिका स्वतःच्या घरांत मात्र नीग्रो लोकांस लोकशाहीचे व स्वातंत्र्याचे मूलभूत हक्क नाकारीत आहे. या वर्तनांतील विसंगतीची जाणीव आज सर्व जगास होऊन चुकली आहे. आणि त्यामुळें जगभर सर्वत्र अमेरिकेस मानहानि व अप्रतिष्ठा सहन करावी लागत आहे. वस्तुस्थिति अशी आहे, कीं नागरिकांचे मूलभूत हक्क व अधिकार नीग्रो लोकांस प्राप्त व्हावेत, यासाठीं कित्येक काळ्यागोऱ्यांच्या संघटना कित्येक वर्षांपासून काम करीत आहेत. गेल्या वीस वर्षांत या देशांतील न्यायालयांनीं दिलेले निवाडे आणि स्थानिक, राज्यसंबध व राष्ट्रीय कायदे-कानून्वयें कायद्यांत घडवून आणलेल्या अनुकूल सुधारणा यांजमुळें अमेरिकेंतील नीग्रो माणसास पूर्वीपासून नाकारण्यांत आलेले अनेक हक्क आतां नव्यानें प्राप्त झाले आहेत आणि त्यांच्या संरक्षणाची हमी त्याला राष्ट्राकडून दिली गेली आहे. न्यायालयाचे निवाडे व विधिमंडळाचे कायदे यांजमुळें, बिघडलेले वांशिक संबंध सुधारण्यास पुष्कळच मदत झाली आहे. आजवर शक्य झालेली सुधारणा लक्षांत घेतां लोकांनीं सरकारच्या स्वाधीन केलेले अधिकार योग्यप्रकारें जाणून आणि प्रचलित कायदे निश्चयपूर्वक अंमलांत आणून या देशांतील वांशिक संबंध उत्तरोत्तर अधिकाधिक सुधारतील आणि

तत्त्व व आचार यांतील विसंगति सावकाश पण निश्चयानें नाहींशी करतां येईल, अशी आशा करण्यास जागा आहे.

अमेरिकेच्या घटनेनें सर्व अमेरिकन नागरिकांस मानवाच्या मूलभूत हक्कांची सनद व हमी दिलेली आहे. घटनेनें व कायद्यानें दिलेले हक्क व अधिकार जतन करणें, हा संघटित लोकशाहीचा मूलभूत संकेत आहे. आपणांस प्राप्त झालेल्या हक्कांची जपणूक करणें, हा प्रत्येक नागरिकाचा सर्वाधिक मौल्यवान अधिकार आहे. लोकशाहीच्या संकेतांचें परिपालन करून आजवर आश्चर्यकारक अशी प्रगति वांशिक संबंधाच्या प्रश्नांत झालेली दिसून येते. शांततेच्या सनदशीर मार्गांनीं न्याय्य हक्कांसाठीं लढे उभारतां येतात व यशस्वी करतां येतात, याचा प्रत्यय अमेरिकन जनतेस असल्यामुळें याच सनदशीर मार्गाचा अवलंब करण्याची प्रवृत्ति अमेरिकन लोकांत बळावत आहे. आज अमेरिकेंतील एकूण लोकसंख्येच्या एक तृतीयांश भागावर या ना त्या क्षेत्रांतील पक्षपाताचें कायद्यानें निर्मूलन करूं पाहणाऱ्या राज्यसत्तेची हुकुमत चालते. नीग्रो नागरिकांच्या मूलभूत हक्कांचें जतन, संरक्षण व विस्तरण करण्याची हमी न्यायालय देत आहे. आणि देशभर सर्वत्र नीग्रो लोकांच्या नागरिक हक्कांस मान्यता देणारे निवाडे प्रसृत होत आहेत. ही जी प्रगति साधली, तिचें स्वरूप व महत्त्व यथार्थ समजून घ्यावयाचें असेल, तर तत्संबंधी पूर्वेतिहासाचें सिंहावलोकन करणें आवश्यक आहे.

गुलामगिरींतून मुक्तता होण्यापूर्वी अमेरिकन नीग्रोंस कोणतेहि हक्क व अधिकार कायद्यानें दिले नव्हते, अशी स्थिति ज्या काळांत होती, तेव्हां सुद्धां कांहीं थोडे नीग्रो स्वतंत्र होतेच. आणि सिव्हिल वॉर होण्यापूर्वी सुद्धां न्यू इंग्लंड राज्यांत स्वतंत्र नीग्रोंस मताधिकार होता व तो ते बजावीत. युद्धाच्या परिणामीं गुलामगिरी नष्ट झाली. सर्व नीग्रो लोकांस नागरिकत्वाचे हक्क प्राप्त झाले. आणि न्यायाच्या लेखी घटनेनुसार काळेगोरे एकाच समान भूमिकेवर आले. अमेरिकेंतील संयुक्त राज्यांच्या घटनेंतील तेराव्या, चौदाव्या आणि पंधराव्या कलमांत ज्या दुरुस्त्या करण्यांत आल्या, त्यामुळें प्रत्येक गुलाम स्वतंत्र झाला. आणि निदान तत्त्वतः तरी त्याला गोऱ्या नागरिकांचे सर्व मूलभूत हक्क प्राप्त झाले. असें असलें, तरी सुद्धां १८९६ सालीं संयुक्त

राज्यांच्या सुप्रीम कोर्टानें प्लेसी वि. फर्ग्युंसन नामक एका गाजलेल्या खटल्याचा जो निवाडा दिला, त्यामुळें नीग्रो लोकांस एकदां दिलेले हक्क परत हिरावून घेतल्यासारखी परिस्थिति निर्माण झाली. घटनेंत अंतर्भूत केलेल्या चौदाव्या दुरुस्त कलमाचा अर्थ सुप्रीम कोर्टानें असा केला, कीं नीग्रो लोकांस गोऱ्यांचे सर्व मूलभूत हक्क घटनेनुसार प्राप्त झाले आहेत, पण ते सर्व प्राप्त हक्क नीग्रो लोकांस विभक्त राहून सुद्धां भोगतां येतील. या निवाड्यामुळें स्वाभाविकच नीग्रो जमात देशभर सर्वत्र बहिष्कृत ठरली. देशांतील सर्वोच्च न्यायालयानें घटनेंतील कलमाचा लावलेला अर्थ सर्वस्वी विपरीत होता. त्या अर्थाच्या परिणामीं सर्वत्र भयंकर अनर्थ ओढवला. नीग्रोवर बहिष्कार जारी केल्यामुळें जी घटना नवमुक्त नीग्रो लोकांस भावी गुलामगिरीपासून संरक्षण देऊं पाहात होती, त्याच घटनेच्या विकृत अर्थामुळें नीग्रो जनता पुन्हा एकवार अतर्क्य अन्यायाची बळी झाली. तदनंतर सर्वतोपरीनीं अस्वाभाविक अशी एक विचित्र समाजरचना अस्तित्वांत आली. नीग्रोंची गुलामगिरी संपली खरी, पण क्वचित गुलामगिरीपेक्षांहि भयंकर अशा बहिष्कृत अवस्थेंत नीग्रोंस खितपत पडावें लागलें.

वांशिक पक्षपातास व बहिष्कारास जे कोणी उत्तेजन देऊं पाहात होते, त्यांचा उद्देश एकच होता आणि तो म्हणजे नीग्रोंच्या मनोवृत्तींत कायमचा हीनगंड निर्माण करणें. अपेक्षित हीनगंड सर्व नीग्रोंच्या मनांत निर्माण झाला असेलच, अशी ग्वाही देतां येणार नाहीं. पण उलट गोऱ्यांच्या मनांत मात्र फाजील अहंकार निर्माण झाला व बळावला. सिव्हिल वॉरच्या पूर्वीपासूनच दक्षिणेकडील राज्यें गुलामगिरीचा उघड पुरस्कार करीत होतीं. तेथील गोऱ्या लोकांनीं नीग्रो-द्वेषाचें व्रत नवप्राप्त परिस्थितींत सुद्धां निर्धारानें पुढें चालू ठेवण्याचें ठरविलें. त्यांच्यापैकीं कांहीं कर्मठांनीं सर्वथा असत्य अशा तथाकथित शास्त्रोक्त सिद्धांताचा नव्यानें प्रचार करावयास सुरुवात केली. परिणामीं गोऱ्यांच्या मनांत अशी एक गैरसमजूत बळावली कीं जन्मतःच गोरे श्रेष्ठ व काळे कनिष्ठ आहेत; फार काय अगदीं परवां परवांपर्यंत, निदान १९३५ सालापर्यंत संख्याधिक गोरे असें गृहीत धरून वागत, कीं जन्मापासून प्रत्येक गोरें अर्भक काळ्या अर्भकापेक्षां अधिक बुद्धिमान्, सशक्त, शूर

आणि चारित्र्यसंपन्न असें असतें. तेव्हां वीस वर्षांपूर्वी अशी स्थिति होती कीं केवळ कायद्यानेंच नीग्रो जमात बहिष्कृत केली होती, असें नाहीं; तर शास्त्रोक्त पुरावासुद्धां सर्वतोपरींनीं नीग्रोंच्या विरुद्ध होता. वंशजात श्रेष्ठतेचा हा नसता अहंकार बहुतेक गोऱ्यांच्या मनांत घर करून होता. केवळ दक्षिणेकडेच या अहंकाराचें प्रदर्शन करण्याची प्रवृत्ति प्रचलित होती, असें नाहीं; तर उत्तरेंत सुद्धां तीच परिस्थिति होती. अमेरिकन जीवनाच्या एकूण एक सर्व क्षेत्रांत अशा रीतीनें वांशिक पक्षपाताचा फैलाव झपाट्यानें झाला. वांशिक पक्षपाताच्या या नव्या आपत्तीस तोंड देण्याचें काम त्यापुढील कित्येक नीग्रो पिढ्यांस पुरून उरलें. अमेरिकन जीवनाचें अंगोपांग पक्षपाताच्या विषानें ग्रासून टाकलें.

पक्षपाताचें विष असेंच सर्वत्र चरत चाललें, तर अल्पावधींतच अनर्थ कोसळेल, हें विचारवंतांच्या ध्यानीं यावयास विलंब लागला नाहीं. अमेरिकेची सदसद्विवेकबुद्धि वांशिक पक्षपाताच्या अन्यायाविरुद्ध बंड करून उठली. या बंडखोरांपैकीं जे कोणी विद्यापीठांतून सामाजिक संशोधन करीत होते, त्यांनीं गोऱ्यांच्या वंशजात श्रेष्ठतेचा डोलारा एकाच फटक्यांत जमीनदोस्त करून टाकला. शास्त्रोक्त सत्य काय, तें त्यांनीं धैर्यानें लोकांस समजावून सांगितलें. गोऱ्यांच्या वांशिक श्रेष्ठतेस शास्त्राधार नाहीं, हें एकदां जगजाहीर झाल्यावर अमेरिकेंतील गोरे लोक मनस्वी अस्वस्थ झाले. नीग्रो लोकांच्या मतासाठीं जेव्हां लोकसभेचे उमेदवार झगडे करूं लागले, तेव्हां नीग्रोनांसुद्धां आपल्या सामर्थ्याची जाणीव जणूं एकदम नव्यानें झाली, आणि घटनेनें व कायद्यानें जे हक्क नीग्रोंस जन्मतःच प्राप्त झालेले होते, त्यांच्या बळावर आपला उत्कर्ष साधणें शक्य आहे, ही कल्पना कित्येक सुधारकांच्या मनांत पक्की रुजली. ‘नॅशनल असोसिएशन फॉर दि अॅडव्हान्समेंट ऑफ कलर्ड पीपल’ या नामांकित संस्थेनें तर १९३५ सालापासून आपल्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या कचेरींत कायद्याबाबत सल्ला देणाऱ्या तज्ज्ञांची सर्व वेळ नेमणूक केली. लोकशाहीच्या रूढ प्रथांस अनुसरून लढावयाचें, तर त्यासाठीं घटनेनें व कायद्यानें प्रत्येक नीग्रो व्यक्तीस दिलेल्या प्रत्येक हक्काचें अत्यंत सूक्ष्म ज्ञान करून घेणें आवश्यक होतें. कारण

अखेरीस न्यायालयांतच या प्रश्नाचा अंतिम निर्णय काय तो लागावयाचा होता. अमेरिकेंत नीग्रो वंशांत जन्म घेणें म्हणजे क्रूर छळास आणि दारुण निराशेस आमंत्रण देणें होय, अशीच त्या काळांत परिस्थिति होती. या असह्य परिस्थितींत इष्ट ते बदल घडवून आणावयाचे म्हटलें, तर त्यासाठीं देशव्यापी उग्र लढे उभारणें आणि शांततेच्या मार्गानें न्यायालयांत प्रचलित अन्यायाविरुद्ध दाद मागणें, एवढा एकच एक मार्ग लोकशाहींत उपलब्ध होता. असोसिएशनच्या कचेरींत जे निष्णात वकील गोळा झाले होते, त्यांनीं पक्षपातास प्रतिकूल असे निवाडे एकामागून एक घेण्याचा सपाटा चालविला. अमेरिकेंतील सर्व लोकांस वंशनिरपेक्ष न्याय्य वागणूक मिळावी, एतदर्थ हे वकील कोर्टांतच ठाण मांडून बसले. आणि पक्षपातास विरोधी असे निवाडे लागोपाठ अनेक वेळां घेऊन अन्यायाविरुद्ध जनमत संघटित करण्याचा त्यांनीं यशस्वी यत्न केला.

त्यानंतरच्या वीस वर्षांत नीग्रो लोकांच्या मूलभूत नागरिक हक्कासंबंधींचे अनेक प्रश्न सुप्रीम कोर्टांत खेंचण्यांत आले. कोणतीहि फिर्याद शेवटीं सुप्रीम कोर्टांत वरपर्यंत खेंचून आणणें, ही गोष्ट सोपी नव्हती. कोणतीहि फिर्याद सुप्रीम कोर्टांत दाखल करावयाची असेल, तर त्यासाठीं अनेक स्थानिक राजधान्यांच्या कोर्टांतून प्रथम त्या फिर्यादीची सुनावणी व्हावी लागते. हा मार्ग विलक्षण त्रासाचा, खर्चाचा, कष्टाचा व कंटाळवाणा आहे. पण लोकशाहींत ही सर्व वाटचाल आवश्यकच आहे. सुदैवानें या संस्थेस अनेक समर्थ संस्थांचा व कामगार संघटनांचा आणि जागृत काळयागोऱ्या व्यक्तींचा पाठिंबा होता.

अमेरिकेंत याबाबतची परिस्थिति अत्यंत गुंतागुंतीची होती. घटनेनें नीग्रो माणसास कांहीं मूलभूत हक्क दिले होते, तर कित्येक राज्यांचीं धोरणें साक्षात् घटना-विरोधी होतीं. विशेषतः दक्षिणेकडील राज्यांत पक्षपातास शक्यतों उत्तेजन देण्याचें धोरण सर्वत्र जारी होतें. राज्याविरुद्ध राष्ट्र असें या लढ्याचें विलक्षण स्वरूप होतें. उदाहरणार्थ, ओक्लाहोमा राज्यांत ‘ग्रँड फादर क्लॉज्’ या नांवानें ओळखलें जाणारें एक विचित्र कलम जारी होतें. प्रस्तुत कलमाचा इत्यर्थ असा कीं पूर्वी आजास मतदानाचा हक्क असेल,

तरच तो हक्क नातवास मिळूं शकेल. अर्थातच त्या काळच्या पिढींतील बहुतेक सर्वच नीग्रोंचे पूर्वज त्यांच्या काळांत गुलाम होते व त्यांना मतदानाचा अधिकार नव्हता. ज्यांच्या पूर्वजांस मताधिकार नव्हता, अशा वंशजास मताधिकार नाहीं, याचा अर्थच परिणामीं असा कीं कोणत्याहि नीग्रो माणसास मतदानाचा अधिकार नाहीं. शेवटीं सुप्रीम कोर्टात लढून या निर्घृण अन्यायाची दाद लावून घ्यावी लागली. सुप्रीम कोर्टानें असा निर्णय दिला कीं ओक्लाहोमा राज्यांतील ' ग्रँड फादर क्लॉज ', घटनेंतील पंधराव्या दुरुस्त कलमाचा भंग करणारा आहे. सुप्रीम कोर्टाचा हा निर्णय जाहीर झाल्यानंतरच ओक्लाहोमा राज्यांतील नीग्रोंस मतदानाचा हक्क प्राप्त झाला. टेक्सास राज्यांत नीग्रोंचा मताधिकार मर्यादित करण्यासाठीं अनेक अन्याय्य निर्बंध लादण्यांत आले होते, ते सुप्रीम कोर्टांतून रद्द करून घ्यावे लागले. लुईव्हिल राज्यांत काळयागोऱ्यांच्या वसाहती विभक्त करण्याच्या उद्देशानें एक वटहुकूम जारी करण्यांत आला होता. तो सुद्धां सुप्रीम कोर्टानें चौदाव्या दुरुस्त कलमास विरोध म्हणून रद्द ठरवला. कित्येक फिर्यादी अशा असत कीं ज्या चालविल्या जात असतांना कायद्यानें उपलब्ध करून दिलेल्या सवलती नीग्रोंस दिल्या जात नसत. सुप्रीम कोर्टानें अशा फिर्यादींचे खालील कोर्टानें दिलेले निर्णय रद्द ठरविले, आणि अशा फिर्यादी पुनः रीतसर चालविण्याचे हुकूम दिले, पूर्वीच्या काळांतील या अशा फिर्यादींचा अभ्यास करीत असतां असें निदर्शनास आलें कीं अभ्यस्त तज्ज्ञांच्या हातीं फिर्याद सोंपविली, तर अपेक्षित निर्णय योग्य त्या कालावधीनें पण अविलंब मिळूं शकतो. अशा रीतीनें सुप्रीम कोर्टांतून अनेक निवाडे पैदा करण्यांत आले. आणि त्यांच्या बळावर प्रत्येक राज्यांत अनेक नव्या फिर्यादी करून इष्ट ते निर्णय मिळविण्यांत आले. १९३५ सालानंतर ॲसोसिएशनच्या विद्यमानें हजारों खटले लढविण्यांत आले. वांशिक पक्षपातास विरोधी व नीग्रोंच्या हक्कास अनुकूल असे निवाडे असंख्य खटल्यांत पैदा करण्यांत आले. पक्षपाताविरुद्ध सुसंस्कृत जनमत संघटित करण्याच्या कामीं या निवाड्यांचा पुष्कळच उपयोग झाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

...३...

अनुक्रम २५८४८

परिणामीं अमेरिकनांच्या मनोवृत्तींत अनुकूल असे बदल घडवून आणण्यास प्रस्तुत निवाडे उपकारक ठरले. आणि १९३५ सालानंतर अमेरिकेंतील नीग्रोंच्या संबंधांत क्रांतिकारक सुधारणा झालेली दृष्टोत्पत्तीस आली. वंशनिरपेक्ष लोकशाहीचा आदर्श अद्यापि वस्तुस्थितींत आकारास यावयाचा आहे. पण नीग्रो, अमेरिकन जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे आणि त्याला निःपक्षपाती व न्याय्य वागणूक दिली जाणें आवश्यक आहे, हें तत्त्व उत्तरोत्तर प्रभावी होत असलेलें आढळून येत आहे. एक गोष्ट खरी, वैध मार्गास अनुसरणारे अमेरिकन लोक संख्येनें वाढत असले, तरीसुद्धां या देशांत अजून कित्येक माणसें अशीं आहेत कीं जीं पूर्वग्रहास वा स्वार्थास स्मरून वैध मार्गास विरोध करतात. आणि कांहीं थोडे लोक मात्र प्रामाणिकपणानें पक्षपाताचा पुरस्कार करतात. ज्यांना सुप्रीम कोर्टाच्या निवाड्यांची फारशी दिक्कत वाटत नाहीं, ते असें म्हणतात कीं यापुढें नीग्रो लोकांत शिक्षणाचा प्रचार अधिक झाला कीं पक्षपातास जागाच उरणार नाहीं. हें मत पुरावा पाहिला असतां टिकण्यासारखें नाहीं. कारण वांशिक संबंधांत जी कांहीं सुधारणा आजवर झालेली दिसते, ती खरोखर उपर्युक्त निवाड्यांचेंच फलित होय.

आज परिस्थितींत जे कांहीं इष्ट बदल घडून आलेले दिसतात, ते निःपक्षपात समाजरचनेस उपकारक ठरतील, हें उघड आहे. हे बदल घडून आले, ते प्रामुख्यानें गेल्या वीस वर्षांतील सुप्रीम कोर्टाच्या निवाड्यांमुळेंच शक्य झालें, यांत शंका नाहीं. सुप्रीम कोर्टानें सतत नीग्रोंच्या मूलभूत हक्कांचा धडाडीनें पाठपुरावा केलेला आहे. आणि राज्यांराज्यांतील वंशवर्णसापेक्ष पक्षपातावर वेळोवेळीं तीव्र आघात केला आहे. घटनेनें सर्वांस समान हक्क दिलेले आहेत आणि ते प्राप्त करून घेण्यासाठीं व प्राप्त हक्क जतन करण्यासाठीं जो कोणी न्यायालयांत कारवाई करूं पाहील, त्याला घटनेंत दिलेल्या सर्व सवलती प्रत्येक राज्यानें न्याय्य बुद्धीनें उपलब्ध करून द्यावयास हव्यात, असें सुप्रीम कोर्टाचें प्रतिपादन आहे. सर्वोच्च सुप्रीम कोर्ट नीग्रोच्या पाठीशीं उभें आहे, ही वस्तुस्थिति आहे. त्याचबरोबर उदार शिक्षणामुळें व धार्मिक ध्येयवादामुळें वांशिक संबंध सुधारण्यास पुष्कळच मदत केली आहे, हें निर्विवाद कबूल करावयास हवें. सुप्रीम कोर्टाच्या निवाड्यांनीं केवळ

सार्वजनिक संबंधांतील पक्षपात रद्द केला. त्याचा परिणाम असा झाला कीं व्यक्तिव्यक्तींतील पक्षपाताचें निरसन होण्यास कल्पनातीत मदत झाली. व्यक्तिगत संबंधांत घटनापर्याप्त विधिनिषेध मार्गदर्शक ठरूं शकतात ही वस्तुस्थिति आहे. सुप्रीम कोर्टाच्या निवाड्यामुळें व्यक्तींच्या व संस्थांच्या न्याय्यबुद्धीस इष्ट तें आवाहन पोहोंचलें. आणि अशा व्यक्तिसंस्था आपण होऊन नीग्रोंस न्याय देण्यास प्रवृत्त झाल्या हा इतिहास आहे. वांशिक संबंधांत सुप्रीम कोर्ट म्हणजे देशाच्या सदसद्विवेक बुद्धीचें निर्णायक मत ठरलें आहे. सुप्रीम कोर्टानें राज्यांराज्यांतील पक्षपातास परिणामकारक आळा घातला आहे. सुप्रीम कोर्टानें कायद्याच्या प्रश्नांत केवळ अंतिम मार्गदर्शन केलें, असें नाहीं; तर देशांतील एकूण व्यवहारास नैतिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. ज्या व्यवहारांत न्यायालयाचा हात पोहोंचत नव्हता, तेथेंसुद्धां सुप्रीम कोर्टानें अचूक मार्गदर्शन केलें आहे. सुप्रीम कोर्टाचे निवाडे न्यायाच्या क्षेत्रांत तर उपकारक ठरलेच, पण न्यायालयाबाहेर देखील नीग्रोंची प्रतिष्ठा स्थापिण्यास हे निवाडे साहाय्यकारक ठरले. लोकशाहीच्या ध्येयाविषयीं उदात्त श्रद्धा नागरिकांच्या मनांत नव्यानें जागृत झाली. आणि लोकशाहींतच निःपक्षपाती न्याय मिळूं शकतो, असा विश्वास सर्वांच्या मनांत नव्यानें निर्माण झाला.

१९३५ ते १९५४ या काळांत सुप्रीम कोर्टानें वांशिक पक्षपाताच्या विरुद्ध जे निवाडे दिले, त्यांचे परिणाम अशा रीतीनें दूरगामी ठरले. सर्वांच्या नागरिक हक्काचें जतन करण्यास सर्वोच्च सुप्रीम कोर्ट बद्धपरिकर आहे, हें जगाच्या निदर्शनास स्पष्टपणें आलें आणि त्यामुळें अमेरिकेंतील नीग्रोंचें जीवन सुसह्य व सन्मानाचें होण्यास मदत झाली. मूलभूत नागरिक हक्कांबाबत गेल्या वीस वर्षांत सुप्रीम कोर्टानें जे निवाडे दिले, त्यांचा संक्षिप्त तपशील खालीं सादर केला आहे.

१९४४ सालीं स्मिथ वि. ऑलराइट नामक खटल्यांत सुप्रीम कोर्टानें घटनेंतील पंधराव्या दुरुस्त कलमाच्या आधारानें नीग्रोच्या मताधिकारास मान्यता दिली. खरें म्हणजे नीग्रोस मताधिकार पूर्वीपासून होताच. पण कांहीं कांहीं राज्यें मतदानाची यंत्रणा अशा विशिष्ट हेतूनें करीत कीं त्यामुळें नीग्रोस मिळालेला मतदानाचा हक्क त्याला बजावतांच येऊं नये. निवडणुकीं-

तील वांशिक पक्षपात सुप्रीम कोर्टानें सरसहा रद्द केल्यानंतर नीग्रो मतदारांच्या संख्येंत झालेली वाढ आश्चर्यकारक आहे. उदाहरणार्थ, १९४४ सालीं दक्षिण राज्यांत एकूण ५००००० नीग्रो मतदान नोंदलेलें होतें. १९५२ सालीं त्याच राज्यांतील नीग्रो मतदारांची संख्या एकूण १२००००० झाली. दक्षिणेकडील राज्याच्या राजकीय कारभारांत नीग्रोंचें महत्त्व जसजसें वाढत चाललें, तसतसें गौऱ्यांच्या वंशजांत श्रेष्ठतेचें तत्त्वज्ञानहि सावकाश अप्रिय व्हावयास लागलें. आणि अलीकडे तर अशी स्थिति आहे कीं वांशिक श्रेष्ठतेच्या वल्गना गोरे सहसा करीतच नाहींत.

नीग्रो मतदारांची संख्या जसजशी वाढत चालली, तसतशी त्यांच्या मतांची किंमत दोन्ही पक्षांतील राजकीय नेत्यांस कळून चुकली आणि राजकारणांत नीग्रो मताचें महत्त्व व वर्चस्व आपोआप वाढीस लागलें. कित्येक सरहद्द विभागांत आणि उत्तरेकडील राज्यांत तर अशी स्थिति आहे कीं नीग्रो मतदारांनीं मनांत आणलें, तर ते निवडणुकीचा निकाल स्वतःच्या इच्छेस अनुकूल असा सहज लावून घेऊं शकतील. नीग्रो मतदार अजूनपर्यंत क्वचित्च संघटित मतदान करतात. पण ज्या दिवशीं एकमुखानें ते आवाज उठवतील, त्या दिवशीं ते सर्व राजकीय सत्ता सहज काबीज करूं शकतील, असें म्हणण्याचें भय कोणासच वाटत नाहीं. याचें कारण असें कीं इतर सर्व नागरिकांप्रमाणेंच नीग्रो मतदारसुद्धां आपआपल्या पक्षाच्या उमेदवारास आपलीं मतें देतात. ज्या पक्षाच्या हातीं समाजाचें व देशाचें भवितव्य सुरक्षित राहील, असें त्यांना वाटतें, त्या पक्षास सदसद्विवेक बुद्धीस स्मरून ते मतदान करतात. नीग्रोचें मत हें सर्वसाधारण बुद्धिमत्तेचें मत आहे. त्या मतामुळें सर्व नागरिकांच्या कल्याणास अनुकूल असे कायदे प्रस्थापित करण्यास साहाय्यच होतें. वेळप्रसंगीं त्यांच्या मतदानांत आश्चर्यकारक पालट झालेला दिसतो. एकदां नीग्रोंनीं बहुसंख्येनें रिपब्लिकन पक्षास मतें दिलीं, तर अलीकडे त्यांचा भरघोंस पाठिंबा डेमोक्रॅटिक पक्षास असलेला दिसतो. उद्यां कदाचित् त्यांचें मतदान विरुद्ध पक्षास अनुकूल होईल, किंवा दोन्ही राजकीय पक्षांत त्यांचीं मतें सारखींच विभागलीं जातील. स्वतंत्र राष्ट्रांतील लोकशाहींतच मतदानाचे असे चमत्कार घडून येऊं शकतात.

नीग्रो नागरिकांचें मत आपणास अनुकूल व्हावें, या हेतूनें त्या त्या पक्षाचे उमेदवार नीग्रो मतदारांस नाना प्रकारचीं सुधारणेचीं अभिवचनें देतात. अर्थातच निवडणुकीपूर्वी दिलेलीं वचनें निवडणुकीनंतर सर्वच कृतींत उतरतात, असें मुळींच नाहीं. असें असलें, तरी सुद्धां आजच्या राजकारणांत नीग्रो मतांस जें असाधारण महत्त्व प्राप्त झालेलें आहे, तें लक्षांत घेऊन दिलेलीं कांहीं वचनें तरी पाळणें उमेदवारास भाग पडतें आणि दिल्या वचनास जागून कांहीं ना कांहीं सुधारणा नीग्रो मतदारांच्या पदरांत टाकावीच लागते. वस्तुस्थिति अशी असल्यामुळें प्रत्येक निवडणुकीनंतर नीग्रोंची स्थिति अधिकाधिक सुधारलेली दिसते. स्थानिक परगण्यांतील, राज्यांतील आणि राष्ट्रांतील प्रत्येक अधिकारपदावर नीग्रो मताचा अधिकार चालत असल्यामुळें स्वाभाविकच आजच्या राजकारणांत नीग्रो मतांस अनन्यसाधारण असें अपूर्व महत्त्व प्राप्त झालेलें आहे. नीग्रो मताच्या वाढत्या प्रभावाचा प्रत्यय आणखी एका बाबतींत स्पष्टपणानें प्रगट झालेला दिसतो. महत्त्वाच्या अशा सार्वजनिक अधिकारपदांवर अधिकाधिक नीग्रोंची नेमणूक वा निवडणूक झालेली दिसते. कॉलेज ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्कमधील राज्यशास्त्राचा प्राध्यापक डॉ० जॉन ए. डेव्हिस प्रस्तुत संदर्भात लिहितो:—‘ १९५१ सालांत अशी स्थिति होती. १६ राज्यांतून ४० नीग्रो विधिमंडळाचे सभासद होते. १९ नीग्रो नगरपालिकांच्या विधिमंडळाचे सभासद होते आणि १४ नीग्रो नगरपालिकांच्या कक्षेंतील न्यायालयांत न्यायाधीश म्हणून काम करीत होते. केंद्र सरकारांत ५४ नीग्रो आज बडया अधिकाराच्या जागांवर काम करीत आहेत. त्यांजपैकीं एक सर्किट कोर्टाचा न्यायाधीश आहे. एक कस्टम्स कोर्ट ऑफ अपीलसचा न्यायाधीश आहे. एक युनायटेड नेशन्स ॲसेंब्लीचा पर्यायी प्रतिनिधि आहे. एक केंद्र सरकारच्या शिक्षणखात्यांत ॲसिस्टंट डायरेक्टर आहे. एक सेक्रेटरी ऑफ डिफेन्सचा सिव्हिलियन ॲसिस्टंट आहे. एक डायरेक्टर ऑफ सिलेक्टिव्ह सर्व्हिसचा एक्झिक्यूटिव्ह ॲसिस्टंट आहे. एक कॉन्सल जनरल आहे. आणि एक यू. एस्. एंबसीजचा फर्स्ट सेक्रेटरी आहे. एक मजूरखात्याचा असिस्टंट सेक्रेटरी आहे. नगरपालिकांच्या आणि राज्यांच्या अनेक अधिकारपदांवर नीग्रो आहेतच.

इलिनॉइस राज्याचा डायरेक्टर ऑफ पब्लिक सेफ्टी नीग्रो आहे. फिलाडेल्फिया आणि न्यूयॉर्क राज्यांचे सिव्हिल सर्व्हिस कमिशनर्स नीग्रो आहेत. न्यूयॉर्क राज्याच्या मजूर खात्याचा सेक्रेटरी नीग्रो आहे. ओहिओ राज्यांत इंडस्ट्रियल कमिशनचा उपाध्यक्ष नीग्रो आहे. आणि न्यूयॉर्कमधील मॅनहॅटन बरोचा प्रेसिडेंट एक नीग्रो आहे. असिस्टंट डिस्ट्रिक्ट ॲटॉर्नीच्या पदावर असंख्य नीग्रो आहेत. अशा रीतीनें राजकारणांत नीग्रोमतास जें महत्त्व व वर्चस्व प्राप्त झालें, त्याचा परिणाम म्हणून कित्येक लायक नीग्रोंची सार्वजनिक अधिकारपदावर नेमणूक वा निवडणूक झालेली दिसते.'

हा सर्व आश्चर्यकारक बदल केवळ आजच घडून आला, असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण यापूर्वीसुद्धां कित्येक नीग्रो माणसांनीं कित्येक सरकारी कार्यक्षेत्रांत चांगली आणि भरीव कामगिरी केलेली दिसते. १८६९ ते १९०१ या तीस वर्षांच्या काळांत कॉंग्रेसमधील एकूण सदतीस जागा नीग्रोंनीं मिळविलेल्या आहेत. आणि त्यांजपैकीं दोन नीग्रो सीनेटर्सनीं वरिष्ठ विधिमंडळांत उपयुक्त काम केलें आहे. आज कॉंग्रेसच्या सभासदांत तीन नीग्रो आहेत : शिकागोचा सीनेटर विल्यम डॉसन, न्यूयार्कचा सीनेटर ॲडम क्लेटन पॉवेल आणि डेट्रॉईटचा चार्ल्स सी. डिग्ज. १९५५ सालीं राष्ट्राध्यक्ष आयसन हॉवरनें ई. फ्रेडरिक मॉरो या नीग्रोची व्हाईट हाऊसचा सल्लागार म्हणून नेमणूक केली आहे.

१९४६ सालीं मॉर्गन वि. व्हर्जिनिया नामक केसमध्यें सुप्रीम कोर्टानें एक महत्त्वाचा निर्णय दिला. विविध राज्यांतून रेल्वे प्रवासाबाबत अनेक निर्बंध नीग्रोंच्या संबंधांत लादलेले होते. कांहीं राज्यांत रेल्वेनें प्रवास करणाऱ्या नीग्रो यात्रेकरूंस त्यांच्यासाठीं खास राखून ठेवलेल्या डब्यांतूनच प्रवास करावा लागे. या निर्बंधामुळें राज्यांराज्यांतून थेटचा प्रवास करणाऱ्या नीग्रो यात्रेकरूंची विलक्षण कुचंबणा होई. ज्या राज्यांत बहिष्कार जारी असे, तेथील रेल्वे-प्रवास बहिष्कृतांच्या डब्यांतूनच त्यांना करावा लागे. यामुळें एका राज्याची सरहद्द मागें पडली कीं लगेच लांबचा प्रवास करणाऱ्या नीग्रो यात्रेकरूंस स्वतःची व सामानाची उचलसाचल करावी लागे. प्रवासाच्या या त्रासदायक पद्धतीमुळें नीग्रो यात्रेकरूंस किती

कष्ट, मानहानि व मनःसंताप सहन करावा लागत असेल, याची कल्पनाच केलेली बरी. उपर्युक्त केसमध्यें सुप्रीम कोर्टानें जो महत्त्वाचा निवाडा दिला, त्यामुळें नीग्रो यात्रेकरूंचे हाल एकदम संपुष्टांत आले. देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत एकाच डब्यांतून प्रवास करण्याचा नीग्रो यात्रेकरूंचा हक्क सुप्रीम कोर्टानें मान्य केला. या निवाड्यामुळें कोणत्याहि राज्यांत बहिष्कृत नीग्रोंसाठीं रेल्वेचे वेगळे डबे जोडण्याची सक्त मनाई झाली. यानंतर कांहीं वर्षांनीं आणखी एक महत्त्वाचा निवाडा याच संबंधांत सुप्रीम कोर्टानें दिला मिशिगन राज्यांत बहिष्कृत नीग्रोंसाठीं वेगळे डबे वापरणाऱ्या रेल्वे कंपनीस तेथील कोर्टानें शिक्षा केली होती. तिचा पाठपुरावा सुप्रीम कोर्टानें केला. आणि केवळ वंशभेदाच्या आधारावर नीग्रो यात्रेकरूंस प्रवासाचा हक्क नाकारणाऱ्या रेल्वे कंपनीस शिक्षा ठोठावली. आज सुद्धां कांहीं राज्यांतून रेल्वे–प्रवासाबाबत पक्षपाताचें धोरण जारी आहे. पण राज्याराज्यांच्या सीमा ओलांडून लांबचा वा थेटचा प्रवास करणाऱ्या यात्रेकरूंस आतां हें बहिष्काराचें धोरण ताप देऊं शकत नाहीं. सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाचा आणखी एक उपकारक परिणाम असा झाला आहे कीं ज्या राज्यांत वांशिक पक्षपात अजूनहि जारी आहे, त्या राज्यांतसुद्धां नागरिकांचे मूलभूत हक्क प्रमाण मानून पक्षपात रद्द ठरविणारे निवाडे तेथील न्यायालयें आतां देऊं शकतात. आणखी एक गोष्ट प्रस्तुत संदर्भांत स्पष्ट झाली. ती ही कीं अमेरिकेचें राष्ट्रीय धोरण निःपक्षपाती आहे. आणि कांहीं राज्यांतून पक्षपात जारी असेल, तर तो राष्ट्रीय धोरणाचा उपमर्द करणारा आहे.

१९५० सालीं हेंडर्सन वि. युनायटेड स्टेट्स नामक केसमध्यें सुप्रीम कोर्टानें पंक्तिप्रपंचाविरुद्ध स्पष्ट निवाडा दिला. आंतरराज्य प्रवाससंबंधींचा जो कायदा आज अस्तित्वांत आहे, त्याचा अर्थ सुप्रीम कोर्टानें निःसंदिग्ध शब्दांत समजावून सांगितला. त्यापूर्वी थेटच्या वा राज्यांच्या सरहद्दी ओलांडून लांबचा प्रवास करणाऱ्या रेल्वे गाड्यांत गोऱ्यांसाठीं व काळ्यांसाठीं विभक्त भोजनप्रबंध असे. आणि भोजनाचे वेळीं व ठिकाणीं काळ्यांगोऱ्यांची एकत्र सरमिसळ होऊं नये, अशी दक्षता रेल्वे कंपन्या घेत. काळ्यागोऱ्यांमधील हा पंक्तिप्रपंच सुप्रीम कोर्टानें अन्याय्य म्हणून रद्द केला.

आणि आज अशी स्थिति आहे कीं रेल्वे कंपन्यांनीं आपण होऊन पूर्वोक्त पंक्तिप्रपंच रद्द केला आहे. आंतरराज्य प्रवास करूं इच्छिणाऱ्या सर्व यात्रेकरूंस समान हक्क प्राप्त होतात, आणि हे हक्क सुप्रीम कोर्टाच्या वंशनिरपेक्ष निवाड्यानें मान्य केले आहेत. ही आज वस्तुस्थिति आहे. राष्ट्राचें धोरण वंशनिरपेक्ष असल्यामुळें बहुतेक विमानतळांवरील वेटिंगरूम्समध्यें आज पक्षपात नाहीं. कांहीं थोड्या विमानतळांवर वेटिंगरूम्समध्यें गोरे व काळे असे फलक लावलेले दिसले, तरीसुद्धां आज कोणी त्या फलकांकडे विशेष लक्ष देत नाहीं. पण पक्षपाताचा निर्देश करणारे हे फलक अजूनपर्यंत तेथें आहेत, ही मात्र वस्तुस्थिति आहे.

दक्षिणेकडील राज्यांत बसच्या प्रवासांत पक्षपात सर्वत्र आणि संपूर्ण जारी आहे. बसमध्यें उतारू सरमिसळ एकत्र बसूं शकत नाहींत. आणि बस स्टेशन्समध्यें पक्षपाताचें धोरण सर्रास जारी आहे. तेथें रेल्वे-प्रवासांत सुद्धां पक्षपात दक्षतापूर्वक अंमलांत आणलेला दिसतो. एवढेंच काय, पण सेंट लुई, सिनसिनाटी आणि वाशिंग्टन येथून दक्षिणेकडे जाणाऱ्या रेल्वे गाड्यांत सुद्धां हाच पक्षपात प्रभावी आहे. दक्षिणेकडील राज्यांत रेल्वे स्टेशनांवरील वेटिंग रूम्समध्येंदेखील पक्षपात आवर्जून पाळला जातो. अर्थातच राज्यांराज्यांतील हा असला पक्षपात देशाच्या राष्ट्रीय धोरणाशीं सर्वथा विसंगत आहे. त्याचा निरास व्हावा म्हणून इंटरस्टेट कॉमर्स कमिशनसमोर आंतरराज्य प्रवास करणाऱ्या एकूण अकरा रेल्वे कंपन्यांविरुद्ध एक महत्त्वाचा दावा तूर्त चालू आहे. त्याचा निर्णय अजून लागावयाचा आहे.

१९४८ सालीं शेले वि. क्रेमर नामक केसमध्यें सुप्रीम कोर्टानें एक महत्त्वाचा निवाडा दिला. राज्यांतील कांहीं कोर्टांनीं जमिनी व घरें यांची मालकी, विक्री व वापर यांचेबाबत वांशिक पक्षपातास अनुकूल असे निवाडे दिले होते, ते सुप्रीम कोर्टानें फेटाळून लावले. तोंपर्यंत स्थिति अशी होती कीं कांहीं गोरे एकत्र जमून नीग्रो लोकांस एका विशिष्ट विभागांत जमीन वा घर विकावयाचें नाहीं, असें आपआपसांत ठरवीत. पण जर का त्यांच्यांतील एखाद्या व्यक्तीनें फुटून आपली स्थावर मालमत्ता नीग्रो खरेदीदारास विकावयाचें ठरविलें, तर मात्र देशांतील कोणत्याहि कोर्टांत त्याच्याविरुद्ध

वचनभंगाची फिर्याद लावतां येत नसे. कोर्टानें सांगितलेला हा निषेध ध्यानांत बाळगून नीग्रो माणसें पूर्वीच्या गोऱ्यांसाठीं खास राखून ठविलेल्या वस्त्यांतून शक्य तेथें जमीन वा घर विकत घेण्याची संधि सहसा सोडीत नाहींत. अशा रीतीनें वरच्या वस्त्यांतील तटबंदीच्या भिंती हादरे बसून कोसळून पडत आहेत. परिणामीं आतां अशी आशा निर्माण झाली आहे कीं अमेरिकेंत सर्वत्र काळ्यागोऱ्या सर्व लोकांस खुल्या अशा वस्त्या उत्तरोत्तर अधिकाधिक उपलब्ध होतील व त्यांची संख्या सदा वाढत राहील. शेले वि. क्रेमर या दाव्याचा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. कारण पूर्वीच्या कायद्यानें व रूढीप्रमाणें उत्तर व पश्चिम अमेरिकेंतील मोठमोठ्या नगरांतून उपलब्ध असलेल्या सर्वांत चांगल्या व सोयीस्कर जागा गोरे लोक केवळ स्वतःसाठींच राखून ठेवण्याचा यत्न करीत. आणि काळ्यांचा संपर्क टाळण्यांत तेवढ्यापुरतें यशस्वी होत. वस्त्यावस्त्यांतील भेदभाव नाहींसा करण्यांत यश आलें, तर काळ्यागोऱ्यांचे नागरिक संबंध निकटवर्ती होतील व सुधारतील, हें सहज समजण्यासारखें आहे. सुप्रीम कोर्टाच्या प्रस्तुत निवाड्यामुळें नीग्रो नागरिकांस नागरिक म्हणून जे मूलभूत अधिकार आहेत, त्यांजपैकीं एक महत्त्वाचा अधिकार – वसतिस्वातंत्र्याचा – नीग्रोंस नव्यानें मिळवून दिला आहे.

काळ्यागोऱ्यांतील पक्षपात म्हणजे राष्ट्राच्या घटनेवर आघात होय. हें जाणून घटनेनें सर्व नागरिकांस निःपक्षपात असे जे हक्क दिले आहेत, त्यांची अंमलबजावणी निग्रहपूर्वक करणें अत्यंत आवश्यक आहे. पूर्वी सर्वत्र परिस्थिति अशी होती कीं खास काळ्यांच्या शाळांतील नीग्रो शिक्षकांस गोऱ्यांच्या मानानें फारच कमी पगार मिळत असे. पण ह्या संबंधांत घटनेनुसार जो अन्याय उघड दिसत होता, तो नाहींसा करण्यासाठीं राज्याराज्यांतून सर्वत्र लढे उभारण्यांत आले. प्रत्येक राज्यांतील कोर्टाकोर्टांतून काळ्यागोऱ्या शिक्षकांच्या वेतनमानांतील पक्षपात रद्द करून घेण्यांत आला. आणि आज तर स्थिति अशी आहे कीं बहुतेक सर्व ठिकाणीं काळ्यागोऱ्या शिक्षकांचें वेतनमान एकच आहे. शिक्षणक्षेत्रांत आणखीं एक अन्याय फार पूर्वीपासून मूळ धरून होता. तो म्हणजे एखाद्या राज्यांतील गोऱ्या विद्यार्थ्यांस जें उच्च

शिक्षण विनासायास उपलब्ध होत असे, तेंच नीग्रो विद्यार्थ्यांस नाकारलें जात असे. हा अन्यायसुद्धां उघड होता. आणि त्याची दाद लावून घेणें अगत्याचें होतें. १९३८ सालीं मिसूरी राज्यांतील गेन्स नामक एका नीग्रो विद्यार्थ्यानें समान उच्च शिक्षण मिळविण्याचा हक्क प्रस्थापित करण्यासाठीं थेट सुप्रीम कोर्टापर्यंत धांव घेतली, त्याला मिसूरी विद्यापीठांत कायद्याचा अभ्यास करण्यासाठीं प्रवेश हवा होता आणि तो नाकारण्यांत आला होता. याबाबत राज्याचें म्हणणें असें होतें कीं आपण आपल्या राज्यांतील या नीग्रो विद्यार्थ्यांस उच्च शिक्षणास आवश्यक ती शिष्यवृत्ति देण्यास तयार आहोंत. तिच्या बळावर दुसऱ्या कोणत्या तरी राज्यांत त्यानें अपेक्षित तें उच्च शिक्षण संपादन करावें. नीग्रो विद्यार्थ्यासाठीं एवढें केलें, म्हणजे घटनेनें त्याला दिलेला हक्क आपण मंजूर केला, असें होईल. पण सुप्रीम कोर्टानें मिसूरी राज्याची ही कैफियत धुडकावून लावली. आणि घटनेंतील चौदाव्या दुरुस्त कलमाप्रमाणें राज्यांतल्या राज्यांत हवें तेथें, हवें तें उच्च शिक्षण गोऱ्यांच्या बरोबरीनें संपादन करण्याचा नीग्रो विद्यार्थ्यांचा हक्क उचलून धरला. सुप्रीम कोर्टाचा हा निवाडा कायद्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा होता आणि काळ्यागोऱ्यांतील सामाजिक संबंध सुधारण्यास प्रस्तुत निवाड्यानें मोठेंच साहाय्य केलें. कांहीं राज्यांतील शिक्षणखात्यांतून विभक्त पण समान संधीचें खूळ बरेंच बोकाळलेलें होतें. त्यावर सुप्रीम कोर्टाच्या निवाड्याचा हा आघात चांगलाच परिणामकारक ठरला, यांत शंका नाहीं.

घटनेनें सर्वांस एकत्र व समान संधि दिली आहे, हें तत्त्व सुप्रीम कोर्टानें वारंवार घोषित केलें आहे. १९४८ सालीं सिप्युएल वि. बोर्ड ऑफ रीजंटस् नामक गाजलेल्या दाव्याचा निवाडा याच तत्त्वास अनुसरून सुप्रीम कोर्टानें नीग्रोंस अनुकूल असा दिला. एखाद्या राज्यानें गोऱ्या विद्यार्थ्यांसाठीं उच्चतर शिक्षणाच्या कांहीं नवीन सोयी विद्यापीठानें उपलब्ध करून दिल्या, तर त्यांचा लाभ लायक नीग्रो उमेदवारांस तत्परतेनें मिळावयास हवा, असा सुप्रीम कोर्टानें सर्व राज्यांस आदेश दिला. प्रस्तुत संबंधांत सुप्रीम कोर्टानें तदनंतर दिलेले दोन निवाडे राष्ट्रांतील सर्व राज्यांस मार्गदर्शक ठरतील अशा योग्यतेचे आहेत. १९५० सालीं स्वेट वि. पेंटर नामक दाव्याच्या

संबंधांतील सुप्रीम कोर्टाचा निवाडा उल्लेखनीय आहे. टेक्सास विद्यापीठांत गोऱ्यांना कायद्याचें उच्चतर शिक्षण देण्याची सोय होती, ती अन्यत्र असलेल्या काळ्यांच्या लॉ स्कूलमध्यें नव्हती. अशा स्थितींत टेक्सास विद्यापीठानें लायक नीग्रो विद्यार्थ्यास कायद्याच्या उच्च शिक्षणासाठीं दाखल करून घ्यावें, असा स्पष्ट आदेश सुप्रीम कोर्टानें दिला, त्याच दिवशीं मॅकलॉरिन वि. ओक्लाहोमा स्टेट रीजंटस् नामक दाव्याच्या संबंधांत सुप्रीम कोर्टानें आणखी एक महत्त्वाचा निवाडा जाहीर केला. ओक्लाहोमा विद्यापीठानें एका नीग्रो विद्यार्थ्यास ग्रॅज्युएट स्कूलमध्यें दाखल करून घेतलें होतें. पण प्रत्यक्ष वर्गांत व इतरत्र त्या नीग्रो विद्यार्थ्यानें गोऱ्यांच्या संपर्कांत येऊं नये, यासाठीं बहिष्काराचें वातावरण तेथें दक्षतापूर्वक निर्माण केलें होतें. त्याविरुद्ध सुप्रीम कोर्टानें आवाज उठविला व विद्यापीठास काळ्यागोऱ्यांत पक्षपाती भेदभाव करण्यास सक्त मनाई केली. सुप्रीम कोर्टानें दिलेले हे दोन्ही निवाडे वस्तुतः दूरगामी परिणाम घडवून आणतील, अशी अपेक्षा होती. ती मात्र सफल होऊं शकली नाहीं.

निःपक्षपात असें वातावरण विद्येच्या क्षेत्रांत निर्माण करावें हा एकच उद्देश डोळ्यांसमोर ठेवून सुप्रीम कोर्टानें वरील निवाडे दिले होते. ज्या राज्यांतील दाव्याच्या संबंधांत हे निवाडे दिले होते, तेथें विभक्त पण समान संधीचें तत्त्व सर्वत्र जारी होतें. अशा स्थितींत सुप्रीम कोर्टानें कांहींहि निर्णय दिले, तरी प्रत्यक्षांत त्यांची अंमलबजावणी करण्याचा अखत्यार त्या त्या राज्यांचा होता. विशेषतः खालच्या पातळीवर असलेल्या शाळांतील पक्षपात उच्च शिक्षणाच्या संदर्भांत दिलेल्या या निवाड्यांनीं रद्द होणें अशक्यप्राय होतें. दुसरें असें कीं दृश्य स्वरूपांतील बहिष्कार लक्षांत येण्यासारखा व तशीच इच्छा असेल तर उठविण्यासारखा होता. पण अदृश्य मानसिक बहिष्काराचें वातावरण नाहींसें करणें तितकेंसें सोपें नव्हतें. शिक्षणक्षेत्रांतील पक्षपाती वातावरणाचें निर्मूलन करावयाचें, तर प्राथमिक व माध्यमिक शाळांपासूनच सुरुवात करावयास हवी होती. सामाजिक शास्त्राच्या अभ्यासकांनीं अदृश्य बहिष्काराचें वातावरण उजेडांत आणण्यास पुष्कळच साहाय्य केलें. आणि मानसिक बहिष्काराचे बळी झालेल्या विद्यार्थ्यास प्रत्यहीं पदोपदीं

कोणत्या संकटांस तोंड द्यावें लागतें, तें प्रगट केलें. सामाजिक शास्त्रज्ञांच्या प्रस्तुत संशोधनास अनेक नामांकित मानसशास्त्रज्ञांनीं व शिक्षण तज्ज्ञांनीं दुजोरा दिला. उपर्युक्त शास्त्रज्ञांच्या सहकारानें शालेय शिक्षणांतील पक्षपातावर आघात करणें सुकर झालें. आणि १९५१ सालीं त्या दिशेनें परिणामकारक प्रयत्न करण्यास सुरुवात झाली.

परिणामीं कॅन्सास, दक्षिण कॅरोलिना, व्हर्जिनिया, डेलावेअर व कोलंबिया येथील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण देणाऱ्या सार्वजनिक शाळांतील पक्षपाताच्या संबंधांत पांच दावे गुदरण्यांत आले. १९५२ सालीं हे सर्व दावे सुप्रीम कोर्टांत थडकले. आणि १९५४ सालीं १७ मे रोजीं सुप्रीम कोर्टानें प्रस्तुत दाव्यांच्या संबंधांत एक ऐतिहासिक निर्णय जाहीर केला. या निर्णयानें विभक्त पण समान संधीच्या तत्त्वास कायमची मूठमाती मिळाली. आणि सार्वजनिक शिक्षण संस्थांतील सर्व प्रकारचा पक्षपात या निवाड्यानें रद्द ठरविला. हा एक ऐतिहासिक निवाडा असा आहे, कीं ज्याचा परिणाम दूरगामी ठरेल. आणि कदाचित् संभव असा आहे, कीं अमेरिकन जीवनांतील वांशिक पक्षपात रद्द करण्यास हा निवाडा मनस्वी उपकारक ठरेल. सुप्रीम कोर्टानें वस्तीच्या व सार्वजनिक शिक्षणाच्या क्षेत्रांतील पक्षपाताला सर्व सामर्थ्य एकवटून केलेला हा आघात इतर क्षेत्रांतील पक्षपाताचें निर्मूलन करण्यास उपकारक ठरेल, यांत मुळीं सुद्धां शंका नाहीं. वस्तींत व शाळा-कॉलेजांत जर पक्षपातास थारा नसेल, तर इतर क्षेत्रांतील पक्षपाताचें वातावरण असून नसल्या सारखेंच होईल, हें उघड आहे.

वांशिक संबंधांतील सुधारणेचें नवयुग अमेरिकेंत आज उजाडत आहे. समतेच्या दिशेनें अमेरिका झपाट्यानें वाटचाल करीत आहे. जगांत सर्वत्र सामाजिक क्रांतीचें वातावरण आहे. वर्णवंशाच्या कल्पित भिंती सर्वत्र धडाडून कोसळत आहेत. १९३० सालांत जें स्वप्नांतसुद्धां असाध्य वाटलें असतें, तें आज डोळ्यासमोर साक्षात आकारत आहे. वस्तींतील व शिक्षणांतील पक्षपात रद्द ठरविणारा सुप्रीम कोर्टाचा निवाडा ऐतिसासिक म्हणावयाचा तो अशासाठीं, कीं त्यांच्या परिणामीं वांशिक पक्षपाताचा जोर ओसरेल आणि कालांतरानें निःपक्षपात अशी नवी समाजरचना अस्तित्वांत

येईल. सुप्रीम कोर्टानें सर्वांच्या नागरिक हक्कांस सारखीच मान्यता दिली आहे. याचा अर्थ असा, कीं यापुढें वर्णवंश–निरपेक्ष अशा राज्याची ग्वाही सुप्रीम कोर्टानें दिली आहे. यापुढें सर्व अमेरिकन लोकांचीं सुखदुःखें एकच होतील. कारण सर्वांचे हक्क व अधिकार न्यायाच्या लेखीं एकच आहेत.

हें सर्व भविष्यकाळाविषयीं झालें. हें अंतिम लक्ष्य आहे. या देशांत काळे–गोरे समान भमिकेवर एकत्र सुखानें, नांदावयाचे असतील, तर त्यासाठीं दीर्घकाळपर्यंत पुष्कळच परिश्रम करावे लागतील. जोंपर्यंत राज्यकारभारांतील पक्षपात निर्मूल होत नाहीं, तोंपर्यंत घटनेनें सर्वांस दिलेल्या नागरिक हक्काची न्याय्य अंमलबजावणी होऊं शकणार नाहीं. म्हणून प्रथम राज्यकारभाराची यंत्रणा निःपक्षपात बुद्धीनें कार्यकर होईल, अशी व्यवस्था करणें अत्यावश्यक आहे.

अमेरिकेंतील मध्यवर्ती सरकारचा ॲटॉर्नी जनरल व राष्ट्राध्यक्षांच्या कॅबिनेटमधील एक सदस्य हर्बर्ट ब्रावनेल प्रस्तुत संबंधांत काय म्हणतो, तें विचारणीय आहे. त्याचें म्हणणें असें कीं सुप्रीम कोर्टापुढें पक्षपाताच्या संबंधांत आलेल्या सर्व दाव्यांचे निर्णय पक्षपातास प्रतिकूल आहेत. आणि न्यायखात्यानें तत्त्वतः निःपक्षपात भूमिका स्वीकारली आहे. या घटनेचा अर्थ असा कीं सुप्रीम कोर्टानें दिलेल्या निवाडयांची अंमलबजावणी सर्व राज्यांतून कांटेकोरपणानें होत आहे किंवा नाहीं, तें बघण्याचें काम केंद्र सरकारला यापुढें डोळयांत तेल घालून करावें लागेल. ब्रावनेलच्या मतानें राष्ट्राचा कल निःपक्षपात लोकशाहीस अनुकूल असा दिसत आहे. अल्पसंख्यांचे प्रश्न काय आहेत, हें जाणून घेण्याची समंजस वृत्ति लोकांत बळावत आहे. आणि जेथें जेथें म्हणून पक्षपात दिसेल, तेथें त्याचा प्रतिकार करण्यास हें राष्ट्र बद्धपरिकर आहे.

अशा स्थितींत काळयागोऱ्यांत जे कोणी समजूतदार शहाणे लोक आहेत, त्यांनीं वर्णवंशनिरपेक्ष लोकशाहीचें वातावरण निर्माण करण्यासाठीं न्यायाच्या कक्षेंत राहून अवश्य ते यत्न झटून करावयास हवेत. सार्वजनिक शिक्षण जर निःपक्षपात झालें आणि उभयवंशांतील सदिच्छाप्रेरित, समंजस लोक एकजुटीनें कामास लागले, तर या देशांतील शिक्षण निर्विष होईल. अन्यथा या

देशांतील लोकशाही नामशेष होईल. पण तसा संभव तूर्त तरी यत्किंचितहि दिसत नाहीं.—तर अमेरिकन जीवनाच्या इतर सर्व क्षेत्रांतील पक्षपात आपोआप नष्ट झालेला दिसेल. हें क्रमप्राप्तच आहे. जेव्हां केव्हां हें नवयुग उजाडेल, तेव्हां या देशांतील एकूण एक सर्व माणसांस नागरिक हक्क प्राप्त झालेले दिसतील. अपेक्षित नवयुगाची पहांट लवकर फुटावयास हवी असेल, तर राष्ट्राच्या सर्वोच्च न्यायालयानें सर्व नागरिकांस समान लेखणारे जे निर्णय दिले आहेत, त्यांची अंमलबजावणी राज्यांराज्यांतील सर्व न्यायालयांनीं अविलंब करावयास हवी. मध्यंतरीं राजकीय क्षेत्रांत नीग्रो लोक अधिकाधिक प्रतिष्ठा पावत आहेत. राज्याचे कारभारी या नात्यानें सर्व समाजाची सेवा ते करतील आणि हें सर्व अपेक्षेप्रमाणें घडलें तर नवयुगाची पहांट क्षितिजावर फुटलेली दिसेल.

---

ज्यूलियस ए. टॉमस

# उदरनिर्वाहाची नवी संधि

अमेरिकेंतील जीवनाच्या आणि उद्योगधंद्यांच्या विविध क्षेत्रांत आजवर जी उल्लेखनिय प्रगति झालेली दिसून येते तिच्याशीं सुसंगत अशा अनेक संधी कित्येक कार्यक्षेत्रांत नीग्रो लोकांस नव्यानें उपलब्ध झाल्या आहेत, असें आढळून येतें. विशेषतः १९४० पासून नीग्रो कामगारांस जे अनेक नवे उद्योग उपलब्ध झाले, त्यांजमुळें आजवरच्या पुरातन कामाच्या कक्षा तोडून पुढें जाणें त्यांना सहज शक्य झालें. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं अनेक नवीं नवीं कामें सरकारला हातीं घ्यावीं लागलीं आणि प्रत्येक कामांत हजारों कामगारांचें साहाय्य घ्यावें लागलें. तोंपर्यंत बहुतेक नीग्रो माणसें जमीनदारांच्या शेतांतून किंवा पैसेवाल्यांच्या घरांतून अंग मोडून काम करीत होतीं. या महायुद्धामुळें असंख्य विमानें व जहाजें बांधण्यासाठीं आणि दारूगोळा तयार करण्यासाठीं पूर्व–पश्चिम भागांत शेंकडों कारखाने उभारावे लागले आणि त्या कारखान्यांतून माहितगार वा उमेदवार नीग्रो कामगारांची भरती करावी लागली. 'ब्यूरो ऑफ लेबर स्टॅटिस्टिक्स'नें याबाबात जो अहवाल प्रसिद्ध केला आहे, त्यांतील आंकडेवारी पाहतां असें दिसून येतें कीं १९४० सालीं २९००००० नीग्रो कामगार होते. नंतर ही संख्या ३२००००० झाली. १९४० सालीं १५००००० नीग्रो स्त्रिया विविध प्रकारचीं कामें करीत होत्या. नंतर ही संख्या २१००००० वर जाऊन पोहोंचली. युद्धामुळें जीं नानाविध नवीं नवीं कामें हातीं घेण्यांत आलीं, त्यांजसाठीं माहितगार कुशल कामगार मिळविणें आवश्यक होतें. त्यावेळीं लक्षावधि नीग्रो लोकांनीं जुनीं कामें टाकून नव्या कामासाठीं आवश्यक असलेली

माहिती व कुशलता सहज पैदा केली. या काळांत अमेरिकेच्या सशस्त्र सैन्यांत १०००००० नीग्रो सैनिक सर्व आघाडयांवर नेमून दिलेलीं कामें दक्षतेनें करीत होते. आणि सैन्यांत नीग्रो सैनिकांची भरती सावकाश चालूच होती. युद्धकाळांत प्रायः सर्व बेकार नीग्रो कामकऱ्यांस अनेक उद्योगांत कामें मिळालीं. मध्यंतरीं एकूण ६९३००० नीग्रो स्त्रीपुरुषांस युद्धसंबद्ध खात्यांतून नानाविध कामें करण्याची संधि प्राप्त झाली. दुसऱ्या महायुद्धाचे इतर काय परिणाम झाले असतील, ते असोत; पण हा एक परिणाम मात्र निश्चित झाला. नीग्रोंतील बेकारी या युद्धामुळें नष्ट झाली.

१९५० सालीं एकूण जे नीग्रो कामगार हरतऱ्हांचीं कामें करीत होते, त्यांजपैकीं शेंकडा आठ माणसें कांहीं विशेष कुशलतेचीं कामें करणारे होते. युद्धपूर्व काळाचा विचार करतां कुशल नीग्रो कामगारांच्या संख्येंत झालेली ही वाढ उल्लेखनीय आहे. गोऱ्या कामगारांतसुद्धां शेंकडा एकोणीस कामगार विशेष कुशलतेचीं कामें करतात. त्या मानानें कुशल नीग्रो कामगारांच्य. संख्येंतील ही वाढ आश्चर्यकारक समजावयास हवी.

याच काळांत नीग्रो स्त्रियांनीं वाढत्या कामांतील आपला वांटा तत्परतेनें उचलला. कामधंद्यांतील त्यांची ही प्रगति युद्धपूर्व काळाच्या मानानें डोळयांत भरण्यासारखी आहे. आतां ही एक गोष्ट खरी, कीं विशेष कुशलतेचीं कामें करण्यांत गोऱ्या स्त्रियांच्या मानानें नीग्रो स्त्रिया अजून मागें आहेत। कारकुनीच्या, तांत्रिक वा यांत्रिक कामांत गोऱ्या स्त्रिया संख्याधिक आहेत हें स्वाभाविक आहे. पण असें असलें, तरी सुद्धां ही तुलना भविष्यकाळाचा विचार करतां उद्‌बोधक ठरावी. कुशल नीग्रो स्त्रिया उत्तरोत्तर अधिकाधिक उपलब्ध होतील, तसतशीं नानाविध कामें त्यांची वाट पाहात आहेत असें त्यांना आढळून येईल. उदाहरणार्थ, १९४० सालापूर्वीं शेंकडा ८० नीग्रो स्त्रिया पैसेवाल्यांच्या घरांतून मोलकरणींचीं कामें करीत असत. आज ही संख्या शेंकडा ६५ पर्यंत घटलेली दिसते. या घटनेचा अर्थ असा, कीं शेंकडा १० ते १५ नीग्रो स्त्रियांस अधिक कुशलतेचीं वा वरच्या दर्जाचीं कामें नव्यानें उपलब्ध झालीं आहेत.

कारकुनीच्या, तांत्रिक वा यांत्रिक ज्ञानाच्या व्यवस्थापनाच्या क्षेत्रांतील अधिकाराच्या जागा नीग्रो स्त्रीपुरुषांस सावकाश पण निश्चयानें उपलब्ध होत आहेत. आज अधिकाराच्या जागीं शेंकडा ८ गोरे आहेत, तर नीग्रो फक्त शेंकडा २ आहेत. पण भविष्यकाळांत हें अंतर तुटेल व कमी होत जाईल. कोणत्याहि कामधंद्यांतील वरिष्ठ जागा कोणास एकाएकीं सहज मिळण्यासारख्या नसतात, हें लक्षात घेतां वरील आंकडेवारी आशादायक आहे, असेंच म्हणावें लागेल,

युद्धकाळांतील नानाविध उद्योगांसाठीं नीग्रो कामगारांची भरती करणें आवश्यक होतें. फार मोठ्या संख्येनें नीग्रो स्त्रीपुरुष नव्यानें मिळालेलीं आपआपलीं कामें तत्परतेनें करूं लागले होते. नव्यानें भरती झालेले नीग्रो कामगार नेमून दिलेलीं कामें समाधानकारक करतील किंवा नाहीं, अशी शंका कित्येक चिंताग्रस्तांच्या मनांत घर करून होती. युद्धकाळांत अनेक उद्योगधंद्यांत नीग्रो स्त्रीपुरुष नवीं कामें उत्साहानें करावयास लागले. पुढील काळाचा विचार करतां नीग्रो स्त्रीपुरुषांचीं कामें समाधानकारक होतात किंवा नाहीं, याचा विचार करणें वेळींच आवश्यक होतें. ‘नॅशनल अर्बन लीग’नें हें पाहणीचें काम हातीं घेतलें, आणि आपल्या स्थानिक शाखांस हा उद्योग हातीं घेण्याचा आदेश दिला. एकूण ३०० युद्धोद्योग देशभर सर्वत्र चालू होते. तेथें जाऊन संबंधितांनीं पाहणीचें काम चोख पार पाडलें. या चौकशींतून जें काय निष्पन्न झालें, त्याचा अहवाल ‘ अर्बन लीग’नें ता० १ फेब्रुवारी १९४४ रोजीं प्रसिद्ध केला. युद्धोद्योग ३०० होते. त्यांच्या व्यवस्थापकांपैकीं २१५ जणांनीं असें सांगितलें कीं नीग्रो कामगारांचें काम समाधानकारक आहे. ५० जणांनीं नीग्रोंचें काम अत्यंत समाधानकारक आहे, असें आवर्जून सांगितलें. फक्त ९ जणांनीं मात्र असें सांगितलें कीं गोरे जें काम करतात, तें काळ्यांस झेपत नाहीं. आणि गोऱ्यांच्या मानानें काळ्यांचें काम तितकेंसें समाधानकारक नाहीं. असा प्रतिकूल अभिप्राय ज्यांनीं व्यक्त केला, त्यांच्या अधिकारकक्षेंत असलेल्या कामांची काळजीपूर्वक पाहणी करण्यांत आली. तेथें असें आढळून आलें कीं नीग्रो कामगारांस अनुकूल अशी परिस्थिति मुळांतच तेथें उपलब्ध नव्हती. आणि त्यामुळें नीग्रो कामगारांचें काम तेथें समाधानकारक नव्हतें.

एवढ्या मोठ्या संख्येनें नीग्रो स्त्रीपुरुष युद्धोद्योगांत भरती झाले होते. तेव्हां त्यांच्या कामाची चौकशी करणें आवश्यक होतें. ‘ अर्बन लीग ’चा हा अहवाल फार महत्त्वाचा मानला जातो. कारण त्यामुळें अनेक महत्त्वाचे निष्कर्ष प्रस्थापित करतां आले. नव्यानें आलेला नीग्रो कामगार नेमून दिलेलें काम मन:पूर्वक व समाधानकारक करतो. अर्थातच त्यासाठीं त्याला कांहीं उमेदवारी करणें भाग पडतें. ज्या कामाचा त्याला साक्षात् परिचय नाहीं, तें काम प्रथम मन लावून शिकणें अगत्याचें ठरतें. पण शिक्षणाची संधि मिळाल्यास इतर सर्व कामगारांप्रमाणेंच तो कार्यक्षम ठरतो. अर्थातच तज्ज्ञांस हें पूर्वीपासूनच माहित होतें. प्रत्यक्ष अनुभवाच्या संदर्भांत तें खरें ठरलें. नीग्रो कामगार नवीं कामें कुशलतेनें करावयास शिकला. यासाठीं जरूर ती शिस्त त्यानें अंगीं बाणवून घेतली. आणि इतर उद्योगधंद्यांत तो तसाच कार्यक्षम व उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यानें नव्यानें निर्माण केला. त्याच्या स्वाभिमानास सुखावणारी आणि आत्मसामर्थ्याचा प्रत्यय जागविणारी अशी ही क्रांतिकारक घटना होती. या नव्या घटनेचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम उल्लेखनीय आहे. नीग्रो कामगाराच्या मिळकतीचें प्रमाण या काळांत वाढलें. त्यामुळें एकूण अर्थव्यवहाराची पातळी उंच झाली.

दुसरें महायुद्ध संपुष्टांत येणार असा रंग दिसावयास लागला; तेव्हां एका नव्या संकटाचीं पूर्वचिन्हें कित्येकांस अस्वस्थ करूं लागलीं. यद्ध संपलें कीं युद्धोद्योगांत गुंतलेले बहुसंख्य नीग्रो कामगार बेकार होतील, अशी धास्ती कित्येकांनीं घेतली. या भयाचें कारण उघड होतें. ज्या नीग्रो कामगारांचा संबंध युद्धोद्योगाशींच फक्त जडलेला होता, त्यांना इतर उद्योगांत समरसून सामावून घेण्याची दुष्प्राप्य संधि आतां नव्यानेंच समीप येऊन ठेपली. लक्षावधि नीग्रो कामगारांचें भवितव्य या एकाच संधीवर अवलंबून होतें.एकूण परिस्थिति चिंताजनक वाटावी, अशीच होती. पण युद्ध संपल्यावर पांच वर्षांनीं ‘ ब्यूरो ऑफ लेबर स्टॅटिस्टिक्स ’नें १९५० सालीं जो अहवाल सादर केला, त्यांतील निर्वाळा आशादायक होता: युद्धोद्योगांत भरती झालेल्या नीग्रो कामगारांस युद्धोत्तर काळांत देखील तशींच कामें उपलब्ध झालेलीं आहेत. प्रस्तुत संबंधांत एक गोष्ट कटाक्षानें ध्यानांत घ्यावी ती ही, कीं

युद्धोद्योग संपुष्टांत आले, तरी त्याचा परिणाम लगेच एकूण अर्थव्यवहारावर झालेला दिसला नाहीं. मध्यंतरींच्या काळांत कोरियांत जो संघर्ष झाला, त्यामुळें युद्धसाहित्याची मागणी सतत वाढत राहिली. आणि १९४९ सालीं जो बेकारीचा धोका निर्माण झाला होता, तो दिसेनासा झाला. १९५४ सालचा अहवाल सांगतो कीं त्यावेळीं एकूण ५०,००००० अमेरिकन कामगार बेकार होते. त्यांजपैकीं नीग्रो कामगार नेमके किती, त्याची आंकडेवारी उपलब्ध नाहीं. १९४३-४४ सालीं जे कामगार इतर उद्योगांत दाखल झाले होते, त्यांचीं कामें मध्यंतरीं संपुष्टांत आलीं. कारण ते उद्योगच मध्यंतरीं बंद पडले. अशा स्थितींत आज नीग्रो कारभारास भय वाटावें, हें स्वाभाविक आहे. आजच्या हलाखीच्या आर्थिक दुरावस्थेंत बेकार नीग्रो कामगारांस तंग परिस्थितीची झळ लागावी, आणि गेल्या पंधरा वर्षांत जें मोठ्या परिश्रमानें कमावलें तें गमावलेलें बघण्याचा प्रसंग त्यांजवर यावा हें एक दुश्चिन्हच आहे. गोऱ्या कामगारांपेक्षां नीग्रो कामगारांची आजची स्थिति अधिक भयावह आणि चिंताजनक आहे.

आर्थिक उत्कर्षाचें गमक तें काय ? शेवटीं आर्थिक उत्कर्ष डॉलर्स आणि सेंट्स मध्येंच आपण मोजतों. हातीं रोकड पैसा असला, म्हणजे उदरनिर्वाहास आवश्यक त्या वस्तूंची खरेदी करतां येते. त्या पैशांच्या बळावर घर घेतां येतें. मुलाबाळांचें शिक्षण करतां येतें. भविष्यकाळाची थोडीबहुत तरतूद करतां येते. आणि शक्य झालें, तर सुखविलासाचीं कांहीं साधनें पैदा करतां येतात. जेव्हां म्हणून अमेरिका एकूण आर्थिक व्यवहाराचा हिशेब करील, तेव्हां नीग्रो मिळकतीचा विचार करणें क्रमप्राप्त होईल. निदान तसें व्हावयास हवें. १९५० सालच्या औद्योगिक आकडेवारीवरून असें दिसून येतें. कीं नीग्रो नागरिक कुटुंबाचें सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न १८६९·५४ डॉलर्स आहे, तर गोऱ्या नागरिक कुटुंबाचें सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न ३४४५ डॉलर्स आहे. याचा अर्थ असा कीं साधारणपणें गोऱ्या नागरिक कुटुंबाच्या मिळकतीच्या शेंकडा ५४ टक्के इतकें उत्पन्न नीग्रो नागरिक कुटुंबाचें असतें. शेतावर राबणाऱ्या व जमीन कसणाऱ्या नीग्रो कुटुंबाचें सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न १९४५ सालीं ५५० डॉलर्स होतें. तें १९४९ सालीं

१०२३६

६८१ डॉलर्सपर्यंत वाढल्याचें आढळून आलें. पण गोऱ्या जमीनदार कुटुं-बाच्या सर्वसाधारण वार्षिक उत्पन्नाच्या मानानें तें शेंकडा ४० होईल. १९३९ सालीं रोजंदारीनें काम करणाऱ्या नीग्रो कामगाराचें सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न ४०० डॉलर्स होतें, तर गोऱ्या कामगाराचें १००० डॉलर्स होतें. १९५० सालीं नीग्रो कामगाराचें सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न १३०० डॉलर्सपर्यंत वाढलें. पण त्या वेळीं सुद्धां गोऱ्या कामगाराच्या मानानें हें प्रमाण शेंकडा ५२ टक्के इतकेंच होतें. या आंकडेवारीवरून एक आशादायक निष्कर्ष काढतां येण्यासारखा आहे. तो हा कीं नीग्रो कुटुंबाचें सर्वसाधारण वार्षिक उत्पन्न सदा वाढतें आहे. १९३५ सालीं नीग्रो कामगाराचें सर्व-साधारण वार्षिक उत्पन्न जें होतें, त्यांत १९५० सालीं शेंकडा ३०० इतकी वाढ झाली आहे. आज तर तें त्या मानानें अधिकच वाढलेलें असणार. नीग्रो माणसाच्या उत्पन्नांतील ही वाढ म्हणजे त्याच्या वाढत्या उत्कर्षाची निशाणीच आहे.

अमेरिकेंतील नीग्रो कामगारांचें एकूण उत्पन्न १५००००००००० डॉलर्स आहे. अमेरिकेंतील संयुक्त राज्यांच्या एकूण लोकसंख्येपेक्षां जेथील लोकसंख्या अधिक आहे, अशा कित्येक राष्ट्रांच्या सरकारी अंदाजपत्रकांतील एकूण जमेच्या रकमेपेक्षां अमेरिकन नीग्रोची ही मिळकत किती तरी पटींनीं अधिक आहे. याचा अर्थ असा कीं अमेरिकन नीग्रो जगांतील कित्येक राष्ट्रांतील असंख्य लोकांपेक्षां भौतिक साधनांनीं अधिक संपन्न आहे. त्याचें वेतन अधिक आहे. पर्यायानें त्याची शिल्लक अधिक आहे. तो अधिक सशक्त आहे. अधिक चांगल्या घरांत तो राहतो. त्याचीं मुलेंबाळें अधिक मोठ्या संख्येनें विद्या-पीठांत शिक्षण घेऊं शकतात. आणि स्वदेशांत किंवा परदेशांत अधिक प्रवास करण्याची संधि त्याला उपलब्ध आहे.

उत्कर्षाची अमर्याद संधि आज नीग्रोस सर्वत्र मिळत आहे. आणि दहा ते पंधरा हजार डॉलर्सचा वार्षिक पगार मिळवूं शकणाऱ्या गोऱ्या अमेरिकन माणसांत प्रतिवर्षी नीग्रो वरिष्ठ अधिकाऱ्यांची भर पडत आहे. बारा सप्टेंबर १९५५ च्या 'न्यूजवीक' नामक प्रसिद्ध साप्ताहिकाच्या अंकांत 'उद्योगक्षेत्रांतील नीग्रोंचा उत्कर्ष' नांवाच्या मथळ्याखालीं आलेल्या लेखांत

एक खास औद्योगिक अहवाल दिलेला आहे. त्यांत नीग्रोंस उपलब्ध असणाऱ्या मुक्त संधीचीं अनेक उल्लेखनीय उदाहरणें उद्धृत केलीं आहेत. त्यांतील कांहीं येणेंप्रमाणें :--

**लॉईड हॉल** : वय ६१. शिकागो शहरांतील 'ग्रिफिथ लॅबोरेटरीज्'चा टेक्निकल डायरेक्टर. हॉलच्या संशोधनांतून निष्पन्न झालेल्या पेटंटस्मुळें या कंपनीस कोटयवधि डॉलर्सची प्राप्ति झाली आहे. १९१६ सालीं नॉर्थ वेस्टन विद्यापीठाची पदवी संपादन केल्यावर इतरत्र कांहीं काम व अनुभव पैदा करून १९२५ सालीं ग्रिफिथ कंपनींत चीफ केमिस्ट आणि लॅब डायरेक्टर म्हणून त्यानें काम करावयास सुरुवात केली. तत्पूर्वी शहरांतील हेल्थ लॅबोरेटरीज्मध्यें आर्मी ऑर्डनन्ससाठीं मीट पॅकिंग कारखान्यांत आणि रसायन शाळेंत वरिष्ठ ह्द्याच्या जागांवर त्यांची नेमणूक झालेली होती. बॉयलॉजिकल केमिस्ट्री आणि अन्न हे त्यांच्या व्यासंगाचे खास विषय आहेत.

**जॉर्ज ओल्डन** : वय ३५ सी. बी. एस्. टेलिव्हिजन नेटवर्कचा ग्रॅफिक आर्टस् डायरेक्टर. १९४० सालीं व्हर्जिनिया स्टेट कॉलेजमधून फाईन आर्टस्ची पदवी घेतल्यावर कांहीं दिवस स्वतंत्रपणें काम करण्यांत त्यानें घालविले. युद्धकाळांत ओ. एस्. एस्. च्या कलाविभागांत त्यानें काम केलें. १९४५ सालीं सॅन्फ्रान्सिस्को येथें बोलाविण्यांत आलेल्या युनायटेड नेशन्स कॉन्फरन्ससाठीं ग्रॅफिक डिझायनर म्हणून त्याची नियुक्ति करण्यांत आली. याचवर्षी सी. बी. एस्. च्या ग्रॅफिक आर्टस् विभागाची आखणी करण्यासाठीं म्हणून तो गेला. आणि पुढील वर्षी त्याच विभागाचा डायरेक्टर म्हणून त्याची नेमणूक करण्यांत आली. कलाक्षेत्रांत त्याच्या नांवास मान आहे. स्टेशन-ब्रेक कार्टून्ससाठीं त्याची ख्याति आहे.

**डॉ. पर्सी ज्यूलियन** : वय ५६. नीग्रो गुलामांचा हा नातू. ग्लिडेन कंपनीच्या संशोधन विभागाचा प्रमुख होता. कॉर्टिसोन, प्रेजेस्टरोन, टेटोस्टरोन, एस्ट्रोन, इ. सिंथेटिक रसायनांचा संशोधक. अमेरिकेंतील एक अग्रगण्य ऑरगॅनिक केमिस्ट, शिकागोमधील स्वतःच्या रीसर्च लॅबॉरेटरीचा तो आज प्रमुख आहे.

देशांतील औद्योगिक क्षेत्रांतील कांहीं नामांकित नीग्रोंचीं हीं नांवें केवळ उदाहरणादाखल येथें दिलेलीं आहेत. अशीं आणखी किती तरी सांगतां येतील. नामांकित नीग्रोंच्या या यादींत सतत भर पडत आहे.

नीग्रोंच्या उत्कर्षाचा हा असा इतिहास आहे. तो सांगत असतांना वेळींच एका दुःखद घटनेकडे लक्ष वेधावयास हवें. अजूनहि बहुसंख्य नीग्रो कामगार कमी वेतनाच्या अकुशल कामांतच गुंतलेले आहेत. शेतीच्या ढोरकामांतून आणि कष्टप्रद घरकामांतून मुक्त झालेला नीग्रो कामगार आज औद्योगिक कारखान्यांच्या कामांत गुंतलेला दिसतो. त्याच्या कामांतील हा बदल त्याच्या प्रगतीचा निदर्शक आहे. त्यामुळें त्याच्या मिळकतींत वाढ झाली आहे. मान ताठ ठेवून स्वाभिमानानें तो आज जगू शकतो. हें सर्व खरें. पण औद्योगिक क्षेत्रांतील विशिष्ट कुशलतेचीं कामें तो क्वचित्‌च करतो. आणि कारखान्यांतील मोठ्या पगाराच्या वरिष्ठ जागांवर क्वचित्‌च त्याची नेमणूक झालेली दिसते. शिवाय शेंकडा ३४ नीग्रो दांपत्यांस काम करणें भाग पडतें. सुधारलेलें जीवनमान पैदा करण्यासाठीं शेंकडा २१ गोऱ्या दांपत्यांस काम करावें लागतें. याचा अर्थ असा कीं अधिक नीग्रो स्त्रियांस अंगमेहनतीचें काम करणें भाग पडतें.

नीग्रो कामगारांची आर्थिक दुरवस्था व बेकारी ही वस्तुस्थिति आहे. या दुःखद वस्तुस्थितीस जबाबदार असलेलीं तीन कारणें अनुक्रमानें सांगतां येतील. त्यांजपैकीं पहिलें कारण म्हणजे काम देतेवेळीं करण्यांत येणारा पक्षपात; दुसरें कारण म्हणजे कांहीं उद्योगांतील कामगार संघटनांची शत्रुत्व-भावना. आणि तिसरें कारण म्हणजे सार्वजनिक शिक्षणांतील पक्षपातान्वयें योग्य त्या शिक्षणामुळें संस्कार संपादनाची नीग्रोस आजवर नाकारण्यांत आलेली संधि.

आज अमेरिकेंत अजूनपर्यंत अशीं कित्येक राज्यें आणि क्षेत्रें आहेत कीं जेथें भरपूर पगाराच्या व वरिष्ठ अधिकाराच्या जागा नीग्रोंस कधींच मिळू शकत नाहींत. यासाठीं कट करून बुद्धिपुरःसर यत्न केले जातात. असल्या पक्षपाताच्या परिणामीं नीग्रो कामगारांस कमी पगाराच्या अकुशल कामांतच आपलें तनमन गुंतवावें लागतें. त्याचप्रमाणें वांशिक पक्षपात टाळण्याच्या

अनुक्रम क्रमांक (५५) १९८२ वि: नों: दि:

कामीं एकूण कामगार संघटनांनीं जरी उदार धोरणाचा अवलंब केलेला असला, तरी कांहीं कामगार संघटनांनीं प्रचलित धोरणास दाद न देण्याचें ठरविलेलें दिसतें. आणि कांहीं कामगार संघटना पक्षपातास प्रत्यक्ष उत्तेजन देत नसल्या, तरी नीग्रो कामगारांच्या हितसंबंधांबाबत त्या उदासीन आहेत. उदाहरणार्थ, मोटरींच्या उद्योगांत कामगारांस सर्व प्रकारच्या संधी विपुलतेनें उपलब्ध आहेत. पण ' युनायटेड ऑटो वर्क्स अँड दि ऑटोमोबिल टूल अँड डाय असोसिएशनच्या करारानें बांधलेल्या २०० सुट्या भागांच्या आणि रंगांच्या दुकानांतून आजवर एकाहि नीग्रो कामगारास काम मिळूं शकलें नाहीं, ही वस्तुस्थिति आहे. पोलाद, कापड आणि तंबाखूच्या कारखान्यांतून कारकुनीच्या किंवा वरिष्ठ अधिकाराच्या जागा नीग्रोस क्वचित्च देण्यांत येतात. मागील एका प्रकारणांत सार्वजनिक शिक्षणाच्या संबंधांत सुप्रीम कोर्टानें दिलेल्या ज्या निवाड्यांचा उल्लेख केला आहे, त्या निवाड्यांमुळें यापुढें तरी निदान शिक्षणाची संधि नीग्रोस नाकारली जाणार नाहीं. परिणामीं औद्योगिक क्षेत्रांतील कामांबाबत सध्या जो पक्षपात करण्यांत येतो, त्याला आपोआप आळा बसेल, आणि नीग्रो कामगारांच्या प्रगतीच्या मार्गांतील एक मोठा अडथळा दूर होऊं शकेल, अशी आशा करण्यास जागा आहे.

उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत जें पक्षपाताचें धोरण अजूनपर्यंत कोठें कोठें जारी आहे, तें रद्द करून घेण्याच्या कामीं लोकशाही समाजांतील पुरोगामी शक्ति साहाय्यक ठरूं शकतात, असें आजवरच्या अनुभवानें वारंवार सिद्ध केलें आहे. प्रस्तुत संबंधांतील प्रगतीचा अहवाल डोळ्याखालून घातला, तर अनेक आशादायक घटनांचें दर्शन होण्यासारखें आहे. उदाहरणार्थ:

दुसरें महायुद्ध सुरू झालें, त्यावेळीं राष्ट्राध्यक्ष रुझवेल्टनें १९४१ सालीं संरक्षणाच्या कामीं गुंतविण्यांत येणाऱ्या कामगारांच्या संबंधांत पक्षपाताचें धोरण रद्द करणारा खास वटहुकूम जारी केला. त्यानंतर कॉंग्रेसमध्यें कामगारांच्या कामीं करण्यांत येणाऱ्या पक्षपातास बंदी करण्याच्या संबंधांत सतत यत्न करण्यांत आल्यावर कॉंग्रेसमध्यें कामांतील पक्षपात रद्द करून घेण्यासाठीं अनेक कायद्यांचे मसुदे मांडण्यांत आले पण मध्यवर्ती सरकारनें

अजूनपर्यंत त्या मसुद्यांस कायद्याचें रूप दिलेलें नाहीं. असें असलें तरी कामधंद्यांत वांशिक आणि धार्मिक पक्षपात रद्द करणारे कायदे न्यूयॉर्क, जर्सी, इंडियाना, विसकॉन्सिस, मॅसॅच्युसेटस्, कनेक्टिकट, ओरेगॉन, वॉशिंग्टन, ऱ्होड आयलंड, न्यू मेक्सिको, कोलोराडो, पेन्सिलव्हॅनिया आणि कॅन्सास राज्यांनीं जारी केले आहेत. त्याचप्रमाणें ३१ मोठ्या शहरांनीं कामधंद्यांतील पक्षपात रद्द करणारे वटहुकूम जारी केले आहेत.

काँग्रेसनें कामधंद्यांतील पक्षपात कायद्यानें रद्द ठरवावा, यासाठीं कांहीं लोक शक्तिसर्वस्व एकवटून यत्न करीत आहेत, तर कांहीं लोक हे यत्न हाणून पाडण्यासाठीं सर्व शक्ति पणास लावीत आहेत. अर्थातच लोकशाही स्वतंत्र समाजांत प्रत्येक विषयासंबंधीं हवें तें मत प्रतिपादन करण्याचा हक्क व अधिकार प्रत्येक नागरिकास जरूर आहे. आज जे कायदे सर्वत्र जारी आहेत, त्यांचे परिणाम दैनंदिन व्यवहारांत कितपत होतात, त्या संबंधीं मोजमाप घेण्यासाठीं आजवर अनेक यत्न करण्यांत आले आहेत. काम देणारा ज्यावेळीं तोंपर्यंत जारी असलेलें पक्षपाताचें धोरण एकाएकीं रद्द करतो, तोपर्यंत त्या वेळीं त्यानें केलेलें हें कृत्य कायद्यास मान द्यावा म्हणून केलें कीं अन्य कांहीं कारण त्या कृत्यास जबाबदार आहे, हें ठरविणें नेहमींच शक्य होतें, असें नाहीं. पुष्कळ वेळां असें घडतें कीं एखादा कायदा मंजूर झाल्यावर तदनुसार लोक आपलें वर्तन बदलतात वा सुधारतात, असें दिसून येतें. अशा स्थितींत वरील प्रश्नाचें निर्णायक उत्तर शोधणें बिकट होतें तरी सुद्धां सद्यः स्थितींतील बदल लक्षांत घेतले आणि वीस वर्षांपूर्वी काय स्थिति होती व आज काय आहे, त्यांतील भेद ध्यानांत घेतला, तर सरकारचे कायदे परिणामकारक ठरतात, असेंच अनुमान काढावें लागेल. पक्षपाताच्या संबंधांत सरकारी धोरणाचें मार्गदर्शन स्पष्ट असल्यानें कामधंद्यांतील पक्षपात सावकाश पण निश्चयानें कमी कमी होत आहे. त्याचप्रमाणें खांद्याला खांदा भिडवून सहकार्यानें एकत्र काम करण्याची प्रवृत्ति लोकांमध्यें उत्तरोत्तर वाढत आहे. कामधंद्यांतील पक्षपात रद्द ठरविणारा कायदा काँग्रेसमध्यें मंजूर होण्यास कदाचित् कित्येक वर्षें लागतील. पण तोंपर्यंत मध्यंतरीच्या काळांत कित्येक राज्यांतून आणि नगरांतून पक्षपात रद्द कर-

णारे कायदे लवकरच जारी होतील आणि अशा रीतीनें निःपक्षपात कामांचीं क्षेत्रें उत्तरोत्तर खुलीं होतील. पक्षपात जेथें जेथें बेकायदा ठरेल, तेथें तेथें लोकांच्या वर्तनांत आपोआप अनुकूल ते बदल घडून येतील, हें निश्चित होय.

दुसऱ्या महायुद्धाच्या आरंभीं राष्ट्राध्यक्ष रुझवेल्टनें नेमिलेलें 'फेअर एम्प्लॉयमेंट प्रॅक्टिसेस कमिशन' १९४६ सालीं अस्तित्वांतून नाहींसें झालें. कारण कमिशनच्या कामीं करण्यांत यावयाचा खर्च कॉंग्रेसनें नामंजूर केला. त्यानंतर कामधंद्याच्या क्षेत्रांतील लोकशाहीस विरोधी अशा अन्याय्य वर्तनास आळा घालण्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें कांहीं ना कांहीं उपाय-योजना करावी, हें क्रमप्राप्तच होतें. विशेषतः ज्या उद्योगाचा संबंध मध्यवर्ती सरकारशीं नित्य येत होता, त्या उद्योगांतील पक्षपात रद्द करण्यासाठीं कांहीं तरी करणें अत्यावश्यक होतें. कॉंग्रेसमध्यें पक्षपात रद्द करणारा कायदा तर मंजूर होऊं शकत नाहीं. जे लोक अशा कायद्यास परिणामकारक विरोध करीत होते, त्या कट्टर कर्मठ लोकांस सुद्धां वस्तुस्थितीकडे डोळेझांक करून चालण्यासारखें नव्हतें. वस्तुस्थिति अशी होती कीं मध्यवर्ती सरकारचा सर्व पैसा लोकांवर लादलेल्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष करांतून निष्पन्न होत होता. आणि जे कर देत होते, ते अनेक वंशांचे, वर्णांचे वा धर्मांचे होते. अशा स्थितींत मध्यवर्ती सरकारनें जर कोणत्याहि पक्षपातास उत्तेजन देणारें धोरण अंमलांत आणलें असतें, तर तें निःपक्षपात न्यायबुद्धीस अनुसरून योग्य ठरलें नसतें. जे कोणी कर देतात, त्या सर्वांस कामधंद्याच्या सर्व क्षेत्रांत निःपक्षपात वागणूक मिळावी, ही अपेक्षा सर्वस्वीं वाजवी व न्याय्य अशीच होती.

हा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविण्यासाठीं राष्ट्राध्यक्ष ट्रुमननें रुझवेल्टच्या धोरणास अनुसरून एक नवा वटहुकुम जारी केला. या वटहुकुमान्वयें असा आदेश जारी करण्यांत आला कीं ज्या कोणास मध्यवर्ती सरकारशीं औद्योगिक करार करावयाचे असतील, त्या सर्वांनीं आपआपल्या उद्योगधंद्यांत निःपक्षपात वर्तन करण्याची हमी द्यावयास हवी. हा नवा वटहुकुम कार्यवाहींत आणण्यासाठीं ट्रुमननें नामांकित वंशनिरपेक्ष नागरिकांची एक कमिटी नेमिली. रुझवेल्ट–ट्रूमनच्या धोरणास अनुसरून राष्ट्राध्यक्ष

आयसनहॉवरनें अधिकारपद घेतल्यावर याच आशयाचा एक वटहुकुम जारी केला व उपराष्ट्राध्यक्ष निक्सन यांस त्या कमिटीचें अध्यक्षपद दिलें. औद्योगिक संबंधांत ज्या कोणास सरकारशीं करार-मदार करावयाचे असतील, त्यांचें वर्तन आपआपल्या उद्योगांत निःपक्षपात असावयास हवें. अशी हमी त्यानें पण मागितली. आणि अशी हमी देणारे लोक दिल्या वचनास जागून वागतात किंवा नाहीं, हें पाहण्यासाठीं, या कमिटीची योजना केली. १९५५ सालच्या उन्हाळयांत राष्ट्राध्यक्ष आयसनहॉवरनें जारी केलेल्या धोरणाचे परिणाम अजमावण्यासाठीं व तें धोरण अधिक प्रभावी करण्याच्या हेतूनें संबंधितांची एक सभा बोलावण्यांत आली.

याच धोरणास अनुसरून मध्यवर्ती सरकारच्या अनेकविध कार्यक्षेत्रांतील पक्षपात समूळ नष्ट करण्यासाठीं 'फेअर एम्प्लॉयमेंट बोर्डाची' स्थापना करण्यांत आली. दुसऱ्या महायुद्धापूर्वी सरकारी कामधंद्यांत गुंतलेल्या नीग्रो कामगारांची अवस्था इतरत्र खाजगी कामधंद्यांत गुंतलेल्या नीग्रो कामगारांच्या अवस्थेपेक्षां फारशी भिन्न नव्हती. सरकारी कामकऱ्यांची पाहणी केली असतां त्या वेळीं असें आढळून आलें होतें कीं सरकारी यंत्रणेंत नीग्रो कामगारांस जीं कामें मिळत, तीं बहुतकरून केवळ अंगमेहनतीचीं पट्टेवाला, झाडूवाला असलीं हलकीं सलकीं असत. फार फार तर किरकोळ कारकुनीचीं कामें त्यांच्या वांटयास येत. युद्धाचें वातावरण जसजसें तापूं लागलें, तसतशी नव्या कामगारांची भरती करणें आवश्यक झालें. युद्धकाळांत नीग्रो कामगारांस अधिक चांगल्या नोकऱ्या उपलब्ध झाल्या, एवढेंच केवळ नाहीं, तर सरकारी नोकरींत गुंतलेल्या नीग्रो कामगारांच्या संख्येंत शेंकडा २० टक्केपर्यंत वाढ झाली. युद्ध संपुष्टांत आलें, तेव्हां एकूण २५००००० सरकारी नोकर मुलकीकडे काम करीत होते, त्यांजपैकीं ३००००० नीग्रो होते. वटहुकुमान्वयें 'फेअर एम्प्लॉयमेंट बोर्डा'चें काम नेमून दिलें होतें, तें असें कीं कोणाहि कामगारास सरकारी नोकरींत घेतेवेळीं, उमेदवारीच्या काळांत, पगाराच्या वा दर्जाच्या वाढींत आणि नोकरींतून कमी करतेवेळीं त्याचा वंश, वर्ण, वा धर्म विचारांत घेतला जाऊं नये. याबाबत बोर्डानें सक्त दक्षता घेऊन सर्व सरकारी कामगारांस निःपक्षपात वागणुकीची दिलेली ग्वाही

चोख अंमलांत आणण्यासाठीं योग्य ते सर्व उपाय बोर्डानें योजावेत, असा सरकारी आदेश होता. परिणामीं सरकारी कामकाजांतील वातावरण निःपक्षपाती राहण्यास या वटहुकुमाची उत्तम मदत झाली आणि त्यामुळें सरकारी नोकरी करणाऱ्या नीग्रो कामगारांची पुष्कळच प्रगति होऊं शकली.

नीग्रो कामगारांच्या संख्येंत वाढ झाली, त्या प्रमाणांत कामगार संघटनेच्या नीग्रो सदस्यांच्या संख्येंत स्वाभाविक वाढ झाली. १९३० सालापासून आजतागायत ही वाढ १५०००० पर्यंत जाऊन पोहोंचली आहे. असंख्य नीग्रो कामगार संघटित झाल्यामुळें कामगार संघटनांच्या दृष्टिकोणांत कांहीं पुरोगामी बदल झालेला दिसतो. त्यामुळें कामगार संघटनेंत नीग्रो कामगारास आज असाधारण महत्त्व प्राप्त झालें आहे. परिस्थितींतील हा सूचक बदल राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कामगार संघटनांनीं ध्यानांत घेतला असून तदनुसार त्यांच्या धोरणांत नीग्रोंस अनुकूल असा बदल घडून आल्याचें सर्वत्र दिसत आहे. कामगारांच्या नेमणुकींत पक्षपात केला जाऊं नये आणि त्यासाठीं अवश्य ते नवे कायदे अंमलात आणावेत, अशी आजच्या कामगार संघटनेची धारणा असल्याचें आढळून येतें. कामगार चळवळींत नवे नवे नीग्रो नेते आपल्या हक्काचें स्थान घेत आहेत आणि त्यांपैकीं कांहीं अत्युच्चपदीं जाऊन पोहोंचलेले दिसतात. कामगार चळवळीचें धोरण ज्यांच्या हातीं आहे, त्या नेत्यांमध्यें कित्येक नीग्रो आहेत हें एक बदलत्या परिस्थितीचें प्रसादचिन्ह समजावें लागेल.

प्रस्तुत संदर्भांत सुद्धां एक गोष्ट कटाक्षानें ध्यानांत घ्यावयास हवी, ती ही कीं राष्ट्रव्यापी कामगार संघटनांचें धोरण निःपक्षपात असलें, तरी या संघटनांस जोडलेल्या स्थानिक कामगार संघटना हें धोरण नेहमींच व सर्वत्र अंमलांत आणतात, असें दिसत नाहीं. उदाहरणार्थ, कित्येक स्थानिक कामगार संघटना अजूनसुद्धां इतर क्षेत्रांत आढळणारा पक्षपात निष्ठेनें पाळतात. कांहीं थोड्या पण महत्त्वाच्या कामगार संघटना अजूनहि पक्षपाती आहेत. हा भेदभाव सर्वांत अधिक ठळकपणानें रेल-कामगारांच्या चारी राष्ट्रव्यापी संघटनांत उमटून दिसतो. रेल्वेशीं संबंधित अशा कांहीं कामगार संघटना नीग्रो कामगारांस काम मिळूं नये, यासाठीं झटून यत्न करतात. अगदीं

अलीकडे कित्येक संघटना पक्षपातास थारा देतनाशा झाल्या आहेत. सुतार, गवंडी, छापखान्यांतील कामगार आणि वीजकामगार यांच्या जुनाट संघटना नीग्रो कामगारांस क्वचित्च थारा देतात. पण न्यायालयाची प्रवृत्ति निःपक्षपातास अनुकूल आहे, हें एकदां ध्यानांत आल्यानंतर पक्षपाती कामगार संघटनासुद्धां आज नव्या कालमानास अनुसरून आपल्या धोरणांत इष्ट ते बदल घडवून आणीत आहेत, असें दिसतें. त्यामुळें नीग्रो कामगारांस अधिकाधिक कामाचीं क्षेत्रें उत्तरोत्तर खुलीं होत आहेत.

कामगार संघटनांत नीग्रो कामगारांचा प्रवेश व प्रभाव झाल्यापासून त्यांचा पुष्कळच फायदा झाला आहे. सर्वसाधारण विचार केला असतां नीग्रो कामगारांच्या प्रगतीस कामगार संघटनांनीं प्रत्यक्ष साहाय्य बरेंच केलें आहे, असें दिसून येतें. उदाहरणार्थ, कित्येक नीग्रो कामगारांच्या मिळकतींत व पगारांत वाढ झाली आहे, आणि कामगार संघटनांच्या औद्योगिक करारामुळें नीग्रो कामगारांस पगारवाढीचे सर्व हक्क ज्याप्रमाणें प्राप्त झाले आहेत, त्याप्रमाणें कामांतील अनुभवाच्या मानानें त्यांना वरिष्ठ जागा उपलब्ध होऊं लागल्या आहेत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कामाच्या संबंधांत त्यांना स्थैर्याची शाश्वति प्राप्त झाली आहे. कामगार संघटनांच्या सभासदांस आयुर्विमा, प्रॉव्हिडंट फंड इ. अधिकार प्राप्त होतात, ते आतां नीग्रो कामगारांस स्वाभाविकच मिळतात. त्याशिवाय आजारपणाच्या काळांत संघटनेनें केलेली औषधपाण्याची तरतूद त्यांच्या कामीं येते. कामगार संघटनांत स्थान मिळाल्यामुळें नीग्रो कामगारांचें व त्यांच्या कुटुंबाचें सर्वतोपरीनीं हित झालें आहे.

औद्योगिक क्षेत्रांत कारखान्यांच्या मालकांनीं वा व्यवस्थापकांनीं प्रथम पक्षपातास उत्तेजन दिलें होतें, हें तर खरेंच. या पापाचे ते निःसंशय धनी आहेत. पण हें सांगत असतांना त्यांचीं सत्कृत्यें पण सांगावयास हवींत. उदाहरणार्थ, त्यांच्यापैकींच अनेकांनीं नीग्रो कामगारांच्या प्रगतीस हातभार लावण्याचें पुण्य संपादन केलें आहे. एकदां आपली चूक समजून आल्यावर आतां ते शहाणपणा शिकले आहेत. पक्षपातास थारा दिल्यामुळें मानवतेचें तर अकल्याण होतेंच, पण त्यापायीं स्वार्थसुद्धां दुरावतो, हें त्यांना अनु-

भवानें कळून चुकलें आहे. मजुरीच्या खुल्या बाजारांत प्रत्येकास आपलें सामर्थ्य वा कौशल्य विक्रीस मांडण्याचा हक्क आहे, हें मूलभूत तत्त्व मान्य न केल्यामुळें कारखानदारांचें सुद्धां आजवर अपरिमित नुकसान झालें आहे. बहुसंख्य नीग्रो कामगारांस व तथाकथित 'अल्पसंख्यां'स काम शोधण्याचा जसा हक्क आहे, त्याप्रमाणें आपल्या गरजेस अनुसरून त्यांना काम देण्याचें सुद्धां आपलें कर्तव्य आहे, हें कांहीं पुरोगामी उद्योगपतींस आज पटलेलें दिसतें. बदलत्या कालमानास अनुसरून कारखानदारांची वागणूक बदलती आहे. प्रस्तुत संबंधांत विमान वाहतुकीच्या धंद्यांतील एका कामगार–संपर्क अधिकाऱ्याचें मत बदलत्या मनोवृत्तीचें द्योतक आहे. तो म्हणतो : 'नीग्रो कामगारांना आम्ही कामावर घेतलें, तर त्यांत नीग्रोंचेंच केवळ हित आहे, असें नाहीं. त्यांत कारखानदारांचें देखील हितच आहे. बाजारांत मजूर संख्येनें जेवढे अधिक, त्या प्रमाणांत हवी तशी निवड करण्यास सोयीचें जातें... पक्षपात केला, तर हवी तशी निवड करावयास फार मोठा वाव राहतच नाहीं...म्हणून सर्व दृष्टींनीं नीग्रो कामगारांस कामाची संधि देणें उभयपक्षीं हितावह आहे. '

ज्या कंपन्यांच्या निःपक्षपात धोरणामुळें नीग्रो कामगारांस कामाची संधि उपलब्ध होऊं शकली, त्यांच्यापैकीं कांहीं प्रसिद्ध कंपन्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:— ' इंटरनॅशनल हार्वेस्टर कंपनी, रेडिओ कॉर्पोरेशन ऑफ अमेरिका, पिटनी–बोवेस कंपनी, वेस्टर्न इलेक्ट्रिक कंपनी, वेस्टिंग हाऊस इलेक्ट्रिक कॉर्पोरेशन, फोर्ड मोटार कंपनी, इन्लंड स्टील कंपनी, फ्रिजिडेअर कंपनी, नॉर्थ अमेरिकन एव्हिएशन, लॉकहीड एअरक्राफ्ट, डीट्रॉइट एडिसन आणि 'स्टँडर्ड ऑईल कंपनी ऑफ न्यू जर्सी '—वरील यादी लक्षांत घेतली असतां भविष्याविषयीं चिंता करण्याचें कारण नाहीं, असें वाटतें. संभव असा दिसतो कीं, यापुढें पुरोगामी प्रवृत्तीचा प्रभाव उत्तरोत्तर वाढत जाईल. अधिकाधिक कारखानदार आपआपल्या कारखान्यांचीं दारें सर्व कामगारांस खुलीं करतील. आणि कामगारांच्या निवडींत फक्त पात्रतेचीच तेवढी एक कसोटी वापरली गेली, तर नीग्रो कामगारांस काम मिळणें सोपें होईल.

काळाचीं पावलें ओळखून निःपक्षपातवृत्तीचा आदर करणाऱ्या अनेक नागरिक व वंशनिरपेक्ष संस्था कामधंद्यांतील पक्षपात नष्ट करण्याच्या कामीं झटत आहेत आणि सर्व देशभर त्यांचें काम एकसारखें वाढत आहे.

आज परिस्थिति अशी आहे, कीं नीग्रो समाजाचें आर्थिक दैन्य हळुहळू नाहींसें होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. आज सुखवस्तु नीग्रोंची संख्या जेवढी आहे, तेवढी यापूर्वी केव्हांच नव्हती. अमेरिकन जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत नीग्रोंस अनुकूल अशी प्रवृत्ति सर्वत्र कार्यक्षम होत आहे. प्रगल्भ सामाजिक आणि आर्थिक तत्वज्ञानाच्या संयुक्त प्रभावामुळें आणि विस्तार पावत जाणाऱ्या क्रियाशील आर्थिक स्थितीच्या दडपणामुळें आजवर होत राहिलेली मौल्यवान् मानव सामर्थ्याची नासाडी थांबेल आणि तेणेंकरून नीग्रो समाजाचा भाग्यकाल जवळ येईल, अशीं पूर्वचिन्हें आज सर्वत्र दिसत आहेत.

विल्यम आर. हाजिन्स

# औद्योगिक व स्वत्वसंबद्ध प्रगति :

अमेरिकन जीवनाच्या अनेकविध क्षेत्रांत गेल्या कांहीं वर्षांत नीग्रो लोकांची जशी झपाट्यानें प्रगति झालेली आहे, तशीच पण त्याहून आश्चर्यकारक अशी प्रगति उद्योगधंद्याच्या आणि मालकीच्या संबंधांत झालेली आढळते. संयुक्त राज्यांत सर्व अल्पसंख्यांची आर्थिक सुरक्षितता देशाच्या अर्थव्यवस्थेशीं निगडित आहे. ज्या प्रमाणांत देशाची भरभराट होते आणि देश संपन्न होतो, त्या प्रमाणांत उत्कर्षाच्या संधी सर्वांसच अधिक उपलब्ध होतात. या नियमास नीग्रो जमात अपवाद नाहीं. अमेरिकन नीग्रोची आर्थिक सुरक्षितता आणि संपत्तीची मालकी आज कशी विस्तार पावत आहे, या संबंधांत तीन ठळक उदाहरणें सांगण्यासारखीं आहेत.

कॅलिफोर्निया राज्यांत लॉस एंजेलिस येथें दहा वर्षांपूर्वी जॉर्ज सेव्हेल्ड नांवाचा एक नीग्रो हमाल एका पेट्रोल पंपावर काम करीत असे. त्यावेळीं त्याच्या खिशांत एखादा सुद्धां डॉलर सांपडण्याची मुष्कील होती. आज तोच नीग्रो हमाल दरसाल एक लक्ष डॉलर्सचें उत्पन्न देणाऱ्या पेट्रोल पंप कंपनीचा मालक आहे. आणि त्याच्या स्वतःच्या मालकीची 'युनियन ऑईल कंपनी'चें प्रतिनिधित्व करणारीं पेट्रोल स्टेशन्स उत्तरेस कॅनडांतील व्हॅनकूव्हर-पासून दक्षिणेंत कॅलिफोर्नियांतील सॅन डीगोपर्यंत व पूर्वेस यूटापर्यंत सर्वत्र पसरलेलीं आहेत.

जॉन एच. जॉन्सन नांवाच्या एका नीग्रोनें दुसऱ्या महायुद्धानंतर वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी ५०० डॉलर्सच्या उसन्या भांडवलावर प्रकाशनच्या

धंद्यांत काम करावयास सुरुवात केली. आज ह्याच तरुण माणूस वयाच्या केवळ पस्तिशींत चार मासिकांचा मालक–प्रकाशक आहे. त्यांतील सर्वाधिक प्रसिद्ध मासिक म्हणजे 'एबनी'. या सर्व मासिकांचा एकूण खप २० लक्षांवर आहे.

पी. एम्. जेंकिन्स हा नीग्रो कामगार दहा वर्षांपूर्वी न्यूयॉर्क राज्याच्या मजूर खात्यांत व्होकेशनल गायडन्सचें काम करीत असे. आज तोच जेंकिन्स सुप्रसिद्ध वॉल स्ट्रीटवरील 'स्पेशल मार्केटस्' नामक एका इन्व्हेस्टमेंट फर्मचा प्रेसिडेंट आहे. आणि 'म्यूच्युअल इन्व्हेस्टमेंट कंपनी ऑफ अमेरिका' आणि 'नॉर्थ अमेरिकन टेलिव्हिजन प्रॉडक्शन्स' नामक कंपन्यांच्या नियंत्रक मंडळाचा कार्यकारी सभासद आहे.

भांडवल गुंतविण्यापूर्वी तें आधीं बँकेंत स्वतःच्या नांवावर नोंदलेलें असावें लागतें. याचा अर्थ असा, कीं दैनंदिन राहणीचा खर्च भागविल्यानंतर त्या माणसाजवळ स्वतःच्या मालकीची विपुल शिल्लक असावी लागते. जेंकिन्सची आर्थिक स्थिति सर्वतोपरींनीं भरभराटीची असल्यामुळेंच भांडवल गुंतविण्याचे आर्थिक व्यवहार तो स्वतःच्या संपत्तीच्या बळावर करूं शकतो. कामांतील कष्ट, शहाणपणानें केलेला खर्च व शिलकेंत टाकलेली बचत, चांगलें काम व चांगला पगार यांच्या बळावर हजारो नीग्रो आज आर्थिक सुस्थितींत आहेत. आणि त्यामुळें शिलकेंतील आपलें भांडवल ते इतरत्र गुंतवूं शकतात. या बदलत्या परिस्थितीमुळें या नव्या बाजारांत अनेक इन्व्हेस्टमेंट फर्म्स परस्परांशीं स्पर्धा करीत आहेत.

मानवी जीवनाच्या प्रत्येक अभ्यासकास हें माहीत असतें कीं सर्वच माणसांची स्थिति सर्वत्र एकसारखी नसते. उत्कर्षास चढलेल्या तीन नीग्रो माणसांचीं उदाहरणें जीं वर दिलेलीं आहेत, तीं एकूण नीग्रो जमातीचीं प्रातिनिधिक नव्हेत. ज्याप्रमाणें 'युनायटेड स्टेटस् स्टील कॉर्पोरेशन'चा प्रेसिडेंट म्हणजे कांहीं सर्व गोऱ्या अमेरिकन माणसांचा प्रतिनिधि नव्हे, तसेंच हें आहे. आजहि कित्येक नीग्रो कुटुंबें अशीं आहेत कीं त्यांना सार्वजनिक कल्याणनिधीच्या मदतीवर अवलंबून राहावें लागतें. अर्थात्च हीच स्थिति कित्येक गोऱ्या कुटुंबांची देखील आढळते. त्याचबरोबर हेंहि खरें कीं

वर ज्या नीग्रो माणसांचीं उदाहरणें मुद्दाम दिलीं त्यांच्यापेक्षां अधिक श्रीमान आणि कर्तृत्ववान अशीं नीग्रो माणसें उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत किती तरी आढळतील. वरील उदाहरणें एवढयासाठींच दिलीं कीं त्यांजमुळें उद्योग-धंद्यांत आणि पर्यायानें अर्थसंबंधांत नीग्रो माणसांनीं केवढें मोठें यश मिळविलें आहे त्याची यथार्थ कल्पना यावी. नीग्रो माणसाचा हा आर्थिक उत्कर्ष केवळ एकाच पिढींत शक्य झाला आहे. स्वतंत्र लोकशाही समाजांत प्रत्येक माणसास वैयक्तिक कर्तृत्व गाजविण्याची संधि उपलब्ध असते, एवढी एक गोष्ट यामुळें स्पष्ट झाली, तरी पुरे.

नीग्रो जमातीच्या उत्कर्षाच्या मार्गांत केवढे मोठे अडथळे होते, तें ध्यानांत घेतलें, म्हणजे उद्योगधंद्यांत, मालकी हक्कांत व अर्थसंबंधांत नीग्रो माणसांनीं गाजविलेलें कर्तृत्व केवढें मोठें आहे, त्याची यथार्थ कल्पना करतां येईल. ज्यांचे पूर्वज कांहीं थोडया वर्षांपूर्वी गुलाम होते, जनावरां-पेक्षां ज्यांची किंमत अधिक नव्हती आणि गोऱ्यांच्या मालमत्तेंत ज्यांचा समावेश केला जात असे, त्यांचेच वंशज आज कोटयवधि डॉलर्सच्या संपत्तीचे धनी झालेले दिसत आहेत. या देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत सर्वत्र नीग्रो माणसांच्या मालकीच्या शेतजमिनी पसरलेल्या आहेत. सर्वत्र त्यांच्या मालकीचीं घरें आहेत, दुकानें आहेत, प्रकाशन संस्था आहेत, सरकारी कर्जरोखे आहेत. आणि आणखी किती तरी विविध प्रकारची मिळकत त्यांच्या मालकीची आहे.

गुलामगिरीच्या काळांत नीग्रो माणसाच्या सत्तेचें असें कांहीं सुद्धां नव्हतें. त्यांच्या देहावरसुद्धां त्यांची सत्ता नव्हती. सिव्हिल वॉरमुळें या नीग्रो गुलामांची गुलामगिरींतून मुक्तता झाली. त्यावेळीं गुरांढोरांपेक्षां त्यांची किंमत अधिक नव्हती. ज्यावेळीं नीग्रो गुलाम मुक्त व स्वतंत्र झाला, त्यावेळीं त्याच्या स्वतःच्या देहाखेरीज त्याच्या मालकीचें असें दुसरें कांहींच नव्हतें. त्याच्याजवळ पैसा नव्हता कीं दुसऱ्या कसल्या कामाचा अनुभव त्याच्या गांठीं नव्हता. त्यावेळीं 'फ्रीड मॅन्स ब्यूरो ऑफ फेडरल गव्हर्मेंट' व्यतिरिक्त अन्य कोणती शक्ति त्याच्या पाठीशीं नव्हती. कोणतेंहि काम करण्यासाठीं प्राथमिक हत्यारें–अवजारें हवींत. तीं सुद्धां त्याच्याजवळ

नव्हतीं. तदनंतरच्या सामाजिक पुनर्रचनेच्या काळांत केवळ स्वतःच्या ताकदीवर विसंबून नीग्रो माणसांना गोऱ्यांशीं सर्व क्षेत्रांत स्पर्धा करावी लागली, आणि ती सुद्धां वांशिक पक्षपातास सर्वस्वीं अनुकूल अशा परिस्थितींत. त्यामुळें देहदास्यांतून मुक्त झालेला हा नीग्रो समाज आर्थिक दास्याच्या कैचींत सांपडला. त्यापूर्वीं निदान स्वतःच्या वा कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची चिंता त्याला करावी लागत नसे. आतां मात्र गुलाम नसूनहि गुलामापेक्षां अधिक केविलवाणी पण स्वाभिमानाच्या दृष्टीनें स्वतंत्र अशी मुक्त नीग्रोची अवस्था होती.

अशा स्थितींत नीग्रो माणसास कामें तरी कसलीं उपलब्ध होणार, हा प्रश्नच होता. शेतावरील ढोर मेहनतीचीं कामें किंवा घरांतील गड्यांचीं अंग मेहनतीचीं कामें यांजव्यतिरिक्त अन्य कोणताहि रोजगार त्या काळीं नीग्रो माणसास उपलब्ध नव्हता. अर्थातच नीग्रो समाजांत परस्परांसाठीं करावयाचीं कांहीं कामें हातीं घेण्यासारखीं होतीं. असल्या कामांत गोरे कसलेंच लक्ष घालावयास तयार नव्हते. उद्योगधंदा करावयाचा म्हटलें, तर त्यासाठीं कांहीं किमान शिक्षणाची व माहितीची आवश्यकता होतीच. त्याशिवाय भांडवलाचा सर्वस्वीं अभाव असल्यामुळें कोणत्याहि धंद्यांत वा व्यापारांत पैसे गुंतविण्याची कोणाची ताकद नव्हती. बाजारांत कसली म्हणून पत नव्हती. पक्षपातामुळें कसलें म्हणून काम मिळण्यासारखें नव्हतें. कोणत्याहि उद्योगांत आणखी एक नवा प्रतिस्पर्धी नको, अशा भावनेनें उद्योगाच्या सर्व क्षेत्रांतून नीग्रोस पाऊलसुद्धां टाकूं न देण्याचें धोरण सर्वत्र जारी होतें. सर्वस्वीं विपरीत अशा या स्थितींत नीग्रो माणसाचे उपजीविकेसाठीं चाललेले सर्व यत्न अपेशी ठरावेत, हें क्रमप्राप्तच होतें.

पण या दुर्दैवी परिस्थितीस शरण जाऊन भागण्यासारखें नव्हतें. त्यामुळें उपासमारीचाच प्रसंग नीग्रोंवर ओढवला असता. बहिष्कृत अवस्थेंतील लाचारीचें जीवन कंठण्याचें भागधेय नीग्रोंच्या वांट्यास आलें होतें. गोऱ्यांनीं काळ्यांस सामाजिक जीवनांतून हद्दपार केलें होतें. हें दुर्दैवच एका परीनें नीग्रोंचें सुदैव ठरलें. नीग्रोंच्या वसाहती विभक्त असल्या, तरी त्या एकत्र व सुसंघटित होत्या. तेथेंच उपजीविकेचा प्रश्न सोडविणें अगत्याचें होतें.

नीग्रोंच्या प्राथमिक गरजा त्यांच्या त्यांनींच भागविण्यास सुरुवात केली. तसें पाहिलें, तर नीग्रोंस काय नको होतें ? अन्नधान्य हवें होतें, म्हणून त्यांनीं किराणा मालाचीं दुकानें काढलीं. खाद्यपेयें हवीं होतीं, म्हणून उपाहारगृहें चालविणें आवश्यक होतें. राहण्यासाठीं जागा हवी होती, म्हणून जमिनींची खरेदीविक्री करणाऱ्या संस्था चालविणें भागच होतें. कोणास पैसा कर्जाऊ हवा होता. कोणास क्वचित् गांठीं सांठलेला पैसा व्यापारांत गुंतविण्याची संधि हवी होती. या असल्या गरजा भागविण्यासाठीं स्थापन झालेल्या संस्थांचे इतिहास उद्‌बोधक आहेत. फिलाडेल्फिया येथें 'बेरियन सेव्हिंग्ज अँड लोन असोसिएशन' नामक एक संस्था बेरियन प्रेस्बिटेरियन चर्चमध्यें १८८८ सालीं स्थापन करण्यांत आली. त्यावेळीं तिचें एकूण भांडवल फक्त ५००० डॉलर्स होतें. आज याच अ‍ॅसोसिएशनचें २५०००० डॉलर्सच्या कॉर्पोरेशनमध्यें रूपांतर झालेलें दिसतें.

सुप्रसिद्ध 'फॉर्च्यून' मासिकानें न्यू ऑर्लीन्स शहराची पाहणी प्रस्तुत संदर्भांत १९४९ सालीं केली. तेव्हां असें आढळून आलें, कीं फक्त त्या एका शहरांत नीग्रोंनीं चालविलेले ३१०० उद्योगधंदे आहेत. अमेरिकेंत नीग्रोंच्या मालकीचे असे उद्योगधंदे एकूण नेमके किती आहेत आणि त्यांत एकूण किती भांडवल गुंतविलेलें आहे, याबाबतचे विश्वसनीय आंकडे तूर्त उपलब्ध नाहींत. पण नीग्रोंच्या मालकीच्या उद्योगधंद्यांत गुंतलेलें नीग्रो भांडवल अब्जावधि डॉलर्सचें असावें, हें आंकडे न देतां सुद्धां सहज समजण्यासारखें आहे.

नीग्रोंच्या मालकी हक्कांची संपत्ति एवढ्या प्रचंड प्रमाणांत वाढलेली दिसते, त्याचें कारण केवळ प्रामाणिक कष्टांतच सांपडेल, असें नाहीं. अंग मोडून केलेले कष्ट तर नीग्रोंच्या पांचवीलाच पूजिलेले होते. या कष्टांव्यतिरिक्त आणखी अनेक साधनांचें साहाय्य त्यांना शोधावें व घ्यावें लागलें. कष्टांतून मिळकत झाली. पण अजूनपर्यंत नीग्रो लोकांस कसलें म्हणून आर्थिक साहाय्य देण्यास गोरे राजी नव्हते. नीग्रो माणसाजवळ तारण म्हणून देण्यास कसली मालकीची वस्तूच नव्हती. त्यामुळें त्याच्याशीं कोणताहि आर्थिक व्यवहार करण्यास गोऱ्यांनीं चालविलेल्या बँका तयार नव्हत्या.

अशा स्थितींत नीग्रो लोकांना स्वतःच्या बँका काढण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. गोऱ्यांच्या आयुर्विमा कंपन्या नीग्रो लोकांस विमा देण्यास सदाच नाखूष असत. कारण गोऱ्यांच्या मानानें नीग्रोंची आयुर्मर्यादा तोकडी आहे, असा एक रास्त समज गोऱ्यांमध्यें प्रचलित होता. जातां जातां प्रस्तुत संदर्भांत हें सांगावयास हवें कीं काळ्यागोऱ्यांच्या आयुर्मर्यादेंतील विषमता आतां पुष्कळच कमी झाली आहे. गोऱ्यांच्या बाजारांत काळ्यांची पत नसल्यानें नीग्रो लोकांना बँकिंगच्या सर्व व्यवहारांत जातीनें लक्ष घालावें लागलें.

नीग्रोंच्या उद्योगधंद्यांत व आर्थिक व्यवहारांत आयुर्विमा कंपन्यांचें व बँकांचें स्थान केवळ अद्वितीय असें आहे. नीग्रोंच्या एकूण १४ बँका अशा आहेत कीं त्यांजपैकीं प्रत्येक बँकेंत ३५०००००० डॉलर्सचें भांडवल गुंतलेलें आहे. या १४ बँकांपैकीं १२ दक्षिणेंत आहेत. त्यांची सर्वांत मोठी बँक म्हणजे वॉशिंग्टनमधील ' इंडस्ट्रियल बँक ' होय. त्याशिवाय गहाणांचा व कर्जाच्या देवघेवीचा व्यवहार करणाऱ्या सेव्हिंग्ज व लोन अॅसोसिएशन्स आणखी किती तरी आहेत. त्यांजमध्यें एकूण १६५०००० डॉलर्सचें भांडवल गुंतविलेलें आहे. १९४८-४९ या सालांत या अशा देवघेवीच्या संस्थांच्या संख्येंत शेंकडा ४५ प्रमाणांत वाढ झालेली दिसते, ती उल्लेखनीय आहे.

अमेरिकन नीग्रोंच्या मालकीचा व त्यांनीं चालविलेला सर्वांत मोठा किफायतशीर धंदा म्हणजे विम्याचा होय. त्यांची पहिली विमा कंपनी ' आफ्रिकन लाइफ इन्शुरन्स कंपनी ' फिलाडेल्फिया येथें १८१० सालीं स्थापन झाली. तिचें सुरुवातीचें भांडवल फक्त ५००० डॉलर्स होतें. नीग्रो लोकांनीं चालविलेली स्वतःच्या मालकीची अशी सर्वांत मोठी आयुर्विमा कंपनी म्हणजे ' दि नॉर्थ कॅरोलिना म्युच्युअल लाइफ इन्शुरन्स कंपनी ' होय. या विमा कंपनीची स्थापना जॉन मेरिक नामक एका न्हाव्यानें केली. प्रारंभीं अत्यंत अल्प भांडवलावर सुरू केलेल्या या विमा कंपन्यांनीं तदनंतर अमेरिकेच्या प्रचंड अर्थव्यवहारांत अत्यंत सन्मानाचें असें स्थान प्राप्त करून घेतलें आहे. स्वतंत्र नीग्रोंनीं लहान प्रमाणावर सुरू केलेल्या या विमा कंपन्या आज आर्थिक अधिसत्तेचें एक केंद्रस्थान होऊन बसलेल्या आहेत. १९५० सालीं प्रसिद्ध करण्यांत आलेल्या ' नॅशनल नीग्रो इन्शुरन्स असोसि-

सिएशन'चा अहवाल त्यांच्या प्रगतीचा आलेख स्पष्ट दाखवितो. आज अमेरिकेंत एकूण २०० नीग्रो विमा कंपन्या आहेत. या आपल्या कंपन्यांतून विमा उतरणारे एकूण ५०००००० नीग्रो पॉलिसी होल्डर्स आहेत. १९५० सालीं यांजपैकीं ६० कंपन्यांनीं एकूण १२८७०७४.१० डॉलर्सचे विमे उतरवले. त्यांची एकूण मालमत्ता १३००००००० डॉलर्सची आहे आणि गुंतविलेलें भांडवल एकूण ३०००००००० डॉलर्स आहे.

नीग्रोंनीं देशांतील अनेक बँकांतून गुंतविलेल्या रकमांचा बिनचूक तपशील आज उपलब्ध नाहीं. पण तरी सुद्धां एक गोष्ट निश्चयानें सांगण्यासारखी आहे, ती ही कीं स्वतःच्या बँकांतून जेवढा पैसा नीग्रोंनीं गुंतविलेला आहे, त्यापेक्षां किती तरी पटींनीं अधिक भांडवल त्यांनीं या देशांतील सर्वमान्य अशा बँकांतून ठेव म्हणून गुंतविलेलें आहे. बँकांत जें नीग्रो भांडवल गुंतून पडलें आहे, त्यामुळें अमेरिकेच्या अर्थव्यवहारांत नीग्रोंची पत किती तरी वाढलेली आहे. आणि नीग्रो उद्योगधंद्यांच्या वाढीच्या व विस्ताराच्या दृष्टीनें हें नीग्रो भांडवल मनस्वी उपकारक ठरण्याचा संभव आहे. जी स्थिति बँकांची आहे, तीच विमा कंपन्यांची आहे. नीग्रोंच्या विमा कंपन्यांत नीग्रोंनीं ज्या रकमांचे विमे उतरवले आहेत, त्यापेक्षां किती तरी पटींनीं अधिक मोठ्या रकमांचे विमे त्यांनीं या देशांतील सर्वमान्य अशा विमा कंपन्यांतून उतरवलेले आहेत.

गेल्या कांहीं दशकांत बांधकामांच्या क्षेत्रांत नीग्रो कॉंट्रॅक्टर कंपन्यांनीं व आर्किट्रेक्चरल फर्म्सनीं फार मोठें नांव कमावलेलें दिसतें. त्यांजपैकीं कांहीं उल्लेखनीय अशा वास्तुतज्ज्ञांचीं नांवें येथें दिलेलीं आहेत. त्यांजवरून या क्षेत्रांतील त्यांच्या कर्तृत्वाची कल्पना थोडीबहुत करतां येईल. इंडियाना राज्यांतील गॅरी येथील मीन्स ब्रदर्स, या देशांतील अनेक राज्यांत नवीन घरांच्या वसाहती उठवीत आहेत. न्यू ऑर्लीन्समधील जो बार्थोलोमो शहरांची, पुलाची आणि गोद्यांची आंखणी बांधणी करण्यांत निष्णात आहेत. आयोवा येथील आर्ची ए. अलेक्झांडर हा पूर्वी लिबेरियामध्यें संयुक्त राज्यांचा राजदूत म्हणून काम पाहत असे. त्यानें या देशाच्या राजधानींत ३०० बांधकामें पुरीं केलेलीं आहेत. टायडल बेसिन ब्रिजचें काम पण त्यानेंच

हातीं घेऊन पुरें केलें आहे. वॉशिंग्टन डी. सी. मधील मिसेस जिनेव्हा के. व्हलेंटाईनचें बांधकामाच्या साहित्याचें दुकान प्रसिद्ध आहे. तेथें ४० विक्रेते काम करतात. या दुकानांत दरसाल बारा पंधरा लक्ष डॉलर्सचा व्यवहार होतो. ऑगस्टिन ए. ऑस्टिन हा न्यूयॉर्क शहरांतील एक बडा रिअल इस्टेट ऑपरेटर म्हणून प्रसिद्ध आहे. कॅलिफोर्निया राज्यांतील पॉल विल्यम्स या नामांकित आर्किटेक्टचें नांव देशभर महशूर आहे. देशांतील अत्यंत उद्योगी आणि कल्पक आर्किटेक्ट म्हणून त्याची ख्याति आहे. या देशांतील कित्येक उत्तमोत्तम घरांचे आणि सार्वजनिक बांधकामांचे मूळ आराखडे त्याच्या हातचे आहेत.

साधारणपणें प्रत्येकीं ७६ एकर जमिनीचा एक तुकडा, अशीं एकूण २००००० शेतें नीग्रो शेतकऱ्यांच्या मालकीचीं आहेत. त्यांच्यापैकीं कांहीं शेतकरी धनाढ्य आहेत. आणि त्यांच्या मालकीच्या शेतमळ्यांची संख्या अजस्र आहे. १९४० सालीं नागरवस्तीचा शेंकडा विसावा भाग नीग्रो मालकीचा होता. १९५० सालीं ह्याच विभागांत सरासरी शेंकडा तेराची आणखी भर पडली आहे. गेल्या दहा पंधरा वर्षांत गोऱ्या लोकांनीं जेवढीं घरें बांधलीं, त्याजपेक्षां अधिक नीग्रो लोकांनीं बांधलीं, असें दिसून येतें. असें असलें तरी सुद्धां नीग्रो घरमालकांची एकूण संख्या गोऱ्या घरमालकांच्या मानानें अजून पुष्कळच कमी आहे. पण इतर अनेक क्षेत्रांतील विषमतेप्रमाणेंच ही विषमता देखील झपाट्यानें नष्ट होत आहे.

उद्योगधंद्यांत, शेतीवाडींत आणि घरबांधणींत नीग्रोंची मालकी झपाट्यानें वाढत आहे. ही वाढ त्यांच्या प्रतिष्ठेस पोषक आहे. त्यामुळें नीग्रो लोकांच्या मनांत स्वाभिमानाची भावना अधिक बळावली आहे. कोणत्याहि क्षेत्रांतील यश माणसाच्या मनांतील वाजवी अभिमानास कारण होतें; आणि भविष्यकाळांतील प्रगतीसंबंधीं अधिक विश्वास निर्माण करतें. या यशाची प्रेरणा तरुणांच्या मनांत अधिक मोठी महत्त्वाकांक्षा उत्पन्न करते. आज या देशांत क्वचित्‌च असा एखादा उद्योग वा धंदा असेल कीं ज्यांत नीग्रोचें स्थान मानाचें नाहीं. आज नीग्रोस काम मिळत नाहीं, असें सहसा होत नाहीं. नीग्रो बेकारीचा प्रश्न आतां बहुतकरून सुटल्यासारखा झाला आहे. आज

खरा प्रश्न आहे तो अधिक पगाराच्या व प्रतिष्ठेच्या जागांसाठीं लायक असे सुशिक्षित नीग्रो अधिक मोठ्या संख्येनें उपलब्ध कसे होतील, हा आहे. १९५५ सालीं ऑक्टोबर महिन्यांत उपराष्ट्राध्यक्ष निक्सन यांच्या नेतृत्वाखालीं एक परिषद प्रस्तुत संबंधांत विचार करण्यासाठीं बोलावण्यांत आली होती. या परिषदेंत 'रेडिओ कॉर्पोरेशन ऑफ अमेरिका' या संस्थेचा प्रेसिडेंट डेव्हिड सार्नॉफ आणि 'वेस्टिंगहाऊस इलेक्ट्रिक कंपनी'चा प्रेसिडेंट ग्वायलिन ए. प्राईस या दोघांनीं हाच एक विचार प्रामुख्यानें मांडला. या देशाच्या इतिहासांत प्रथमच अमेरिकन नीग्रोंस उत्कर्षाची अमर्याद संधि उपलब्ध होत आहे. स्वतंत्र लोकशाही समाज रचनेंत गुलामगिरींतून काल मुक्त झालेल्या नीग्रोंस योग्य तें मानाचें व प्रतिष्ठेचें स्थान प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाहीं.

उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत नीग्रोंचा जो उत्कर्ष झालेला दिसतो, त्याचीं कारणें अनेक आहेत. (१) नीग्रोंनीं प्रामाणिक कष्ट केले व स्वतःच्या आणि एकमेकांच्या प्रगतीस हातभार लावला. (२) पक्षपातामुळें अमेरिकन अर्थ व्यवहारावर जो ताण पडतो, त्याची यथार्थ जाणीव अर्थवेत्त्यांस झाली. उपराष्ट्राध्यक्ष निक्सन यांच्या मतानें अमेरिकेस या पक्षपाताची किंमत सालिना ३००००००० डॉलर्स द्यावी लागली. (३) नीग्रो माणसाचें शिक्षण व कौशल्य वाढल्यामुळें कामांत, मालकींत व भांडवलांत वाढ झाली. परिणामीं नीग्रोंतील खरेदीशक्ति त्या प्रमाणांत वाढली. (४) अमेरिकन नीग्रोची खरेदीशक्ति एकदम अमर्याद वाढल्यामुळें त्याच्या मागणीचा पुरवठा करण्यासाठीं तथाकथित 'गोरे उद्योग' स्पर्धेच्या रंगणांत उतरले. (५) सरकारशीं औद्योगिक संबंध ठेवूं इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस वा संस्थेस निःपक्षपात वर्तनाची हमी द्यावी लागते. त्यामुळें नीग्रोस सरकारी कामांत योग्य तो वांटा मिळाला. सरकारी धोरणास अनुसरून अनेक गोऱ्या उद्योगपतींनीं आपआपल्या व्यवसायांत आपण होऊन स्वेच्छेनें निपःक्षपात धोरण अंमलांत आणलें. परिणामीं नीग्रोस अधिक काम मिळालें. आणि त्याची पत वाढली. (६) सर्वांत अधिक महत्त्वाचें कारण हें कीं स्वतंत्र, स्पर्धाशील समाजरचनेंत नीग्रोंच्या उत्कर्षास योग्य तो वाव मिळाला ही गोष्ट अगदीं

खरी कीं संयुक्त राज्यांत अजूनपर्यंत संपूर्ण समतेचें राज्य प्रस्थापित झालें नाहीं. समतेच्या स्थापनेसाठीं यापुढें अविरत कष्ट करावे लागतील. पण आजवर साधलेल्या उत्कर्षानें व मिळविलेल्या यशानें नीग्रोंचा उत्साह प्रत्यहीं वाढत आहे. आणि अजूनपर्यंत ध्येय साध्य झालें नसलें, तरी त्याची योग्य ती जाणीव आज प्रत्येकाच्या मनांत उदित झालेली आहे. आज नीग्रोस जी नवी अर्थसत्ता प्राप्त झाली आहे, तिचे राजकीय, सामाजिक व शैक्षणिक परिणाम दूरगामी होतील, यांत शंकाच नाहीं. पूर्वग्रह व पक्षपात समूळ नष्ट करण्यासाठीं कायद्याचें, शिक्षणाचें व धर्माचें अनेक परींनीं साहाय्य होईल, हें तर खरेंच; पण त्याचबरोबर नीग्रोस नव्यानें प्राप्त झालेली अर्थसत्ता समतेचें ध्येय साकार करण्यास उपकारक ठरेल, यांत संदेह नाहीं.

आर्थिक उत्कर्षाच्या नव्या क्षेत्रांचीं क्षितिजें आज प्रथमच डोळ्यांस दिसूं लागलीं आहेत. नवयुगाच्या उंबरठ्यावर आज हा देश उभा आहे. शुभ भवितव्याचीं प्रसादचिन्हें आज सर्वत्र दिसत आहेत. वॉल स्ट्रीटवरील एक बडी अर्थसंस्था नीग्रो-भांडवलाच्या खास तज्ज्ञाची खास नेमणूक करीत आहे. विमान वाहतुकीच्या उद्योगांत गुंतलेल्या दोन अग्रेसर कंपन्या एअर लाइन होस्टेस्च्या कामासाठीं नीग्रो मुलींच्या मुलाखती शांतपणें घेत आहेत. या देशांतील चार धनाढ्य डिपार्टमेंट स्टोअर्स फॅशन शोजमधून नीग्रो मॉडेल्सचें प्रदर्शन थाटामाटानें मांडीत आहेत. टेक्सास राज्यांतील डगलसमधील मिसेस पर्ल अँडरसन नामक एक नीग्रो विधवा अडचणींत सांपडलेल्या दरिद्री गरजू नीग्रो मेक्सिकन आणि गोऱ्या कुटुंबांस मदत करण्यासाठीं म्हणून ३२५००० डॉलर्सचें दानपत्र लिहून देत आहे. या सर्व घटना आशादायक आहेत. आर्थिक पक्षपाताच्या सर्वनाशाची ग्वाही देणाऱ्या अशाच या सर्व घटना आहेत. ध्येयभूत भवितव्य आकारास आणण्याच्या कामीं उपकारक ठरतील, अशा या भविष्यसूचक घटनांचें मनःपूर्वक स्वागत करावयास हवें.

जे. ऑस्कर ली

# धर्मानें आश्वासिलेला भ्रातृभाव

गेल्या तीस वर्षांपूर्वीचा इतिहास पाहिला असतां असें आढळून येईल कीं, या देशांतील धर्माचारांत देखील वांशिक पक्षपात प्रबळ होता. त्या पक्षपाताच्या चौकटींत राहून अधिकांत अधिक न्याय कसा देतां येईल, याचाच विचार प्रामुख्यानें येथील धर्मसंस्था करीत असत. परिणामीं अमेरिकेंतील सार्वजनिक जीवनांत सर्वाधिक पक्षपात वांशिक संबंधांत झालेला दिसून येतो. वस्तुस्थिति अशी आहे कीं सरकार, शिक्षण, उद्योग आणि इतर कामधंदे या सर्वांच्या यंत्रणेंत पुरोगामी शक्ति आधींच कामास लागल्या होत्या. आणि कालांतरानें आपआपल्या क्षेत्रांतील पक्षपात कमी करण्याच्या कामीं मनापासून झटत होत्या व इतर क्षेत्रांतील पक्षापाताचें प्राबल्य कमी कसें करतां येईल, त्यासंबंधीं विचार करीत होत्या. समाजजीवनाच्या इतर सर्व आघाड्यांवर ज्यावेळीं पक्षपातास विरोधी अशा सर्व शक्ति पणास लावून झुंजत होत्या, त्यावेळीं येथील धर्मसंस्था या ज्वलंत प्रश्नाच्या संबंधांत सर्वस्वीं उदासीन होत्या हा इतिहास आहे.

१९३० सालापासून नंतरच्या काळांत धर्मसंस्था जागरूक झाल्या, असें दिसून येतें. येशू ख्रिस्तास अनुसरणाऱ्या ख्रिश्चन धर्माचे नैतिक आदर्श समतेच्या तत्त्वास भजणारे आहेत. ख्रिश्चन तत्त्वज्ञानाच्या प्रकाशांत पक्षपाताच्या काळोखी शक्तीस स्थान नाहीं. समता हवी असेल, तर पक्षपात मोडून काढावयास हवा, हें खऱ्या धर्मनिष्ठांस कळून चुकलें. आणि चर्चमधून पक्षपाताचा प्रभाव नाहींसा करण्यासाठीं पुरोगामी शक्ति बद्धपरिकर झाल्या व पक्षपाताचा निःपात करण्याच्या इच्छेनें प्रेरित होऊन कामास लागल्या.

हें सर्व खरें. पण त्यामुळें चर्चमधून पक्षपात नाहींसा झाला, हें मात्र खरें नाहीं. चर्चमध्यें किंवा इतर धर्मसंस्थांच्या कारभारांत अजूनसुद्धां पक्षपाताचें प्राबल्य आहे. गेल्या तीस वर्षांच्या काळांत आशादायक बदल झालेला दिसतो, तो एवढाच कीं निःपक्षपातास अनुकूल असें वातावरण चर्चच्या आवारांत थोडेंबहुत तयार झालेलें दिसावयास लागलें आहे. येशू ख्रिस्ताच्या शिकवणुकीशीं पक्षपात विसंगत आहे, ख्रिश्चन धर्माच्या व नीतीच्या तत्त्वांची श्रद्धा समतेस अनुकूल व पक्षपातास प्रतिकूल आहे, हें ज्या विचारवंतांच्या ध्यानीं आलें, त्यानीं एकवटून धार्मिक क्षेत्रांतील पक्षपाताचें उच्चाटन करण्यासाठीं कंबर कसली.

कांहीं थोड्या दिवसांपूर्वी ‘ सेंट जॉन दि डिव्हाइन कॅथीड्रल’चा डीन जेम्स पाईक यानें टेनेसीमधील सेवानी विद्यापीठाच्या नव वर्षाच्या उद्‌घाटन प्रसंगीं भाषण करण्यास स्पष्ट नकार दिला. नकाराचें कारण त्यानें स्पष्ट शब्दांत असें दिलें, कीं विद्यापीठांत नीग्रो विद्यार्थ्यांस मज्जाव आहे. परिणामीं विद्यापीठाच्या कांहीं प्राध्यापकांनीं धर्मगुरूच्या आदेशास अनुसरून आपल्या कामाचे राजिमामे सादर केले. ही घटना विद्यापीठास मार्गदर्शक ठरली व तदनंतरच्या वर्षारंभीं नीग्रो विद्यार्थ्यांस विद्यापीठाच्या परिसरांत प्रवेश मिळाला. लुईसिआना येथील “ सेंट सेसिलिया कॅथॉलिक मिशन’च्या चर्चमध्यें ‘ मास ’ समारंभासाठीं आर्चबिशप जोसेफ एफ्. समेल यानें एका तरुण नीग्रो प्रीस्टला पाठविलें. तेव्हां तेथील चर्चच्या सभासदांनीं आर्चबिशपच्या वर्तनाचा स्पष्ट शब्दांत धिक्कार केला. आणि नीग्रो पाद्रयाकडून धर्मोपदेश ऐकण्याची आपली मुळींच इच्छा नाहीं असें निक्षून कळविलें. आर्चबिशपनें तात्काळ त्या चर्चमधील धार्मिक समारंभ रद्द केला, आणि चर्चच्या सभासदांस उलट निक्षून सांगून पाठविलें कीं त्यांचेंच वर्तन ख्रिश्चन धर्मनिष्ठेस विरोधी आहे, प्रत्येक ख्रिश्चन प्रीस्ट हा परमेश्वराचा पृथ्वीतलावरील प्रतिनिधि आहे, मग त्याचा वंश, वर्ण वा देश कोणताहि असो. सर्व कॅथॉलिक धर्मनिष्ठांनीं वंशवर्ण देशनिरपेक्ष प्रत्येक प्रीस्टला योग्य तो सन्मान दाखवावयास हवा, आणि त्याचा उपदेश प्रमाण मानावयास हवा. अमेरिकेंतील शेकडों कॅथॉलिक व प्रास्टेस्टंट चर्चेसच्या सभासदांत सर्व वंशांच्या, वर्णांच्या व देशांच्या लोकांस मुक्तद्वार प्रवेश असल्याचें आढळून येतें.

दक्षिणेंतील राज्यांत सुद्धां धर्मसंस्थांतून पक्षपातास थारा मिळूं नये, यासाठीं यत्न होत आहेत, असें दिसतें. वांशिक संबंधाच्या संदर्भांत पुरोगामी प्रवृत्तीचा आदर करण्याची भूमिका स्वीकारली, म्हणून तेथील सहा धर्मोपदेशकांस राजीनामे द्यावे लागले. त्यांच्यापैकीं कांहींजणांकडून राजीनाम्यांची मागणी करण्यांत आली, आणि कांहींजणांनीं स्वेच्छेनें राजीनामे दिले. जेव्हां वांशिक संबंधांतील न्यायवृत्तीचा आदर करण्यासाठीं धर्मोपदेशक त्यागबुद्धीनें बळी होण्यास उत्सुक असलेले दिसतात, तेव्हां तेथील चर्चमध्यें नवयुगाची प्रभात उजाडत आहे, असें समजण्यास प्रत्यवाय नाहीं.

टेक्सास राज्यांत हौस्टन येथें 'एपिस्कोपल चर्च'ची राष्ट्रीय परिषद बोलावण्यांत आली होती. पण तेथें नीग्रो प्रतिनिधींस समान वागणूक दिली जाईलच, अशी हमी मिळेना. तेव्हां हौस्टनमधील परिषद होनोलुलू येथें घेण्यांत आली. अमेरिकेंतील 'प्रेस्बिटेरियन चर्चने पुरातन काळापासून असें धोरण ठेविलें आहे कीं जेथें नीग्रो प्रतिनिधींस समान वागणूक मिळण्याचा संभव नाहीं, अशा कोणत्याहि शहरांत वार्षिक अधिवेशन घेण्यांत येऊं नये. 'कलर्ड मेथॉडिस्ट इपिस्कोपल चर्च' ही धर्मसंस्था आपलें नांव बदलून 'ख्रिश्चन मेथॉडिस्ट एपिस्कोपल चर्च' असें नवें नांव घेण्याच्या विचारांत आहे. त्याचें कारण एवढेंच कीं सभासदांस वंशवर्णनिरपेक्ष मुक्तद्वार असावें. १९५४ सालीं 'साऊथ प्रेस्बिटेरियन संस्थेनें आपल्या अधिकार कक्षेंतील ४००० स्थानिक चर्चेसनीं नीग्रो सभासदांस स्वीकृत करण्यास उत्तेजन द्यावें, असा आदेश दिला आणि ओकलाहोमा राज्यांतील पूर्वींपासून विभक्त असलेल्या काळ्यागोऱ्या प्रेस्बिटेरियन धर्मसंस्थांनीं १९५५ सालीं संयुक्त होण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणें विभक्त संस्था आज संयुक्त झाल्या आहेत. आतां त्यांच्या सभासदांस वंशनिरपेक्ष वागणूक मिळते असेंच केवळ नाहीं, तर या संयुक्त संस्थेचें नेतृत्व सुद्धां वंशनिरपेक्ष आहे.

आजवर धर्मसंस्थांतून पक्षपातास उत्तेजन दिलें जात असे, ही वस्तुस्थिति आहे. वांशिक पक्षपातास कडाडून विरोध करणाऱ्या शक्ति धर्मक्षेत्रांत यापूर्वीं प्रभावी होऊं शकल्या नाहींत. देवाच्या लेखीं माणसांमाणसांत काळे-गोरे असा भेद करणें पाप आहे, हें सर्वांसच उमजलें नाहीं. असें असलें

तरीसुद्धां या धर्मसंस्थांतच कांहीं ध्येयवादी व्यक्ति आणि त्यांच्या ध्येयवादांतून प्रेरित झालेल्या जोरदार चळवळी निःपक्षपाताच्या आघाडीवर त्यागबुद्धीनें अखंड लढा देतच होत्या. त्यांना अल्पसंख्यांचे माणुसकीचे हक्क मंजूर होते. गुलामगिरीविरुद्ध जेव्हां त्यांनीं मोहीम सुरू केली, तेव्हां अशा कांहीं ध्येयवादी व्यक्ति म्हणजे जणुं देशाची सदस्‌द्विवेक बुद्धीच झाल्या. त्यांच्या लढ्याचा जोर जसा वाढत चालला, तशा गुलामगिरीच्या शृंखला खिळखिळ्या झाल्या, आणि अखेरीस त्या निखळून तुटून पडल्या. गुलाम मुक्त झाल्यावर त्यांच्यासाठीं या उदारहृदय स्त्रीपुरुषांनीं शाळाकॉलेजें काढलीं व चालविलीं. त्यांच्यासाठीं हॉस्पिटल्स आणि चर्चेस बांधलीं. नीग्रोंच्या मुक्ततेसाठीं व उन्नतीसाठीं अहर्निश, सतत झटणाऱ्या या थोर स्त्रीपुरुषांविषयीं अनेक गैरसमज पसरविण्यांत आले. त्यांना असह्य हालअपेष्टांस सतत तोंड द्यावें लागलें. आणि त्यांचा छळ कांहीं कमी झाला नाहीं. सामाजिक बहिष्कार त्यांच्या ललाटीं बहुतेक कायमचाच लिहिलेला होता.

अमेरिकेच्या संयुक्त राज्यांतील सुप्रसिद्ध महाविद्यालयांची कोणी यादी करण्याचें मनांत आणलें, तर त्या यादींत स्पेलमन, फिस्क, हॅम्टन, मॉर्गन, व्हर्जिनिया, युनियन, लिंकन, मोरहाऊस, टस्कगी, यांपैकीं सर्व नाहीं तरी कित्येक महाविद्यालयांचा समावेश करावा लागेल. उपर्युक्त सर्व महाविद्यालयें –आणि त्यांच्यासारखीं आणखी निदा नवीस तरी आहेत,–हीं सर्व गोऱ्या अमेरिकन लोकांनीं स्थापिलीं, बांधलीं व चालविलीं. त्यांच्या मनांतील सदसद्विवेक सतत जागा होता. हे सर्व लोक धर्मनिष्ठेनें भारलेले होते; आणि खऱ्या धर्ममतांचें दैनंदिन व्यवहारांत अनुकरण व आचरण करण्याची त्यांची मनीषा होती. ज्या समाजांत पक्षपाताचें वर्चस्व होतें, अशा समाजांत राहून नीग्रोंस माणुसकीचे हक्क प्राप्त करून देण्यासाठीं शिक्षणाची समान संधि त्यांना उपलब्ध करून देणें आवश्यक आहे, अशी या लोकांची श्रद्धा होती. त्यांच्याच यत्नांमुळें चर्चेसच्या कर्मठ वातावरणांत थोडीबहुत सुधारणा होऊं शकली. निदानपक्षीं नीग्रो माणूस आहे व त्याला शिक्षणाची संधि नाकारणें देवाच्या घरीं गुन्हा ठरेल, अशी घोषणा त्यांच्याच प्रेरणेमुळें चर्चेसना करावी लागली.

अनुक्रम क्रमांक वि: नोंः दिः

अगदीं परवांपर्यंत अशी स्थिति होती कीं जे नीग्रो पदवीधर होत, त्यांच्यापैकीं बहुसंख्यांचें शिक्षण मुख्यत्वेंकरून खास त्यांच्यासाठींच चालविण्यांत येणाऱ्या ‘ काळ्या शिक्षणसंस्था’तून झालेलें असे. अलीकडे मात्र, पूर्वीं ज्या शिक्षणसंस्था कटाक्षानें केवळ गोऱ्यांसच शिक्षण देत, त्यांचीं द्वारें नीग्रोंसाठीं खुलीं झालीं आहेत आणि काळ्यागोऱ्यांच्या एकत्र शिक्षणासाठीं स्थानिक व राज्य सरकारें अधिकाधिक पैसा खर्च करूं लागलीं आहेत. त्यामुळें आतां या कित्येक ‘ काळ्या ’ शाळाकॉलेजांतून गोऱ्या विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यांत येतो; आणि कांहीं नीग्रो शिक्षणसंस्थांतून परदेशांतील विद्यार्थ्यांस प्रवेश मिळविणें शक्य झालें आहे. वांशिक संबंध सुधारण्याच्या इच्छेनें आपण होऊन स्वेच्छेनें लोकांचें नेतृत्व करण्याची तयारी चर्चेसनीं कधींच दाखविली नाहीं. पण चर्चच्या शिकवणुकीचे संस्कार ज्यांच्या मनांवर उमटलेले होते, अशा कर्मठ धर्मनिष्ठांनीं नेतृत्वाची धुरा उचलली, हें निर्विवाद सत्य आहे. अमेरिकन जीवनाच्या व विचाराच्या प्रत्येक क्षेत्रांत धर्मनिष्ठ सुधारणावादी लोकांचें नेतृत्व करीत असलेले आढळतात. ‘ नॅशनल ॲसोसिएशन फॉर दि ॲडव्हान्समेंट ऑफ कलर्ड पीपल ’ या जगप्रसिद्ध संस्थेच्या कार्यास ज्यांनीं चालना दिली व मार्गदर्शन केलें, त्यांच्यापैकीं दोन महान् नेते चर्चनेंच दिलेले होते. ‘ कम्युनिटी चर्च ’चा रेव्हरंड जॉन हेन्स होम्स व ‘ फ्री सिनॅगॉग’चा रबी स्टीफेन एस्. वाइज हे ते दोन नेते होत. अमेरिकेंतील वांशिक संबंध सुधारण्यासाठीं राजकारण, शिक्षण, उद्योग, कामगार चळवळ इत्यादि विविध आघाडयांवर जीं माणसें नेतृत्व करीत आहेत, त्यांच्यापैकीं कित्येक चर्चचे पदाधिकारी आणि अनुयायी आहेत.

१९२१ सालीं पूर्वीच्या ‘ फेडरल कौन्सिल ऑफ चर्चेस ’नें—आतां ही संस्था ‘ नॅशनल कौन्सिल ऑफ चर्चेस ’मध्यें समाविष्ट झालेली आहे— ‘ कमिशन ऑन नीग्रो चर्चस अँड रेस रिलेशन्स ’ नेमिलें होतें. हें कमिशन नेमण्यामागें उद्देश असा होता कीं सर्वतोपरीच्या वांशिक पक्षपाताविरुद्ध क्रियाशील लढे उभारण्यास अनुकूल असें वातावरण चर्चेसच्या परिसरांत निर्माण करावें. तोंपर्यंत परिस्थिति अशी होती कीं चर्चेस केवळ ढोबळ पक्षपाताचा निषेध करून तेथेंच थांबत. त्या ऐवजीं केवळ निषेध न नोंदवितां

ती निषेधाची भावना साक्षात् कृतींत प्रगट झालेली दिसावी आणि उद्दिष्ट-साधनासाठीं काय करतां येईल, त्याचा विचार करावा, या हेतूनें हें कमिशन नेमण्यांत आलें होतें. तदनंतर १९४६ सालीं कौन्सिलनें अधिकृत ठराव करून असें प्रतिपादन केलें कीं – वांशिक संबंधांतील पक्षपात सर्वथैव अनावश्यक आणि अनिष्ट आहे. माणसांमाणसांत प्रेम व बंधुभाव वाढीस लावूं पाहणाऱ्या धर्ममतांस सर्वस्वीं विरोधी असा हा पक्षपात आहे. १९५२ सालीं यापेक्षांसुद्धां अधिक कणखर अशी लढाऊ भूमिका घेण्यांत आली. चर्चमधील व समाजांतील पक्षपात समूळ नष्ट व्हावा आणि निःपक्षपातास अनुकूल असें वातावरण सर्वत्र निर्माण करावें, या हेतूनें प्रत्यक्षांत काय वर्तन करतां येईल, त्याविषयीं विचार करण्यांत आला आणि विचारांतीं 'नॅशनल कौन्सिल'नें आपल्या सर्व घटक चर्चेसना जो आदेश दिला, त्यांतील महत्त्वाचा भाग पुढील प्रमाणें :

अमेरिकेच्या संयुक्त राज्यांतील 'दि नॅशनल कौन्सिल ऑफ दि चर्चेस ऑफ ख्राइस्ट' ही संस्था आपल्या घटनेंत आणि कार्यपद्धतींत कोणत्याहि, कसल्याहि पक्षपातास यापुढें थारा देणार नाहीं. या तत्त्वास अनुसरून ही संस्था आपल्या सर्व घटक सभासद चर्चेसना असा आदेश देत आहे कीं वंशवर्णराष्ट्र संबंधांतील पक्षपात अनावश्यक आणि अनिष्ट आहे. माणसा-माणसांतील प्रेम व बंधुभाव वाढीस लावूं पाहणाऱ्या धर्ममतांस सर्वस्वीं विरोधी असा हा पक्षपात असल्यामुळें सर्व घटक चर्चेसनीं अशा पक्षपाताचा निषेध व त्याग करावा, अशी या संस्थेची तळमळीची शिफारस आहे.

येशु ख्रिस्ताच्या उपदेशास विरोधी असा हा पक्षपात धर्माचारांतून नष्ट करणें हें सर्व ख्रिश्चन चर्चेसचें ध्येय आहे. पण तें ध्येय साध्य करण्यासाठीं सर्वस्वीं अनुकूल असें वातावरण या देशांतील ऐतिहासिक व सामाजिक पूर्व-गृहामुळें सर्व चर्चेसमध्यें उपलब्ध होऊं शकत नाहीं. आणि ध्येयसाधने प्रीत्यर्थ होणाऱ्या यत्नांत तरतमभाव निर्माण होतो, तसें होऊं नये. निःपक्षपात चर्च हें आपलें ध्येय आहे. प्राचीन ख्रिश्चन समाजाची निष्ठा याच एका ध्येयास वाहिलेली होती. 'चर्च ऑफ ख्राईस्टच्या' न्यू टेस्टामेंटमध्यें हेंच निःपक्षपाताचें तत्त्व अनुस्यूत आहे. आणि म्हणून कौन्सिलची सर्व घटक

चचसना अशी आग्रहाची विनंति आहे, कीं निःपक्षपात चर्चच्या प्रतिष्ठापने-साठीं त्यांनीं सतत व निष्ठेनें काम करीत राहावें.

एतद्विषयक आपल्या निष्ठेची प्रचीति म्हणून 'नॅशनल कौन्सिल ऑफ चर्चे'स अशी घोषणा करीत आहे कीं यापुढें निःपक्षपात चर्चच्या व निःपक्ष-पात समाजाच्या निर्मितीसाठीं ती संस्था सर्व शक्तींनिशीं यत्न करीत राहील.

'नॅशनल कौन्सिल ऑफ चर्चे'स या धुरंधर धर्मसंस्थेनें केलेल्या मार्ग-दर्शनास अनुसरून इतर धर्मपंथांच्या तत्सम संस्थांनीं पक्षपाताच्या संदर्भांत अशाच आशयाचीं स्पष्ट निवेदनें मागाहून प्रसिद्ध केलीं. 'नॅशनल कौन्सिल ऑफ चर्चेस' चें उपर्युक्त निःसंदिग्ध निवेदन तदितर बहुतेक सर्व धर्मपंथांच्या राष्ट्रीय संस्थांनीं मान्य केलेलें दिसतें. वांशिक संबंधांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं त्यांनीं पण केवळ उक्तीवर न थांबतां कृतीवर अधिक भर दिला. आणि घटनेनें प्रतिपादिलेले व कायद्यानें गृहीत धरलेले प्रत्येक नाग-रिकाचे मूलभूत हक्क मान्य करण्यास मान्यता दर्शविली. प्रस्तुत संबंधांतील कांही थोडीं उदाहरणें उद्बोधक ठरतील. १९४२ सालीं बोलाविलेल्या राष्ट्रीय अधिवेशनांत 'इव्हँजेलिकल अँड रिफॉर्म्ड चर्च'नें खालील ठराव संमत केलाः—

देवाच्या लेखीं सर्व माणसें सारखीं आहेत, हें तत्त्व आम्हीं मान्य करतों. आमच्या सामाजिक जीवनांत व वर्तनांत हें तत्त्व पक्केपणीं रुजलेलें दिसावयास हवें, एतदर्थ आम्ही खालील कार्यास वाहून घेत आहोंत. (१) राष्ट्रधर्मवंशनिरपेक्ष अशी सामाजिक पुनर्रचना : अशा समाजरचनेंत त्येत राष्ट्राच्या, धर्माच्या व वंशाच्या प्रत्येक नागरिकास आत्मविकासाची समान संधि उपलब्ध होईल. आणि तेणेंकरून आपलें जन्मजात वैशिष्टय तो प्रगट करूं शकेल. (२) पाशवी आणि बेकायदा दगडमारीस प्रतिबंध : 'लिंचिंग'ची क्रूर चाल नष्ट करण्यासाठीं लोकांच्या सदसद्विवेक वुद्धीस आवाहन करावयास हवें. शिक्षणाचा प्रसार करावयास हवा. आणि मध्यवर्ती सरकारनें कायदा करून ही अमानुष चाल रद्द करावयास हवी. (३) सामाजिक बहिष्कार : विभक्त राहणी, आर्थिक पक्षपात, नागरिक हक्कांस

नकार, या सर्व अनिष्टांचें निर्दालन करावयास हवें. राष्ट्रधर्मवंशनिरपेक्ष प्रत्येक नागरिकास मतदानाचा हक्क प्राप्त व्हावयास हवा.

'इव्हँजेलिकल अँड रिफॉर्म्ड चर्च' या धर्मसंस्थेनें उपर्युक्त आदेश दिला; त्याच वेळीं दिलेल्या आदेशास बळकटी आणण्यासाठीं एका रेस रिलेशन्स सेक्रेटरीच्या खास नेमणुकीची घोषणा करण्यांत आली. या सेक्रेटरीनें सर्व धर्म व धर्मपंथ समान होत, आणि सर्व धर्मांच्या अनुयायांस परस्परांविषयीं आदरभाव वाटावा, ही भूमिका घेऊन सर्व ख्रिश्चन चर्चेस-मध्यें व लोकशाही समाजरचनेंत सर्व लोकांस वंशवर्णनिरपेक्ष समान स्थान व न्याय मिळवून देण्यासाठीं उक्तीनें व कृतीनें अप्रतिहत कार्य करावें असें ठरविण्यांत आलें. अशाच आशयाच्या आदेशाची व तदनुसार कृतीची घोषणा करणारे ठराव – त्यांजपैकीं कांहीं अधिक स्पष्ट कृतीची मागणी करणारे व दूरगामी परिणाम साधणारे – 'मेथॉडिस्ट, प्रेस्बिटेरियन, कॉंग्रिगेशनल ख्रिश्चन, डिसायपल, एपिस्कोपेलियन, बॅप्टिस्ट, ब्रेदरन' इत्यादि धर्मपंथांनीं वारंवार केले आहेत.

अमेरिकेंतील संयुक्त राज्यांत नीग्रो ज्यू संख्येनें फार थोडे आहेत. त्यांना फलाशी असें संबोधितात. वांशिक संबंध सुधारण्याच्या आघाडीवर ज्यू धर्म-गुरु, धर्मसंस्था, नेते व त्यांचे अनुयायी सतत झटून लढा देत आहेत. सर्व अल्पसंख्यांस बहुसंख्यांच्या बरोबरीनें सन्मान व न्याय मिळावा, यासाठीं त्यांचे यत्न सतत चालू असतात. नीग्रोंच्या उत्कर्षासाठीं प्रस्थापित करण्यांत आलेल्या संस्थांना धनाढ्य ज्यू लोकांनीं जेवढी आर्थिक मदत आजवर दिलेली आहे, त्या प्रमाणांत इतर कोणत्याहि धर्मानुयायांनीं दिलेली नाहीं. याच न्यायानें ज्यू लोकांनीं जेवढ्या प्रमाणांत आपला वेळ, कर्तृत्व व सेवा नीग्रोंच्या कारणीं खर्ची घातली आहे, तेवढ्या प्रमाणांत अन्य कोणा धर्मानुयांनीं खर्ची घातलेली दिसत नाहीं. नीग्रोंच्या उत्कर्षासाठीं तनमनधनानें सतत झटणारे ज्यू कार्यकर्ते–त्यांच्या संख्येचा विचार करतां सर्वाधिक आहेत. 'अमेरिकन ज्यूइश कॉंग्रेस; अमेरिकन ज्यूईश कमिटी, अँटि–डिफेमेशन लीग ऑफ बनाई बारिथ' आणि अमेरिकन ज्यूईश इयर बुकांत नोंदलेल्या ३०० राष्ट्रीय व स्थानिक ज्यू संस्थांपैकीं इतर कित्येक संस्था ज्याप्रमाणें स्वतःच्या त्याचप्रमाणें

नीग्रोंच्या हक्कांसाठीं सतत झटत आहेत. सेंट्रल कॉन्फरन्स ऑफ अमेरिकन रबीज् ( रिफॉर्म्ड ) या ज्यू धर्मगुरूंच्या मध्यवर्ती राष्ट्रीय धर्मसंस्थेनें 'सर्व लोकांस समान संधि' या न्याय्य तत्त्वास सर्व अमेरिकन लोकांनीं मान्यता द्यावी म्हणून आवाहन केलें. त्याच वेळीं 'सिनेगॉग कौन्सिल ऑफ अमेरिका' आणि 'युनियन ऑफ अमेरिकन हीब्रू कॉंग्रिगेशन्स'नें आंतरधर्म आदेशास अनुसरून 'अल्पसंख्यांची स्थिति सुधारण्याबाबत देशांत जो वाढता उत्साह दिसून येत आहे' त्याचें मनःपूर्वक स्वागत केलें. १९४५ सालीं 'अमेरिका' नामक एका वजनदार कॅथोलिक प्रकाशनचा संपादक फादर जॉन लाफार्ज यानें लिहिलें–'राज्यानें लादलेला असो वा रूढीनें आदरलेला असो, कोणत्याहि क्षेत्रांतील वांशिक पक्षपाताच्या तत्त्वास वा आचरणास चर्चचा कडवा विरोध आहे.' पण १९४५ सालापूर्वींपासून या देशांतील कॅथॉलिक जनता वांशिक संबंधाच्या संदर्भांत पुरोगामी मताचा पुरस्कार आणि रोमन कॅथॉलिक चर्च व तत्संबद्ध संस्था पक्षपाताचा विरोध करीत आली आहे : 'कॅथॉलिक इंटररेशियल कौन्सिल्स' कित्येक शहरांतून आपल्या अधिकारकक्षेंतील सभासदांमध्यें नित्य निःपक्षपाताचा प्रचार करीत आहेत. 'इंटररेशियल रिव्ह्यू' नामक आपल्या मासिक मुखपत्रांत राष्ट्रीय पातळीवरून सर्व क्षेत्रांतील पक्षपाताचा निषेध करीत असतां 'कॅथॉलिक इंटररेशियल कौन्सिल्स' देशभर आंतरवंश संस्थांच्या निर्मितीस प्रोत्साहन देत असतात. कॅथॉलिक महाविद्यालयांच्या पदवीधरांमध्यें वांशिक समानतेचा प्रचार करणारें 'अॅलम्नि रेस रिलेशन्स कौन्सिल,' आंतरवंश संस्थांच्या स्थापनेसाठीं व उत्कर्षासाठीं झटणारें 'नॅशनल फेडरेशन ऑफ कॅथॉलिक कॉलेज स्टुडंटस्', कॅथॉलिक नॅशनल वेल्फेअर कॉन्फरन्स, कॅथॉलिक इंटररेशिल कौन्सिल' आणि 'कॅथॉलिक कमिटी ऑफ दि साऊथ' या सर्व कॅथॉलिक धर्मसंस्थांनीं केवळ कॅथॉलिक लोकांतच नव्हे, तर इतरत्र देखील वांशिक संबंध सुधारण्यासाठीं अखंड यत्न केले आहेत.

सुप्रीम कोर्टानें सार्वजनिक शिक्षणसंस्थांतील वांशिक पक्षपात घटनेनुसार बेकायदा ठरविला, त्यापूर्वी एक वर्ष आधीं दक्षिण राज्यांतील रोमन कॅथॉलिक बिशप्सनीं एक संयुक्त पत्रक काढून रोमन कॅथॉलिक लोकांना

वंशभेदांतीत भ्रातृभावाचा आदेश दिला होता. त्या पत्रकांत त्यांनीं म्हटलें होतें, ' आम्हांला मनःपूर्वक अशी आशा वाटते कीं भविष्यकाळांत या दक्षिण भूमींतून वांशिक पक्षपाताच्या अरिष्टाचा संपूर्ण नायनाट होईल, आणि असा एक दिवस उजाडेल कीं जेव्हां ख्रिश्चन भ्रातृभावाचें ध्येय साकार झालेलें दिसेल.'

रोमन कॅथॉलिक चर्चच्या अधिकारक्षेत्रांतील खालील विभागांतून शालेय संबंधांत निःपक्षपात भूमिका घेतली गेल्याचें निदर्शनास येईल. वॉशिंग्टन डी. सी. मधील सर्व शाळा १९४९ पासून, आर्कन्सास आणि डेलावेअरमधील सर्व शाळा सुप्रीम कोर्टाचा निवाडा जाहीर होण्यापूर्वीपासून, मिसुरींतील सर्व शाळा, नॉर्थ कॅरोलिनामधील बहुतेक सर्व पूर्व प्राथमिक आणि कांहीं प्राथमिक शाळा, टेक्सासमधील सॅन अँटोनिओ येथील सर्व शाळा-१९५४ सालीं वसंत ऋतूंत आर्चबिशपनें दिलेल्या आदेशावरून-आणि व्हर्जिनिया व पश्चिम व्हर्जिनियाच्या कांहीं विभागांतील शाळा कित्येक वर्षांपूर्वीपासून, उपर्युक्त विभागांतील शाळांतून आज वंशनिरपेक्ष शिक्षण दिलें जात आहे. उत्तर राज्यांतील कॅथॉलिक शाळांतून कित्येक वर्षांपूर्वीपासून नीग्रो विद्यार्थ्यांस मुक्तद्वार प्रवेश दिला जात आहे.

देशांतील बहुतेक सर्व चर्चेसच्या कौन्सिलसमधून आंतरवंश संबंधास सर्वस्वीं अनुकूल असें वातावरण निर्माण झालेलें आज दिसत आहे. जेथें म्हणून स्थानिक चर्चनियंत्रक अधिकारी युगधर्मास अनुकूल अशी भूमिका घेण्यास प्रतिकूल होते, तेथें आंतरवंशसंबंध दृढतर करण्याच्या उद्देशानें कित्येक चर्चेसच्या ख्रिश्चन अनुयायांनीं पुढाकार घेऊन वंशनिरपेक्ष धर्मसंस्थांची स्थापना केली आहे, असें आढळून येतें. ' यंग मेन्स अँड वुइमेन्स ख्रिश्चन अॅसोसिएशन्स' आपल्या धोरणांत व कार्यक्रमांत वंशनिरपेक्ष भूमिका बहुतकरून नेहमींच घेतात. पुरुषांपेक्षां स्त्रिया प्रस्तुत संबंधांत अधिक धैर्यानें व अधिक तत्परतेनें कामास लागतात असा नित्याचा अनुभव आहे. ' नॅशनल कौन्सिल ऑफ चर्चेसच्या ' घटक सभासदांस अधिकारी वर्गांत व कार्यक्रमांत अल्पसंख्यांस स्थान दिलें जातें. किंबहुना ज्या राज्यांत वांशिक पक्षपात अजूनपर्यंत कायद्यानें जारी आहे, अशा राज्यांत देखील राज्याच्या व

शहरांच्या कौन्सिल्समध्यें सुद्धां हेंच सर्व समावेशक उदार धोरण जारी आहे. निदान गेल्या दहा वर्षांपासून ' व्हर्जिनिया कौन्सिल ऑफ चर्चेस ' आणि ' नॉर्थ कॅरोलिना कौन्सिल ऑफ चर्चेस ' हेंच धोरण निग्रहानें अंमलांत आणीत आहेत. धार्मिक व्यासपीठांवरून काळेगोरे धर्मोपदेशक आज सर्वत्र प्रवचनें देत आहेत. पूर्वीच्या काळांत हा जो केवळ अपवाद होता, तोच आज नियम होऊन बसला आहे.

आपल्या ' इंटररेशियल कौन्सिल्स ' मधून कॅथॉलिक लोकांनीं वंशनिरपेक्ष धोरणाचा सतत पुरस्कार व अवलंब केला आहे. आणि इतर चर्चसंबद्ध संस्थांतून हेंच धोरण अंमलांत आणलें जावें, याविषयीं ते सतत यत्न करीत आहेत. १९५४ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत तीन नीग्रोंस सभासदत्व नाकारलें, म्हणून एका साहाय्यक बिशपनें ' क्लीव्हलँड नाइटस् ऑफ कोलंबस कौन्सिल'चा राजीनामा देण्याची तयारी दाखविली. त्याच वर्षी ऑक्टोबर महिन्यांत ' बॉईज टाऊन'च्या सुप्रसिद्ध संस्थापकाचा ज्येष्ठ बंधु मॉन्सिन्योर पॅट्रिक ए. फ्लनॅगन यानें ओमाहा येथील 'फादर फ्लनॅगन कौन्सिल ऑफ दि नाइटस् ऑफ कोलंबस ' या संस्थेच्या नांवांतून फादर फ्लनॅगनचें नांव काढून टाकावें, अशी मागणी केली. मागणीचें कारण—फादर फ्लनॅगनचें नांव सांगणाऱ्या या संस्थेनें तीन नीग्रो उमेदवारांस सभासदत्वाचा हक्क नाकारला.

अमेरिकेंतील सर्व राज्यांतील सार्वजनिक शिक्षणसंस्थांतून वांशिक पक्षपात रद्द करण्यासंबंधीं सुप्रीम कोर्टानें जो नामांकित निर्णय दिला, त्या निर्णयास बहुतेक सर्व चर्चसंबद्ध संस्थांनीं हार्दिक पाठिंबा दिला. जेव्हां दक्षिण राज्यांतील चर्चेसमधील प्रस्तुत निर्णयास विरोध करणाऱ्या कांहीं थोडया संस्थांनीं याबद्दल निषेध व्यक्त केला, आणि नंतरच्या वार्षिक सभेंत पूर्वप्रस्तावाचा फेरविचार करावा, अशी परिणामकारक मागणी केली, तेव्हां बहुतेक सर्व ठिकाणीं अधिक मोठ्या बहुमतानें पूर्वप्रस्ताव संमत करण्यांत आला. आणि कांहीं ठिकाणीं तर पूर्वप्रस्तावास संमति दर्शविणारी भाषा अधिक निग्रहाची व कडक योजण्यांत आली.

पक्षपाताच्या संबंधांतील चर्चसंबद्ध असा जो सर्वाधिक कठिण प्रश्न आहे, तो स्थानिक चर्चमध्यें उपस्थित होतो. पण तेथें सुद्धां वंशनिरपेक्ष संबंध दृढतर करण्यासाठीं झटून यत्न होत आहेत, असें आढळून येतें. विशेषेंकरून ज्या विभागांत अनेक वंशांचे ख्रिश्चन लोक एकत्र वस्ती करून राहत आहेत, अशा शहरांतून उदार धोरणाचा प्रभाव सर्वत्र दिसून येतो. प्रस्तुत संबंधांत आजवर चळवळ पुष्कळ झाली आहे, पण ती पुरेशी आहे, असें मुळींच नाहीं. ही चळवळ तत्परतेनें सर्वत्र पसरत नाहीं, हें पण कबूल करावयास हवें. पण चळवळ आहे व ती वाढत आहे, हें मात्र कबूल करावयास हवें. वस्तुस्थिति अशी आहे कीं एक रोमन कॅथॉलिक चर्चचा अपवाद वजा केला तर इतर ख्रिश्चन धर्मपंथांच्या चर्चेसना स्थानिक वा निकटवर्ति चर्चच्या अखत्यारांत ढवळाढवळ करतां येत नाहीं. फार फार झालें, तर कांहीं प्रमाणांत धार्मिक आदेशाचा वा कृतीचा कांहीं थोडाबहुत परिणाम होऊं शकतो. प्रॉटेस्टंट चर्चची घटना तर प्रत्येक स्थानिक चर्चला स्वायत्त मानते. त्यामुळें सर्व घटक सभासद संस्थांनीं वा सभासदांनीं मानलाच पाहिजे, असा आदेश प्रॉटेस्टंट चर्च देऊं शकत नाहीं.

जेव्हां जेव्हां स्थानिक चर्चसनीं नीग्रो सभासदांस मुक्तद्वार प्रवेश देण्याचे प्रस्ताव संमत केले, तेव्हां तेव्हां असें आढळून आलें कीं, फारच थोड्या गोऱ्या सभासदांनीं अशा प्रस्तावास विरोध दर्शविला किंवा त्या चर्चमधून निवृत्ति पत्करली. उलट डेट्रॉइटमधील 'सेंट अॅन्ड्र्यूज प्रेस्बिटेरियन चर्चनें' जेव्हां नीग्रो सभासदांस मुक्तद्वार प्रवेश दिला, तेव्हांपासून त्या चर्चचे सभासद, वजन व वर्गण्यांचे आंकडे फार मोठ्या प्रमाणांत वाढल्याचें दिसून येतें आणि असें हें कांहीं एकुलतें एक चर्च नाहीं. १९५० सालीं आल्फ्रेड क्रामरनें 'नॅशनल कौन्सिल ऑफ चर्चेस' च्या आदेशानुसार तीन धर्मपंथांच्या एकूण १३५९७ चर्चेसची पाहणी केली. त्या पाहणींत असें आढळून आलें कीं चर्चेसमधून नीग्रो सभासदांस प्रवेश दिल्यावर एकूण २३७००० गोऱ्या सभासदांपैकीं फक्त २६ सभासदांनीं आपआपल्या चर्चमध्यें जाण्याचें बंद केलें. त्याच पाहणीचा आणखी एक निष्कर्ष असा : ज्या चर्चेसची पाहणी केली, त्यांजपैकीं एकूण १३३१ चर्चेसमध्यें सर्व वंशांच्या सभासदांस मुक्तद्वार प्रवेश

आहे. अर्थातच पाहणीसंबद्ध एकूण चर्चसंख्येचा विचार करतां मुक्तद्वार चर्चेसची संख्या तशी फार मोठी नाहीं. कदाचित् ती क्षुल्लक भासली, तरी तिचें महत्त्व तसें फार मोठें आहे. कारण या मुक्तद्वार चर्चेसनीं निदान एक महत्त्वाची गोष्ट सिद्ध केली आहे, ती ही कीं चर्चमध्यें वंशनिरपेक्ष सभासदत्व, सहकार्य आणि उपस्थिति असूं शकते. उपर्युक्त पाहणीचा अहवाल १९५१ सालीं प्रसिद्ध झाला. तेव्हांपासून आजतागायतचा इतिहास असा आहे कीं, आणखी कित्येक चर्चेसमधून वंशनिरपेक्ष कार्यपद्धति जारी झाली आहे. ज्याप्रमाणें वंशसापेक्ष विभक्त वस्तीचा पूर्वसंकेत आजच्या व्यवहारांत रद्द झालेला दिसतो, त्याचप्रमाणें कालांतरानें वंशसापेक्ष विभक्त चर्चचा संकेत रद्द झाल्याशिवाय राहणार नाहीं. आज तरी निदान कांहीं पुरोगामी चर्चेसनीं असें दाखवून दिलें आहे, कीं वंशनिरपेक्ष सभासदत्व सर्वतोपरींनीं अधिक हितकारक ठरतें. युगधर्मास स्मरून यापुढें शक्यतर सर्व चर्चेसनीं स्वतःचीं व्यासपीठें धर्मोपदेकांस वंशनिरपेक्ष खुलीं करून द्यावयास हवींत. अजूनपर्यंत या दिशेनें फारसे यशस्वी यत्न झालेले दिसत नाहींत. पण भविष्यकाळांत हें ध्येय सुद्धां साध्य होईल, अशी आशा प्रस्तुत परिस्थितीनें निर्माण केली आहे, हें निर्विवाद होय.

चर्चमध्यें वंशनिरपेक्ष सर्वांस प्रवेश उपलब्ध होईल, असें जें म्हटलें, त्याचें कारण उघड आहे. कारण हें कीं आपल्या धर्माचीं मूलभूत तत्त्वें आणि धर्मनिष्ठ चर्चमधील वंशसापेक्ष पक्षपाती वर्तन यांतील विसंगति उत्तरोत्तर अधिकाधिक विचारवंतांच्या ध्यानांत आल्याशिवाय राहणार नाहीं. या देशांतील चर्चमधून आणि धर्मसंबद्ध संस्थांतून वंशनिरपेक्ष सर्वांस प्रवेश मिळावा, अशा ज्या घोषणा आज सर्वत्र उमटत आहेत, त्या घोषणा केवळ गळा मोकळा करून उच्चारलेले शब्दच आहेत, असें नाहीं. त्या घोषणांचें अधिष्ठान आत्मविश्वासांत आहे. वंशनिरपेक्ष धर्माचाराच्या संबंधांत प्रत्यहीं प्रगति होत आहे, हें सर्वांस कळून चुकलें आहे. या देशांतील लोकशाहीचा महान् प्रयोग यशस्वी व्हावयाचा असेल, तर चर्चमधील आणि धर्मसंस्थांतील आचार वंशनिरपेक्ष तत्त्वावर आधारलेला असावयास हवा, हें अलीकडचें वातावरण पाहतां सर्वमान्य होत आहे, असें दिसतें. त्याच-

प्रमाणें धर्मनिष्ठ व्यक्तींच्या व संस्थांच्या आचारविचारांत आज वंशनिरपेक्ष वृत्तीचें दर्शन स्पष्ट होत आहे. अखेरीस धर्मप्रभावानें प्रत्येक नागरिकास सुविचार सुचेल, विचारांचें प्रत्यंतर आचारांत उमटेल, आणि वंशनिरपेक्ष भ्रातृभावाचें वर्तन उद्यांचा लोकाचार होईल; यांत शंका नाहीं.

अर्थातच हें ध्येयस्वप्न साकार व्हावयास कांहीं कालांतराची आवश्यकता आहे. पण जेव्हां कनेक्टिकट मधील ' ओल्ड मिस्टिक मेथॉडिस्ट चर्च 'चे गोरे सभासद एका नीग्रो धर्मोपदेशकास सन्मानपूर्वक आमंत्रण देतात,–या ठिकाणीं जातां जातां हें सांगावयास हवें कीं १९५५ सालापूर्वीं सुद्धां कनेक्टिकट राज्यांतील स्टॅफर्ड स्प्रिंग्जनें हा प्रयोग पूर्वीं एकवार केलेला होता,–जेव्हां नॉर्थ कॅरोलिनामधील ' होली रिडीमर रोमन कॅथॉलिक चर्च 'चा बिशप व्हिन्सेंट एस्. वॉटर्स स्वतःच्या अधिकार कक्षेंतील सर्व चर्चेसमध्यें वंशसापेक्ष पक्षपाती वर्तन धर्मविरोधक म्हणून रद्द करतो, जेव्हां तीन नीग्रो चर्चेस गोऱ्या सभासदांस प्रवेश देतात, आणि गोऱ्या धर्मोपदेशकांस प्रवचनासाठीं सन्मानपूर्वक आमंत्रण देतात; आणि जेव्हां, सोळा वर्षांपूर्वीं ज्या चर्चनें नीग्रो सभासदांस मुक्तद्वार प्रवेश दिला, असा नॉर्थ कॅरोलिना येथील ब्रुकफोर्ड बॅप्टिस्ट चर्च आपल्या दाक्षिणात्य धर्मोपदेशकाच्या मागणीवरून प्रार्थना संगीताचें दिग्दर्शन करण्यासाठीं एका नीग्रो सभासदाची नियुक्ति करतो; तेव्हां स्वाभाविकच हीं प्रसादचिन्हें आशादायक होत, असें विचारवंतांस वाटतें. उपर्युक्त घटनांचा अर्थ असा कीं या देशांतील चर्चेसमध्यें जागृति होत आहे. वांशिक न्यायाच्या मिरवणुकींत सर्व अमेरिकन चर्चेस पुढें मागें सामील होतील, त्या मिरवणुकींतील आपआपलें नियुक्त स्थान शोधतील व घेतील, आणि शेवटीं ही मिरवणूक भव्य उद्दिष्टाच्या मार्गानें नेऊन इष्ट स्थळीं विसर्जित करतील.

---

ह्यू एच्० स्माइथ
आणि
जेम्स एच्० रॉबिन्सन

# अमेरिकन संस्कृतीस नीग्रोचा हातभार

अमेरिकेस नीग्रोनें दिलेली सर्वोत्तम व सर्वाधिक वैभवशाली देणगी कोणती असेल, तर ती त्याच्या वैशिष्टययुक्त कलेची होय. नीग्रोचें संगीत, साहित्य, नाट्य व चित्र केवळ अनन्यसामान्य असें आहे. अमेरिकेच्या राष्ट्रीय जीवनांत नानाविध देशांच्या व वंशांच्या अस्मितांचे अंश एकवटलेले आहेत. अमेरिकन जीवनाचें महावस्त्र नाना देशवर्णवंश-धर्मांच्या धाग्यादोऱ्यांनीं विणलेलें आहे. पण लोकसंख्येच्या प्रमाणांत कलेचें एवढें गौरवशाली वरदान अमेरिकेस नीग्रोंव्यतिरिक्त अन्य कोणा वंशांनीं दिलेलें नाहीं. अमेरिकेच्या सांस्कृतिक पितृदत्तांत व प्रगतींत नीग्रोकलेचा वारसा सर्वाधिक संपन्न असा आहे. या खंडप्राय देशांत ज्या क्षणीं नीग्रो स्थायिक होऊन वास्तव्य करावयास लागले, त्या क्षणापासून आविष्करणाची संधि उपलब्ध होतांच त्यांचे स्वाभाविक कलागुण आपातत: प्रगट व्हावयास लागले.

अमेरिकन संगीताचा एकूण अभ्यास केला, तर असें दिसून येईल कीं कंठगत संगीताच्या महान् काळापासून तों आजतागायतच्या जाझ संगीता-पर्यंत प्रत्येक अवस्थेंत नीग्रोनें पृथगात्मक संगीताची अस्मिता प्रगट केलेली आहे. प्राचीन नीग्रो-संगीत आफ्रिकेंतील त्यांच्या पूर्वेतिहासाशीं निगडित

होतें व तें टॉम टॉमच्या तालांत व्यक्त होत होतें. नीग्रोचें 'ब्ल्यूज' 'मिन्स्ट्रल' व 'जाझ' संगीत सर्वांच्या परिचयाचें आहे. ज्या थोर गायकांनीं व नटनर्तकांनीं हें संगीत विशेष लोकप्रिय केलें, त्यांचीं नांवें सर्वांस जगभर माहीत आहेत. पण हें नीग्रो–संगीत व संगीतकार या देशाच्या मर्यादेंतच ख्याति पावलेले होते. या संगीतकारांच्या महान् वंशजांच्या कीर्तीनें मात्र दिगंत गांठलें. त्यांची निर्माणक्षम प्रतिभा आज या देशाशीं एकरूप झालेली असली, तरी या नीग्रो संगीतानें अखिल पश्चिम गोलार्धाची संस्कृति संपन्न केली आहे.

नीग्रो – संगीताचा सर्वाधिक प्राचीन वारसा म्हणजे त्यांच्या 'स्पिरिच्युअल्स'चा – प्रार्थनासंगीताचा. नीग्रोची गुलामगिरी अमानुष आर्थिक दडपणाखालीं मृतप्राय झालेली नव्हती, अशा वसाहतीच्या पूर्वकाळापासून नीग्रोंचीं हीं महान् प्रार्थनागीतें या देशांत मुक्तकंठ म्हटलीं जात असत. त्या काळांत सुद्धां कांहीं सुप्रसिद्ध नीग्रो गीतकार व धर्मोपदेशक नीग्रो लोकसंगीताच्या निर्मितींत पुढाकार घेत होते. हें प्रार्थनासंगीत पराकाष्ठेचें भावनोत्कट आणि हृदयद्रावक आहे. खरें म्हणजे नव्या देशांतील स्वातंत्र्याच्या शोधांत आलेल्या, जंगली निसर्गावर मात करण्याच्या दुर्दम्य महत्त्वाकांक्षेनें प्रेरित झालेल्या आणि नव्या जगाच्या निर्मितींत धुंद झालेल्या गोऱ्या लोकांनीं नीग्रो प्रार्थनासंगीतासारखें कांहीं लोकसंगीत निर्माण केलें असतें, तर ती संगीताच्या इतिहासांतील एक महान् घटना ठरली असती. पण पाशवी दैन्यावस्थेंत निराश जीवन कंठणाऱ्या नीग्रो लोकांच्या धार्मिक प्रेरणेंतून निर्माण झालेलें प्रार्थनासंगीत आज सुद्धां कोणीं ऐकलें, तर तो श्रोता आश्चर्यचकित झाल्याशिवाय राहत नाहीं. पूर्वावस्थेंतील हे नीग्रो गुलाम आफ्रिकेंतील नाना प्रदेशांतून येथें आलेले होते. त्यांच्या बोलभाषा भिन्न भिन्न होत्या. जन्मदत्त स्वाभाविक संस्कृतीस ते एकाएकीं पारखे झालेले होते. त्यांचे कौटुंबिक आप्तसंबंध पार तुटून ते परस्परांस पारखे झालेले होते. आणि परस्परांचा ठावठिकाणा एकमेकांस माहीत नाहीं, अशा अवस्थेंत एकमेकांपासून हजारों योजने दूर राहून ते एकाकी, निर्मम जीवन कंठीत होते. सर्वस्वीं परक्या अशा परदेशी व परधर्मीय संस्कृतीशीं एकरूप होण्याचा प्रसंग दुर्दैवानें त्यांजवर ओढवलेला होता.

परभाषेंतील शब्दांचे धडे त्यांना घ्यावे लागत होते. आणि अशा सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितींत या नीग्रो लोकांनीं अमेरिकेस सर्वाधिक वैशिष्टचसंपन्न अशा कलेचें वरदान देऊन उपकृत करावें, ही घटना जागतिक कलेच्या इतिहासांत केवळ अश्रुतपूर्व अशी आहे.

नीग्रोंच्या या भावनोत्कट प्रार्थनासंगीताचें एक मनोरंजक वैशिष्टच ध्यानांत घेण्यासारखें आहे. त्या काळांत नीग्रो गुलाम या प्रार्थना–संगीताचा उपयोग बिनतारी संदेस पाठविण्यासाठीं प्रामुख्यानें करीत. गुलामगिरींतून मुक्त झालेल्या वा मुक्त होण्यासाठीं झटणाऱ्या स्वातंत्र्याकांक्षी नीग्रोंस या प्रार्थना–संगीताचें पठण उपकारक ठरे. पूर्वनियोजित प्रार्थना-गीतांतून उमटलेले संदेश शेंकडों मैलांचें अंतर तोंडून इष्ट स्थळीं जाऊन थडकत. नीग्रोचें गाणेंबजावणें सर्वांसच प्रिय होतें. तेव्हां गुप्तसंदेश परस्परांस पोंचविण्यासाठीं काळ्या गुलामांनीं या मार्गाचा अवलंब करावा, हें स्वाभाविक होतें. जन्मजन्मांतरींचें दुःख विसरण्यासाठीं नीग्रो गुलामांनीं हृदयभेदक गीताक्रोश करावा, हें गोऱ्यांस स्वाभाविक वाटे. शेकोटी-भोंवतीं जमून कांहीं नीग्रोंनीं मुक्तकंठ गाणीं म्हटलीं, तर त्या गाण्यांतून मुक्ततेच्या पूर्वतयारीसाठीं कांहीं गुप्त सूचना देण्यांत येत असतील, असा गोऱ्या मालकांस चुकूनसुद्धां कधीं संशय आला नाहीं. कधीं कधीं तर आपल्याच मालकाच्या बड्या घरांत एखाद्या समारंभाच्या निमित्तानें नीग्रो गुलाम एकत्र जमत व मोठ्यानें गाणीं म्हणत. त्या गाण्यांच्या स्वरांत मुक्ततेचीं कारस्थानें डोळ्यांदेखत उच्चारलीं जात असतील, असा संशय कोणा मालकांस वा मुकादमांस काय म्हणन यावा ? पण पुष्कळ वेळां ते एखादें साधें भजन म्हणत, तें सुद्धां कांहीं विशिष्ट गुप्त हेतूनें, याचा सुगावा इतर कोणास कधींच लागला नाहीं—'स्टील अवे टू जीजस' या भजनाचा सांकेतिक अर्थ बहुतकरून—'आज मुक्ततेची रात्र आहे. तयार राहा, सावधान ! ' असा होत असे. गाण्याची सुरुवात शांत, गंभीर वातावरणांत खालचा सूर धरून होई. थोड्या वेळानें गीतकारांचा आवाज आकाशास भिडेल, एवढा मोठा होई. आणि त्या गगनभेदी स्वरलहरी नद्या ओलांडून पर्वत चढून दऱ्याखोऱ्यांतून शेंकडो मैल फिरत. आणि त्या मुक्त गीतांचे

स्वर कान देऊन ऐकणाऱ्या गुलामांच्या मनांत आनंदाचे व आशेचे दीप प्रज्वलित करीत.

तेंच भजन पुन: केव्हां त्यांच्या कानीं पडलें कीं पुन: एकदां उत्साहाच्या लाटांवर ते वाहून जात. क्वचित् दुपारीं मालवलेल्या आशा रात्रीं पुन: पेटून उठत–‘ स्टील अवे टु जीजस ’– याचा अर्थ –‘ स्टील अवे टु न्यू यॉर्क, न्यू इंग्लंड, पेन्सिल्व्हॅनिया कॅनडा ’– असा संदर्भानुसार यथोचित केला जात असे. ‘ आय एंट गॉट लाँग टु स्टे हिअर ’–हें एका प्रसिद्ध भजनाचें पालुपद कोणीं ऐकलें कीं बहुतकरून त्याचा सांकेतिक अर्थ – ‘ आमच्यापैकीं कांहीं लोक आज रात्रीं येथून निघणार आहेत. ’– असा अचूक केला जात असे.

कांहीं कारस्थान रचलें खरें, पण तें सिद्धीस गेलें कीं नाहीं, हें जाणण्याची सर्वांसच उत्सुकता असे. पुष्कळ वेळां कान देऊन ऐकणारे श्रोते त्या कारस्थानांत स्वत:च सामील असत. आणि त्यांच्यावर कारस्थान तडीस नेण्याची जबाबदारी असे अशा स्थितींत सांकेतिक भाषेंत गीतोत्तर पाठविणें भाग पडे. उदाहरणार्थ–‘ कांहीं काळजी करूं नका. बेत आंखल्याप्रमाणें पार पडला. मुक्त झालेला गुलाम इष्ट स्थळीं सुखरूप जात आहे ’– असा उलट संदेश पाठवावयाचा असेल, तर भजनी मंडळी एकत्र जमत व मेघगर्जनेच्या उंच सुरांत टिपेवरचें भजन म्हणत. –‘ स्विंग लो, स्वीट चॅरियट ’– भजनांतील हा चॅरियट (रथ) म्हणजे बहुतकरून एखादा मोडकातोडका जुनाट खटारा असे. गवतानें भरलेला, मंद व दुडक्या चालीचा, खेचरांनीं ओढलेला. तें कांहीं असो. याहून अधिक सुंदर शृंगारलेला रथ पृथ्वीतलावर कधीं दौडत निघाला नसेल.

अशीं हीं प्रार्थनागीतें, भजनें. त्यांतील आशय नेहमीं करुणार्त असे. या प्रार्थनासंगीतांतून नीग्रो गुलामांनीं अनेकविध लोकसंगीत निर्माण केलें. त्यांच्या तात्कालिक मन:स्थितीचें स्पष्ट प्रतिबिंब या गीतांतून व्यक्त झालेलें आढळतें. त्यांतील कांहीं गाणीं शेतांतील कामें एकत्र करीत असतांना सर्वांनीं मिळून म्हणावयाचीं आहेत. कांहीं गाण्यांतून देवाचा धांवा आहे. कांहीं गाण्यांत अंतरास जाळणाऱ्या दु:खाचें निवेदन आहे. आणि कांहीं गाणीं केवळ शीण घालविण्यासाठीं रचलेलीं, हलकीं फुलकीं अशीं आहेत. नीग्रो गुलामांची

जेथें म्हणून वस्ती असेल तेथें भजनी मंडळी हटकून असत. आणि आसपास कोठें त्यांचें स्थानिक चर्च असेल, तर तेथें नीग्रो गायकवादकांचा ताफा हटकून असे. त्यांचीं गाणीं अंतःकरण पिळवटून निर्माण झालेलीं आहेत. या गाण्यांत गुलामगिरीचें हृदयद्रावक दुःख आहे. गुलामगिरींतून कधींकाळीं मुक्त होण्याची आशा आहे. गुलामगिरीच्या जिण्यांत उन्मत्तानें दलितांवर केलेल्या क्रूर पाशवी अत्याचाराची कहाणी आहे आणि दुर्दैवानें प्राप्त झालेल्या गुलामगिरीस आपण पुरून उरूं असा दुर्दम्य आत्मविश्वास आहे. सारांश या नादमधुर हृदयस्पर्शी गीतांतून नीग्रो गुलामांचा इतिहास नोंदलेला आहे. पुढील काळांत हींच गीतें गाऊन कांहीं गायकवादक दिगंत कीर्ति मिळविणार होते. त्यांच्यापैकीं कांहीं गीतकार आज जगांत नामांकित झालेले दिसून येतात : 'फिस्क ज्युबिली सिंगर्स, हॅम्पटन कॉयर,' आणि सुप्रसिद्ध 'हॉल जॉन्सन, विंग्ज ओव्हर जॉर्डन' आणि 'डीपौर इन्फंट्री कोरसेस.'

नीग्रो वादक कांहीं विशिष्ट वाद्यें वाजविण्यांत मनस्वी कुशल असत. नृत्यसंगीत नीग्रोंच्या रक्तांत भिनलेलें आहे. आणि त्यांना योग्य ती संधि उपलब्ध होतांच त्यांच्यापैकींच कांहीं प्रतिभाशाली गायक, वादक, गीतकार आणि संगीतकार म्हणून जगभर ख्याति पावले. कांहींनीं बँड लीडर्स म्हणून लौकिक मिळविला. नीग्रो बँड आणि जाझ संगीत आज जगभर प्रसिद्ध आहेत. ड्यूक एलिंग्टन, लुई आर्मस्ट्रॉंग, काऊंट बेसी, कॅब कॅलोवे, लायोनेल हॅम्टन, अर्स्किन हॉकिन्स आणि डिझी जिलेप्सी, यांचे बँड आज जगांत अग्रगण्य गणले जातात. सारा व्हॉन, नॅट किंग कोल, व्हलैडा स्नो, मॅक्झिन सलिव्हॉन, बिली विस्टन, लेना हॉर्न, पर्ल बेले, एला फिज्जेरल्ड, बिली डॅनिएल्स या नामांकित गायकांनीं आज विलक्षण लोकप्रियता संपादन केलेली आहे. अमेरिकेंत आणि इतरत्र सर्वत्र काळ्यागोऱ्या गीतलोलुप लोकांत त्यांच्या गायनाची चहा आहे. लक्षावधि लोकांच्या कानांत व मनांत त्यांचें नादमधुर गाणें सर्वत्र दुमदुमत आहे.

नीग्रो संगीत अमेरिकेंत पहिल्यापासून सर्वत्र लोकप्रिय होतें. पण प्रथमपासून पक्षपातामुळें संगीताच्या जगांत अधिकारपरत्वें जें स्थान त्यांना प्राप्त व्हावयास हवें होतें, तें त्यांजपासून नेहमींच दूर ठेवण्यांत परवांपर्यंत पक्ष-

पातानें यश मिळविलें होतें. कालांतरानें जलशाच्या जगांत नीग्रो गायकांस प्रवेश मिळाला. आणि त्यांच्यापैकीं कांहीं प्रतिभाशाली कलावंतांनीं संगीताच्या इतिहासांत आपलीं नांवें रत्नखचित अक्षरांत लिहून ठेवलेलीं आहेत. अंत:-करणांत ज्यांचे स्वर उचंबळतात व श्रोत्यांच्या अंत:करणांत कायमचें स्थान मिळवितात, असे नीग्रो गायक आज जगभर विख्यात आहेत. स्वरसम्राज्ञी मेरिअन अँडरसन हिच्या अतुलनीय संगीताविषयीं एकदां टोस्कानिनीनें भारावल्यागत अभिप्राय व्यक्त केला आहे : 'असा आवाज शतकांतून फक्त एकदांच ऐकावयास मिळतो.'—रोलंड हेजनें आपल्या अप्रतिम आवाजानें जग जिंकल्यानंतर अॅन विगिन्स ब्राऊन, टॉड डंकन, एलाबेल डेव्हिस पॉल रोबसन, डोरोथी मेनॉर, म्यूरियल रान आणि इतर कित्येक नीग्रो गायकांनीं संगीताच्या जगांत असामान्य विक्रम प्रस्थापित केलेले आढळतात. त्यांच्याच अनुकार करून, आज जे तरुण नीग्रो गायक केवळ अमेरिकेस माहीत आहेत, ते उद्यां जगभर विख्यात होणार आहेत. विल्यम वॉरफील्ड, कॅमिला विल्यम्स, लेऑनटाइन प्राईस, अॅडेली अॅडिसन, मॅटिविल्डा डॉन्ब आणि कॅरोल ब्राईस यांचीं नांवें उद्यां जगभर दुमदुमणार आहेत.

संगीताच्या जगांत ज्यांना केवळ अतुलनीय असें अत्युच्च स्थान प्रतिभा-बळावर प्राप्त होतें आणि ज्यांची प्रतिभा संपत्तीच्या बळावर विकत घेतां येत नाहीं, अशा दुर्मिळ संगीतकारांच्या यादींत कांहीं नीग्रो संगीतकारांचीं नांवें आज अग्रगण्य मानलीं जातात. जॉन डब्ल्यू वर्क, क्लॅरेन्स कॅमेरॉन व्हाइट, विल्यम ग्रांट स्टिल, नाथानियल डेट, जे रोझामंड जॉन्सन, यूलिसिस के, विल्यम लेव्ही डेव्हिसल,—या नीग्रो संगीतकारांचें ऋण अमेरिका कदापि विसरूं शकणार नाहीं.

संगीताच्या इतिहासांत जें घडलेलें दिसतें, त्याचीच पुनरावृत्ति नाटयाच्या इतिहासांत घडलेली आढळते. ज्यानें आपल्या असामान्य अभिनयानें सर्व युरोपवर मोहिनी घातली, अशा इरा आल्ड्रिजचा लोकविलक्षण अपवाद वजा केला, तर बाकी सर्व नीग्रोनाटयाचा इतिहास पूर्वोक्त कालखंडांत विभागलेला आढळतो. अर्ध शतकापूर्वीं नीग्रो शाहिरी या देशांत सर्वत्र लोकप्रिय होती. दक्षिणेंतील गुलामांच्या वसाहतींत या शाहिरींतून नाटय

फुललें. आणि कालांतरानें जेव्हां अमेरिकेच्या धंदेवाईक रंगभूमीचीं द्वारें नीग्रो नटांस खुलीं झालीं, तेव्हां हेच नीग्रो शाहीर रंगभूमीवर लोकप्रिय झाले. या शाहीरांच्या रक्तांतच नाट्य भिनलेलें होतें. आपली आनुवंशिक कला घेऊन हे शाहीर रंगभूमीचा कबजा करण्यास सरसावले, तेव्हां ही शाहिरीच त्यांच्या कामीं आली. खरें सांगावयाचें तर अमेरिकन भूमींत रुजलेलें पहिलें नाट्य म्हणजे नीग्रो शाहीरांचें होय. बिलो करसँड्स, बोही बंधू, सॅमल्यूकास आणि जेम्स ब्लँड हे पहिले शाहीर–नट होत. सार्वजनिक करमणुकीच्या कार्यक्रमांत या नीग्रो कलावंतांनीं नाट्यात्म स्वगतांस मोठी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पदन्यासाचें संगीत आणि हृदयस्पर्शी संगीत नीग्रो कलावंतांनीं अमेरिकेच्या रंगभूमीवर विलक्षण लोकप्रिय केलें.

पहिलें महायुद्ध सुरू होण्यापूर्वी गेल्या शतकाच्या अखेरीस नीग्रो कलावंतांनीं 'केक वॉक, जोना मॅन, रॅगटाईम' आणि 'जाझ' संगीत रंगभूमीवर रुजू केलें. या काळांत नीग्रोंचें प्रार्थनासंगीत गोऱ्या श्रोत्यांस विलक्षण आवडत असे. डब्ल्यू. सी. अँडीनें दुःखार्त गीतें म्हणून नीग्रो संगीतास उदंड मान्यता मिळवून दिली. ह्या वेळपर्यंत नीग्रोंचें हास्यकारक व्यंगचित्र गोऱ्या प्रेक्षकांस फार आवडूं लागलें होतें. कित्येक वर्षें नीग्रोंचें हें हास्यकारक व्यंगचित्र धंदेवाईक रंगभूमीवर कबजा करून होतें. आणि कदाचित् हें व्यंगचित्रच अमेरिकन रंगभूमीच्या आश्रयास कायमचेंच राहिलें असतें. पण मध्यंतरीं कांहीं प्रतिभाशाली नीग्रो कलावंत अधिकृत नाट्याचें क्षेत्र पादाक्रांत करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून त्या दिशेनें यत्न करावयास लागले. कांहींनीं नाट्यलेखनाचा पेशा पत्करला. आणि कांहीं संगीत रचनेकडे वळले. याच सुमारास विल मेरियन कुकच्या 'क्लोरिंडी' नामक लोकप्रिय नाटकानें नाट्यसंगीतांत एक नवा विक्रम प्रस्थापित केला. या नाटकामुळें एका नवीन, अभिजात संगीतप्रतिभेचा लाभ रंगभूमीस झाला. तदनंतर बर्ट विल्यम्सचें युग सुरू झालें. हास्यकारक नीग्रो नाटकांत आपल्या प्रतिभाशाली अभिनयानें अव्वल दर्जाचा नट म्हणून त्यानें ख्याति संपादन केली. या देशाच्या एतद्देशीय रंगभूमीच्या आणि वंश संबंधाच्या कामीं विल्यम्सनें जें मनस्वी कर्तृत्व गाजविलें त्याचें वर्णन मेरियन अँडरसननें खालील शब्दांत केलें आहे.

—' बर्ट विल्यम्सनें शाहीर म्हणून रंगभूमीवर प्रवेश केला आणि असामान्य प्रतिभेचा नट म्हणून मोठा लौकिक मिळविला. तावत्काळपर्यंत गोऱ्या रंगभूमीचीं दारें काळचांस कायमचींच बंद होतीं. पण विल्यम्सनें आपल्या अस्सल अभिनय गुणाच्या बळावर हीं सदा बंद दारें खुलीं केलीं आणि त्याच्यामागून असंख्य नीग्रो नटांनीं गोऱ्या रंगभूमीवर सहज प्रवेश मिळविला. गोऱ्या नाटचगृहांचे व्यवस्थापक व दिग्दर्शक प्रथमपासून नीग्रो कलावंतांस रंगभूमीवर प्रवेश देण्यास राजी नव्हते. पण विल्यम्सनें हिंमत धरून पक्षपाताचे अडसर तोडले आणि गोऱ्या रंगभूमीचीं दारें नीग्रो कलावंतांस कायमचीं खुलीं करून दिलीं. त्यावेळीं बहुतेक सर्व वृत्तपत्रें काळचा–गोऱ्यांच्या संमिश्र नाटच प्रयोगांस कसून विरोध करणारीं होतीं. पण विल्यम्सनें आपल्या अंगभूत अभिनय गुणांनीं वृत्तपत्रांतील पक्षपातास आळा घातला. तोंपर्यंत गोरे नट तोंडास काजळी फासून नीग्रोंचीं सोंगें रंगभूमीवर काढीत असत. तीं विद्रुप सोंगें मनस्वी लोकप्रिय होतीं. पण विल्यम्सनें नीग्रोंचे वंशजात नाटचगुण गोऱ्या प्रेक्षकांच्या निदर्शनास आणण्यांत अभूतपूर्व यश मिळविलें. नीग्रोंचीं हास्यकारक विदुषकी सोंगें काढणाऱ्या गोऱ्या नटांस त्यानें कांहीं मोलाचे धडे शिकविले आणि वेडचावाकडचा अंगविक्षेपाऐवजीं शांत, संयमित नर्म विनोद गोऱ्या रंगभूमीवर रुजू केला.

पहिल्या महायुद्धाच्या वेळीं गोऱ्या रंगभूमीवर नीग्रोंचा जो शिरकाव झाला, तो तशाच तोलामोलाच्या अशा एका महान् नाटककाराच्या महान् नाटचकृतींत. त्याच सुमारास युजीन ओ'नील नांवाच्या एका होतकरू नव्या दमाच्या नाटककारानें 'एंपरर जोन्स' नांवाचें एक नवीन नाटक लिहिलेलें होतें. या नाटकाचा नायक एक नीग्रो होता. किंबहुना त्याचीच सर्व कहाणी या नाटकांत काव्यात्म शैलींत प्रभावीपणानें सांगितलेली आहे. बर्ट विल्यम्सनें 'एंपरर जोन्स'ची ही भूमिका अशा कांहीं सामर्थ्यानें वठविली कीं नाटचप्रयोगाच्या पहिल्याच रात्रीं त्याला जन्माची प्रसिद्धि मिळाली. विल्यम्सनें आजवर बंद असलेली जी वाट मोकळी करून दिली, त्याच वाटेनें तदनंतर चार्ल्स गिल्पिनसारखा दुसरा एक प्रतिभाशाली नट पुढें जाणार होता. आणि गोऱ्या रंगभूमीवर नीग्रोच्या वंशजात भावनोत्कट अभिनयाचें प्रभावी

प्रात्यक्षिक निर्देशित करणार होता. याच सुमारास दर्दभरी नीग्रो संगीतानें गोऱ्या रंगभूमीचा कबजा घेतला. ज्या चार नीग्रो संगीतकारांच्या संगीता-मुळें अमेरिकन संगीतास जागतिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली, त्यांचीं नांवें अमेरिकन रंगभूमीच्या इतिहासांत सदैव आदरपूर्वक उल्लेखिलीं जातील. फोर्ड डॅब्ने, जेम्स रीज युरोप, बिल मेरियन कुक आणि डब्ल्यू. सी. हॅंडी या चौघांनीं जेव्हां नीग्रो संगीताची पुनर्रचना केली, तेव्हां संगीत सृष्टींतील एक अद्भुत नवल वर्तलें, असेंच म्हणावें लागेल. तत्पूर्वी वस्तुस्थिति अशी होती कीं नीग्रो संगीतास स्वतःची अशी प्रक्रांत होती, पण परिभाषा नव्हती. नीग्रो संगीतास कांहीं विशिष्ट ताल होता, नाद होता, वाद्यवृंद होता, आणि वंश-विशिष्ट स्वतंत्र तांत्रिक शैली होती. नीग्रो संगीताची योजना व रचना या चौघांच्या परिश्रमांनीं घडविली. कालांतरानें हें वस्तुतः जुनें पण नव्यानें निर्माण झालेलें नीग्रो संगीत केवळ या देशाच्याच नव्हे, तर सर्व जगाच्या कानाकोपऱ्यांत पोहोंचलें. जगांतील असंख्य संगीतप्रेमी श्रोत्यांस या नाद, विशिष्ट नीग्रो संगीतानें पराकाष्ठेचा आनंद आजवर दिलेला आहे. व्हॉडे-विलच्या कार्यक्रमास नीग्रो संगीतानें एक आगळें वैशिष्ट्य प्राप्त करून दिलें. आणि अमेरिकेला एक संपूर्ण नवा असा वैशिष्ट्ययुक्त वैभवशाली नृत्यप्रकार उपलब्ध करून दिला.——शार्लेस्टन आणि टॅप डान्सनें सर्व जगास भुरळ घातली. बिल 'बोंजांगल्स' रॉबिन्सन हा या नव्या नृत्य विशेषाचा सर्वश्रेष्ठ पुरस्कर्ता होय.

अमेरिकन कला आणि जीवन यांच्या संदर्भात बर्ट विल्यम्स आणि जिम यूरोप, फ्लॉरेन्स व आणि रोझ मॅकक्लेंडन, चार्ल्स गिल्पिन आणि रिचर्ड हॅरिसन व एथेल वॉटर्स यांजसारख्या महान् कलावंतांच्या कर्तृत्वाचा अभ्यास करण्यासारखा आहे. यांजपैकीं कोणी नट होते, कोणी नर्तक होते-कोणी संगीतकार होते. त्यांना जी उदंड कीर्ति प्राप्त झाली, ती सहजासहजीं मिळाली, असें नव्हे. त्यांचा रस्ता बिकट होता. आणि त्यांच्या हालअपेष्टा केवळ असह्य, अतर्क्य अशा होत्या. आपआपल्या जीवन–नाटयांत त्यांच्या-पैकीं प्रत्येकानें जी भूमिका साक्षात् वठविली होती, तिच्याशीं तुलना करतां कोणतेंहि नाटक निःसंशय फिकें पडेल. एक काळ असा होता कीं ज्यावेळीं

केवळ नीग्रो रंगभूमीवरील सर्वच कलावंत–नट, नर्तक, गायक, वादक, संगीतकार, सर्वच नीग्रो होते. जुन्या काळांतील विल्यम्स आणि वॉकर यांच्या कंपन्या अशाच नीग्रोनिविष्ट अशा होत्या. नीग्रोंची वंशसापेक्ष अशी एक काळी रंगभूमि अशी आहे कीं जेथें निरपवाद सर्व प्रेक्षक खास करून काळेच असतात. उदाहरणार्थ : हार्लेमधील लाफायेत थिएटर. नीग्रो रंगभूमि आज नाट्यदृष्ट्या संपन्न आहे. रिजले टॉरेन्सचीं तीन नीग्रो नाटकें, पॉल ग्रीनचें ' इन आब्राहाम्स बूझम ', मार्क कोनोलीचें ' ग्रीन पाश्चर्स ',—हीं नाटकें विचारांत घेतलीं, तर असें दिसतें कीं नीग्रो जीवन चित्रित करणारीं उत्तम नाटकें गोऱ्या नाटककारांनीं लिहिलेलीं आहेत. नीग्रोंनीं पण लिहिलीं आहेत. उदाहरणार्थ : लँग्स्टन ह्यूजेसचें ' मुलॅटो ' व रिचर्ड राईटचें ' नेटिव्ह सन '. पण अमेरिकन रंगभूमि या सर्वांपेक्षां सर्वथैव निराळी, वेगळी आहे. अमेरिकन रंगभूमीवरसुद्धां नीग्रो कलावंतांनीं आपल्या कलावैशिष्ट्याचे ठसे स्पष्ट उमटविले आहेत. करमणुकीच्या व कलेच्या सर्व क्षेत्रांत आज नीग्रो वैशिष्ट्याचा ठसा स्पष्ट उमटलेला दिसतो. नीग्रो कलावंतांच्या वैयक्तिक जीवनांतील नाट्य मनस्वी चित्तवेधक आहे. वंशवैशिष्ट्यामुळें त्याच्या जीवनास कांहीं विशिष्ट आकार लाभला आहे. पक्षपातामुळें अंगीं अलौकिक गुण असूनसुद्धां ते प्रगट व्हावयास अनुकूल अशी संधि दुर्मिळ असल्यामुळें अनेक वेळां त्याची वंचना झाली आहे. महत्त्वाकांक्षेनें तो भारलेला आहे. पण त्याचा उत्कर्ष सहज साध्य नाहीं. भोंवतालच्या परिस्थितीशीं व समाजाशीं त्याचे जे संबंध जडलेले आहेत, त्यांच्या परस्पर संघर्षांतून रम्यभीषण नाट्य निर्माण झालेलें दिसतें.

कालांतरानें का होईना, पण अमेरिकन रंगभूमीवर नीग्रो कलेस प्रगट होण्याची संधि प्राप्त झाली. ही संधि प्राप्त होतांच केवळ त्याची कलाच प्रगट झाली, असें नाहीं; तर त्याचा अंतरात्मा आणि त्याचा संदेश या रंगभूमीवर प्रगट झाला. या रंगभूमीच्या परिसरांत त्याला असे गोरे मित्र लाभले कीं त्यांनीं त्याच्या सुखदुःखाशीं समरस होऊन त्याला सदैव साथ दिली. अमेरिकन जीवनाच्या इतर कोणत्याहि उद्योगधंद्यांत ज्या प्रमाणांत पक्षपाताचें वातावरण आढळतें, त्यापेक्षां किती तरी कमी प्रमाणांत तसें

वातावरण नाटयादि कलांच्या क्षेत्रांत आढळतें. नट आणि कलाकार निःपक्षपात वृत्तीनें कलेची आराधना करतात, असेंच सर्वत्र बहुतकरून आढळून येतें.

या देशांतील नाटयकलेच्या क्षेत्रांत नीग्रो कलावंतांनीं सर्वांत अधिक उज्वल, उपयुक्त आणि उपकारक असें सहकार्य केलें, तें प्रामुख्यानें गेल्या पंचवीस वर्षांच्या याच कालावधींत. पॉल रोबसनच्या अभिनयानें नाटयक्षेत्रांत एक नवा आदर्श निर्माण केला. याच काळांत नीग्रो जीवनाचें सम्यग्दर्शन घडविणारी ' नेटिव्ह सन ' सारखीं परिणामकारक नाटकें रंगभमीवर आलीं. याच काळांत ' पॉर्गी अँड बेस ' या लोकप्रिय संगीत नाटकाचें पुनरुज्जीवन झालें. आणि जगांत सर्वत्र या नाटकानें मोठी प्रतिष्ठा संपादन केली. एतद्देशीय लोकनाटय असें हें पहिलेंच होय. त्यांतील नृत्यसंगीतानें जगांतील सर्व रसिकांस वेड लावलें. याच काळांत ' कामन जोन्स'च्या प्रयोगांनीं हें निर्विवाद सिद्ध केलें कीं त्यानंतर नीग्रो रंगभमीस स्वतःचें, स्वतंत्र, वेगळें अस्तित्व स्थापिण्याची आवश्यकता नाहीं. याच काळांत ' फेडरल थिएटर ' या नामांकित नाटयसंस्थेची स्थापना करण्यांत आली, आणि आर्थिक आपत्तीच्या काळांत अधिकाधिक नीग्रो कलावंतांस जरूर तो नाटयानुभव मिळवून देण्याची सोय या संस्थेनें उपलब्ध करून दिली. याच काळांत हार्लेममध्यें ' अमेरिकन नीग्रो थिएटर'ची संघटना बांधण्यांत आली. आणि तेथें लोकप्रिय झालेलें ' ॲना ल्युकास्टा ' नांवाचें नाटक अखेरीस ब्रॉडवेच्या रंगभूमीवर ऐन वैभवांत झळकलें. ज्या नाटकांत नीग्रो जीवनाचें प्रामाणिक दर्शन घडतें आणि तरी सुद्धां ज्या नाटकांत वांशिक प्रश्न चर्चिला जात नाहीं, असें नाटक केवळ अभिनयाच्या बळावर लोकप्रिय होऊं शकतें, हें या नाटकानें प्रथम दाखवून दिलें. याच काळांत ' स्ट्रेंज फ्रुट, डीप आर दि रूट्स, जेब ' सारख्या अनेक प्रभावी नाटयकृतींतून काळयागोऱ्या कलावंतांनीं एकत्र कामें केलीं, आणि संमिश्र भमिकांचीं नाटकें रंगभमीवर यशस्वी होऊं शकतात, हें निर्विवाद सिद्ध केलें. याच काळांत ' फिनियन्स रेनबो ' सारख्या नवलाच्या नाटकांत नीग्रो नटांनीं अभिनयाचें एक आगळें प्रात्यक्षिक दाखविलें. याच काळांत दक्षिण आफ्रिकेंतील पददलित नीग्रो लोकजीवनाची करुण कहाणी ॲलन पेटनच्या ' क्राय, दि बिलव्हेड कंट्री ' या नाटकानें जगास ऐकविली.

याच काळांत कॅथेरिन डनहॅमनें आपल्या संगीत नृत्यनाटचास रसिकमान्य लौकिक मिळवून दिला. या नृत्यनाटचांतून आफ्रो–कॅरिब्बीअन नेपथ्यरचना रंगभूमीवर लोकप्रिय केली आणि पाश्चात्य संस्कृतीस आदिवासी नृत्याचें बहुमोल लेणें दिलें.

याच काळाच्या उत्तरार्धांत ' मदाम बटरफ्लाय ' नामक लोकप्रिय संगीत नाटकांत कॅमिला विल्यम्स नामक नीग्रो नटीनें एक अविस्मरणीय भमिका निर्माण केली. ' सिटी सेंटर ऑपेरा कंपनी 'नें लँग्स्टन ह्यजेस – विल्यम ग्रँट स्टिलच्या ' ट्रबल्ड आयलंड ' या जगद्विख्यात संगीत नाटकाचे असंख्य प्रयोग सादर केले. यरोपमधील व दक्षिण अमेरिकेंतील अनेक प्रतिष्ठित ऑपेरा थिएटर्समधून मॅटिविल्डा डॉन्सनें अलौकिक लोकप्रियता संपादन केली. आणि अखेरीस या सर्व घटनांची परिणति म्हणूनच कीं काय ' मेट्रोपॉलिटन ऑपेरा ' च्या बादशाही रंगभमीचीं द्वारें नीग्रो गायिकांस खुलीं झालीं. जॅनेट कॉलिन्स, कार्मेन डि लाव्हालेड, मेरियन अँडरसन या नीग्रो गायिकांच्या कंठांतील स्वर्गीय स्वरांनीं ' मेट्रोपॉलिटन 'चें वातावरण धुंद करून सोडलें. याच काळांत रॉबर्ट मॅकफेरिन या नीग्रो गायकास ' मेट्रोपॉलिटन 'च्या रंगभूमीवर गाण्याचा मान मिळाला.

नीग्रो कलावंतांनीं केवळ संगीत, नृत्य व नाटच या कलांतच आपली अस्मिता प्रगट व प्रस्थापित केली आहे असें नाहीं. चित्र, शिल्प आणि काव्य या कलासुद्धां नीग्रो कलावंतांच्या कर्तृत्वानें अंकित झालेल्या आहेत. प्रस्तुत कलांच्या संबंधांतील नीग्रो-कर्तृत्व खास करून उल्लेखनीय आहे.

डॉ. अॅलेन एल्. लॉक हा चित्रकलेच्या संबंधांत अधिकारी टीकाकार मानला जातो. त्यानें नीग्रो चित्रकलेचें साद्यंत दर्शन घडविलें आहे. जोशुआ जॉन्स्टन (१७७०–१८३०) नामक नीग्रो गुलाम हा अमेरिकेंतील पहिला अधिकृत चित्रकार होय. त्याच्यानंतर रॉबर्ट एस्. डंकन्सन (१८२१–१८७१) याचें नांव घ्यावें लागतें. त्याचें एक चित्र महाराणी व्हिक्टोरियानें विंडसर कॅसलमध्यें लावण्यासाठीं म्हणन विकत घेतलें होतें. एडवर्ड एम्. बॅनिस्टर (१८२८–१९०१) याच्या ' अंडर दि ओक्स ' नामक चित्रास १८७६ सालच्या फिलाडेल्फिया सेंटेनियल एक्सपोझिशनमध्यें मानाचें सुवर्णपदक

क्रमांक(९९) ११८२ नों. दि. १८-११-५८

मिळालें होतें. एडमोनिआ लेव्हिस (१८४५-१८९०) हा एक पोरका मुलगा. पण त्यानें त्याच्या काळांत लोकप्रिय असलेल्या निओ क्लासिकल चित्रणशैलींत विलक्षण नैपुण्य संपादन केलें होतें. हेन्री ओ. टॅनर (१८५९-१९३७) हा एक जागतिक कीर्तीचा चित्रकार होता. बायबलमधील अनेक संस्मरणीय प्रसंगांचीं त्यानें काढलेलीं चित्रें केवळ अविस्मरणीय अशीं आहेत. जगांतील अनेक आंतरराष्ट्रीय चित्रप्रदर्शनांत त्याच्या कित्येक चित्रांस सन्मानाचीं पदकें मिळालेलीं आहेत. टॅनरच्या असाधारण कर्तृत्वापासून स्फूर्ति घेऊन त्याच्याच मार्गानें जाणारे असे अनेक काळेगोरे चित्रकार चित्रेतिहासांत नमूद आहेत.

भूतकाळांतून वर्तमानकाळांत आलों तर अनेक नामांकित नीग्रो चित्रकारांचीं नांवें सहज आठवतात. चार्ल्स सी. डॉसन हा एका नामांकित चित्रालयाचा व्यवस्थापक आहे. चित्रकार म्हणून त्याचा मोठा लौकिक आहे. ग्रंथासाठीं व वृत्तपत्रांसाठीं त्यानें काढलेलीं चित्रें लोकप्रिय झालेलीं आहेत. अनेक प्रकाशन संस्थांचा कलाविषयक सल्लागार म्हणून त्यानें ख्याति मिळवलेली आहे. कलात्मक खोदकामासाठीं त्याची प्रसिद्धि आहे. आर्चिबाल्ड जे. मोटले (ज्यूनियर) व ॲरॉन डग्लस हे दोघेहि चित्रकार म्हणून नामांकित आहेत. सार्जंट जॉन्सन हा शिल्पकार म्हणून प्रसिद्ध आहे. काचेवरील रंगचित्रांसाठीं याची ख्याति आहे. गोल्डन गेट एक्झिबिशनमधील ॲक्वेटिक पार्कसाठीं त्यानें रंगविलेलीं प्रचंड भित्तिचित्रें त्या काळांत मान्यता पावलीं होतीं. हेल वूड्रफ हा सुद्धां एक नामांकित चित्रकार होता. टॉलाडेगा कॉलेजमधील सॅव्हरी लायब्ररीसाठीं त्यानें रंगविलेलीं ॲमिस्टाड भित्तिचित्रें प्रसिद्ध आहेत. ई. सिम्स कँपबेल हा चित्रकार अनेक प्रसिद्ध मासिकांसाठीं चित्रें काढतो. त्या क्षेत्रांतील त्याचें कर्तृत्व सर्वांस विदित आहे. आदिवासी चित्रणशैलीचा एक प्रमुख प्रतिनिधि होरेस पिपिन यानें कोणत्याहि चित्रशाळेंत शिक्षण घेतलेलें नाहीं. आणि तरी सुद्धां कार्नेगी एक्झिबिशन अॅन्युअल अॅवॉर्ड त्यानें जिंकलें. ऑगस्टा सॅव्हेज ही एक प्रतिभाशाली शिल्पी आहे. न्यू यॉर्क वर्ल्डस् फेअरमधील तिची एक शिल्पकृति जगभर गाजली होती. जेम्स ए. पोर्टर हा चित्रकार पुस्तकांसाठीं चित्रें काढतो, तीं प्रसिद्ध आहेत. त्याशिवाय

त्याचीं चित्रें चाळीस प्रदर्शनांतून झळकलेलीं आहेत. स्वतःच्या चित्रांचीं प्रदर्शनें तो नेहमींच भरवतो, तीं लोकप्रिय आहेत. जेकब लॉरेन्स या नीग्रो चित्रकाराचा परिचय १९४२ सालीं सुप्रसिद्ध मेक्सिकन चित्रकार ओरोझको यानें—'अमेरिकेंतील दुर्मिळ प्रतिभावंतांपैकीं एक '—अशा गौरवशाली शब्दांत करून दिलेला होता. आणि अखेरीस आजच्या नीग्रो चित्रकारांतील अग्रगण्य म्हणून जर कोणा एकाचें नांव घ्यावयाचें असेल, तर तें रिचमंड बार्थ याचें घ्यावें लागेल. शिल्पकार म्हणून देखील त्याची ख्याति आहे. टॅनरनंतर सर्वाधिक प्रसिद्ध असा हा नीग्रो कलाकार. अनेक जागतिक प्रदर्शनांतून त्याला प्रथम श्रेणीचीं बक्षिसें व पदकें मिळालेलीं आहेत. 'नॅशनल अॅकॅडमी ऑफ आर्ट्स अँड लेटर्स' या राष्ट्रीय कलासंस्थेचा तो सभासद आहे. आणि अमेरिकेंतील प्रख्यात कलाकारांपैकीं विशेष ख्याति पावलेला असा हा प्रतिभाशाली नीग्रो कलाकार आहे.

ही झाली नामांकितांची नामावलि. पण उपर्युक्त नामांकितांस जी आज प्रतिष्ठा प्राप्त झालेली दिसते, तिचा अंशमात्र सुद्धां ज्यांच्या वाट्यास अजूनपर्यंत आलेला नाहीं, असे अनेक नीग्रो कलाकार आहेत. राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय चित्रप्रदर्शनांतून त्यांनीं मांडलेल्या कलाकृतींस सन्मानाचीं पारितोषिकें मिळालेलीं आहेत. अनेक प्रसिद्ध सार्वजनिक इमारतींच्या भिंतीं-वरील चित्रें त्यांनीं रंगविलेलीं आहेत. उद्यांच्या जगांत त्यांच्या नांवांस प्रतिष्ठा प्राप्त होईल, याविषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

गेलीं कित्येक वर्षें लेखनाच्या क्षेत्रांत नीग्रो लेखक केवळ उमेदवारी करीत होते, असें दिसतें. पण आज मात्र नीग्रो लेखकांस अधिकारपरत्वें ख्याति प्राप्त झालेली आहे. आजवर नीग्रो लेखक प्रसिद्धीच्या प्रकाशांत झळकलेले फारसे दिसत नाहींत, याचें कारण उघड आहे. एका निर्घृण सामाजिक अन्यायाचे ते बळी होते; आणि बहिष्काराच्या व पक्षपाताच्या स्वाभाविक गंडानें त्यांचीं मनें आजवर पछाडलेलीं होतीं. त्यामुळें पक्ष-पाताच्या पाशांतून मुक्त व्हावयास नीग्रो प्रतिभेस कांहीं काळ लोटावा लागला. अजूनसुद्धां कित्येक नीग्रो लेखक स्वतःच्याच वेदनेंत गढलेले दिसतात. त्यांत स्वाभाविक असें कांहीं नाहीं. पण कांहीं तरुण नीग्रो

लेखकांनीं या स्वाभाविक बंधनांतून प्रतिभेस मुक्त केलें आहे, असें आज दिसून येतें. आणि राष्ट्रीय अमेरिकन साहित्याशीं एकरूप होण्यासाठीं आज त्यांचे यत्न चालले आहेत. स्वतःच्या अस्मितेशीं इमान राखून सर्व जगास कळेल व मोह घालील, असें साहित्य हे तरुण नीग्रो लेखक आज निर्माण करीत आहेत.

विल्यम स्टॅनले ब्रेथवेट हा एकच नीग्रो लेखक असा होता कीं ज्यानें १९१३ पासून १९२९ पर्यंत मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध होणाऱ्या कवितांचें संकलन ग्रंथरूपानें प्रतिवर्षी नियमित केलें होतें. त्याशिवाय अमेरिकन काव्याचे वार्षिक संग्रह आणि मॅसॅच्युसेट्स राज्यांतील कवितांचीं संकलनें त्यानें प्रतिवर्षी नियमित संपादिलीं होतीं. त्याचा एक उज्वल अपवाद वगळला, तर बाकीचे सर्व नीग्रो लेखक वांशिक दृष्टिकोनांतून सतत लिहीत होते; असें दिसून येतें क्लॉड मॅके आणि काऊंटी कलन हे नीग्रो कवि आपल्या कवितांतून पक्षपाताचा निषेध अत्यंत आवेशानें व्यक्त करीत होते. त्याच काळांत वॉल्टर व्हाईट हा लेखक अमेरिकेंतील वांशिक पक्षपाताचें उत्साही समर्थन त्याच आवेशानें करीत होता. व्हाइट हा स्वतः एका लढाऊ चळवळीचा मोठा पुढारी होता. आणि 'रोप ॲण्ड फॅगॉट' नामक एक प्रक्षोभक ग्रंथ लिहून त्यानें मोठी ख्याति संपादन केली होती. जेम्स वेल्डन जॉन्सन या नीग्रो लेखकानें भाषेवर असाधारण प्रभुत्व पैदा केलें होतें. त्यानें लिहिलेली 'ऑटोबायॉग्रफी ऑफ ॲन एक्स–कलर्ड मॅन, नीग्रो अमेरिकन, व्हॉट नाऊ?, ब्लॅक मॅनहॅटन' हीं पुस्तकें तत्कालीन नीग्रो वाङ्‌मयांत महत्त्व पावलेलीं आहेत. विशेषतः 'अलॉंग धिस वे' या त्याच्या नामांकित आत्मचरित्रानें नीग्रो लोकांत आशादायक भविष्यकाळाविषयीं उत्साह व विश्वास निर्माण केला होता. या द्रष्टयानें दाखविलेल्या मार्गानें वाटचाल केली असतां नीग्रो दास्यमुक्त – स्वतंत्र होऊं शकेल, अशी श्रद्धा त्याच्या आत्मचरित्रानें नीग्रोमनांत निर्माण केली होती. 'गॉडस् ट्रॉम्बोन्स' या त्याच्या ग्रंथांत एका सनातनी धर्मोपदेशकाचें अभिजात दर्शन घडतें. अनेक अमेरिकन लोक मानतात, त्यापेक्षां पुष्कळच अधिक कार्य या नीग्रो धर्मोपदेशकानें धार्मिक व सामाजिक संबंधांत केलेलें आहे. लॅंग्स्टन ह्यूजेस

या नीग्रो लेखकानें ' नॉट विधाउट लाफ्टर, दि वेज ऑफ व्हाईट फोक्स, शेक्सपिअर इन हार्लेम ' हीं आणि यासारखीं अनेक सोपीं पुस्तकें लिहून परिवेष्टित दुःखावर मात करूं पाहणाऱ्या नीग्रो जीवनाचीं आनंददायक रमणीय दृश्यें चित्रित केली आहेत. शहरांत स्थायिक झालेल्या नीग्रो लोकांच्या हालअपेष्टांचीं विदारक आणि अविस्मरणीय अशीं चित्रें रिचर्ड राईटनें ' नेटिव्ह सन् ' आणि ' ब्लॅक बॉय ' नामक अप्रतिम आत्मचरित्रवजा ग्रंथांतून रेखाटलेलीं आहेत. ज्याचे ग्रंथ लाखानें खपतात, असा हा एक लोकप्रिय नीग्रो लेखक. निषेध व निराशा आणि स्वीकार व आशा या वृत्तींतील अंतर तोडण्याचा परिणामकारक यत्न करणारा आर्ना बॉटेम्प्स हा एक प्रतिभाशाली नीग्रो लेखक आहे. त्याची ग्रंथसंख्या सर्वाधिक आहे. ' गोल्डन स्लिपर्स, वुई हॅव टुमारो, दि फास्ट सूनर हाउंड, चॅरिअट इन दि स्काय ' हीं त्याचीं पुस्तकें विशेष मान्यता पावलेलीं आहेत.

पॉल लॅरेन्स डन्बार हा नीग्रो लेखक गेल्या शतकाच्या अखेरीस वयाच्या केवळ तिसाव्या वर्षी मरण पावला. समकालीन नीग्रो लेखकांपेक्षां सर्वथैव आगळें असें त्याचें वाङ्मयीन व्यक्तिमत्व होतें. त्याचें सर्व लेखन प्रादेशिक नीग्रो बोलींत लिहिलेलें आहे. त्याच्या मतानें त्याचीं अभिजात भावगीतें सर्वाधिक महत्त्वाचीं होत. आणि त्याचें हें मत विचारांतीं रसिकांस पटण्यासारखें आहे. ' ओक अँड आयव्ही, लिरिक्स ऑफ दि लोली लाईफ' व ' मेजर्स अँड मायनॉर्स ' या संग्रहांत समाविष्ट केलेली त्याची कविता विशिष्ट कल्पकतेनें नटलेली आहे. अमेरिकेंतील वांशिक संबंधांत जो विनोद दृष्टोत्पत्तीस येतो, त्याचें दर्शन त्याच्या काव्यांतून घडतें. त्याच्या काव्यांत कटुता नाहीं, गोडवा आहे.

कालांतरानें नीग्रो लेखक आत्मसंस्था समाधींतून जागे होत आहेत. केवळ स्वतःच्या दुःखांत चूर झालेले स्वयंकेंद्र नीग्रो लेखक आज अधिक व्यापक अशा भूमिकेवर स्थिर होण्याचा यत्न करीत आहेत. आणि सर्व अमेरिकन लोकांच्या चित्तांस स्पर्श करतील, अशा विषयांसंबंधीं लिहूं लागले आहेत. एक काळ असा होता कीं जागृत नीग्रो लेखक स्वतःच्या वंशवैशिष्ट्यांचा

स्वतःस व जगास विसर पडावा म्हणून आपल्या लेखनांत वांशिक विषय बुद्धिपुरःसर टाळीत. वंशविशिष्ट विषयांकडे ते एक दुर्लक्ष तरी करीत किंवा त्या विषयासंबंधीं लिहावयाची इच्छा असली, तरी तो एक विषय डावलून लिहिण्याचा ते यत्न करीत. ही दुर्दैवी परिस्थिति आतां सुदैवानें पालटली आहे. नवा नीग्रो लेखक आशेनें भारलेला आहे. अमेरिकन साहित्यसृष्टीचा तो एक अविभाज्य घटक झाला आहे. ज्या विषयांत त्याला विशेष रस वाटतो, त्या विषयासंबंधीं तो आज मोकळेपणानें लिहीत आहे. स्वतःच्या कल्पना व्यक्त करण्यासाठीं आज तो धडपडत आहे. केवळ निषेधाच्या मर्यादित परिघांत फिरण्याचा नाद त्यानें आतां सोडून दिला आहे. स्वतःच्या अपेक्षांचा विचार तो आतां अलिप्त वृत्तीनें करतो; आणि भविष्याच्या आशेनें भारावल्यागत लिहितो.

आज तुम्ही पाहाल, तर सर्वाधिक लोकप्रिय अमेरिकन लेखकांच्या यादींतील एक अग्रगण्य नांव फ्रँक यर्बी या नीग्रो लेखकाचें हटकून आढळतें. अमेरिकन कथाकारांत आज त्याचें नांव सुप्रतिष्ठित झालेलें दिसतें. 'फ्लड-टाइड, दि व्हिक्सन, फॉक्सेस ऑफ हॅरो, ए वूमन कॉल्ड फॅन्सी' इत्यादि त्याच्या कथांतून नीग्रो जीवनाची पार्श्वभूमि आहे, नाहीं असें नाहीं; पण तो अशा कांहीं सामर्थ्यानें, चातुर्यानें आणि सूक्ष्म गूढार्थानें लिहितो कीं खुद्द नीग्रो वाचकांस सुद्धां हा लेखक आपल्यासारखाच एक नीग्रो आहे, या वस्तुस्थितीचा विसर पडतो. जेम्स बाल्डविनच्या 'नोटस् ऑफ ए नेटिव्ह सन' नामक ग्रंथांत एका असामान्य शैलीचा प्रत्यय घडतो. केवळ निषेधाचे बंध तोडून एकूण अमेरिकन जीवनाशीं एकरूप होण्याचा यत्न येथें स्पष्ट दिसतो. याशिवाय जे सॉंडर्स रेडिंग्जच्या 'दे केम इन चेन्स, अमेरिकन्स फ्रॉम आफ्रिका, नो डे ऑफ ट्रायंफ;' विल्यम गार्डनर स्मिथच्या 'दि लास्ट ऑफ दि कॉंकरर्स' व 'अँगर अॅट इनोसन्स' ओवेन डॉडसनच्या 'बॉय अॅट दि विंडो' आणि एलेन टॅरीच्या 'दि रनअवे एलेफंट' इत्यादि लहान मुलांसाठीं लिहिलेल्या पुस्तकांतून नीग्रो लेखकांच्या विशिष्ट सामर्थ्याचा साक्षात्कार घडतो, आणि लेखनाच्या क्षेत्रांतील त्यांचें भविष्य उज्वल आहे, याची खात्री पटते.

एकंदर नीग्रो लोकसंख्येचा विचार करतां धंदेवाइक नीग्रो लेखकांची संख्या केवळ अत्यल्प आहे, असें दिसून येतें. पण लोकसंख्येच्या मानानें अमेरिकन साहित्यांत नीग्रो लेखकांनीं घातलेली भर उल्लेखनीय व मौल्यवान आहे. लेखनांत व्यक्त झालेल्या त्यांच्या प्रतिभागुणांचें स्वागत अमेरिकन जनतेनें अंतःकरणपूर्वक केलेलें आहे. अनेक नीग्रो लेखकांच्या लेखनानें अमेरिकन लोकांच्या मनांत स्थान मिळविलेलें आहे. त्यावरून भविष्यकाळांत अनेक सव्यसाची, धंदेवाइक नीग्रो लेखक निपजतील, असें कोणीं भविष्य वर्तविलें, तर तें चुकीचें ठरणार नाहीं.

ह्यू एच. स्माइथ

# क्रीडाक्षेत्रांतील मानकरी विजेते.

अमेरिकेंत मर्दानी खेळाडूंस जो मान मिळतो, तो केवळ असाधारण होय. एखाद्या संशोधकापेक्षां त्याच्या नांवाचा बोलबाला किती तरी अधिक होतो. राष्ट्राध्यक्षांपेक्षां त्याला अधिक प्रसिद्धि मिळते. गायक कलावंतांपेक्षां अधिक मोठा अनुयायी वर्ग त्याला लाभतो. आणि एखाद्या विजयी सेनानीपेक्षां त्याचा गौरव अधिक मुक्तकंठानें गायिला जातो. अशा या देशांत क्रीडापटु नीग्रो खेळाडूंस अमेरिकन लोकांनीं डोक्यावर घेऊन नाचवावें, हें उचितच होय. नीग्रो क्रीडापटूंचे अनन्यभक्त या देशांत या टोकापासून त्या टोकांपर्यंत कोटचवधि विखुरलेले आहेत. वृत्तपत्रांतील क्रीडा–विभागांत वा अमेरिकन लोकांच्या अंत:करणांत नीग्रो खेळाडूंनीं मनस्वी सन्मानाचें स्थान प्राप्त करून घेतलें आहे. जेस ओवेन्स, जो लुई, जॅकी रॉबिन्सन, हेन्री आर्मस्ट्रॉंग, विली मेज, फ्रिट्झ पोलार्ड, गूज टाटुम, हे आणि त्यांच्यासारखे इतर अनेक नीग्रो खेळाडू क्रीडा जगतांत अजरामर समजले जातात; आणि त्यांच्या साहसकृत्यांचे पोवाडे मुक्तकंठानें गाण्यांत अमेरिकन लोकांना मनस्वी अभिमान वाटतो.

१९३९ सालीं एडविन बी. हेंडर्सननें ‘ दि नीग्रो इन स्पोर्टस् ’ नामक एका सुप्रसिद्ध क्रीडाग्रंथांत नीग्रो क्रीडापटूंच्या पराक्रमाची नोंद करून ठेविलेली आहे. ग्रंथगत झालेला असा नीग्रो–क्रीडेचा हा पहिलाच विचारणीय ग्रंथ. त्यानंतर गेल्या सोळा वर्षांत नीग्रो खेळाडूंचें कर्तृत्व अधिकच देदीप्यमान झालेलें दिसतें. विविध क्रीडाक्षेत्रांतील नीग्रो खेळाडूंची संख्या अधिक वाढली आहे.

अनेक जागतिक विक्रम त्यांनीं प्रस्थापित केले आहेत. आंतरराष्ट्रीय क्रीडा-स्पर्धांच्या प्रसंगीं त्यांनीं अमेरिकेस अजिंक्यपद प्राप्त करून दिलें आहे. आणि पर्यायानें अमेरिकेंतील एकरूप वांशिक संबंध अखिल जगाच्या निदर्शनास आणले आहेत. त्याचप्रमाणें या देशाचे प्रतिनिधि या नात्यानें देशोदेशीं फिरून अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणास त्यांनीं प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे. क्रीडाक्षेत्रांतील नीग्रो पराक्रमाची संपूर्ण कहाणी सांगावयाची योजिलें, तर हेंडर्सनच्या ग्रंथासारखे अनेक ग्रंथ आतां लिहावयास हवेत, अशी स्थिति आहे. खेळ कोणताहि असो, जेव्हां म्हणून योग्य संधि उपलब्ध झाली, तेव्हां नीग्रो क्रीडापटूंनीं आपलें कौशल्य, चातुर्य, सामर्थ्य, बुद्धिचापल्य आणि आदर्श खेळाडूपणा, या अंगभूत गुणांचें प्रात्यक्षिक सर्वत्र दाखविलेलें आढळून येतें. नीग्रो क्रीडापटूंनीं क्रीडाक्षेत्रांत नवा इतिहास घडविला आहे. अशा स्थितींत प्रस्तुत प्रकरणाच्या मर्यादेंत केवळ त्यांच्या अत्युच्च विक्रमांची नोंद करणेंच शक्य आहे.

मुष्टियुद्धांत जो लुईनें गेलीं अकरा वर्षें हेवीवेट स्पर्धेंत अजिंक्यपद सतत टिकवून ठेविलें आहे. जॅक जॉन्सन आणि हेन्री आर्मस्ट्रॉंग या दोघांनीं मुष्टियुद्धाच्या तीन विविध विभागांत अजिंक्यपद मिळविलें होतें. ‘शुगर’ रे रॉबिन्सन हा वेल्टर आणि मिडलवेट स्पर्धांतील अजिंक्यपदाचा अधिकारी होता. सॅम लँगफर्ड, हॅरी विल्स आणि ‘जर्सी’ जो वॉलकॉट हे मुष्टियोद्धे जगभर प्रसिद्ध आहेत. यांजपैकीं कांहीं जण केवळ अजिंक्यपदांचे अमेरिकन विजेते होते, हें तर खरेंच; पण त्या सर्वांनीं मिळून मुष्टियुद्धाच्या क्षेत्रांत अमेरिकेस सर्वोच्च स्थान प्राप्त करून दिलें. मुष्टियुद्धास प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठीं जे सर्वाधिक झटतात, त्यांना एडवर्ड जे. नील ॲवॉर्ड देण्यांत येतें. मुष्टियुद्धाच्या जगांत हा सर्वोच्च मान समजला जातो. रे रॉबिन्सन आणि जो वॉलकॉट दोघेहि नील ॲवॉर्डचे मानकरी होते. १९५१ सालांत जगांतील एकूण आठ अजिंक्यपदांपैकीं चार अजिंक्यपदांचे विजेते नीग्रो अमेरिकन्स आहेत—वॉलकॉट, रॉबिन्सन, जिमी कार्टर व सँडी सॅडलर. याशिवाय कित्येक तरुण नीग्रो मुष्टियोध्यांनीं गोल्डन ग्लोव्हज् सामन्यांत आणि आंतर-राष्ट्रीय ऑलिंपिक स्पर्धांत अजिंक्यपदें मिळविलेलीं आहेत.

अमेरिकेंतील कॉलेजच्या विद्यार्थ्यांत फूटबॉलचा खेळ सर्वाधिक लोकप्रिय आहे. महाविद्यालयांच्या परिसरांत कांहीं निग्रो खेळाडूंच्या नांवाचा केवळ उच्चारसुद्धां विद्यार्थ्यांच्या स्तुतिपाठास कारण होतो. एक दक्षिण राज्यांचा अपवाद वजा केला, तर अखिल राष्ट्रांत असें एक क्रीडाधिवेशन भरत नाहीं जेथें नीग्रो खेळाडू सर्वोच्च सन्मानाचे अधिकारी म्हणून गौरविले जात नाहींत. फूटबॉलच्या क्षेत्रांतील अत्युच्च सन्मान म्हणजे 'ऑल–अमेरिकन' ही पदवी होय. कित्येक नीग्रो खेळाडू 'ऑल–अमेरिकन' पदवीच्या सन्मानास पात्र ठरलेले आहेत. भूतकाळांत पॉल रोबसन, एड बेल आणि डयूक स्लेटर यांचीं नांवें फुटबॉलच्या सामन्यांतून विशेष गाजलेलीं होतीं. यांजपैकीं डयूक स्लेटर याची निवड 'फूटबॉलहॉल ऑफ फेम' साठीं एकमतानें करण्यांत आली होती. फूटबॉलच्या क्षेत्रांतील हा सर्वोच्च सन्मान समजला जातो. अलीकडच्या काळांत ब्रड हॉलंड, ऑली मॅटसन, क्लॉड 'बडी' यंग जॉर्ज टालिआफेरो, मारियन मोटले आणि जॉनी ब्राईट या खेळाडूंनीं फूटबॉलच्या खेळांत अलौकिक प्रावीण्य संपादन केलें आहे. १९५१ सालीं जॉनी ब्राईटनें ५९०३ यार्ड अंतर तोडून या देशांतील अत्युच्च विक्रम प्रस्थापित केला आणि एक नवा इतिहास घडविला. ज्याप्रमाणें महाविद्यालयांच्या क्रीडाक्षेत्रात नीग्रो खेळाडूंनीं अद्वितीय विक्रम केले आहेत त्याचप्रमाणें धंदेवाईक सामन्यांत सुद्धां त्यांनीं असामान्य लौकिक संपादन केला आहे.

बास्केट बॉलच्या खेळांत नीग्रो खेळाडू अलीकडेच उतरले आहेत. पण त्या मानानें या खेळांतसुद्धां फार लौकर त्यांनीं आपला अधिकार प्रस्थापित केला आहे. गेल्या कांहीं थोडया वर्षांत सॅन् फ्रॅन्सिस्कोचा बिल रसेल, डकेनचा डिक रिकेट्स्, आणि सेंट फ्रान्सिसचा मॉरिस स्टोक्स हे खेळाडू ऑल-अमेरिकन टीम्समध्यें निवडले गेले आहेत. जगांतील सर्वांत अधिक प्रसिद्ध अशी जी बास्केट बॉल टीम आहे, ती नीग्रो खेळाडूंचीच आहे – 'हार्लेम ग्लोब ट्रॉटर्स'. जगभर देशांदेशांतून या टीमनें दौरे काढले आहेत. जेथें जेथें म्हणून या टीममधील नीग्रो खेळाडू गेले, तेथें तेथें अभूतपूर्व उत्साहानें लोकांनीं त्यांच्या क्रीडानैपुण्याचें कौतुक व स्वागत केलें आहे. क्रीडाशौकिन

लोकांचीं अंत:करणें या खेळाडूंनीं आपल्या कौशल्यानें जिंकलीं आहेत. रिओडि-जानेरो येथें त्यांचा खेळ बघण्यासाठीं पन्नास हजार लोक जमले होते, तर बर्लिनमध्यें पाऊण लाख लोक त्यांच्या स्वागतासाठीं गोळा झाले होते. जगांत कोठेंहि त्यांचा खेळ असो, गर्दी ही ठेवलेलीच. दक्षिण राज्यांत सुद्धां ! १९५०-५१ च्या सीझनमध्यें फक्त सहा सामने ते हरले, तर ३३४ सामन्यांत त्यांनीं विजय संपादन केला.

इतर कोणत्याहि खेळांपेक्षां धांवण्याच्या शर्यतींत नीग्रो खेळाडू अधिक मोठ्या संख्येनें भाग घेतात व चमकतात. धांवण्याच्या शर्यतींत त्यांचा हात धरणारे – किंवा त्यांचे पाय मागें ओढणारे, असें म्हणा हवें तर, – खेळाडू जगांत कोठें नाहींत. धांवण्याच्या शर्यतींच्या अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्यें नीग्रो खेळाडूंनीं अमेरिकेस अजिक्यपद प्राप्त करून दिलें आहे. १९०४ सालीं प्रथम नीग्रो खेळाडूंनीं ऑलिंपिक स्पर्धेत भाग घेतला. त्या सालापासून आज-तागायत प्रत्येक वर्षी अमेरिकन टीममध्यें नीग्रो खेळाडूंचा अंतर्भाव केला गेला आहे. १९३६ सालीं जर्मनींत ऑलिंपिक सामने घेण्यांत आले. त्या सालीं तेथें जेस ओवेन्स या नीग्रो खेळाडूनें इतिहास घडविला. धांवण्याच्या संबंधांत ओवेन्स हा जगांतील सर्वांत अधिक प्रसिद्ध असा खेळाडू होय. त्या वर्षीं त्यानें धांवण्याच्या वेगवेगळ्या शर्यतींत चार सुवर्ण-पदकें मिळविलीं, आणि आपल्या टीममधील नीग्रो सहकाऱ्यांच्या साहाय्यानें इतर कित्येक शर्यतींत पहिला क्रमांक प्रस्थापित केला. ओवेन्स एकामागून एक अनेक शर्यतींत विक्रम प्रस्थापित करीत आहे, हें बघून हिटलरचें पित्त खवळलें; कारण हा कुप्रसिद्ध हुकुमशहा वांशिक श्रेष्ठतेच्या वल्गना नेहमींच करीत असे. आर्यन वंशाच्या तथाकथित श्रेष्ठतेस ओवेन्सनें सुरुंग लावला, आणि अनेक ‘ आर्यन ’ वीरांस त्यानें सहज धूळ चारली. ओवेन्सचा हा पराक्रम बघून हिटलरचा संताप अनावर झाला व रागारागानें स्टेडियम सोडून तो निघून गला. त्या नीग्रो खेळाडूंना हिटलर तुच्छतेनें ‘ अमेरिकेचे काळे सह-कारी ’ म्हणून संबोधीत असे. पण अमेरिकन टीमचे हे नीग्रो खेळाडू खरेखरे सदस्य आहेत हें जगास कळून चुकलें होतें. त्या वर्षीं अमेरिकन टीमच्या यशानें सर्व जगाचें लक्ष वेधून घेतलें, ही गोष्ट खरी. पण त्या टीममध्यें

केवळ नीग्रो खेळाडूच होते असें नव्हे तर गोरे खेळाडू सुद्धां अनेक होते. वस्तु-स्थिति अशी होती कीं काळेगोरे इत्यादि वंशभेद लक्षांत न घेतां केवळ गुण लक्षांत घेऊनच निःपक्षपात बुद्धीनें टीममधील सर्व खेळाडू निवडण्यांत आले होते. आणि त्यांच्या संयुक्त श्रमामुळें अमेरिकन टीमला हा नेत्रदीपक विजय प्राप्त झाला होता. एडी टोलन, हॅरिसन डिलार्ड, डेहार्ड हुबार्ड, राल्फ मेटकाफ, डेव्ह आल ब्रिटन, माल व्हाइट फील्ड, जॉन बोरिकन, आणि जॉन वूड्रफ हे नीग्रो खेळाडू धांवण्याच्या शर्यतींत प्रसिद्धि पावलेले आहेत.

नीग्रो खेळाडूंनीं विविध क्रीडाक्षेत्रांत असंख्य विक्रम प्रस्थापित केले आहेत. त्या सर्वांची येथें यथाक्रम नोंद करणें केवळ अशक्य आहे. प्रस्तुत संदर्भात एक गोष्ट ठळकपणें नजरेंत भरते, ती ही कीं नीग्रो खेळाडूंच्या सहकार्यानें अमेरिकन क्रीडेची पातळी उंचावण्यास मदत केली आहे. हें क्रीडेचें क्षेत्र असें आहे कीं तेथें केवळ माणुसकीच्या अधिकारानें स्त्री-पुरुष एकत्र येतात, आणि आपलें वैयक्तिक क्रीडाकौशल्य पणास लावतात. स्पर्धा वैयक्तिक नैपुण्याची असेल, तर प्रत्येक खेळाडू स्वतःचें शक्तिसर्वस्व एकटाच पणास लावतो. सांघिक स्पर्धा असेल तर प्रत्येक खेळाडूनें आपलें सर्व नैपुण्य पणास लावून संघाच्या यशास शक्य तें सर्व सहकार्य द्यावें लागतें. ज्या ज्या क्रीडाक्षेत्रांत नीग्रो खेळाडूंस योग्य ती संधि व आवश्यक तें प्रोत्साहन मिळालेलें दिसतें, त्या त्या क्रीडाक्षेत्रांत नीग्रो खेळाडूंनीं क्रीडेच्या इतिहासांतील कांहीं उदात्त प्रकरणें लिहून ठेविलेलीं आढळतात.

नीग्रो लोकांनीं अमेरिकन समाजाशीं एकरूप व्हावें, या हेतूनें जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत जे अनेकविध यत्न होत आहेत, त्यांजपैकीं क्रीडा क्षेत्रांतील अभावित यत्न पुष्कळच परिणामकारक ठरलेले दिसतात. नीग्रो खेळाडूंनीं पक्षपाताच्या भिंती उध्वस्त करण्यांत फार मोठें यश मिळविलें आहे. क्रीडा-क्षेत्रांत त्यांना जी असामान्य प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे, त्यामुळें इतर क्षेत्रांत सुद्धां कळत न कळत निःपक्षपात वर्तनास उत्तेजन मिळत आहे. नीग्रो खेळाडूंचें वर्तन नेहमींच सुसंस्कृत असल्यामुळें त्या वर्तनाचा प्रभाव सर्वत्र कमी अधिक प्रमाणांत जाणवल्याशिवाय राहत नाहीं. पोहण्यासारख्या कांहीं थोड्या क्रीडाक्षेत्रांत नीग्रो खेळाडूंस अजूनपर्यंत योग्य तो मान संपादन

करण्याच्या यत्नांत अनेक अडचणी उपस्थित झालेल्या दिसतात, ही गोष्ट खरी; पण गोल्फ, टेनिस, आणि बोलिंग या राष्ट्रीय खेळांत त्यांचा प्रवेश सावकाश पण निश्चयानें होत आहे व जाणवत आहे. बाकी सर्व महत्त्वाच्या खेळांमध्यें त्यांचें असाधारण नैपुण्य प्रगट होऊन चुकलें आहे. आणि पूर्वीच्या प्रादेशिक विभागांमध्यें कोणत्याहि प्रकारच्या निःपक्षपात क्रीडास्पर्धा आजवर योजिल्या जाण्याची शक्यता संभवत नव्हती, तेथें सुद्धां आज विविध क्रीडास्पर्धांमध्यें काळे खेळाडू गोऱ्यांच्या बरोबरीनें भाग घेत आहेत, असें दिसून येतें. क्रीडाक्षेत्रांत पक्षपातास सहसा उत्तेजन मिळत नाहीं, याचें कारण उघड आहे. अज्ञान आणि असभ्य वर्तन क्रीडाक्षेत्रांतून आपोआप हद्दपार होतें, असा अनुभव आहे. कोणत्याहि खेळांत वैयक्तिक वा सांघिक नैपुण्य पैदा करावयाचें म्हटलें, तर खेळाडूंमध्यें परस्परांविषयीं योग्य तो आदरभाव असावा लागतो. स्पर्धेत सुद्धां मैत्रीचें वातावरण आवश्यक असतें आणि सहकार्याशिवाय कोणताच खेळ रंगत नाहीं.

खरें म्हणजे बेसबॉलच्या खेळांत नीग्रो खेळाडू अगदीं अलीकडेच भाग घेऊं लागले आहेत. पण या खेळांतील त्यांचें वाढतें नैपुण्य व वजन आजच लोकांच्या प्रत्ययास येऊन चुकलें आहे. बेसबॉलमधील नीग्रोचा प्रवेश व त्या खेळांतील त्याचें कर्तृत्व या संबंधांतील सर्वच घटना विलक्षण नाटयात्म आहेत. बेसबॉल हा अमेरिकन लोकांचा सर्वांत आवडता खेळ आहे. पण अगदीं परवांपर्यंत – १९४६ सालापर्यंत – बेसबॉलच्या मायनॉर व मेजर संघांतून नीग्रो खेळाडूंस खेळण्याची बंदी होती. १९४६ सालीं ब्रुक्लिन डॉजर्सचा प्रमुख ब्रांच रिकी यानें आपल्या ‘ मॉण्ट्रिअल मायनॉर लीग फार्म टीम ’मध्यें जॅकी रॉबिन्सन या नीग्रो खेळाडूचा अंतर्भाव करण्याचें शहाणपण व धैर्य दाखविलें. पुढच्याच सीझनमध्यें जॅकीचा अंतर्भाव मेजरलीग टीम-मध्यें करण्यांत आला. खेळांतील बिकट प्रसंगीं त्यानें दाखविलेलें विलक्षण चातुर्य आणि केवळ अल्पावधींतच या खेळावर त्यानें प्रस्थापित केलेलें अद्वितीय प्रभुत्व, यांजमुळें इतर नीग्रो खेळाडूंसाठीं मार्ग खुला झाला. जॅकीचें नांव तर लगेच सर्वतोमुखीं झालें. आणि अमेरिकन क्रीडाषौकीनांच्या लेखीं तर जॅकीसारखा अन्य कोणी खेळाडू जणुं झालाच नव्हता, असें दिसतें.

बेसबॉलच्या जगांतील अधिदैवताचा मान आज जॅकीचा आहे. मेजर लीग बेसबॉल टीममध्यें जॅकी केवळ तीन वर्षेंच खेळला होता, त्या वेळीं 'बेसबॉल रायटर्स ॲसोसिएशन ऑफ अमेरिका' या संस्थेनें 'मोस्ट व्हॅल्युएबल प्लेअर' म्हणून त्याची निवड केली. बेसबॉलच्या जगांतील हा सर्वोच्च सन्मान होय.

सदांचें बंद असलेलें हें एक दार जॅकी राबिन्सननें ठोठावून उघडल्यानंतर त्या दारांतून अनेक – आजच्या प्रथितयश–नीग्रो खेळाडूंनीं प्रवेश केला. आणि त्यांजपैकीं कांहीं व्यक्तिगत नैपुण्यामुळें महत्पदास चढले. 'न्यूयॉर्क जायंटस्'चे मॉंटी इर्व्हिन आणि बिली मेज, 'डॉजर्स'चे डॅन न्यूकोंब, ज्यूनिअर गिलिअम, 'क्लीव्हलॅंड इंडियन्स'चे लॅरी डोबी आणि आल स्मिथ 'शिकागो कब्ज'चा अर्नी बॅंकस्, 'शिकागो व्हाइट सॉक्स'चा ओरेस्टिस मिनोसो व 'न्यूयॉर्क यांकीज'चा एलस्टन हॉवर्ड हे त्यांजपैकीं ोत. उपर्युक्त खेळाडूंपैकीं कांहीं जणांनीं या खेळांतील अत्युच्च सन्मान संपादिले आहेत. कांहीं जणांनीं बॅटिंगचें अजिक्यपद पैदा केलें आहे, तर 'रूकी ऑफ दि ईअर'त 'मोस्ट व्हॅल्युएबल प्लेअर' म्हणून कित्येकांची निवड झाली आहे. नीग्रो खेळाडूंच्या अप्रतिम नैपुण्याचें व अलौकिक चापल्याचें प्रात्यक्षिक बघण्यासाठीं लीग सामन्यांना तोबा गर्दी व्हावयास लागली आहे. आणखी कित्येक होतकरू तरुण नीग्रो खेळाडू आज मायनॉर लीग्जमध्यें खेळत आहेत. अल्पावधींत त्यांचीं नांवें सर्वतोमुखीं होतील, यांत शंकाच नाहीं. बेसबॉलचा दर्जा नीग्रो खेळाडूंमुळें उंचावला आहे आणि त्या खेळाची प्रतिष्ठा व लोकप्रियता वाढण्यास त्यांच्यामुळें मदत झाली आहे. खेळाच्या दृष्टीनें हें इष्टच आहे, आणि सामाजिक संबंध सुधारण्याच्या दृष्टीनें हें इष्टतर आहे.

विविध क्रीडाक्षेत्रांत अनेक नीग्रो खेळाडू चमकले व जगभर त्यांची ख्याति झाली, या घटनेचें श्रेय जसें त्यांच्या यत्नांस व शहाणपणास द्यावयास हवें, त्याचप्रमाणें त्यांचें ज्यांनीं मनःपूर्वक स्वागत केलें, बिकट प्रसंगीं त्यांना दिलासा दिला, त्यांच्याशीं निःपक्षपात वर्तन केलें व संघभावनेनें त्यांच्या गुणांची कदर करून उत्तेजन दिलें, अशा अनेक गोऱ्या खेळाडूंस व बेसबॉल संस्थांच्या कार्यकारी संयोजकांस पण या श्रेयाचे वाटेकरी समजावयास हवें.

केवळ त्यांच्या शहाणपणाच्या धोरणामुळें नीग्रो खेळाडूंस ही संधि उपलब्ध होऊं शकली, हें निर्विवाद होय. काळे खेळाडू व त्यांचे गोरे साहाय्यकर्ते यांचेंच केवळ हें श्रेय आहे, असें नाहीं. बेसबॉल खेळणारे व बघणारे असंख्य अज्ञात क्रीडाषौकीन देशभर सर्वत्र पसरलेले आहेत. त्यांची वृत्ति सामान्यतः न्यायाची आणि औदार्याची आहे. प्रामाणिक यत्नाचें व कर्तृत्वाचें स्वागत व कौतुक करावयास ते सदा सिद्ध आहेत. त्यांचा पिंड लोकशाहीचा आहे. खेळाडचा वर्ण, वंश, देश वा धर्म कोणताहि असो, त्याच्या क्रीडाप्रावीण्याचा आदरसत्कार करण्यासाठीं ते नेहमींच उत्सुक आहेत. सर्वाधिक श्रेय या लोकांचें आहे. बेसबॉलच्या एका खेळांतच या उदात्त प्रवृत्तींचें दर्शन घडलें असें नाहीं, तर कोणत्याहि खेळाच्या संबंधांत हें असेंच आहे.

---

रॉबर्ट एम्. साइक्स

# राष्ट्राच्या संरक्षण--संबंधांतील समानता :

अमेरिकेंतील वांशिक संबंधाच्या इतिहासाचें एक अत्यंत मनोरम प्रकरण राष्ट्रीय सैन्याच्या संबंधांत लिहिलें गेलें आहे. हें प्रकरण उज्वल व उद्बोधक असें आहे. जें कधीं होणार नाहीं असें वाटत होतें, तें सैन्यानें करून दाखविलें. किंबहुना एक वेळ सैन्यास सुद्धां जें अशक्य वाटत होतें, तेंच नेमकें सैन्यानें करून दाखविलें, असें म्हणणें उचित होईल. एक वेळ सेनाधिकारी असें म्हणत असत कीं सैन्यांतून पक्षपात कधींच हद्दपार होणार नाहीं, पण आज पाहिलें तर त्याच सैन्याचें रंगरूप पार पालटून गेलें आहे आज जेथें जेथें म्हणून सैन्याचे तळ आहेत, तेथें तेथें काळेगोरे सैनिक खांद्याला खांदा भिडवून एकत्र काम करीत आहेत, असें दिसतें. या भूमीला ज्या लोकांनीं संपन्न केलें आणि या देशाचें नांव ज्यांनीं महत्पदास चढविलें, असे हे या भूमीचे व देशाचे सुपुत्र या एका क्षेत्रांत तरी निदान आज समान हक्क भोगीत आहेत.

आज तरी निदान लोकशाहीच्या कारभारांतील पुरोगामी विचार-प्रणालीचा हा सर्वांत मोठा विजय समजावा लागेल. देशाच्या संरक्षणासाठीं जे बद्धपरिकर आहेत, त्यांच्या घटनेंत आज कोणत्याहि पक्षपातास वा भेद-भावास थारा नाहीं, अशी वस्तुस्थिति आहे. पण आजची वस्तुस्थिति आकारांत आली ती सहजगत्या आपोआप निर्माण झाली, असें नव्हे. त्यासाठीं झटून यत्न करावयास लागले. ता. ८ डिसेंबर १९४१ रोजीं दुसऱ्या महायुद्धाची घोषणा करण्यांत आली, त्या दिवशीं कांहीं चिताग्रस्त नीग्रो

वार्ताहरांस उद्देशून युद्धखात्याच्या एका अधिकृत प्रवक्त्यानें जें निवेदन केलें, त्याचा मथितार्थ येणेंप्रमाणें :—' सैन्याची छावणी म्हणजे कांहीं सामाजिक संशोधनाची प्रयोगशाळा नव्हे. प्रत्येक वंशाच्या आणि धर्माच्या प्रतिनिधींच्या सर्व मागण्या मंजूर करावयाच्या आणि त्यांचे सर्व प्रश्न निकालांत काढावयाचे असें म्हटलें, तर तो प्रयोग सैन्याच्या एकूण शिस्तीस, व्यवस्थेस आणि निष्ठेस घातक ठरेल. परिणामीं अपेश आणि सर्वनाश अटळ आहे, हें निश्चित समजा. '

यानंतर केवळ थोडयाच वर्षांत सैन्यांतून हरएक पक्षपाताचें उच्चाटन झालें आहे; आणि तरी सुद्धां शिस्तीस धोका पोहोंचला नाहीं, व्यवस्थेंत बिघाड झाला नाहीं, निष्ठेंत उणेपणा आला नाहीं, पदरीं अपयश आलें नाहीं कीं सर्वनाश झाला नाहीं. कसला म्हणून घात झाला नाहीं, असें अभिमानानें म्हणण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली. किंबहुना सैन्यांतील काळयागोऱ्या सैनिकांच्या अंतःकरणांत एक नवी उदात्त निष्ठा उत्पन्न झाली, असें आढळून आलें. आज सैन्यांतील काळयागोऱ्या संमिश्र पथकांचे अधिकारी योग्यतेस अनुसरून काळेगोरे हवे तसे आहेत. आजवर काळयांची ताकद देशाच्या कारणीं हवी तशी उभी राहूं शकली नव्हती. त्यामुळें देशाचा मोठाच तोटा झाला होता. आतां केवळ सैन्याची एकूण कार्यक्षमता सुद्धां आश्चर्यकारक रीतीनें वाढली आहे. पूर्वीं असा एक गैरसमज सर्वत्र प्रचलित होता कीं कर्तृत्वांत काळे उणे आहेत. तदनंतर अधिकारी संशोधकांनीं यासंबंधीं केलेलें विपुल संशोधन आज उपलब्ध झालें आहे. त्या संशोधनाचा निःसंदेह निष्कर्ष असा आहे, कीं सैन्याच्या संमिश्र दलांत एकत्र काम करणारे नीग्रो गोऱ्यांपेक्षां कर्तृत्वांत रतिमात्र कमी नाहींत. गोऱ्यांच्या बरोबरीनें नीग्रो लढूं शकतात, पराक्रम गाजवूं शकतात. आजवरचा अमेरिकन सैन्याचा इतिहास पक्षपातास उत्तेजन देणारा असा लांच्छनास्पद होता. आतां सैन्यांत सर्वत्र निःपक्षपात वातावरण आहे. या क्रांतिकारक घटनेचे परिणाम भविष्यकाळांत फार दूरवर पोहोंचतील आणि बदलत्या परिस्थितीस अनुरूप अशी सैन्याची पुनर्रचना पुरोगामी तत्त्वज्ञानास मान्यता देऊन करावी लागेल. अमेरिकन सैन्याच्या घटनेंत ही जी क्रांति घडून आली, ती कांहींएक गाजा-

वाजा न करतां, शांततेच्या मार्गानें घडून आली. या परिवर्तनांत प्रक्षोभ-जनक असा प्रकार क्वचित्‌च कोठें घडून आला. सैन्यांत काळ्यागोऱ्यांची सरमिसळ केलीत, तर याद राखून राहा. त्यामुळें दंगेधोपे माजतील, बंडें होतील आणि काय काय अनिष्ट घडेल, असें भविष्य जे कोणी वर्तवीत होते, त्यांची भविष्यवाणी जें कांहीं प्रत्यक्ष घडलें, त्या घटनेनें संपूर्ण खोटी पडली. सैन्यांतील एकीकरणाच्या मागणीचा सर्वांत मोठा पुरस्कर्ता माजी राष्ट्राध्यक्ष ट्रुमन हेच होते. सैन्यांतील पक्षपात रद्द करण्यासाठीं त्यांनीं मनस्वी यत्न केले. सैन्यांतील एकीकरणाच्या घटनेस अनुलक्षून ट्रुमन त्यावेळीं म्हणाले : 'अमेरिकेच्या इतिहासांतील ही सर्वांत मोठी घटना होय.'

अमेरिकेच्या सैन्यांत पक्षपाताचा अंमल गेलीं २०० वर्षें जारी होता. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं दोन शतकें दृढमूल झालेला सैन्यांतील पक्षपात अल्पावधींतच समूळ नाहींसा झाला. हें कां व कसें घडलें, त्याचा इतिहास सांगण्यासारखा व अभ्यासण्यासारखा आहे. या इतिहासापासून अनेक धडे शिकतां येतील. या देशांत खरी लोकशाही प्रस्थापित करावयाची असेल, तर सैन्य–प्रकरणांतील हे धडे लोकव्यवहाराच्या अनेक मागासलेल्या क्षेत्रांत पुन: पुन: गिरवावे लागतील. इतिहासाच्या मार्गदर्शनापासून पुष्कळ शहाण-पणा शिकतां येईल. हा हेतु मनांत धरून तो सर्व इतिहास येथें संक्षेपानें सादर करण्यांत येत आहे.

या देशांतील पहिल्या क्रांतियुद्धापूर्वीं प्रस्तुत इतिहासांतील पहिली घटना घडली. १७७० सालीं बोस्टनमध्यें जी इतिहासप्रसिद्ध कत्तल झाली, त्या कत्तलींनें जो पहिला अमेरिकन बळी पडला, तो एक नीग्रो गुलाम होता. त्याचें नांव क्रिस्पस अॅटक्स. मॅसॅच्युसेटस् राज्यांतून तो पळून आला होता. १८१२ सालच्या युद्धांत जेव्हां ब्रिटिशांनीं न्यू ऑर्लीन्सला वेढा घातला होता, तेव्हां जनरल अँड्र्यू जॅक्सननें शहराच्या संरक्षणास धांवून येण्यासाठीं मुक्त नीग्रो लोकांस आवाहन केलें होते. लुईसिआना राज्याचा गव्हर्नर क्लैबोर्न याला उद्देशून लिहिलेल्या एका इतिहासप्रसिद्ध पत्रांत जॅक्सन म्हणतो : "नीग्रो लोक एक आपल्या बाजूचे तरी असतील किंवा आपल्या विरुद्ध तरी असतील. तुम्ही त्यांच्या निष्ठेविषयीं शंका घेतलीत कीं ते तुमचे शत्रु झालेच

म्हणून समजा. माझें तुम्हांला असें सांगणें आहे कीं त्यांना विश्वासांत घ्या. आणि या देशाच्या प्रत्येक हितसंबंधास ते आपुलकीनें जखडले जातील. '— त्यावेळीं ६०० नीग्रो लोक या हांकेस ओ देऊन धांवून आले. आणि त्यांच्या-पैकीं कित्येकांनीं आपल्या प्राणांचें बलिदान केलें. न्यू ऑर्लीन्सचा वेढा उठल्यावर जनरल जॅक्सननें त्यांच्या असामान्य शौर्याची प्रशंसा केली. स्पॅनिशअमेरिकन युद्धाच्या वेळीं नीग्रो घोडेस्वारांचीं चार पथकें गोऱ्यांच्या बरोबरीनें क्युबामध्यें सान जुआन हिलच्या लढाईंत लढलीं होतीं. त्या वेळीं 'वॉशिंग्टन पोस्ट'च्या वार्ताहरानें आपल्या पत्रास केलेल्या तारेंत म्हटलें होतें–'या वेळीं नीग्रो घोडेस्वार नसते, तर रुझवेल्टच्या साहसी घोडेस्वारांची एकजात कत्तल उडाली असती.' जेव्हां जेव्हां परकीय आक्रमणाचा धोका निर्माण झाला होता, तेव्हां अमेरिकन नीग्रो देशाच्या संरक्षणासाठीं लढण्यास सदा तत्पर आणि उत्सुक होते–जरी काळ्यांच्या अलग पथकांतून लढण्याचा प्रसंग आला तरी !

पहिल्या महायुद्धाच्या वेळीं ३६९ वें पायदळ पथक केवळ नीग्रो सैनिकांचें होतें. या पथकाचा अधिकारी मात्र गोरा कर्नल विल्यम हेवर्ड हा होता. अवश्य तें सर्व युद्धशिक्षण या नीग्रो पथकास देण्यांत आलें होतें. पण ज्या वेळीं महासागर ओलांडून युद्धभूमीवर ठाकण्याचा प्रसंग उभा राहिला, तेव्हां मात्र सुप्रसिद्ध 'रेनबो डिव्हिजन' बरोबर जाण्याची या पथकास परवानगी देण्यांत आली नाहीं. हेवर्डनें कारण विचारलें असतां त्याला सांगण्यांत आलें, कीं इंद्रधनुष्याच्या रंगांत काळा रंग नाहीं ! ३६९ वी नीग्रो पलटण युरोप-मध्यें जाऊन पोहोंचल्यावर नीग्रो सैनिकांच्या हातांत कुदळ–फावडीं देण्यांत आलीं, आणि अंगमेहनतीच्या कामीं त्यांना जुंपण्यांत आलें. यापूर्वीं ज्या चार नीग्रो पलटणी युरोपच्या युद्धभूमीवर दाखल झाल्या होत्या, त्यांचें नशीब कांहीं यापेक्षां वेगळें नव्हतें. पण हेवर्डला या पक्षपाताची चीड आली व त्यानें जनरल पर्शिंगकडे तक्रार नोंदविली. मग मात्र या तुकडीला आघाडी-वर पाठविण्यांत आलें. फ्रेंच हुकुमतींत ही पलटण होती. सतत १९१ दिवस ही पलटण गोळ्यांच्या भडिमारांत अविचल उभी होती. त्या काळांत एक तसूभर सुद्धां हे नीग्रो सैनिक मागें हटले नाहींत. पहिल्या महायुद्धांत अमेरिकन सैन्यांतील अन्य कोणत्याहि एका पलटणीला एवढ्या दीर्घकाळ पर्यंत अग्निवर्षावांत सतत उभें राहावें लागलें नव्हतें.

अर्थातच अतुलनीय शौर्याचें हें प्रात्यक्षिक कांहीं प्रातिनिधिक नव्हतें. नीग्रो सैनिकांच्या ज्या गोष्टी कानांवर नेहमीं येत त्या मुख्यत्वेंकरून त्यांच्या भ्याडपणाविषयीं असत. त्या वेळच्या युद्धाच्या परिभाषेंत बोलावयाचें, तर, अग्निवर्षावांत नीग्रो सैनिक वितळून जात. म्हणजे याचाच अर्थ असा कीं शत्रूनें हल्ला चढविला कीं नीग्रो सैनिक बेशिस्त पळ काढीत. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं ९२ व्या पलटणीनें असा कांहीं एक विवाद्य दुर्लौकिक कमावला होता. रणांगणावरील बेभंरवशाच्या पलटणी म्हणून त्यांचा नेहमींच–कदाचित निराधार–उल्लेख केला जात असे. ज्या वेळीं काळ्या-गोऱ्यांच्या एकीकरणाचा प्रश्न उपस्थित होत असें, त्या वेळीं एकीकरणाचे विरोधक या दुष्कीर्त नीग्रो पलटणीचा उल्लेख हटकून करावयास कधींच चुकत नसत. ९२ व्या पलटणीची जी काय दुष्कीर्ति झाली, तिचा गाजावाजा वृत्तपत्रांनीं नको इतका केला. तेव्हां आर्मी वॉर कॉलेजनें या बाबतींत संशोधन करण्याचें मनावर घेतलें. या संशोधनाचा निष्कर्ष असा कीं, युद्धप्रसंगीं ही पलटण कुचकामी ठरली, ही गोष्ट खरी. या नाकर्तेपणाला कांहीं अपरिहार्य कारणें होतीं. या पलटणींत जे नीग्रो सैनिक होते, त्यांजपैकीं शेंकडा ९० टक्के सैनिक दक्षिण राज्यांतील होते. बहुतेकांच्या शिक्षणाची मनस्वी आबाळ झालेली होती. मानसिक चांचणी परीक्षेंत त्यांचा अनुक्रम सर्वांत खालचा लावलेला होता. त्यांची शैक्षणिक पातळी जवळपास असून नसल्यासारखीच होतीं आणि बौद्धिक वाढ त्याचप्रमाणें मागासलेली. त्यामुळें युद्धयोग्य असें शिक्षण या पलटणींतील सैनिकांस देणें प्रायः अशक्यच होतें. त्याशिवाय पूर्वग्रह आणि पक्षपात जारी असल्यामुळें बहुसंख्य सैनिकांचा उत्साह अगोदरपासूनच खचल्यासारखा होता. आणखी भरीस भर म्हणून या पलटणीस खालच्या दुसऱ्या दर्जाची अपमानास्पद वागणूक देण्यांत येत होती. ज्या वरिष्ठ दर्जाच्या गोऱ्या अधिकाऱ्याच्या हाताखालीं ही पलटण होती आणि ज्यानें अनेक अपेशी लढायांच्या प्रसंगीं या काळ्या पलटणीचें नेतृत्व केलें होतें, त्यानें बऱ्याच वर्षांनंतर जो कबुलीजबाब दिला, तो ध्यानांत घेण्यासारखा आहे. त्याचें म्हणणें असें कीं याच परिस्थितींत अशिक्षित निर्बुद्धांची गोरी पलटण असती, तर तिचें वर्तन काळ्या पलटणीपेक्षां कांहीं वेगळें झालें नसतें.

मानसिक चांचणी परीक्षेंत नीग्रो लोकांचा कस पुष्कळ वेळां कमी दिसला, ही गोष्ट अगदीं खरी. या घटनेचें कारण परिस्थितींत शोधावें कीं तें आनुवंशिक समजावें, याविषयीं बरेच मतभेद सर्वत्र प्रचलित होते. कांहींच्या मतें शेंकडों वर्षांच्या दुर्दैवी अवस्थेचे ते बळी होते व इष्ट दिशेनें अवस्थांतर झालें, तर इष्ट तें फलित निष्पन्न होऊं शकेल. तर कांहींच्या मतें नीग्रो वंशच पूर्णपणें निर्बुद्ध आहे आणि नीग्रोंच्या आनुवंशिक निर्बुद्धतेंत बदलत्या वातावरणामुळें मुळींसुद्धां फरक होण्याचा संभव नाहीं. या मतभेदाच्या प्रश्नाचा एकदां कायमचा निकाल लावण्यासाठीं म्हणून संशोधकांनीं काळ्या-गोऱ्यांच्या व दक्षिणोत्तर रहिवाशांच्या चांचणी-पत्रिका संपादून अभ्यासिल्या. संशोधकांच्या एतद्विषयक अहवालानें अनेकांच्या पूर्वग्रहदूषित समजुतींस हादरा दिला. कित्येकांस विनाकारण असें वाटत होतें कीं, जन्मतःच नीग्रो गोऱ्यांच्या मानानें बुद्धीनें कमी असतात. पण या अहवालानें असें दाखवून दिलें कीं दक्षिणेंतील गोऱ्यांच्यापेक्षां उत्तरेंतील नीग्रो बुद्धिमत्तेनें अधिक आहेत. केवळ योग्य ती संधि योग्य वेळीं उपलब्ध होत नसल्यामुळेंच नीग्रोंची कुचंबणा होत आहे. अन्यथा कोणत्याहि क्षेत्रांत योग्य संधि मिळतांक्षणीं तो गोऱ्यांच्या बरोबरीनें कर्तृत्व करून दाखवील. तात्पर्य, बुद्धीनें काळेगोरे सारखेच होत, असा या अहवालाचा एकूण निष्कर्ष. तो पुराव्यानिशीं सिद्ध झाल्यावरसुद्धां, इतर उद्योगधंद्यांतील नेते जसे आडमुठेपणाचें धोरण अनुसरत होते, त्याचप्रमाणें गोऱ्या लष्करी अधिकाऱ्यांचें प्रस्तुत संबंधांतील वर्तन होतें. जन्मदत्त वैगुण्यानें नीग्रोंचें जीवित कलंकित आहे, गोऱ्यांच्या मानानें नीग्रो सर्वतोपरींनीं उणा आहे, ही त्यांच्या मनांतील गैरसमजूत कांहीं केल्या नाहींशी होत नव्हती.

१९३९ सालीं कॅप्टन अँथनी सी. मॅकऔलिफ हा एका आर्मी वॉर कॉलेजच्या एकीकरण विषयक चौकशी समितीचा सभासद होता. या समितीच्या चौकशीचा अहवाल एकीकरणास सर्वस्वीं विरोधी होता. सैन्यांतील वांशिक पक्षपाताच्या विभाजक धोरणाचें या समितीनें निःसंदिग्ध समर्थन केलें होतें. मध्यंतरींच्या काळांत दुसरें महायुद्ध सुरू झालें. कॅप्टन मॅकऔलिफ युरोपच्या रणभूमीवर जाऊन थडकला. आघाडीवरील एका पलटणीचें नेतृत्व करीत असतांना जर्मन लष्करानें त्याच्याकडे शरणागतीची मागणी केली.

तेव्हां त्यानें ' हुडुत ' ( ' नटस् ' ) म्हणून उत्तर पाठविलें, तें युद्धेतिहासांत गाजलेलें होतें. आतां तो मेजर जनरलच्या हुद्यावर होता आणि एका पायदळ–पलटणीचें नेतृत्व करीत होता. त्याच्या हाताखालीं लढणाऱ्या गोऱ्या तुकडींतील कित्येक सैनिक ठार किंवा जायबंदी झाल्यामुळें त्यांची जागा घेण्यासाठीं मॅकऔलिफनें त्याच तुकडींत नीग्रो सैनिकांची भरती करण्याचें ठरविलें. शत्रूवर हल्ला करतेवेळीं रणगाड्यांवर त्यानें नीग्रो सैनिकांची योजना केली. आणि त्यांच्या संरक्षणासाठीं गोरे पायदळ सैनिक दिले. या संयुक्त फौजेनें ' अजिंक्य ' सिगफ्रीड लाइन आवेशानें तोडली आणि शत्रूच्या मुलुखांत घुसून चाल केली. नंतर या फौजेची छावणी एका लहानशा जर्मन गांवठाणांत पडली, तेव्हां अगदीं वेगळ्या परिस्थतींत या फौजेचें दर्शन त्याला घडलें. या संबंधांत नंतर तो म्हणाला, ' मी पाहिलें, तर काळेगोरे मित्रभावानें वागत होते. एकत्र बसून स्वयंपाक करीत होते. एकाच थाळींतून काळेगोरे खात होते. एका सुरांत गाणीं म्हणत होते. हें दृश्य बघतांक्षणीं माझ्या मनाची खात्री पटली कीं फौजेंत काळेगोरे सैनिक सुखानें एकत्र नांदतील. ' पण त्या वेळीं मॅकऔलिफला पुढील भविष्याचें स्वप्न दिसलें नव्हतें. कांहीं वर्षें उलटून गेल्यावर लष्करांतील फौजेच्या सर्व विभागांत काळ्यागोऱ्यांचें एकीकरण करण्याचें धोरण आंखण्यांत आलें, तेव्हां या धोरणाची अंमलबजावणी करण्याचें काम याच मॅकऔलिफच्या हातीं सुपूर्द करण्यांत आलें ! एकीकरणयोजनेचा प्रमुख सूत्रधार म्हणून त्याची नियुक्ति करण्यांत आली होती ! !

दुसऱ्या महायुद्धांतील प्रारंभींच्या काळांत वैमानिक दलांत नीग्रोंची भरती करण्यास फौजी अधिकाऱ्यांनीं नकार दिला होता. नीग्रो सैनिक पायलटच्या कामास नालायक आहेत, अशी समजूत त्या काळांत सर्वत्र प्रचलित होती. पण नंतर ९९ व्या फायटर स्क्वॉड्रननें नवा इतिहास घडविला. टक्सेगी आर्मी एअर बेस आलाबामा येथें होता. तेथें या वैमानिक पथकाचें सर्व शिक्षण झालें. या पथकांत एकूण एक सर्व सैनिक नीग्रो होते. कालांतरानें हेंच पथक ' ३३२ वा फायटर ग्रूप ' नांवानें ख्यात झालें. या नीग्रो पथकाच्या कर्तृत्वानें सर्व पूर्वग्रह साफ उलथून पाडले. १९४३ सालीं त्या वेळच्या – कर्नल आतां जनरल–बेंजामिन डेव्हिस ज्यूनिअर याच्या

नेतृत्वाखालीं हें पथक युद्धभूमीवर पाठविण्यांत आलें. कर्नल डेव्हिस हा वेस्ट पॉईंट ग्रॅज्युएट लष्करांतील एकमेव नीग्रो जनरलचा मुलगा. हें वैमानिक पथक प्रथम आंझिओ किनाऱ्यावर कामास लागलें. तेथील त्याचें कर्तृत्व डोळे दिपविण्यासारखें होतें. तदनंतर थेट बर्लिनवर या पथकांतील विमानांनीं धडाकून बॉम्बफेक केली. या वैमानिक युद्धाच्या अहवालांत सुप्रसिद्ध ‘ टाइम ’ नियतकालिकानें स्वच्छ लिहिलें–‘ या नीग्रो वैमानिक दलाचा पराक्रम अभिमानास्पद होता. कोणत्याहि फौजेस भूषणभूत होईल, असेंच य पथकाचें अलौकिक कर्तृत्व होतें. तेथें या पथकानें जे अपूर्व दिग्विजय मिळविले, त्यामुळें फौजेंतील एका दुष्ट पूर्वग्रहास कायमची मूठमाती दिली गेली आहे. ’

३३२ व्या फायटर ग्रूपमध्यें कॅप्टन वेंडेल ओ. प्रुइट हा वैमानिक आपल्या साहसी उड्डाणामुळें विलक्षण ख्याति पावला होता. १९४४ सालीं सेंट लुई येथें त्याचा भव्य सत्कार करण्यांत आला. या सत्कारप्रसंगीं प्रुइटची स्टुअर्ट सिमिंग्टनशीं गांठ पडली. सिमिंग्टन हा एक ख्यातनाम उद्योगपति होता. आणि मेयरच्या वांशिक-संबंध-समितीचा सभासद होता. सिमिंग्टन प्रुइटला म्हणाला : ‘ ज्या देशांत तुझा जन्म झाला, त्याच देशांत माझा पण जन्म झाला, याचा मला मोठा अभिमान वाटतो. बोल मित्रा, तुझ्यासाठीं मी काय करावें, अशी तुझी इच्छा आहे ?

‘ माझ्या लोकांना संधि द्या. ’–प्रुइट म्हणाला.

तदनंतरच्या पंधरवड्यांत टक्सेगी येथें एका दुर्दैवी विमान–अपघातांत कॅप्टन प्रुइट ठार झाला. पण त्या शूर नीग्रो वैमानिकाचें बोलणें सिमिंग्टन कधीं विसरला नाहीं. १९४७ सालीं राष्ट्राध्यक्ष ट्रुमनच्या मंत्रिमंडळांत सिमिंग्टन सेक्रेटरी ऑफ दि एअर फोर्सच्या जागेवर काम करूं लागला. आपल्या खात्याचा अधिकार हातीं घेतल्याबरोबर त्यानें पहिली गोष्ट कोणती केली असेल, तर ती म्हणजे पक्षपात–विरोधाची मोहीम त्यानें दणक्यांत उघडली. फौजेंतील इतर सर्व क्षेत्रांस अनुकरणीय ठरेल अशी एक आदर्श एकीकरण–योजना त्यानें धडाकून कार्यवाहींत आणली. दैवयोग असा कीं प्रुइटच्याच सुप्रसिद्ध ३३२ व्या वैमानिक पथकापासून एकीकरण योजनेचा

शुभारंभ करण्यांत आला. हें वैमानिक पथक त्यावेळीं ओहिओ येथील लॉकबोर्न एअर बेस ठाण्यावर मुक्काम ठोकून होतें. आपल्याच पथकापासून एकीकरण योजनेची सुरुवात होणार, असें कळल्यावर त्या पथकांतील ३०० सैनिक मनांत अस्वस्थ झाले. कदाचित् काळ्या–गोऱ्यांच्या संयुक्त पथकांत काळ्यांचा योग्य तो मान राखला जाणार नाहीं किंवा कदाचित् गोऱ्यांच्या तुलनेनें आपलें कर्तृत्व उणें पडण्याचा संभव आहे, असें एक नवेंच भय त्यांच्या मनांत निर्माण झालें. प्रत्यक्षांत जें कांहीं घडलें, तें मात्र सर्वस्वीं अनपेक्षित पण मनस्वी आशादायक असें होतें. एकीकरण योजनेची आंखणी काळजीपूर्वक संपूर्ण झाल्यानंतर या नीग्रो पथकांतील सैनिक जगभर दूर दूर सर्वत्र पाठविण्यांत आले आणि अल्पावधींतच नीग्रोंच्या वांटयास सर्वस्वीं अनपेक्षित अशीं नवीं नवीं अधिकारपदें आलीं. पूर्वींच्या पक्षपाती विभक्त सैन्यव्यवस्थेंत जें कधींच शक्य झालें नसतें, तें आतां या नव्या योजनेंत आकारास आलें. उदाहरणार्थ, पूर्वीं अवघ्या वैमानिक दलांत फक्त एकच नीग्रो कर्नल होता, तर आतां एकूण चार नीग्रो कर्नल्स अधिकारावर आले!

ता. २६ जुलै १९४८ रोजीं राष्ट्राध्यक्ष ट्रुमननीं आपलें सुप्रसिद्ध फर्मान काढलें. या फर्मानांतील आदेश स्पष्ट होता–'लष्करांतील सर्व सशस्त्र सैनिकांस समान संधि व वागणूक मिळेल. वंश, वर्ण, धर्म किंवा मूळ राष्ट्रीयत्व विचारांत न घेतां सर्व सैनिकांस सैन्यामध्यें समान लेखण्यांत येईल.' हा आदेश सर्वत्र सक्तीनें अंमलांत आणला जात आहे, अशी खात्री पटवून घेण्यासाठीं ट्रुमननीं चार्ल्स फाहींची नव्या योजनेचा नियंत्रक म्हणून नेमणूक केली. फाहीचा जन्म जॉर्जि या राज्यांत झाला होता. त्याचें शिक्षण तेथेंच झालें होतें आणि या वेळीं वॉशिंग्टनमध्यें एक अग्रगण्य अॅटॉर्नी म्हणून तो विख्यात होता. फाहीनें व त्याच्या सल्लागार समितीनें या आदेशाचा भंग करणारे गुन्हेगार शोधून काढण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली आणि ट्रुमननीं प्रत्येक बाबतींत त्यांचा पाठपुरावा केला. निग्रहपूर्वक या नव्या धोरणाची अंमलबजावणी करण्यांत आली. कोणी अधिकारी त्या धोरणास विरोध करीत आहे, किंवा अंमलबजावणीच्या कामीं विलंब लावीत आहे, असें आढळून आलें, तर तात्काळ त्या अधिकाऱ्यास बडतर्फ करण्यांत येई. हें सर्व खरें, पण याच वेळीं जर कोरियांतील युद्ध भडकलें नसतें, तर

तज्ज्ञांच्या मतानें सैन्यांतील एकीकरण संपूर्ण यशस्वी होण्यासाठीं निदान दहा वर्षें तरी वाट बघावी लागली असती.

पूर्वी एकदां जर्मनींत घडलें, त्याचप्रमाणें या वेळीं युद्धाच्या दडपणामुळें सैन्यांतील इष्ट ती सुधारणा तडाख्यांत घडून आली. यालू नदीवरील दुर्दैवी संग्रामांत अमेरिकन सेनेस माघार घ्यावी लागली. त्यावेळीं नवव्या पायदळ पलटणींतील शेकडों गोरे सैनिक कामास आले. गोरे सैन्य आघाडीवर लढत होतें, तर नीग्रो सैनिकांच्या तुकडचा मुद्दाम रसद पोहोंचविण्याच्या कामीं गुंतविण्यांत आल्या होत्या. लढण्याव्यतिरिक्त अन्य सर्व प्रकारचीं कामें नीग्रो सैनिकांस देण्यांत आलीं होतीं. कारण गोरे युद्धनेते अजूनपर्यंत, काळे लोक लढाईंत बेभंरवशाचें, असा जप करीत बसले होते. मध्यंतरीं गोरे सैनिक आघाडीवर मरत होते वा जायबंदी होत होते. त्यांची जागा भरून काढण्यासाठीं आवश्यक ती कुमक उपलब्ध होत नव्हती. अशा परिस्थितींत प्रत्यक्ष रणांगणावर उपस्थित असलेल्या सेनाधिकाऱ्यांनीं गोऱ्या पायदळ फौजेंत नीग्रो सैनिकांची भरती करण्याचें ठरविलें. त्यांच्या मनांत भीति होतीच कीं कदाचित गोऱ्या सैनिकांच्या मनावर काळयांच्या सहवासाचा प्रतिकूल परिणाम होईल. अर्थातच ही भीति सर्वस्वीं निराधार ठरली. कारण संख्येनें प्रत्यहीं कमकुवत होत चाललेल्या गोऱ्या सैन्यास लढण्यासाठीं समर्थ व उत्सुक असलेले कोणतेहि सैनिक बचावासाठीं चालण्यासारखे होते. मग त्यांचा वंश वा वर्ण कोणताहि असो. त्याची फिकीर करण्याचें त्यांना कारण नव्हतें.

कोरियन युद्धाचा अग्रगण्य इतिहासकार जनरल एस्. एस्. मार्शल यानें प्रस्तुत संदर्भातील नव्या अनुभवाचें मोठ्या उत्साहानें वर्णन केलें आहे. तो लिहितो, ' कोरियामध्यें विजय मिळाला, तो पराजयाच्या परिणामीं. रणांगणावरील गोऱ्यांच्या तुकडयांत सशस्त्र सैनिकांचा भयंकर तुटवडा होता. अशा स्थितींत गरजेच्या पोटीं काळया-गोऱ्यांचें एकीकरण करणें आवश्यक झालें. तोफांच्या भडिमारांत काळे-गोरे खांद्यांना खांदे भिडवून शर्थीनें लढले. योग्य ती संधि उपलब्ध होतांच नीग्रो सनिक धडाडीनें आघाडीवर धांवले आणि मोठ्या शौर्यानें त्यांनीं निकराचा लढा दिला. अडतीस पॅरॅरलच्या उत्तरेकडील अनाम पर्वतश्रेणींत कांहीं संयुक्त फौजांनीं अतुल

निर्धारानें व अप्रतिहत शौर्यानें मुकाबला केला, म्हणूनच आपल्या कार्य-पद्धतीत एका राष्ट्रास क्रांतिकारक बदल करणें हितावह वाटलें. आणि-बाणीच्या प्रसंगीं एक राष्ट्र शहाणपणा शिकलें, ही घटना सुदैवाची होय. आपलें धोरण बरोबर आहे, अशी खात्री एकदां अनुभवानें पटल्यानंतर एकीकरणाच्या धोरणाची अंमलबजावणी सैन्याच्या सर्व विभागांतून कसोशीनें करण्यांत आली.

जगांतील सर्वच सैन्यें केवळ वरून आलेल्या हुकुमांची तत्परतेनें तामिली करतात. त्या दृष्टीनें सर्वच सैन्यें हुकुमशाहीच्या नियंत्रणांत सर्वथा असावीं लागतात. अशा स्थितींत संपूर्ण लोकशाहीचें निदर्शन प्रथम सैन्यांत व्हावें व नागरिकांस प्रस्तुत निदर्शनामुळें उचित तें मार्गदर्शन प्राप्त व्हावें, हा विरोधाभास लक्षणीय आहे. समजा, मिसिसिपीच्या एका तरुण माणसास जन्मापासून नीग्रोद्वेषाचें बाळकडू मिळालें आहे. तो सैन्यांत दाखल होतो आणि बराकींत नीग्रो सैनिकांच्या सहवासांत आपणांस रात्रंदिवस काढावे लागणार आहेत, असें त्याला आढळून येतें. प्राप्त परिस्थितींत तो कांहीं दुर्वर्तन करील ? वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे निषेध प्रगट करील ? किंवा अन्य कांहीं रीतीनें आपल्या मनांतील घृणा व्यक्त करील ? तुम्हांला काय वाटतें? या प्रश्नाचें उत्तर ‘ नाहीं ’ असें आहे. एखादाच अपवाद वगळला, तर असें दिसून येतें कीं तो कांहींच करीत नाहीं. असें कां घडतें ? सैन्यांतील एक वरिष्ठ अधिकारी याबाबत असें सांगतो–‘ सैन्यांत दाखल झालेला तरुण जवान ज्याप्रमाणें पहांटे ५–३० वा. उठतो आणि कामास लागतो, त्याचप्रमाणें नीग्रोच्या सहवासांत राहण्याचें तो पत्करतो. सैन्यांतील शिस्त अशीच असते. ’

संमिश्र सैन्यांत दाखल झाल्यामुळें स्वाभाविकच नीग्रो सैनिक स्पर्धेच्या ईर्ष्येनें अधिक चांगलें काम करतो. कारण येथें गोऱ्यांच्या बरोबरीनें आपण काम करूं शकतों, हें त्याला स्वतःस व जगास दाखवून द्यावयाचें असतें. स्पर्धावृत्तीमुळें नीग्रोचें कर्तृत्व पणास लागतें, असा दावा अनेक लोक करतात आणि बव्हंशीं तो खरा आहे. उलटपक्षीं असेंहि सिद्ध करून दाखवतां येईल कीं नीग्रो सैनिकांच्या सहवासांत गोरे सैनिक अधिक कर्तव्यदक्ष होतात. प्राप्त परिस्थितीची ही प्रतिक्रिया स्वाभाविक आहे. कदाचित् असें असण्याचा संभव आहे, कीं पूर्वींसुद्धां अनेक गोऱ्या लोकांस नीग्रोशीं निकट

संबंध जोडण्याची मनांतून इच्छा असे. पण एका बाजूनें नीग्रो आपणांस योग्य ती साथ देतील किंवा नाहीं ही शंका आणि दुसऱ्या बाजूनें परिणामीं गोरे बहिष्कार घालतील, ही भीति; या कैचींत सांपडल्यामुळें गोरे लोक इच्छा असून सुद्धां नीग्रो लोकांपासून दूरदूर राहत असतील. नीग्रोंच्या मनांत हीच शंका व भीति अधिक उत्कटतेनें वास करीत असे. कारण पूर्वी गोऱ्यांचा सहवास म्हणजे हिंसाचारास आमंत्रण, अशीच स्थिति सर्वत्र होती. आज असें निश्चयानें म्हणतां येईल कीं माणसांमाणसांतील संरक्षक तटबंदी आज कोसळून पडली आहे, आणि शतकानुशतकांचें भय बाजूस सारून काळ्या-गोऱ्यांस एकमेकांच्या सहवासांत सैन्यानें लोटून दिलें आहे. प्रस्तुत संबंधांत दक्षिणेंतील एक कट्टर सेनापति म्हणतो– ‘ नागर जीवनांत माणसें कळप करून राहतात. कळप सोडण्याची प्रवृत्ति वाढीस लागली पाहिजे. ’

अमेरिकन सैन्यांत पक्षपाताच्या विरुद्ध युद्ध पुकारून समानतेची आघाडी उघडावी लागली. या प्रयोगांत जो अनुभव गांठीं आला तो येणेंप्रमाणें :— कोणत्या तरी समान संकटाची चाहूल लागली, तर त्या संकटाची तरफ करून वांशिक संबंधांतील अडथळे सहज बाजूला ढकलतां येतात. असें झालें, तर उभय वंशांचे लोक एकत्र येऊं शकतात. एकदिलानें अशक्यप्राय कामें सहज करूं शकतात. सहवास एकमेकांवर अपरिहार्य म्हणून लादला गेला, तरी त्याचे परिणाम उभयपक्षीं इष्ट असेच घडतात. चांगल्या कामासाठीं सक्ति केली, तरी ती सक्ति हितावह ठरते. प्रस्तुत संबंधांत लष्करी शिस्तीची सक्ति होती. ध्येय एकच असलें आणि त्याच्या कारणीं काळे गोरे समानतेच्या भूमिकेवर एकत्र आले, तर परस्परांवर एकमेक अवलंबून असल्याची जाणीव उभयपक्षीं निर्माण होते. त्याचप्रमाणें परस्परांविषयीं विश्वास व आदरभाव आपोआपच वाढीस लागतो. परस्परांविषयीं विश्वास व आदर असेल, तर त्यांतून एकमेकांस समजून घेण्याची व स्वीकारण्याची इच्छा उभयपक्षीं निर्माण होईल, अशी आशा मनांत बाळगावयास हरकत नाहीं. मुळांत वृत्तीच असहिष्णु असेल, तर कायद्यानें तिचा नायनाट करतां येणार नाहीं. पण पक्षपाताचा नायनाट करण्याच्या इच्छेनें जरूर कायदा करतां येईल, आणि परस्परांच्या विकासास अनुकूल असें वातावरण पुरोगामी प्रवृत्तीचे लोक निर्माण करूं शकतील. एकदां दार खुलें झालें आणि मोकळ्या

वातावरणांत परस्परांचा सहवास निकट झाला, तर परिणामीं सद्भावनेनें लोक एकमेकांचा स्वीकार करतील. अखेरीस माणसें वेगळीं असलीं, तरी त्यांच्यांत मूलभूत एकता आहे. भेद वरचेवर आणि साम्य आंतरिक आहे, हें सर्वांच्या ध्यानीं येईल.

संयुक्त सैन्यांत एकत्र लढलेले सैनिक युद्ध संपल्यावर परत घरीं गेले, म्हणजे काय होईल ? समजा दक्षिण राज्यांतील एखादा सैनिक परत घरीं गेला, तर मग काय होईल ? हाच प्रश्न एका गोऱ्या वकिलास विचारला असतां तो म्हणाला कीं, विशेष कांहीं घडणार नाहीं. हें लक्षांत घ्या कीं, हा वकील पक्षपाताच्या आघाडीवर सतत झुंज देतो आहे. पण तरीसुद्धां त्याचें उत्तर फारसें आशादायक नव्हतें. तो म्हणाला : 'युद्धांत दीर्घकाळ गुंतून पडलेले तरुण सैनिक दक्षिण राज्यांतील आपल्या गांवीं परत गेले, तरी अजून वयानें ते तसे लहानच आहेत. घरीं गेल्यावर एकतर आर्थिक दडपणास त्यांना तोंड द्यावें लागेल. शिवाय तेथील वातावरण त्यांना पत्करावें लागेल. सर्व समाजा-त्या वातावरणाशीं समरस होण्याशिवाय त्यांना गत्यंतर नाहीं. सर्व समाजा-विरुद्ध दंड ठोकून ठाण मांडण्याचें सामर्थ्य व स्वातंत्र्य या वयांत त्यांना कोठून लाभणार ? संभव आहे कीं कदाचित्त पुढेंमागें मोठेपणीं पैसाअडका व मानसन्मान प्राप्त झाल्यावर पूर्वायुष्यांतील युद्धानुभव त्यांच्या कामीं येईल ?

पण सैन्यांतील अधिकारी प्रवक्ते अधिक आशावादी आहेत. त्यांचा अनुभव असा आहे, कीं दक्षिण राज्यांतील सैनिक लष्करांत अधिक काळ टिकून राहतात. प्रत्येक वर्षीं शेंकडों सेनानिवृत्त सेनाधिकारी दक्षिणेंत रवाना होत आहेत. त्यांच्यापैकीं कांहीं जण स्थानिक चेंबर ऑफ कॉमर्समध्यें किंवा अशाच दुसऱ्या एखाद्या मानाच्या संस्थेंत काम करतील, अधिकारपदास चढतील आणि मानसन्मान प्राप्त झाला, तर पक्षपाताशीं लढा देण्यासाठीं आपलें सामर्थ्य खर्चीं घालतील. संभव आहे कीं कांहीं थोडे लोक पूर्वानुभव विसरतील, पण पुष्कळ लोक स्मरतील. निदानपक्षीं एवढें तरी म्हणतां येईल कीं, नीग्रो लोकांच्या सहवासांत मोकळेपणानें कांहीं वर्षें काढण्याची संधि प्राप्त झाल्यामुळें नीग्रोंकडे पाहाण्याचा त्यांचा दृष्टिकोण अधिक व्यापक व उदार झाला असेल. लष्करांतील अनुभव दुर्लक्षिण्यासारखा नाहीं.

आणि समजा लोकांत राहून लोकांविरुद्ध बोलण्याची कोणास हिंमत नसेल, तर निदान गुप्त मतदानाचा तरी अधिकार तो बजावणार आहे कीं नाहीं ? ज्या तरुण गोऱ्या सैनिकांचें जीवन नीग्रो सहकाऱ्याच्या पराक्रमावर व कर्तृत्वावर विश्वासून सुरक्षित होतें, आणि–' माझ्यासारखाच तो एक चांगला माणूस आहे '–असें जर तो नीग्रो सैनिकांविषयीं केव्हां तरी म्हणाला असेल, तर घरीं परत गेल्याबरोबर या सर्व गोष्टींचा त्याला विसर पडेल आणि एकदम तेथील आचारविचार तो आपले म्हणेल, असें वाटत नाहीं. संरक्षण खात्याची माजी असिस्टंट सेक्रेटरी ॲना रोझेनबर्ग या प्रश्नाच्या संबंधांत एकदां म्हणाली होती आणि तिचे शब्द निष्कर्षरूप व सूचक आहेत: ' जो माणूस नीग्रो सैनिकाच्या खांद्यास खांदा भिडवून लढला आहे, जीवन-मरणाच्या संग्रामांत ज्यानें नीग्रो सैनिकांची साथ विश्वासानें स्वीकारली आहे, उभयतांचे अनुभव एकरूप आहेत, असा एखादा माणूस घरीं परत जाईल, तेव्हां त्याच्या मनांत समजूत उजाडली नसेल, यावर माझा विश्वास बसत नाहीं. '

सशस्त्र फौजांतील पक्षपात नाहींसा करण्याच्या कामीं आज खरोखर पुष्कळच यश मिळालेलें दिसत आहे. हें खरें असलें, तरी याचा अर्थ असा नव्हे, कीं हें काम कायमचें निकालांत निघालें आहे. वरून एखादा हुकूम मिळाला, म्हणजे खालीं त्याची सरसकट अंमलबजावणी झालेली दिसते, हेंच खरें. पण त्यांत पुन्हा तामिली खुषीची कीं सक्तीची हा प्रश्न उरतोच. आणि सक्ति असेल, तर काम केलें जातें. सैन्यांत तर तसें करण्याशिवाय गत्यंतरच नसतें. पण म्हणून लष्करी फौजांतील पक्षपात समूळ नष्ट झाला आहे, असें समजण्यांत शहाणपणा नाहीं, उलट धोका आहे. एन्. ए. ए. सी. पी.च्या कार्यालयांत आलेलीं नीग्रो सैनिकांचीं पत्रें चाळलीं, तर या बाबतींत अजून पुष्कळच काम मनापासून करावयास हवें आहे, असा निष्कर्ष निघतो. अनेक पत्रांत एक तक्रार वारंवार उमटलेली दिसते ती ही, कीं छावणींतून सैनिक बाहेर पडले कीं लगेच पक्षपाताचा अंमल सुरू होतो. सैन्याच्या अधिकाराची कक्षा जेथें संपते, तेथपासून पक्षपाताचें राज्य सुरू होतें.

वरिष्ठ अधिकाराच्या जागा देण्याबाबत नेहमींच पक्षपात करण्यांत येतो, अशी नीग्रो सैनिकांची तक्रार असते. प्रमोशनच्या संबंधांतील पक्षपात सिद्ध

करणें सोपें नसतें. प्रमोशनबाबत योग्यतेच्या अपेक्षा अनेकविध असतात, आणि स्थानिक सैन्याधिकारी या एका बाबतींत मनास येईल तसें वर्तन करूं शकतात.

पक्षपाती गैरवर्तनाच्या संबंधांतील कांहीं तक्रारी याहून अधिक गंभीर स्वरूपाच्या आहेत. जपानमधील एक नीग्रो कार्पोरल लिहितो कीं त्यानें न केलेल्या गुन्ह्याच्या संबंधांत वीस वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा त्याला अकारण ठोठावण्यांत आली. दुसऱ्या नीग्रो सैनिकाचा आरोप असा आहे कीं मिलिटरी पोलिसांनीं त्याला अमानुष मारहाण केली. कारण कांहीं नाहीं; केवळ तो नीग्रो होता म्हणून. दुसरा एक नीग्रो सैनिक अशी तक्रार करतो कीं त्याची बायको बाळंत झाली, त्यादिवशीं रात्रीं वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्याला मुद्दाम गार्ड ड्यूटीवर डांबून ठेवलें. कधीं कधीं नीग्रो सैनिकांच्या संबंधांत असें पक्षपाती गैरवर्तन घडतें, ही गोष्ट अगदीं खरी आहे. पण तसेंच गैरवर्तन कधीं कधीं गोऱ्या सैनिकांच्या संबंधांत देखील घडूं शकतें.

वर उल्लेखिलेल्या बहुतेक सर्व तक्रारींत तथ्यांश आहे. बहुतरून त्या खऱ्या असण्याचा संभव आहे. पण प्रस्तुत संदर्भांत एक गोष्ट कटाक्षानें ध्यानांत घ्यावयास हवी. बहुतेक सर्व सैन्यांतून अन्यायाचीं उदाहरणें काढून दाखवितां येतील. कधीं नेतृत्व दुबळें असतें. कधीं अधिकाऱ्यांच्या ठिकाणीं योग्य त्या न्यायबुद्धीचा अभाव दिसतो. वैयक्तिक संबंधांत उपेक्षावृत्ति बळावलेली दिसते. आणि अमानुष क्रौर्याचें गैरवर्तन कधीं कधीं सर्वच सैन्याच्या कारभारांत आढळून येतें. वर तक्रारींचा निर्देश केला, त्यांच्या संबंधांत वरिष्ठ सैन्याधिकाऱ्यांनीं लक्ष घातलें, ही गोष्ट पण ध्यानांत घ्यावयास हवी. नीग्रो सैनिकांनीं केलेल्या सर्व तक्रारींचा न्यायबुद्धीनें विचार करण्यांत येतो. सचिवालयांतील एका बड्या अधिकाऱ्यानें प्रस्तुत लेखकास असें आश्वासनपूर्वक सांगितलें कीं गोऱ्यांनीं केलेल्या तक्रारींचा तेथें विचार करण्यांत येतो, त्यापेक्षां अधिक दक्षतापूर्वक नीग्रो सैनिकांच्या तक्रारी अभ्यासिल्या जातात. हें योग्यच आहे. कारण जोंपर्यंत नीग्रोस प्रतिकूल अशा वातावरणांत कारभार चालतो आहे. तोंपर्यंत संशयाचा फायदा नीग्रोस देण्यांत यावा, हें न्यायबुद्धीस अनुसरून उचितच आहे.

छावणी सोडून गेलेले सैनिक सैन्याच्या अधिकारकक्षेच्या बाहेर जें वर्तन करतात, त्याची जबाबदारी सैन्याधिकारी घेत नाहीं; हें खरें असलें, तरी सैनिक सर्वत्र जें वर्तन करतात, त्यावर सुद्धां सैन्याची सक्त नजर असते. सुटीचा मोकळा वेळ समाधानानें घालविण्यासाठीं करमणुकीच्या विविध साधनांची योजना करणें आवश्यक आहे, हें सैन्याधिकाऱ्यांस सर्वस्वी मान्य आहे. आणि म्हणून छावणींतील सर्व करमणूक सर्व सैनिकांस निःपक्षपात उपलब्ध असते. असें असलें, तरी सुद्धां नीग्रो सैनिक कधीं कधीं नीग्रो क्लबांचा बुद्धिपूर्वक आश्रय करतात आणि आपखुषीनें पक्षपाताचे बळी होतात, ही वस्तुस्थिति आहे.

दक्षिण राज्यांतील कित्येक शहरांत नीग्रो सैनिक गोऱ्या सैनिकांत मोकळे-पणानें मिसळूं शकत नाहींत, हें खरें आहे. दक्षिण राज्यांत जे सामाजिक संकेत रूढ आहेत, त्यांजमध्यें कांहीं बदल घडवून आणण्याचा यत्न सैन्य करूं शकत नाहीं. नागर जीवनाचें नियंत्रण सैन्याधिकारी करूं शकत नाहींत. पण कधीं कधीं असें घडतें कीं एखाद्या प्रकरणांत नागरिकांशीं अप्रत्यक्ष संबंध सैन्याधिकाऱ्यांस जोडावा लागतो आणि युक्तीनें कार्यभाग साधावा लागतो. मध्यंतरीं मिसिसिपी राज्यांतील बिलोक्सि गांवांत असा एक प्रसंग घडून आला. मिसिसिपी राज्य पक्षपाती वर्तनासाठीं प्रसिद्ध आहे. बिलोक्सि गांवाबाहेर कीस्लर एअर फोर्सचा वैमानिक तळ आहे.

या तळावर कीस्लर वैमानिकांनीं कांहीं नृत्यसमारंभाचें आयोजन केलें आहे, अशी बातमी बिलोक्सि गांवांतील नागरिकांस मिळाली, आणि योग्य वेळीं गांवांतील तरुण मुलींस पहिल्या नृत्यसमारंभासाठीं आमंत्रण देण्यांत येईल, हें उघडें गुपित सर्वांस माहीत झालें. गोऱ्या मुलींच्या आया आपल्या कन्यकांस तेथें पाठविण्यास तयार होत्या. पण तत्पूर्वीं नृत्यप्रसंगीं तेथें नीग्रो वैमानिक उपस्थित असणार नाहींत, अशी हमी त्यांना हवी होती. आपल्या एका सामाजिक कार्यक्रमावर गोऱ्या मुलींच्या आया अनिष्ट दडपण आणूं पाहत आहेत, ही गोष्ट वैमानिकांस सहन झाली नाहीं आणि त्यांनीं नियोजित कार्यक्रमासाठीं गांवांतील गोऱ्या मुलींस आमंत्रण द्यावयाचेंच नाहीं, असा गुप्त निर्णय घेतला व देशांतील दूर दूरच्या कांहीं गांवांतून विमानानें गोऱ्या मुली वाहून आणाव्यात, असा घाट घातला. वैमानिकांनीं

हें काम कसें पार पाडलें, त्याबाबत अधिकाऱ्यांस अजूनपर्यंत गूढ आहे. पण या कामासाठीं विमानें वापरण्यांत आलीं, तेव्हां त्यांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं, ही एक गोष्ट मात्र खरी. तें कांहीं असो, नृत्यसमारंभाच्या रात्रीं तरुण, सुंदर गोऱ्या मुलींची कमतरता भासली नाहीं. दूरदूरच्या राज्यांतून आलेल्या अनेक सुंदर युवती या समारंभास शोभा आणीत होत्या. बिलोक्सि गांवांतील फक्त नीग्रो तरुणी तेवढया हजर होत्या. दुसऱ्या दिवशीं नीग्रो मुलींच्या आयांनीं गांवभर या यशस्वी कार्यक्रमास प्रसिद्धि दिली. पूर्वरात्रीं गोऱ्या मुली आपआपल्या घरांच्या दारांत चुळबूळ करीत टांचा घाशीत अस्वस्थ उभ्या होत्या. त्यांच्या आयांना आपल्या पूर्ववर्तनाचें आतां मनस्वी दुःख झालें. तदनंतरच्या आठवडयांत आणखी एका नृत्यसमारंभाचें आयोजन विमानतळावर करण्यांत आलें. नृत्यसमारंभ सर्वांस खुला आहे, असें अगोदर जाहीर करून बिलोक्सि गांवांतील गोऱ्या तरुण मुलींस रीतसर आमंत्रण देण्यांत आलें. या वेळीं मात्र गांवांतील एकूण एक गोऱ्या तरुणी गर्दी करून गेल्या. त्या दिवसापासून आजतागायत हा असा प्रश्न फिरून कधीं तेथें उपस्थित झाला नाहीं.

नीग्रो सैनिकांस सैन्याच्या तळावर समानतेची वागणूक सर्वत्र मिळते आणि गोऱ्या सैनिकांच्या बरोबरीनें तेथें त्याला एकूण एक सर्व कार्यक्रमांत भाग घेण्याची संधि मिळते. पण एकदां का तळ सोडून नागर क्षेत्रांत त्यानें प्रवेश केला कीं लगेच पक्षपाताचें भूत त्याला सर्वत्र भेडसावूं लागतें. संरक्षण खात्यांतील नीग्रो सिव्हिलिअन असिस्टंट जेम्स सी. इव्हान्स याचें मत प्रस्तुत संबंधांत मार्गदर्शक ठरावें. तो म्हणतो : 'जीवनाच्या सर्व क्षेत्रांत वांशिक पक्षपात समूळ नाहींसा करण्यासाठीं आज अमेरिका उत्सुक आहे फक्त स्वतःची तशी कबुली देण्याचें धैर्य आज अमेरिकन जनतेंत नाहीं.'

प्रस्तुत विषयाच्या संबंधांतली निकोल्सनें 'ब्रेक थ्रू ऑन दि कलर फ्रंट' नांवाचा एक उत्तम ग्रंथ लिहिला आहे. ( प्रकाशक : रँडम हाऊस, १९५४ ) प्रस्तुत प्रकरणांतील पुष्कळ उपयुक्त माहिती मी त्या ग्रंथांतून आभारपूर्वक संपादिलेली आहे. सशस्त्र लष्करी फौजेंत नीग्रो सैनिकांस गोऱ्यांच्या बरोबरीनें आज वागविलें जातें. त्या संबंधांतील अमेरिकेचा अनुभव निकोल्सनें येणेंप्रमाणें ग्रथित केला आहे:—

...९...

‘ अमेरिकन नीग्रो आज वयांत आला आहे. त्याच्या प्रौढतेची निदर्शक अशी ही सैन्याच्या कारभारांतील निशाणी आहे. अमेरिकन सैन्यांत नीग्रो सैनिकांस आज जें अपूर्व स्थान प्राप्त झालें आहे, तें त्यांच्या कर्तृत्वामुळें होय. जवळपास गेलीं दोनशें वर्षें आपल्या मातृभूमीच्या संरक्षणासाठीं लढण्याचा जन्मसिद्ध हक्क प्रस्थापित करण्यासाठीं त्यांना लढा द्यावा लागला आहे. घोर बदनामी झाली आणि असह्य अन्याय यापायीं सहन करावा लागला, तरी नीग्रो स्त्री-पुरुषांनीं आपली राष्ट्रभक्ति अखंड प्रज्वलित ठेविली. आपल्या प्रतिष्ठेस त्यांनीं कधीं कलंक लागूं दिला नाहीं आणि जेव्हां लष्करी फौजेंतील गोऱ्या सैनिकांच्या रांगा त्यांच्या स्वागतासाठीं दुभंग झाल्या, तेव्हां अभिमानानें व शांतपणानें त्यांनीं सैन्यांतील आपलें स्थान घेतलें. आज नीग्रो सैनिक अमेरिकन सेनेचा अविभाज्य, संयुक्त घटक झालेला दिसत आहे. या घटनेचें श्रेय त्याच्याच कर्तृत्वास द्यावयास हवें. ’

---

जेम्स एच. रॉबिन्सन

# उपसंहार :

गेल्या वीस वर्षांत अमेरिकन नीग्रोंनीं अमेरिकन जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत निःसंदिग्ध अशी जी महान् प्रगति केली आहे, तिची साक्ष या पूर्वीच्या प्रकरणांतील निवेदनावरून वाचकांस पटलीच असेल. अमेरिकन जीवनाशीं एकरूप होण्याचा नीग्रोंचा यत्न उत्तरोत्तर अधिकाधिक यशस्वी होत आहे आणि त्याच्या गतीचा वेग प्रत्यहीं वाढत आहे. नजीकच भविष्यकाळ आशादायक आहे. या काळांत उत्कर्षाच्या दिशेनें केलेले यत्न अधिक उल्लेखनीय ठरतील, यांत कांहीं शंका नाहीं. परस्परांत समजूत निर्माण व्हावी, परस्परांच्या प्रगतीस पोषक असें वातावरण निर्माण करावें आणि परस्परांस न्याय देण्याची प्रवृत्ति वाढीस लागावी, या हेतूनें जे यशस्वी यत्न केले जात आहेत, त्यांचें श्रेय ज्याप्रमाणें अमेरिकन नीग्रोच्या अखंड श्रमकर्तृत्वास द्यावयास हवें, त्याचप्रमाणें लोकशाहीच्या भावनेनें भारलेल्या सर्व धर्मपंथांच्या विचारी गोऱ्या नागरिकांच्या संयुक्त यत्नास हें श्रेय द्यावयास हवें. प्रस्तुत ग्रंथांत यासंबंधीं जें निवेदन व विवेचन करण्यांत आलें आहे, त्यावरून अमेरिकन नीग्रोच्या प्रगतीचा आलेख स्पष्ट निदर्शनास येईल. प्रत्येक व्यवसायांतील उद्योगधंद्यांतील आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांतील कित्येक नामवंत व्यक्ती नीग्रोस न्याय मिळावा, एतदर्थ मनोभावानें झटत आहेत. सर्व नीग्रो लोकांना नागरिकत्वाचे मूलभूत हक्क निरपवाद प्राप्त व्हावेत आणि त्याला समान संधि उपलब्ध करून द्यावी, या हेतूनें त्यांचे यत्न अप्रतिहत चालू आहेत.

२५६५८ वि: नैबध(१३२)
११८२ नों दि: १४-१०-७४

अमेरिकेचे तीन महान नेते—पूर्वाध्यक्ष रुझवेल्ट व ट्रूमन आणि राष्ट्राध्यक्ष आयझनहॉवर यांनीं आपल्या सर्वोच्च अधिकारपदाची शक्ति व प्रतिष्ठा न्याय मागणाऱ्या अमेरिकेच्या पाठीशीं उभी केली आणि अमानुष पक्षपाताचीं पाळेंमुळें खणून काढण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली. अजून सुद्धां अमेरिकन समाजरचनेंत कोठें कोठें पक्षपात प्रभावी दिसतो, हें प्रस्तुत ग्रंथांतील प्रकरणांच्या लेखकांनीं स्पष्टपणें दाखवून दिलें आहे. जोंपर्यंत पक्षपातास पोषक अशा प्रवृत्तीचें दर्शन समाजांत घडत आहे, तोंपर्यंत अमेरिकन श्रद्धेचा मूलाधार असलेल्या नैतिक व लोकशाही तत्त्वांचा द्रोह करणारी पक्षपाती प्रवृत्ति संपूर्ण नष्ट झाली आहे, असें म्हणतां येणार नाहीं. जगांतील विविध राष्ट्रांच्या कुटुंबाची अविभाज्य घटक असलेली अमेरिका सर्व राष्ट्रांशीं सहकार्य स्थापूं इच्छित आहे. राष्ट्रांच्या व पर्यायानें सर्व जगाच्या प्रगतीस जीं ध्येयें उपकारक आहेत. असें अमेरिका मानते, त्या ध्येयांशीं विसंगत वा विरोधी असें वर्तन अमेरिका स्वतःच्याच घरांत चालूं देणार नाहीं. अमेरिकन जीवनांतील अंतर्विरोधाचीं व विसंवादाचीं क्षेत्रें कालांतरानें संकोच पावत आहेत. अमेरिकन समाज ज्या लोकशाही तत्त्वांस बांधलेला आहे, धर्माच्या आणि न्यायाच्या ज्या तत्त्वांवर अमेरिकेची निष्ठा आहे, त्याच तत्त्वनिष्ठेंत विरोधाचा निःपात करण्यास आवश्यक शक्ति, श्रद्धा आणि माणुसकीची भावना अंतर्हित आहे.

नीग्रोच्या प्रगतीस रोखूं पाहणाऱ्या अनेक शक्ती या देशांतच प्रारंभापासून मूळ धरून होत्या. या देशाचा इतिहास कांहीं एक विशिष्ट होता. त्या इतिहासानें माणसांमाणसांत वितुष्ट निर्माण केलें होतें. काळ्यागोऱ्यांतील संघर्ष हा त्याच इतिहासाचा एक अपरिहार्य असा परिणाम होता. या विशिष्ट इतिहासामुळें कित्येक गोरे अमेरिकन नीग्रोविद्वेष आचरणांत आणीत होते. नीग्रो विरोधकांचा एक फार मोठा वर्ग या देशांत अस्तित्वांत होता. त्या वर्गाचें अस्तित्व आतां निश्चयानें लोप पावत आहे. गेल्या वीस वर्षांत अमेरिकेंतील नीग्रो लोकांनीं जेवढें सामाजिक, आर्थिक व राजकीय वर्चस्व पैदा केलें, तेवढें दुसऱ्या कोणत्या एका समूहानें पैदा करण्यांत यश मिळविलेलें दिसत नाहीं. त्याशिवाय नीग्रो जनतेस लोकशाहीचा एक निर्विवाद अधिकार प्राप्त झाला आहे. अर्थातच हाच अधिकार इतर सर्व

लोकसमूहांस आहेच. लोकशाहींत मतप्रचाराचें मुक्त स्वातंत्र्य असतें आणि आपलें गाऱ्हाणें रास्त असल्यास कोणत्याहि प्रतिकाराचें भय मनांत न बाळगतां तें गाऱ्हाणें देशाच्या वेशीवर उघड टांगतां येतें. त्यासाठीं वृत्तपत्रें, नभोवाणी, नाटचगृहें, प्रार्थना मंदिरें, कायदेमंडळें आणि अखेरीस कॉंग्रेसचें सर्वोच्च सभागृह, या सर्वांचा उपयोग प्रचारासाठीं मोकळेपणानें, सामर्थ्यानें आणि निर्भयतेनें नीग्रो लोकांस करतां येतो. अमेरिकन नीग्रोनें आपल्या जीवनमरणाच्या लढ्यांत सुद्धां असाधारण संयम आणि सहनशीलता दाखविलेली आहे. शहाणपणानें आणि श्रद्धेनें प्रगतिपथावर ते मार्गक्रमण करीत आहेत. या लढ्यांत त्यांचा तोल कधीं सुटला नाहीं वा शांतता कधीं ढळली नाहीं. या त्यांच्या उदात्त वर्तनाबद्दल त्यांना धन्यवाद द्यावयास हवेत.

वांशिक संबंधांत मोठ्या वेगानें व्यापक अशी जी सुधारणा होऊं शकली, त्या इष्ट सुधारणेचें श्रेय अमेरिकेंतील गोऱ्या व नीग्रो जनतेस द्यावयास हवें. या श्रेयाचा न्याय्य तो अभिमान अमेरिकन जनतेनें अवश्य वाहावयास हवा. या देशांतील ऐक्यभावना अभंग राखण्यासाठीं शांततेच्या मार्गानें वंशसंबंध सुधारावयास हवेत. परस्परांच्या संबंधांत समजूत, आदरभाव आणि सहकार्य अधिक मोठ्या प्रमाणांत उत्तरोत्तर प्रगट व्हावयास हवें. तसें तें होत आहे, हें उभयवंशांस हितावह, भूषणावह असेंच आहे. सर्व लोकांस स्वातंत्र्याचे सर्व फायदे उपलब्ध करून देण्यासाठीं अमेरिकन जनता आज मोठ्या उत्साहानें बद्धपरिकर झालेली दिसत आहे. अमेरिकेची सदसद्विवेकबुद्धि आज जशी जागृत झालेली आहे, तशी इतिहासांत यापूर्वीं कधींच नव्हती. लोकशाहींतील वाटचाल नेहमींच मंद असते. कारण लोकशाहीचें सरकार सर्व लोकांचें व सर्व लोकांसाठीं असतें. सुधारणावादी सज्जनांस या वाटचालीचा वेग अधिक वाढावा, असें स्वाभाविकच वाटत असतें. त्यांच्या अपेक्षेच्या मानानें लोकशाहीची वाटचाल क्वचित मंद असेल, तरी सुद्धां सर्व लोकांच्या हिताची असलेली ही वाटचाल योग्य दिशेनें, योग्य ध्येयांवर एकटक नजर ठेवून निर्धारपूर्वक चाललेली आहे. लोकशाहीच्या वाटचालींत एकूण सर्व जनतेचें हित सामावलेलें असल्यामुळें वाटचाल मंद होत आहे, याची खंत अमेरिकन नीग्रोंच्या मनांत विशेष सलत नाहीं. कारण लोकशाहीवरील त्यांची श्रद्धा अभंग आहे, याच कारणामुळें कम्युनिस्टांनीं त्यांचा बुद्धिभेद

करण्यासाठीं जंग जंग पछाडले, तरी कम्युनिस्टांच्या भयंकर यत्नामागील हेतु ध्यानांत घेऊन नीग्रो नेहमींच त्यांच्यापासून स्वस्थचित्त राहिले आहेत. कम्युनिस्टांना अमेरिकन नीग्रोचें मन, अंतःकरण, नीग्रोंचा आत्मा जिंकण्यांत यश मिळू शकलें नाहीं, हा कम्युनिझमचा सर्वांत मोठा पराभव होय.

लोकशाही समाजरचनेंत प्रगतीचे आपले सर्व हेतु निश्चयानें सिद्धीस जातील, अशी दृढ श्रद्धा अमेरिकन नीग्रोच्या मनांत स्थिर आहे. स्वतंत्र समाजाचा स्वतंत्र नागरिक या नात्यानें नीग्रोचें भवितव्य उज्ज्वल आहे, याची त्याला मनोमन साक्ष पटली आहे. आणि म्हणून लोकशाहीच्या ध्येयाशीं तो एकनिष्ठ आहे. जेम्स वेल्डन जॉन्सन हा एक सुप्रसिद्ध नीग्रो नेता राजकारणकुशल, मुत्सद्दी आणि लेखक-कवि म्हणून विख्यात आहे. 'Lift Every Voice and Sing' या आपल्या नामांकित कवितेंत त्यानें ही नीग्रोनिष्ठा शब्दाकार केली आहे. या कवितेंत तो म्हणतो,–

*'May we forever stand,*
*True to our God,*
*True to our native land.'*

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों: दि: ......

१०२३६
REFBK-0010236
REFBK-0010236

# आ म चीं वै शि ष्ट्य पू र्ण प्र का श नें

- **माझ्या बाई** : हेलेन केलर ह्या जगप्रसिद्ध अंध स्त्रीनें, तिच्या शिक्षिकेचें लिहिलेलें चरित्र. २ : ५०
- **गजल सम्राट गालिब** : गालिबच्या १०० कवनांचा विद्याधर गोखले ह्यांनीं मराठींत अनुवाद करून लिहिलेलें पुस्तक. १ : ५०
- **लोक आणि लौकिक** : अमेरिकेचें चटकदार व ढंगदार वर्णन जयवंत दळवींनीं आपल्यासाठीं लिहिलें आहे. २ : ५०
- **मुक्ता आणि इतर गोष्टी** : अंबादास अग्निहोत्रींच्या लेखणींतून उतरलेल्या, स्त्रीजीवनावरील वैशिष्ट्यपूर्ण कथा. ३ : ००
- **तात्या देवकुटे** : कल्याणला रहाणारे अग्निहोत्रीनिर्मित तात्या तुम्हांला आपल्यांतीलच वाटतील. २ : ५०
- **माझें क्रांतिजीवन** : माणिकतोळा बॉंबकेसमधील क्रांतिकारक आरोपी बंद्योपाध्याय ह्यांच्या मूळ बंगाली आत्मचरित्राचा वि. गं. देशपांडे ह्यांनीं केलेला अनुवाद. २ : ५०
- **समुद्राची देणगी** : ॲन मॅरो लिंडबर्गच्या सुंदर पुस्तकाचा दुर्गाबाई भागवतांनीं केलेला अतिशय सुंदर अनुवाद. १ : ५०
- **लेनिन** : डेविड शबनें लिहिलेल्या लेनिनच्या चरित्राचा अनुवाद. ३ : ००
- **लिंकन** : अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष लिंकन यांचें चरित्र. १ : ५०
- **परिवर्तन** : फ्रेंड्ली पर्सुएशन ह्या जगप्रसिद्ध कादंबरीचा अग्निहोत्रींनीं केलेला अनुवाद. २ : ५०
- **सैबेरिया ते तिबेट** : पोलिश लेफ्टनंट राविज रशियन तुरुंगांतून पळाला व सैबेरियापासून तिबेटमार्गें कलकत्त्याला आला. त्याच्या धाडसी प्रवासाचें वर्णन. २ : ५०
- **हंगेरियन रोजनिशी** : हंगेरिच्या क्रांतीची रोजनिशी. २ : ००
- **मेरी पीटर्स** : जीवनाच्या ऐन उमेदींत दुःखाचा डोंगर शिरावर पेलणाऱ्या एका झुंजार युवतीची धीरोदात्त कहाणी. १ : २५
- **ह्या देशाचें प्रेम** : अमेरिकन निग्रोच्या उन्नतीसाठीं झालेल्या प्रयत्नांची माहिती. २ : ००

## आगामी

- **आमच्या अविवाहित मातांचा प्रश्न** : २ : ५०
- **कबीराची किमया** : बालवाचकांसाठीं. १ : ५०

## कै ला स प्र का श न :

**१२ त्रिभुवन रोड, मुंबई ४**

प्रमुख विक्रेते : **बॉंबे बुक डेपो, मुंबई ४**